# गोष्टीरूप विनोबाजी

लेखक । साने गुरुजी । परिवर्धक । यदुनाथ थत्ते

साधना प्रकाशन । ४३०।३१ शनिवार । पुणे तीस

प्रकाशक । भाल कोरगावकर
साधना प्रकाशन
४३०।३१ शनिवार
पुणे ३०

© साधना ट्रस्ट । पुणे

मुद्रक । प्रभाकर सिद्ध
साधना प्रेस
४३०।३१ शनिवार
पुणे ३०

मुखपृष्ठ । कु. प्रवीणा अवचट
रेखाचित्रे । ओके

प्रथमावृत्ती । १९४४
पुनर्मुद्रण । ११ सप्टेंबर १९७०

किंमत । पांच रुपये

११ सप्टेंबर १९७०
विनोबा अमृत-महोत्सव

भूमिगत असताना सेवा दलातील मुलांचे भावजीवन संपन्न– समृद्ध व्हावे म्हणून साने गुरुजींनी काही वाङ्मय लिहिले. विनोबांचे चरित्र हे त्यांपैकी एक पुस्तक. १९४४-मध्ये ते प्रसिद्ध झाले. पुस्तकाची नवी आवृत्ती काढताना त्यात सुधारणा करण्याची गुरुजींची इच्छा होती, पण तो प्रसंग आला नाही. गुरुजींची ती इच्छा अपूर्णच राहिली. पुढे मूळ पुस्तकही मिळेनासे झाले. हवेहवेसे असूनही मिळत नव्हते. आज पंचवीस वर्षांनंतर विनोबांच्या अमृत-महोत्सवानिमित्त, ही संस्कारित व परिवर्धित आवृत्ती प्रसिद्ध होत आहे. साने गुरुजींची मूळ पुस्तक लिहितानाच्या वेळची दृष्टी, वृत्ती आणि विनोबांसंबंधीची त्यांची उत्कट भावना ध्यानी घेऊन श्री यदुनाथ थत्ते यांनी हे कार्य पार पाडण्याचा नम्र प्रयत्न केला आहे.

विनोबांचे जीवन एखाद्या विशाल महान सागरासारखे, अनंत प्रवाहांनी दुथडी भरून वाहणारे. किती प्रसंग निवडावेत ! यामुळेच मूळच्या ८०–९० पृष्ठांची संख्या २०० पृष्ठांपर्यंत सहज पोचली. तरी अद्याप खूप राहिल्या-सारखे वाटते.

कवी वसंत बापट यांनी आपल्या एका कवितेत विनोबांचे हे जीवन शब्दांत व्यक्त करण्याचा फार सुंदर, समर्पक प्रयत्न केलाय. म्हणूनच या पुस्तकात त्यांची ती कविता मुद्दाम समाविष्ट केली आहे.

विनोबाजी व साने गुरुजी ह्या दोघा संत पुरुषांचा प्रगाढ समागम ह्या निमित्ताने वाचकांच्या अनुभवाला आला तरी पुस्तक कृतार्थ होईल.

या उभयतांना विनम्र अभिवादन.

— प्रकाशक



अनुक्रमांक



# विनोबा आणि साने गुरुजी

एकोणीसशे तीसच्या चळवळीत साने गुरुजी त्रिचनापल्लीच्या तुरुंगात होते. गोलमेज परिषदेच्या निमित्ताने सर्व सत्याग्रही सुटले. बादशहाच्या दरबारात भारताचा प्रतिनिधी म्हणून, दरिद्रनारायणाचा प्रतिनिधी म्हणून एका नंग्या फकिराला बोलावणे साम्राज्यसत्तेला भाग पडले होते. ह्या घटनेमुळे सत्याग्रहींचा उत्साह दुणावला होता. सत्याग्रहींचे मेळावे भरत होते. खानदेशचा असाच एक मेळावा भरला होता. मुख्य पाहुणे होते विनोबा. साने गुरुजींनी विनोबांना प्रथम पाहिले ते तिथे. विनोबांचे मेळाव्यातील तेजस्वी विचार ऐकून साने गुरुजी प्रभावित झाले. हे काही वेगळेच पाणी आहे, हे त्यांना जाणवले. सत्याग्रहाचे त्यांनी फार मार्मिक वर्णन केले. विधायक कार्याची महती त्यांनी गायली. साने गुरुजींना त्या तेजस्वी, सडेतोड विचारांनी मोहिनी घातली. विनोबांची सर्व भाषणे त्यांनी अत्यंत उत्सुकतेने ऐकली. विनोबांचा पुढे खानदेशात दौरा झाला. गुप्तदान अर्थात खादी, शेतकऱ्यांना सल्ला, जमिनीचा प्रश्न– असे किती तरी विषय विनोबांनी विवेचिले. स्वातंत्र्याचे एक वेगळेच दर्शन त्यांत घडत होते. साने गुरुजींना आपल्या मनातलेच अबोध, सुबोध करून विनोबा मांडीत आहेत असे वाटले. विनोबा गेले तरी त्यांची वाणी साने गुरुजींच्या मनात निनादतच राहिली. त्यांच्या लोकशिक्षणाच्या कार्यात ती प्रतिध्वनित होऊ लागली.

एवढ्यात पुन्हा लढ्याला तोंड लागले. साने गुरुजी धुळ्याच्या तुरुंगात येऊन दाखल झाले. ‘ सी ’वर्गात ते इतरांबरोबर राहिले. किती तरी मुले चळवळीत आली होती. साने गुरुजींच्या विद्यालयातलेही अनेक होते. त्यांच्यात साने गुरुजी रमले होते. त्यांच्या कैवाराने सर्व गोष्टी करीत होते. विनोबांनाही पकडून धुळ्याच्या तुरुंगातच आणले. साने गुरुजी मुलांचे म्होरके बनले होते. तुरुंगातले काहीच काम न करण्याचा ह्या टोळीचा विचार ठरला होता ! जेलर त्यांच्या निश्चयाने हवालदिल झाला होता. त्या निरागस मुलांना आणि आईच्या मायेने त्यांच्याशी वागणाऱ्या साने गुरुजींना कशी सजा करावी, हे त्याला समजत नव्हते. बरे शासन न करावे तर तुरुंगातल्या इतर कैद्यांवर त्याचा काही विपरीत परिणाम होण्याचा धोका होता. विनोबांबद्दल सर्व सत्याग्रहींच्या मनांत वसणारा पूज्यभाव पाहून त्याने विनोबांनाच, अडचणीतून मार्ग

कसा काढावा ते विचारायचे ठरवले. विनोबा म्हणाले, "त्यांना माझ्याकडे पाठवा. मी समजावतो."

आणि साने गुरुजी विनोबांकडे आले. त्यांची ती शालीन, सौजन्यशील मूर्ती विनोबांनी पाहिली. त्यांचे म्हणणे ऐकून घेतले आणि एक तोडगा काढला. जेलला लागणारे पीठ सत्याग्रहींनी स्वेच्छेने दळून द्यायचे आणि जेलरने कोणावरही सक्ती करायची नाही, अशी तडजोड निघाली. उभयतांना ती मान्य झाली. आता साने गुरुजी दळणाऱ्यांच्या तुकडीचे म्होरके बनले ! स्वतःचे दळण ते झपाट्याने पूर्ण करीत आणि इतरांनाही मदत करीत. विनोबा दळणाच्या कामाच्या वेळी क्वचित भेट देत. सर्वांच्या पाठींवरून प्रेमाने हात फिरवीत. त्यांना प्रोत्साहन देत. साने गुरुजींच्या गोष्टी त्यांच्या कानांवर येत. मुलांना आपल्या गोष्टींनी ते कसे रंगवतात, खुलवतात ते त्यांच्या कानी आले. एरवी एका बाजूला राहणारे गुरुजी मुलांच्या मेळाव्यात आले की सर्वांगी फुलून येत. त्यांच्या वाणीचे मार्दव मुलांना एका जागी खिळवून ठेवी. विनोबांच्या कानी ह्या गोष्टी आल्या तेव्हा त्यांनी साने गुरुजींना आग्रह केला की, तुम्ही मुलांना जे सांगता ते लिहून काढा ना ! आणि पाच रात्रींत साने गुरुजींनी 'श्यामची आई' लिहून काढली. जशा आठवणी मुलांना सांगितल्या तशाच त्या लिहिल्या.

सत्याग्रहींसाठी विनोबांची काही भाषणे झाली. विनोबांच्या व्यापक व सखोल अध्ययनाची छाप सर्वांवर पडली. त्यांचे विवेचन कसे नेमके असे ! सत्याग्रही भारावून जात. विनोबा अनेक ग्रंथांचा विवेचनात उल्लेख करीत. एकदा एक सत्याग्रही विनोबांना म्हणाले, "तुमचं विवेचन ऐकलं म्हणजे मन कसं भारावून जातं. तुम्ही नाना ग्रंथांचा विवेचनाच्या वेळी उल्लेख करता. हे ग्रंथ आपल्याला कसे वाचता येतील असं मनात येतं. आमचं शिक्षण मामुली. ना धड इंग्रजी, ना संस्कृत. मन खंतावतं."

विनोबा त्यांना म्हणाले, "साने गुरुजींसारख्यांचं हे काम आहे. त्यांनी करावं हे काम."

विनोबांची ही आज्ञा साने गुरुजींच्या एका कवितेत प्रतिध्वनित झाली. "जगात जे जे सुविचार वारे, मदीय भाषेत भरोत सारे।" अशी आकांक्षा विनोबांच्या त्या निर्देशाने साने गुरुजींच्या मनात अंकुरली आणि पुढे भरघोस फोफावली.

विनोबांनी गीतेवर प्रवचने द्यावी, असा अनेकांचा आग्रह. शेवटी दर रविवारी ही प्रवचने होऊ लागली. साने गुरुजी एका कोपऱ्यात बसून एकाग्र मनाने ती ऐकत, त्यांची टिपणे करीत. त्यावर मनन-चिंतन करीत. ही अठराही प्रवचने होईपर्यंत साने गुरुजी धुळ्याच्या तुरुंगात राहिले आणि नंतर त्यांची बदली नाशिकच्या तुरुंगात झाली. विनोबांची भक्ती आणि ज्ञान यांनी साने गुरुजी भारावले होते. धुळ्याच्या तुरुंगात त्या दोघांत अनिर्वचनीय असे नाते निर्माण झाले. जणू जन्मान्तर स्नेहच ! साने गुरुजींनी 'भारतीय संस्कृती' हा आपला अद्वितीय ग्रंथ यानंतरच्या काळात लिहिला. विनोबांचे ऋण त्यांनी त्या ग्रंथाच्या प्रास्ताविकातच मान्य केले आहे.

तुरुंगातून सत्याग्रही सुटले. साने गुरुजी विनोबाजींना भेटायला वर्ध्याजवळ पवनारला गेले. गेले अतिशय ओढीने, पण तिथे गेल्यावर त्यांना संकोचल्यागत झाले. विनोबांना म्हणाले, "मला तुम्हांला प्रश्न नाही विचारता येत. मी आपला ऐकत राहतो."

विनोबा म्हणाले, "मी सांगावं, तुम्ही ऐकावं, असंच आपलं नातं आहे." त्या रात्री साने गुरुजी एका बाजूला आपली घोंगडी टाकून पडले. एवढ्यात तिकडून विनोबा आले. पाहतात तो साने गुरुजी एका कोपऱ्यात नुसत्याच घोंगडीवर पडलेले! त्यांना राहवले नाही. गुरुजींजवळ ते आले. म्हणाले, "गुरुजी, उठा. घोंगडीवर ही स्वच्छ चादर घालतो, मग झोपा." आणि विनोबांनी आपला स्वच्छ पंचा आणला आणि तो त्या घोंगडीवर घातला.

विनोबाजींकडे साने गुरुजी आले की दोघेच फिरायला जात. मग त्यांच्या गोष्टी होत. विनोबाच बरेचसे बोलत. साने गुरुजी एकाग्रतेने सगळे ऐकत. मध्ये प्रश्न विचारला तर तेवढ्यापुरते उत्तर देत.

विनोबा म्हणाले, "गुरुजी, तुम्ही साहित्य संमेलनात का जात नाही?"

गुरुजी काय सांगणार! तथाकथित साहित्यिक त्यांना साहित्यिक कुठे मानायला तयार होते! साने गुरुजींना खरे म्हणजे खंत होती ती विनोबाजींच्या गीताईसारख्या प्रासादिक रचनेचीदेखील साहित्यबुवांना माहिती नव्हती याची. गुरुजींच्याकडून उत्तर येत नाही असे पाहून विनोबाच पुढे म्हणाले, "गुरुजी, तुमच्यासारख्यांनी तिथं गेलं पाहिजे. श्रीधर-महिपती यांच्या पोथ्यांच्या संक्षिप्त संशोधित आवृत्त्या निघाल्या पाहिजेत. हजारोंची जीवनं त्यांनी घडवली व घडवीत आहेत. तेच अद्याप राष्ट्रीय ग्रंथ आहेत."

पुढे काय करायचे याच्या योजना घडू लागल्या. विनोबांनी साने गुरुजींना विचारले, "पुढे काय करणार?" साने गुरुजींसारखी व्यक्ती राष्ट्रीय चळवळीच्या ओघातच राहावी, त्यांच्यापासून स्फूर्ती आणि संस्कार घेऊन लोकांनी स्वातंत्र्यसैनिक व्हावे, असे विनोबांना वाटत होते. साने गुरुजींसाठी त्यांनी पूर्व–पश्चिम खानदेशच्या सीमेवर नावरा-नावरी येथे एक आश्रम काढून दिला. दोन्ही खानदेशांत गुरुजींनी नवी पिढी तयार करावी अशी अपेक्षा. पण साने गुरुजींचे मन तिथे रमेना; आणि एक दिवस अचानक ते निघून गेले! विनोबांना खबर पोचली. ते सचिंत झाले. पण शोध तरी कुठे घेणार? शेवटी एक दिवस विनोबांना साने गुरुजींचा पत्ता कळला. त्यांनी गुरुजींना लिहिले, "गुरुजी, तुमच्या चिंतेनं व्याकुळ झालो होतो. तुमची ईश्वरावर श्रद्धा. तेव्हा कुठं तरी सुखरूप असाल अशी श्रद्धा होती. तिथलं काम आवडत नसेल तर दुसरं आवडीचं काम हाती घ्या. तुम्हीच म्हणालात म्हणून मी तुम्हांला तिथं बसवलं. ज्याचा त्याचा कल पाहूनच मी सांगतो. 'तस्य तस्याचलां श्रद्धां तामेव विदधाम्यहम्'– खरे ना?"

साने गुरुजींनी त्यांना लिहिले, " कुठं तरी देवासाठी जाऊन बसावं, असं मनात येतं. "

विनोबांनी लगेच उत्तर पाठवले, " कुठं जाणार ? तीर्थांचं पावित्र्यही राहिलं नाही. आणि देव सभोवती नाही का ? आजूबाजूचे लोक म्हणजेच परमेश्वर, अशी माझी भावना नसती तर मी कधीच हिमालयात निघून गेलो असतो ! "

साने गुरुजींचे पत्र यावे असे विनोबांना नेहमीच वाटायचे; पण साने गुरुजींना वाटायचे, विनोबासारख्यांना लिहायचे तरी काय ? मग दिवसच्या दिवस पत्रांशिवाय जायचे. एकदा विनोबांनी त्यांना लिहिले, " दुसऱ्याला आपल्यासाठी तटकळत ठेवणं म्हणजे हिंसाच ! "

पण तरी साने गुरुजींकडून पत्र लिहिले गेले नाही. आता या संकोची स्वभावाला काय म्हणावे, तेच विनोबांना कळेना. मग त्यांनी ' विनोबाचे सप्रेम प्रणाम ' एवढे तीन शब्द लिहून एक पत्र पाठवले. साने गुरुजींना शरमल्यासारखे झाले. एवढ्या मोठ्या माणसाने एवढा लोभ आपल्यावर निरपेक्षपणे दाखवावा आणि आपण त्याची कदर करू नये ! मग साने गुरुजींनी एक मोठे पत्र लिहिले. आपल्या शतभावना त्यात प्रकट केल्या. आपल्या हातून झालेल्या कठोरपणाबद्दल त्यांनी पुनःपुन्हा माफी मागितली. दिलगिरी व्यक्त केली.

स्वातंत्र्यासाठी, दीनदलितांच्या भल्यासाठी धडपडणाऱ्या काँग्रेसबद्दल साने गुरुजींच्या मनात अपार भक्ती. सर्वत्र काँग्रेसचे नाव दुमदुमावे अशी त्यांची तळमळ. त्यासाठी नाना योजना त्यांच्या डोक्यात. फैजपूरला पहिले खेड्यातले काँग्रेसचे अधिवेशन भरायचे ठरले. खानदेशात अधिवेशन भरत होते. काँग्रेसबद्दलचे आपले प्रेम लोकांनी या निमित्ताने सक्रियपणे दाखवावे, असे साने गुरुजींच्या मनाने घेतले. पूर्व खानदेशात म्हणजे जळगाव जिल्ह्यात काँग्रेसचे दहा हजार सभासद करावयाचे, असा साने गुरुजींनी संकल्प केला. आपला संकल्प त्यांनी पत्राने विनोबांजवळ प्रकट केला. विनोबांनी त्यांना लिहिले, " गुरुजी, तुमचं सारं काम विजेसारखं. मनात आणाल तेव्हा वाटेल तितकं काम करता, नाही म्हणजे काही नाही ! सतत व स्थिर काम हवं. वीज क्षणभर— पुन्हा अंधार. स्थिर नंदादीप हवा."

फैजपूरच्या काँग्रेसच्या वेळी महाराष्ट्रातील अवघी स्वातंत्र्योन्मुख शक्ती फैजपूरच्या उभारणीसाठी गोळा झाली. साने गुरुजी होते, विनोबाजीही होते. साने गुरुजी प्रचाराची आघाडी सांभाळीत होते. विनोबा तेथेच तळ देऊन बसले होते. प्रचार करून, थकून भागून गुरुजी परत येत. भाषणांमुळे त्यांचा घसा साफ बसलेला असे. तोंडातून अक्षरही बाहेर फुटू नये, अशी स्थिती. साने गुरुजी किती उरापोटी काम करतात ते विनोबांना दिसे. ते गुरुजी येण्याची वाट पाहात थांबत. साने गुरुजी आले की

त्यांना गाईचे तूप आणि थोडे मीठ घालून ते गरम पाणी प्यायला देत. गुरुजींचा घसा मोकळा होई.

पण एक दिवस साने गुरुजींना यायला फार रात्र झाली. अपरात्री विनोबांना उठवायचा त्यांना संकोच वाटला. आणि त्यामुळे ते तसेच गुपचूप झोपून गेले. दुसऱ्या दिवशी विनोबा गुरुजींना म्हणाले, "गुरुजी, किती वाट पाहिली! का नाही आलात? संकोच वाटला?"

खानदेशातला डिसेंबर महिना. खूप थंडी पडायची. शेकत बसले म्हणजे थंडी जायची. पहाटे त्यासाठी शेगडी पेटवून ठेवीत. लोक थोडा वेळ शेकत आणि ऊब आली म्हणजे कामाला निघून जात. एक दिवस खूपच थंडी पडली होती. प्रार्थनेनंतर यजमानाने निखारे भरलेली शेगडी आणून विनोबांपाशी ठेवली. गुरुजी तिकडे एका कोपऱ्यात दूर बसले होते. ते शेकायला येतील म्हणून विनोबांनी वाट पाहिली. पण गुरुजी संकोचाने तेथेच बसून राहिले. गुरुजी येत नाहीत असे पाहून शेगडी घेऊन विनोबाच साने गुरुजींपाशी आले. म्हणाले, "महंमद पर्वताकडे न आला तर पर्वतानंच महंमदाकडे गेलं पाहिजे, नाही?" विनोबा लहान मुलासारखे निरागस हसले, साने गुरुजी लाजले.

काँग्रेस सरकारे गरीबांसाठी झपाट्याने काही करीत ना, तेव्हा साने गुरुजी अस्वस्थ होत. आपल्या काँग्रेस-पत्रातून त्यांनी सरकारचे वाभाडे काढले, तेव्हा काँग्रेसचे पदाधिकारी गुरुजींवर नाराज झाले. साने गुरुजींनी आपल्या पत्राचे 'काँग्रेस' हे नाव बदलावे असे ते म्हणत. साने गुरुजींना वाटे की जनशक्तीचे दडपण असले तरच पुरोगामी कायदे सरकार करू शकेल. विनोबांचे साने गुरुजींच्या कामाकडे लक्ष असे. काँग्रेस–पत्र ते नियमाने पाहात. साने गुरुजींना गरीबांचा जो कळवळा आहे तो हे लोक समजून का घेत नाहीत, असे त्यांना वाटे.

आणि साने गुरुजींना धुळे तुरुंगातील विनोबांच्या गीता–प्रवचनांची आठवण झाली. आपल्या 'काँग्रेस' पत्रात ती प्रवचने क्रमाने द्यावीत असे त्यांच्या मनाने घेतले. विनोबांना त्यांनी पत्र पाठवून अनुमती विचारली. त्या दोघांतले प्रेमसंबंध इतके घनिष्ठ की विनोबांनी लगेच अनुमती दिली. काँग्रेस–पत्रात ती प्रवचने क्रमाने येऊ लागली. विनोबाजींची ती रसाळ, प्रेरक, प्रासादिक प्रवचने हा काँग्रेस–पत्राला एक अलंकार झाला, आणि विनोबांच्या विचार-भाववैभवाची लोकांना ओळख पटली.

विनोबांचे ग्राम सेवा मंडळातील सहकारी ती प्रवचने छापू पाहात होते, पण त्यांना विनोबांनी अनुमती दिली नाही, ती साने गुरुजींना मात्र दिली!

इकडे महायुद्ध सुरू झाले. इंग्रजांनी भारताला न विचारता-पुसता त्याला युद्धात गोवले. काँग्रेस सरकारांनी निषेध म्हणून राजीनामे दिले. इंग्रजांनी दमनचक्र सुरू

केले. साने गुरुजींचे ‘ काँग्रेस ’ पत्र जनतेत तेजस्वी विचार पसरवीत होते. स्वातंत्र्याच्या लढ्यासाठी लोकांना प्रेरित करीत होते. सरकारने काँग्रेस पत्रावर बंदी घातली. काँग्रेस पत्रावर बंदी आल्यामुळे साने गुरुजींच्या मनाची केवढी तगमग होत असेल या कल्पनेने तिकडे विनोबाजी व्याकुळ होत.

साने गुरुजींनी आपल्याकडे यावे, विश्रांती घ्यावी; ताजेतवाने होऊन परत जावे, असे विनोबांना नेहमी वाटायचे. गुरुजींना नाही म्हणणे अवघड जायचे. ते ‘हो’ म्हणायचे आणि जायचे नाहीत! विनोबा त्यांची वाट पाहायचे. शेवटी विनोबांनी गुरुजींना सांगितले, “ गुरुजी, कोणाला काही कबूल नका करत जाऊ. ‘ बघेन जमलं तर ’ असं म्हणा. खोटेपणाचा दोष नको यायला. कबूल केलेलं पाळवत नसेल तर दुसरा काय इलाज ? ”

साने गुरुजींच्या ‘काँग्रेस’ पत्राची विनोबांना सतत चिंता वाटे. ते गुरुजींना हिशोब विचारीत. म्हणत, “ नुकसानीत पत्र नका चालवू. तुमच्या विचारांची कदर दाखवून लोकांनी खर्च मागवण्याइतकं तरी दिलं पाहिजे. ”

काँग्रेस पत्र बंद झाले आणि गुरुजी बडोद्याला गेले. त्यांना फार शीण झाला होता. ते आजारी होते. पण काँग्रेसवादी युवकांच्या परिषदेसाठी ते नाशिक जिल्ह्यात आले आणि त्यांच्या कडक भाषणांपायी पकडले गेले. पुन्हा धुळयाच्या तुरुंगात त्यांना पाठवण्यात आले !

साने गुरुजी धुळयाच्या तुरुंगात गेले आणि इकडे वैयक्तिक सत्याग्रहातील पहिले सत्याग्रही म्हणून विनोबाजीही तुरुंगात होते. पुढे विनोबा सुटले, पण गुरुजींची सजा दीर्घ मुदतीची, म्हणून ते मात्र तुरुंगातच होते. विनोबाजींची पहिला सत्याग्रही म्हणून निवड झाली तेव्हा साने गुरुजींना किती उचंबळून आले होते. पण आपला आनंद व्यक्त करण्याची त्यांना संधी कुठे होती ! विनोबांनी मात्र सुटल्यावर साने गुरुजींना एक पत्र तुरुंगात पाठवले, त्यांना राहवलेच नाही.

पवनार,
१२ डिसेंबर १९४१

श्री गुरुजी,

तुम्ही बहुधा अजून मंदिरात असाल. आम्हांला सध्या मंदिरातून धक्के मारून बाहेर काढण्यात आले आहे. पाहू त्याचे काय करायचे ते. तुमचे स्मरण किती वेळा आणि किती तीव्रतेने होते ते शब्दांत कसे लिहावे ? आणि त्याची गरज तरी काय ? आणि माझ्या शब्दांत एवढी शक्ती तरी कोठे आहे ?

तुमची–आमची हृदये एकरूप आहेत. अनेक जन्मांचे आपण सोबती आहोत. कसलेही भेद– कल्पनेचे, काळाचे, आणि स्थळाचे– आपणास अलग करू शकत नाहीत. मग भेटीची तळमळ कशाला ? पण कधी कधी होते खरी. आणि हीच माझी मानवता. दुर्बळ पण सरळ; प्रेमळ आणि प्रांजळ.

पण त्यातला दुबळेपणा मी टाकू इच्छितो, पोसू इच्छित नाही. म्हणून अंतर्वृत्तीने जरूर तेव्हा तुमच्याजवळ येऊन जातो, आणि बाह्य भेटीची आकांक्षा आवरतो.

एक वेळ येईल, जेव्हा तुमच्या–माझ्या बाह्य प्रवृत्तीही एकरूप होतील, अशी मी आशा सेवून आहे. सृष्टी मिथ्या म्हणणाऱ्या शंकरादी विचारकांचा हल्ली कित्येकांना राग येतो. मला तर ती वस्तू उघड्या डोळ्याला दिसते. हे बाहेरचे सर्व जग देहासकट पार विरून, विरघळून गेले आहे. आकाशही नाही, अनाकाशही नाही. आणि केवळ, मी एकच एक आत-बाहेर येऊन–जाऊन आहे असे अनुभवते.

ह्या चार ओळी तरी कशाला ? हरीला माहीत !

विनोबाचे सप्रेम प्रणाम.

तुरुंगात आलेले हे विनोबांचे पत्र म्हणजे साने गुरुजींना अपूर्व असा लाभ होता. त्यांना ते पत्र कुठे ठेवू नि कुठे नको असे झाले. किती वेळा त्यांनी तो वाचले, त्याला गणतीच नाही. धुळे तुरुंगातल्या अनंत स्मृतींची त्यांनी या पत्राबरोबर उजळणी केली. त्यांना भावनेचा चारा जणू या पत्राने मिळाला.

आणखीही एक पत्र आले होते. त्यात त्यांनी लिहिले होते, “ चैतन्यमय आत्म्याला चैतन्यमय भेटच शोभते. ”

त्यानंतर बेचाळीसचा लढा सुरू झाला. विनोबा तुरुंगात गेले आणि त्यांनी पत्रे लिहिणे सोडले. साने गुरुजी आधी भूमिगत, आणि नंतर तुरुंगात राहिले. त्यामुळे त्या दोघांची दीर्घकाळ ताटातूट राहिली. दोघांना परस्परांचे स्मरण मात्र सतत होत असे.

बेचाळीसचा लढा ओसरला आणि भूमिगतांबद्दल आक्षेप घेतले जाऊ लागले. तरुणांच्या शौर्याचे, स्वातंत्र्यलालसेचे, असीम त्यागाच्या तयारीचे कौतुक करण्याऐवजी हिंसा-अहिंसेचा तात्त्विक वाद काढून काही नेते त्यांचा तेजोभंग करीत होते. त्यामुळे साने गुरुजींचा आत्मा तडफडे. त्यांनी क्रांतिकारी तरुणांच्या गुणसंकीर्तनाचे जणू नवे व्रतच अंगीकारले ! जेथे जात तेथे त्यांच्या शौर्याच्या गाथा साने गुरुजी ऐकवत. महाराष्ट्र-भर त्यांचा संचार सुरू होता. विनोबा या क्रांतिकारक आणि हौतात्म्यासाठी उत्सुक असणाऱ्या तरुणांबद्दल काय भूमिका घेतील, असा विचार त्यांच्या मनात डोकावून जात असे. पण मन ग्वाही देई की, विनोबा तरुणांचा तेजोभंग कधीच होऊ देणार नाहीत. आणि विनोबा सुटले. “ गुलामीतून देश मुक्त करण्यासाठी ज्यांनी बलिदानाची सिद्धता दाखवली ते धन्य होत ” असा विनोबांचा अभिप्राय जाणून गुरुजी समाधान पावले.

साने गुरुजींना सतत चिंता असायची ती त्यांच्या धडपडणाऱ्या मुलांची. स्वातंत्र्याच्या लढ्यात बिनीवर राहिलेल्या ह्या तरुणांच्या निर्वाहाची काही सोय करून

पुढे येणाऱ्या लढ्यासाठी, विधायक कार्यासाठी एक दल उभे करावे अशी गुरुजींना तळमळ होती. सेवा दल वाढत होते. त्यासाठी सर्ववेळ सेवकांची गरज होती. साने-गुरुजींच्या चाहत्यांनी ठरवले की, एक निधी जमवून साने गुरुजींना अर्पण करावा. झपाटल्यागत तरुण कामाला लागले. ह्या निधीतून तरुण समाजवादी कार्यकर्त्यांना साहाय्य मिळेल अशी धास्ती काहींना वाटली, व त्यांनी ह्या निधीला शह देण्यासाठी काँग्रेसच्या नावाने एक निधी सुरू केला! पण गुरुजींचा निधी जमला. जळगावला त्यांचा सत्कार करावा असा बेत होता. गुरुजींच्या सत्काराला विनोबांपेक्षा अधिक योग्य व्यक्ती कोण मिळणार? विनोबांना विनंती-पत्र गेले. पण काही विघ्नसंतोषी लोकांनी विनोबांनी हे निमंत्रण स्वीकारू नये यासाठी खटपट करून पाहिली. पण विनोबांनी निमंत्रण स्वीकारले. जळगावला प्रचंड सत्कार झाला. विनोबांनी गुरुजींचा गौरव केला. म्हणाले, "साने गुरुजींच्या शतसहस्रांश तळमळ देशाची आम्हांला लागेल तर फार मोठं कार्य होईल!"

साने गुरुजींनी हा निधी कार्यकर्त्यांच्या मानधनासाठी म्हणून श्री अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांच्या हवाली केला; आणि निधीसंबंधीचे आक्षेप किती फोल होते ते त्यांनी दाखवून दिले.

विनोबांच्या बुद्धिपूत विचारांवर साने गुरुजींचा मनःपिंड पोसला होता. विनोबांचे विचार त्यांनी विलक्षण रीतीने आत्मसात केले होते. दोघांच्या हृदयांची स्पंदने सामान्यतः संवादी असत. साने गुरुजींच्या विलक्षण कार्यशक्तीबद्दल विनोबांना गौरव, तर विनोबांच्या निखळ मार्गदर्शनाच्या प्रकाशात कार्य करताना साने गुरुजींच्या अंगात हजार हत्तींचे बळ संचरे. विनोबाजींच्या तळमळीने गुरुजी जळत— तर गुरुजींच्या अंतःकरणातील धग विनोबांच्या जीवनात उमटलेली दिसे.

साने गुरुजींचे वडील बंधू आजारी पडले. आपले सर्व कार्यक्रम थांबवून गुरुजी त्यांच्या सेवाशुश्रूषेसाठी घरी बोर्डीला राहिले. विनोबांना ही हकीकत कळली. गुरुजींना मोठे पत्र लिहिण्याची त्यांची कल्पना. पण त्यांच्या भावाच्या आजाराचे वृत्त वाचून त्यांनी एक पत्र पाठवले.

गुरुजी, २७–७–४५

तुम्हांस पुष्कळ लिहिण्याची इच्छा. मला वेळ मिळेना. थोडे लिहिण्याची इच्छा होईना. शेवटी दिवस निघून जातातसे पाहून दुसरा मार्ग नाइलाजाने स्वीकारला.

पत्रद्वारे विशेष गोष्टी लिहिण्यासारखी सांप्रतची स्थिती नाही. केव्हा तरी भेटण्याची गरज आहे. गरज नसून भेटणे हा जसा दोष तसा गरज असून न भेटणे हाही दोषच. पण ते केव्हा आणि कुठे जमेल हरीला माहीत!

तुमचे बंधू एकटेच असतात का? त्यांची काही सेवा मला घडली तर बरे वाटेल त्यांची हकीकत आणि परिवार ह्याविषयी थोडे विस्ताराने लिहावे.

माझी प्रकृती आता बरी म्हटली पाहिजे. जेलमधील अनुभव, नवीन विचार, संशोधन, पुढील निश्चय इत्यादींसंबंधी भेटू तेव्हा बोलू. तीन वर्षांत बारा वर्षांचे काम केले आहे.

" तू तो माझे मी तो तुझे, ऐक्य झाले तेथे कईचे दुजे
तू तो मी गा मी तो तू गा, अज्ञाने बापुडी नेणती पै गा "

खरे ना?

विनोबांचे पत्र आल्यावर गुरुजींनी त्यांना उत्तर पाठवले. त्याची पोच लगेच विनोबांनी दिली आणि नंतर पुन्हा सविस्तर लिहिले. गुरुजींच्या भेटीची दुर्निवार ओढ त्यांना लागली होती. त्यांच्याशी सतत संपर्क राहावा ही इच्छा. सात वर्षांत गुरुजींची त्यांची भेट नव्हती! ती व्हावी, त्यांच्याशी गप्पा गोष्टी कराव्यात असे त्यांना वाटे. या खालच्या पत्रात गुरुजींकडील वृत्त न कळल्याने आपल्या मनाची कशी विकल अवस्था होते ते विनोबांनी सूचित केले आहे.

गुरुजी, २४–८–४५

तुमच्या पत्राच्या उत्तरादाखल दोन ओळी पत्र तुम्हांला मिळाले असेल. तुमच्या बंधूंच्या रोगाची स्थिती काय आहे, हे थोडे तपशीलवार कळवावे. त्यांच्या सेवेत तुम्ही आहात ते योग्यच आहे. तीतून फुरसत काढून कधी बाहेर जाणे होत असते का? होत असेल पण कोण्या दिवशी तुम्ही कुठे असणार याची मला कल्पना हवी म्हणजे तुमच्या कार्यक्रमाची निश्चित व अनिश्चित रूपरेषा लक्षात राहून तुमच्याशी संपर्क ठेवण्याची काही सोय मला काढता येईल.

गेल्या सात वर्षांत मी तुम्हांला धुळयाला तुरुंगात जो एकदा भेटलो तोच. पण त्या वेळी ते भेटणे नाममात्रच होते. तेवढेही माझ्या समाधानाला पुरेसे होते ही गोष्ट वेगळी. पण आता इतक्या वर्षांची अनुभवांची देवघेव करणे आवश्यक झाले आहे. त्याशिवाय चालणारे नाही, असे वाटते. परंतु त्याचीही मला घाई नाही. ईश्वराच्या योजनेप्रमाणे यथासमय होईल. पण तोपर्यंत तुमच्याकडील वृत्त कळत राहिले म्हणजे पुरे आहे. तदभावी गोड वाटत नाही.

दोन-तीन महिने मध्ये असेच जातात. गुरुजी विनोबांना पत्रे पाठवतात. पण विनोबांकडे जायचे त्यांना जमत नाही. गुरुजींना का संकोच वाटत असावा, असे विनोबांच्या मनात येते. नाही तर भेटीला येण्याची अशी टाळटाळ का? ते गुरुजींच्या

मनातला संकोच दूर करण्याचा प्रयत्न करतात. किती आर्जवाने लिहितात. प्रकृती बरी नाही म्हणून गुरुजी मावशींकडे जायच्या विचारात आहेत असे विनोबांना कळते. साने गुरुजींच्या प्रकृतीबद्दल आपण काही प्रयोग करावेत, असेही विनोबांना वाटते.

दोघांच्या मनांत या वेळी दलितांच्या प्रश्नाने घर केले होते. हरिजनांना समतेची वागणूक द्यायला जो देश तयार नाही त्याने स्वातंत्र्य मागावे ? हरिजनांसाठी दोघांची तळमळ. सीतारामभाऊंच्या हाती या वेळी विनोबा पत्र पाठवतात. त्यांनी प्रत्यक्ष गुरुजींना भेटावे व त्यांचे कुशल वृत्त कळवावे हा उद्देश.

गुरुजी, १८–११–४५

तुमची तारीख ५ व ७ ची पत्रे अनुक्रमे १० व १२ ला मिळाली.

माझ्या कल्पना, भावना शब्दांत मांडण्याचा प्रयत्न करीत आहे.

तुम्हांला एकदा भेटायचे तर आहेच. या वेळी इकडची हवाही बरी असते. तुमची तब्येतही बरी नाही, असे समजले आहे. विश्रांतीसाठी मावशीकडे जाऊन राहण्याची कल्पना तुम्ही दादासाहेबांच्या पत्रात व्यक्त केली आहे. पण काही दिवस इकडे येऊन राहिलात तरी तेच कार्य सहज होऊन इतरही गोष्टी साधतील. तुमचा आमच्यावर भार होणार नाही. तुमच्यावर काही दाबही राहणार नाही.

हल्ली माझी बोलण्याची सवय पूर्वीपेक्षाही कमी झालेली आहे. ऐकतो पुष्कळ. तुमचेही रोज थोडे थोडे सावकाश ऐकून घेईन. विचारविनिमयाची गरज तर आहेच. पण शारीरिक प्रकृतीचाही प्रयोग करू. मंदिरप्रवेशाबाबत काम करण्याचे मी सीताराम-भाऊंना सुचवले आहे. ते कैलासाला जाऊन परत आले.

मी म्हणालो : तुमचा पुनर्जन्म झाला आहे. आता स्वतःची जीवनशुद्धी करा. गीताईचे मनन, चिंतन करा, आणि त्याबरोबर समाजशुद्धीचे कार्य हाती घ्या. काम तीव्रतेने करा. पण शांती सोडू नका. इतकेच नव्हे, पण दिवसेंदिवस शान्ती वाढवा.

त्यांच्याचबरोबर हे पत्र रवाना करीत आहे.

अस्पृश्यतानिवारणासाठी, जातीय ऐक्यासाठी, खादी इत्यादी कार्यासाठी सतत तळमळ चाललेली असते. परंतु आतून इतकी विलक्षण शांती अनुभवतो की तितकी यापूर्वी कधीच अनुभवली नव्हती. कारण असा विश्वास वाटतो की, हे सर्व घडून येणारच आहे. याविरुद्ध सर्व गळून पडणार आहे. कारण ईश्वराला ते हवे आहे. पण त्याची कार्ये सर्व शान्तीने होत असतात. तो आमच्या हृदयाची खळबळ पाहून संतुष्ट होणारा नाही. तो खोली पाहून संतुष्ट होणारा आहे. त्यासाठी तो आमची कसोटी करून राहिला आहे.

साने गुरुजींना सीताराम भाऊ भेटतात. विनोबांचे पत्र देतात. विनोबांचा

आग्रहाचा निरोप त्यांना कळवतात. गुरुजींना वाटते, कशाला जायचे ? काय आपण बोलणार, काय सांगणार ? आणि दलितांच्या प्रश्नाबाबत आता चर्चा करण्यासारखे तरी काय आहे ? तिकडे गांधीजी प्राण पणाला लावून अखंड भारताच्या स्वातंत्र्यार्थ प्रयत्न करीत होते. जातीय वातावरणात माणुसकीचा पडणारा मुडदा त्यांना पाहवत नव्हता ! सर्वत्र घोर निराशा. कुठे रस्त्यात ' गांधी मरोत– नेहरू मरोत ' असे फलक गुरुजींना दिसतात. या देशात का खुनाखुनीचे सत्र सुरू होणार ? अजातीय– अहिंसक संघटना का उभ्याच राहणार नाहीत ? सेवा दल वाढावे, अशी साने गुरुजींना तळमळ लागते. ' सेवा दल हा माझा प्राणवायू ' असे ते म्हणतात. गुरुजींची ही अस्वस्थता तिथे विनोबांना जाणवते. गुरुजींची आपली भेट न झाली तर काही तरी भीषण घडेल, असे विनोबांना वाटते. गुरुजी जर भेटायला येत नसतील तर आपण त्यांना शान्तवायला स्वतःच जावे, असे कितीदा त्यांच्या मनात येते. देशातील परिस्थिती पाहून गुरुजींना जगणे असह्य होईल आणि ते आपला देह विसर्जित तर करणार नाहीतना, असे त्यांच्या मनात येते; आणि तसे काही घडू नये म्हणून ते पुनः पुन्हा गुरुजींना लिहितात.

गुरुजी, २१-३-४६

तुम्ही पुष्कळ श्रम केले. निसर्ग-माउली आता विश्रान्ती देत आहे असे दिसते.

माझे निमंत्रण तुमच्या पाठीशी उभे आहेच. पण मला घाई नाही. इकडे उन्हाळ्याची भट्टी पेटली आहे. आजारी कार्यकर्त्यांना माझ्याकडे बोलावीत असतो. पण भाजत्या हवेत आमंत्रण देणारा वेडा ठरायचा ! सवडीने, सोयीने पाहा. सोनूभाऊ नालवाडीला उपचार घेत आहेत. तुमच्याकडून इतिवृत्त, मनोवृत्त काहीच कळत नाही. थोडी ' माया ' राखावी !

हरिजनांना– आदिवासींना अर्ध–गुलामीत ठेवणाऱ्यांना स्वातंत्र्य मागण्याचा काय अधिकार, असे साने गुरुजींना तीव्रपणे वाटते. समाजातले नाना अन्याय त्यांना असह्य होत. ही विषमतेवर आधारलेली, शोषणावर आधारलेली समाजरचना बदलली पाहिजे, समाजवाद त्वरेने आला पाहिजे, त्यासाठी समाजवादी शीलाचे झुंजार तरुण निर्माण झाले पाहिजेत, असे गुरुजींना वाटते. होत असलेल्या कामाच्या गतीने त्यांना समाधान वाटत नाही. काही तरी पोटतिडिकेचे उपाय हवेत. हरिजनांसाठी गुरुजी नाना तऱ्हेची खटपट करीत असतात. राष्ट्र स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर असताना भेदांचा असा बुजबुजाट असावा, हे त्यांना असह्य वाटते ! गुरुजींनी एखादा पराकोटीचा उपाय करू नये, असे विनोबांना वाटते. ते एक लांब पत्र पाठवतात. त्यांच्याही मनात ह्याच विषयासंबंधी विचारांचे वादळ घोंघावत असते. ते पुन्हा साने गुरुजींना लिहितात.

गुरुजींची पत्रे येत नाहीत, आली तर त्रोटक येतात. खानदेशात परत जायचे गुरुजींच्या मनात घोळत असते. बेचाळीसच्या लढ्यापासून एक अढी खानदेशबद्दल

त्यांच्या मनात बसलेली असते. 'चले जाव' चळवळीपासून अमळनेर काहीसे दूरच राहिलेले असते, आणि त्यासाठी साने गुरुजींनी तुरुंगात एक उपासही केलेला असतो. पण पुन्हा जावे, लोकांना समजवावे असेही मनात येते. विनोबांना गुरुजींचे साहित्य वाचायचे असते. 'पत्री' हा काव्यसंग्रह त्यांनी विनोबांना खुणा करून दिलेला असतो. गुरुजींचे मनोभाव समजण्यासाठी विनोबांना त्याचे इतरही वाङ्मय हवे असते. आणि मग एक सविस्तर पत्र विनोबा लिहितात.

गुरुजी, २४-६-४६

हरिजनांसंबंधी तुम्ही प्रचार करीत आहात ते मला प्रिय आहे. निरंतर प्रचार करीत राहणे हेही एक महत्त्वाचे कार्य आहे. हरिजन बोर्डिंगची जबाबदारी उचलता तेही योग्यच आहे; यद्यपि माझ्या मनाचा कल जातीय बोर्डिंगांकडे वळत नाही. वस्तुतः छात्रालय सर्वांचेच हवे. पण चालू परिस्थितीत जे आहे ते चालविणे ठीकच आहे.

या वेळच्या निवडणुकींमध्ये काँग्रेसचे हरिजन उमेदवार निवडून आल्यामुळे आमची जबाबदारी वाढली आहे हे उघडच आहे. अस्पृश्यता नाहीशी होऊन आमच्या समाजाची शुद्धी लौकरात लौकर होणे अगत्याचे आहे. तथापि अशा बाबतीतही– म्हणजे इतकी निकड असतानाही– आमरण अनशनादी प्रयोगांबद्दल मला अनुकूल भाव नाही; किंबहुना पुष्कळ वेळा अशा प्रयोगांचा माझ्यावर उलटाच परिणाम होऊ पाहतो. नैतिक दाबाचीही एक मर्यादा आहे. त्या मर्यादेपलीकडे तो दाब नेल्यास तो नैतिक न राहता अनैतिक होतो, असा माझा अभिप्राय आहे. आमरण अनशनाचे एक शास्त्र आहे. अहिंसेच्या शस्त्रागारात त्याला स्थान आहे. अस्पृश्यतानिवारणासारख्या कार्यात विशिष्ट परिस्थितीत तो समर्थनीय होण्याची शक्यता आहे. इतके सर्व गृहीत धरून हिंदू जनतेच्या चालू परिस्थितीत माझे हे मत झालेले आहे. हे मी तुम्हांला सावधान करण्यासाठी लिहीत नाही, मलाही सावधान करण्यासाठी लिहीत आहे. कारण या प्रश्नासंबंधी अशीच काही विलक्षण तीव्रता मला वाटते.

पण तीव्रता कितीही वाटली तरी वस्तुस्वरूप विचारानेच ठरवावे लागते. ते तीव्रतेने अथवा अतीव्रतेने ठरत नाही. हिंदू धर्माच्या, हिंदू आणि हिंदी समाजाच्या चित्ताचा विकास आदीपासून आतापर्यंत कसा होत गेला याचे मला चांगले ज्ञान आहे, असे मी मानतो; कारण तद्विषयक अध्ययन, चिंतन आणि निरीक्षण तीस पस्तीस वर्षे सतत करत आलो आहे. हिंदू धर्माचा विकास, सखोल चिंतन आणि निष्काम तपश्चर्या या दोन साधनांनी झालेला आहे. आत्म्याचे जितके सूक्ष्म चिंतन आमच्या भूमीत झाले आहे तितके अन्यत्र झाल्याचे तटस्थ बुद्धीने पाहता दिसत नाही. आत्म्याची अकर्तृता हा एक शिरोमणी सिद्धान्त हिंदू धर्माने शोधला आहे. त्यावर प्रयोग करण्यात म्हणजे तपश्चर्येने त्याची अनुभूती करून घेण्यात हिंदू धर्माची शक्ती इतिहासभर खर्च झालेली आहे. त्यातूनच अहिंसा, अनाक्रमणशीलता, सार्वभौम अविरोध ही प्रमेये निघाली आहेत. प्राण्याची हिंसा टाळण्यासाठी यज्ञ, यज्ञातील हिंसा

टाळण्यासाठी यज्ञ-निषेध, यज्ञाचा उच्चतर अर्थ, सर्व यज्ञांतील संन्यास वृत्ती इ. अनेक महान संशोधने सुदीर्घ कालपर्यंत केली गेली आहेत.

अस्पृश्यतानिवारण हे जर असेच शुद्धीचे साधन व्हायचे असेल तर ते अशाच संशोधन-प्रक्रियेने होईल उलट मी अशीही माणसे पाहतो की, जी म्हणतात, " आम्हांला कसलाच भेद नाही. आम्ही मासेही खाऊ शकतो. गोमांसही खाऊ शकतो. कोणाच्याही हातचे खाऊ शकतो. आमच्या कुलात या साऱ्या मर्यादा होत्या, पण आम्ही त्या झुगारून दिल्या आहेत. " हे अस्पृश्यतानिवारण ! याला जर तो शब्द लावणे योग्य असेल तर हिंदू धर्माच्या शुद्धीला ते कुचकामाचे आहे.

चित्तशुद्धिकारक अस्पृश्यतानिवारण करण्याचा, हिंदू धर्माच्या स्वभावाला साजेसा उपाय, आम्ही हरिजन बनणे हा एकच आहे ! असे बनण्यात जे क्लेश होतील, जी तपश्चर्या होईल, ती आम्हांस हवी आहे. तशा प्रक्रियेत अनशनाचाही प्रसंग कल्पिता येतो. पण माझी अशी श्रद्धा आहे की, त्या प्रक्रियेने संशोधन होत असताना अनशनाची गरज निर्माण होण्याची परिस्थिती उभी न होण्याइतका हिंदू समाज विवेकी आहे. हिंदू समाजात बुद्ध, शंकर, ज्ञानदेव, मीरा इ. सत्पुरुषांचा भरपूर छळ झाला आहे, तथापि हिंदू धर्माने एकाही संताला ख्रिस्त किंवा सॉक्रेटिस होऊ दिले नाही !

ही हिंदू धर्मातील जनतेचीच नव्हे तर येथील संतांचीही खुबी आहे. माझ्या नम्र अभिप्रायाप्रमाणे ख्रिस्ताच्या किंवा सॉक्रेटिसच्या बलिदानाचा दोष मुख्यत्वेकरून त्यांच्या त्यांच्या काळच्या त्या त्या जनसमाजाला दिला गेला तरी त्या दोषाचा थोडा वाटा ख्रिस्त व सॉक्रेटिस यांच्याकडेही आहे. ख्रिस्ताच्या व सॉक्रेटिसच्या भाषणांतील तोल सुटलेला आहे असे मला वाटते. अर्थात त्यांच्या कळकळीबद्दल किंवा सद्बुद्धीबद्दल वादच नाही. पण समत्वाची जागा कळकळ घेऊ शकत नाही. याउलट समाजाकडून पुष्कळ त्रास झाला असला तरी समतोल गमावून उच्चारलेला एकही शब्द ज्ञानदेवांच्या सबंध लिखाणात सापडत नाही ! ही खुबी ख्रिस्तात नाही, सॉक्रेटिसात नाही, आणि अहिंसेचा एकनिष्ठ पुरस्कर्ता मानलेल्या टॉलस्टॉयमध्येही नाही.

या विषयासंबंधी इतके विचार माझ्यामध्ये भरलेले आहेत की, लिहायला बसले की, त्याचा ग्रंथच होईल. आणि तशा ग्रंथाची गरज वाटल्यास तो तुमच्याकडूनच मी लिहून घेईन. पण लोक माझ्याकडून आज या विषयावर ग्रंथाची अपेक्षा करीत नाहीत. म्हणून तो काही प्रश्न नाही. याबाबत माझ्या दृष्टीने करता येण्यासारखे मी करीत आहे. पण त्यासंबंधी तूर्त उच्चार नको.

तुम्ही मला पुष्कळ दिवसांत लिहिले नाही. 'काय लिहायचे ?' म्हणता. तुमची मनःस्थिती मी समजू शकतो. पण माझे म्हणणे असे आहे की, तुम्ही नियमितपणे लिहायचे ठरवा. जे काही लिहिले जाईल त्यावर संतुष्ट असा.

माझी प्रकृती चांगली आहे. ईश्वराच्या इच्छेने होईल ते करीत आहे. परिस्थितीविषयी तळमळ वाटते; पण अशान्ती लेशही नाही.

खानदेशात तुम्ही पुन्हा येणार आहात हे चांगले आहे. खानदेशकडे माझे विशेष लक्ष असते हे तुम्हांस माहीतच आहे.

तुमची प्रकाशने अमळनेरहून आली होती. पुढेही येतील. पण मागे 'पत्री'वर तुम्ही खुणा करून दिल्या होत्या, (जे माझे पुस्तक कुणी तरी स्वाधीन केले आहे) त्याप्रमाणे इतर पुस्तकांवरही तुमच्या खुणा असल्या तर मला पाहून जायला सोपे होईल.

गुरुजी, २९-११-४६

तुमचे पत्र मिळाले. तुम्ही लिहिलेले सर्व गृहीत धरूनही तुम्ही इकडे येऊन जावयास पाहिजे, असे माझे आग्रहपूर्वक म्हणणे आहे. दुसऱ्या कोणत्याही कारणासाठी नाही तरी दोनच दिवस राहून निघून गेलात तरी चालेल.

तुमच्या उपवासासंबंधी वर्तमानपत्रात जे काही आले आहे, त्यातले फारच थोडे माझ्या पाहण्यात आले आहे. वर्तमानपत्री टीकेचे मी काही सुखदुःख मानीत नाही.

येथे येऊन विचार-विनिमयाचे अगत्य नसले तर नसो, माझे विचार ऐकून गेलात तरी पुरे. मी वर्तमानपत्रात लिहीत नाही, तुम्हांला माहीतच आहे. पत्रद्वाराही विशेष लिहिण्याची वृत्ती नाही, आणि शक्यताही नाही. म्हणून भेटीशिवाय गतीच नाही. मग तुम्ही येऊ न शकला तर मला यावे लागेल, इतकेच.

येऊ शकलात तर दोन दिवसांसाठी येऊ नका, किंवा दोन वर्षांसाठी येऊ नका. नुसतेच या. आल्यानंतर त्याच दिवशी परतावे असे वाटले, तरी मला हरकत नाही.

येणे शक्य न झाल्यास तसे कळवावे. म्हणजे माझ्या सोयीप्रमाणे तुम्ही असाल तेथे येऊन जाईन.

श्री. सीतारामभाऊंनी मला अतिदुःखित चित्ताने लिहिले आहे. मी सीताराम-भाऊंना असेही सुचवले होते की, गुरुजी येथे येतील तेव्हा तुम्हीही येथे असा. त्यांची आणि इतरांची तुम्ही येथे येऊन जावे अशी तीव्र इच्छा आहे.

काकासाहेब बरवे यांची पत्रके त्यांनी मजकडे पाठविली होती. त्यांची दृष्टी मी समजलो आहे. त्यांना उत्तर मी दिलेले नाही. अप्पा या वेळी अस्वस्थ आहेत. शरीराने फारच दुबळे झालेले आहेत. त्यांनी प्रकृती मजबूत करून घ्यावयास पाहिजे, असे मी त्यांना कळविले आहे. त्यांनी ते स्वीकारले आहे.

बापू या वेळी सर्वच कार्यभार आणि बाह्य आधार सोडून अहिंसेचा प्रयोग करीत आहेत. आमच्या कसोटीची ही वेळ आहे. निराश होण्याची सोय नाही. ईश्वरावर श्रद्धा असणाऱ्या आस्तिक माणसाने निराश तरी का व्हावे? शेवटी सर्व तोच करीत आहे ना? मग मधले आम्ही कोण? आम्ही शरीर धारण करणारे कोण? आणि शरीर फेकून देणारे कोण? शान्त समत्वबुद्धीची गरज कधी नव्हती इतकी आज आपल्या राष्ट्राला आहे. तोल गमावून बोलला गेलेला एक शब्दही या वेळी राष्ट्रघात करू शकतो.

पण या गोष्टीचे भान असावे तितके अजून आमच्या पुढाऱ्यांनाही झालेले दिसत नाही. पण ते त्यांचे कसेही असो, आमचे आम्हांला संभाळायचे आहे.

पंढरपूरचे मंदिर हरिजनांसाठी उघडे नाही म्हणून विनोबांना पंढरीनाथाच्या दर्शनार्थ जाता येत नाही! अरेरे, ज्ञानदेव-एकनाथ-तुकारामांशी साम्यता राखणाऱ्या ह्या महाभागवतालाही विठूराण्याचे दर्शन लाभू नये! किती आम्ही नतद्रष्ट! गुरुजी विनोबांचे अगत्याचे, आग्रहाचे निमंत्रण असूनही त्यांच्याकडे जात नव्हते. त्यांच्याशी काय बोलायचे? कसली चर्चा करायची? सर्व गोष्टी त्यांनी सांगितलेल्याच आहेत. आपल्या कुवतीप्रमाणे आपण त्या मार्गाने धडपडत चालायचे. चर्चा कसल्या? पण विनोबा सतत त्यांच्या हृदयात असतात. विनोबांना पंढरीरायाच्या मुक्तीची लागलेली तळमळ त्यांना जाणवते. ते म्हणतात, "आम्ही आता आमच्या मरणानं प्रचारलं पाहिजे एकेक सामाजिक अन्याय निवारण्यासाठी आत्माहुती देणारे निघाले म्हणजे समाज जागा होईल." आणि पंढरपूरचे मंदिर उघडावे म्हणून कार्तिकी एकादशीपासून ते उपवास करण्याचे एकदम जाहीर करून टाकतात! यंत्र गंजले असले तर प्राणांचे वंगण घालून ते चालते करावे ही कल्पना. पण सेनापती, अच्युतराव त्यांच्याकडे जातात. सहा महिने जनशक्ती निर्माण करू म्हणतात. गुरुजी संमती देतात, आणि मग दौरा सुरू होतो. गुरुजी परोपरीने लोकांना समजावतात, "पंढरपूर म्हणजे महाराष्ट्राचं हृदय. महाराष्ट्राच्या जीवनाची जणू किल्ली! ही कळ दाबली तर महाराष्ट्रभर प्रकाश पडेल. संतांनी पंढरपूरचा महिमा वाढवला. संत बंडखोर होते. कारुण्यसागर होते. वाळवंटात त्यांनी भेदभाव नष्ट केला. त्याच्या पुढचं पाऊल आपण नको टाकायला? पण आपण सहाशे वर्षांत दुसरं पाऊल टाकलं नाही! आपले वंशज असे कसे गतिहीन, काटे असे मनात येऊन संत तडफडत असतील, दुःखानं सुस्कारे सोडत असतील! समानता हा तर धर्माचा आत्मा. जिथं सारे जमू शकत नाहीत ते का देवाचं मंदिर? आपण आपल्या भावांना गुलाम केलं, साऱ्या जगात आपण गुलाम झालो. मी तर अधीर झालो आहे. आता उशीर नको, विलंब नको. सर्व प्रकारच्या गुलामगिरीचं भस्म करून, सर्वांगीण स्वातंत्र्याचं स्वागत करायला हा प्राचीन महान भारत उभा राहो." असा गुरुजींचा धूमधडाक्याचा प्रचार सुरू झाला. सहा महिने संपले. मन्दिराच्या पुजाऱ्यांचा काही निर्णय होईना. गुरुजींना का उपास करावा लागणार? उपास करावा लागू नये, करू नये, असे विनोबांना वाटते. गुरुजींची तळमळ त्यांनाही जाणवत असते. सरकारी मंडळी 'आम्ही कायदा करतोच आहोत. गुरुजींनी आता आततायीपणा करू नये' असे गांधी–विनोबांना सांगतात. गुरुजींना हृदयाचा कायदा हवा असतो. विनोबा गुरुजींना उपासाच्या निश्चयापासून परावृत्त करण्यासाठी दोन पत्रे पाठवतात. चार दिवसांच्या अंतराने लिहिलेली ही पत्रे.

गुरुजी, २५-४-४७

पत्र मिळाले. ह्या आठवड्यात तिघांना आमरण उपवासातून परावृत्त करण्याची कामगिरी मला करावी लागली. तिन्ही हरिजन कार्यासाठी! सर्वांची हृदये तळमळत आहेत. पण तळमळीने भागत नाही. बुद्धियोग लागतो.

तुमच्या बाबतीत निराळी वृत्ती राखावी अशी इच्छा होती. पण दशा पालटली आहे. आणि तुम्हांलाही प्रतिकूल लिहिण्याची पाळी माझ्यावर आली आहे! सहा महिन्यांपूर्वी तुम्ही उपवासाचा संकल्प केलात, त्याहून आज फार वेगळी परिस्थिती आहे. जनमत मंदिरप्रवेशाला अनुकूल झाले आहे. त्याचे श्रेय पुष्कळसे तुम्हांलाच आहे. त्यामुळे मंदिर-प्रवेश बिल शक्य झाले आहे. हे बिल ह्यापूर्वीच का नाही आणले, असे कोणी विचारतात. कारण, लोकमताचा कयास लागला नव्हता. आता तो लागला आहे. त्याचे फलित हे बिल.

लोकमतानुसारी कायदा अहिंसेत येतो. असा कायदा हे केवळ लोकमताचे प्रकाशन मात्र असते. सती कायद्यानेच गेली. पण तो कायदा लोकमतानुसार होता. तीच स्थिती मंदिर-प्रवेशाची आज आहे. म्हणून कायद्याने मन्दिर उघडण्यात गोडी नाही असे अशा कायद्याबाबत म्हणता येत नाही.

कायदा झाला तरी अंमलात येतो की नाही हा सवाल अशा कायद्याबाबत उठू शकत नाही. तो अमलात येणारच आहे. आपणच तो अमलात आणणार आहोत लोकमत बोलून चुकले आहे.

मग हा उपवास कोणासाठी? बडव्यांसाठी? बडव्यांचे आणि आमचे काही विचारांचे नातेगोते असते तर गोष्ट वेगळी. मग काय दोन चार महिन्यांनंतर होणारी गोष्ट आताच व्हावी म्हणून? अशी घाई सुधारकाला आणि सत्याग्रहीला न जमणारी आहे.

मग काय, देवळाचे निमित्त करून एकूण सर्वच हरिजन–प्रश्नांबाबत लोकांची तयारी व्हावी म्हणून? तसे करायचे तर ते एखादे 'निमित्त' करून साधू पाहणे बरोबर नाही. सत्याग्रहाला 'स्पेसिफिक' अशीच बाब पाहिजे. सामान्य समाज-शुद्धीसाठी अलगपणे उपवास करता येतो; पण तो आमरण असू शकत नाही. मुदती-चाच असू शकतो.

काही तरी योग्य निमित्त शोधून देह फेकून मोकळे होता आले तर बरे, अशी एक वृत्ती तुमच्यात काम करीत आहे असे तुम्ही म्हणाला होता. मला तसे तुम्ही एक-दोन वेळा लिहिले आहे. पण आपण पुनर्जन्मावर विश्वास ठेवणारे आहोत; आपल्या हे लक्षात यायला पाहिजे की, अशा तऱ्हेची सोपी सुटका उपलब्ध नाही आहे! एक देह कंटाळून फेकला तर दुसरा तयार आहे; आणि कंटाळल्याबद्दल प्रायश्चित्त म्हणून तो आणखीच अडचणीचा लाभायचा. सारांश, जीवनातून पळवाट नाही; मुक्ती आहे ती वासनाक्षयानेच लाभणारी आहे.

मग संकल्पाचे काय ? संकल्प तर सिद्ध होऊन चुकला आहे, असे लक्षात यायला हवे.

माझे हे पत्र सेनापती बापटांनाही दाखवावे. त्यांचेही माझ्यासारखेच मत पडल्यास उपवास रद्द करावा. माझ्या सूचनेने उपवास रद्द केला असे जाहीर करू शकता. संकल्प तुमचा त्यामुळे मोडत नाही, ह्याविषयी मी निःशंक आहे. आणि मोडतच असला तर त्याचे पाप मला लागेल. ह्याहून अधिक काय लिहू ?

देह-मोहाने मी हे लिहीत नाही हे तर मला वाटते तुम्ही मानालच. सेनापतींनाही माझ्याचसारखे वाटले तर तेही देह-मोहानेच किंवा मरण-भयाने वाटणार नाही. पण त्यांना, तुमच्या व्यक्तिवादी गुणांचा जनतेला लाभ मिळावा, हा कदाचित लोभ असू शकेल. मला अशी आशा आहे की, मला तोही नाही !

परमेश्वराने तुमच्याकडून उदंड जनसेवा घडवून आणावी अशी माझी प्रार्थना आहे. माझेच काम तुम्ही करीत असता, हे तुमचे म्हणणे मला मान्य आहे. तुमच्याकडून तळमळीबरोबरच समत्वाची अपेक्षा मी करीत आहे.

गुरुजी, २९-४-४७

तुमचा संकल्प सिद्ध झालेला आहे असे माझे निश्चित मत आहे. माझे मत मी घाईने बनवलेले नाही. तुमची माझी भेट झाली त्या वेळी हरिजन-प्रवेशाबाबत बिल येणार, अथवा आले आहे, अशी बातमी केवळ आली होती. त्या बिलाचे स्वरूप त्या वेळी कळले नव्हते. तोपर्यंत त्या बातमीचा माझ्या मनावर काहीच संस्कार उमटला नव्हता. स्वरूप कळल्यानंतर परिस्थिती बदलली. तरी मी अभिप्राय एकदम बनवला नाही. पुढे पुण्याच्या सभेने, बिल आल्यामुळे मतमोजणीची गरज नाही, असा निर्णय दिला. ह्याचा अर्थ बिल हे लोकमताचा पर्याय आणि लोकमताचे प्रकाशनच आहे, असे त्या सभेने मानले. सभेचे मत प्रकट झाल्यानंतर, मी स्वतंत्रपणे विचार करू लागलो. नंतर तुमचे पत्र मला ता. २० ला मिळाले. त्याला उत्तर मी सावकाशीने पुनपुन्हा सर्व बाजू विचारात घेऊन २५ ला लिहिले.

माझ्या गेल्या पत्रात सर्वच खुलासा आहे. पण मी मत उशीरा का बनवले, ह्याचा खुलासा नाही. त्याची मला त्या वेळी गरज वाटली नाही. पण त्याचीही गरज होती; म्हणून तो मी येथे निवेदिला आहे.

सुधारक घाई करू शकत नाही. तुमच्या संकल्पाची सिद्धी झालेली आहे. तिचे बाह्य रूप आजच दिसावे अशी वृत्ती राखता येत नाही.

संकल्पाची सिद्धी झालेली नाही असे मला वाटले असते तर, साऱ्या जगाने तुम्हांला उपवास सोडायला सांगितले असते तरी, मी तुमच्या उपवासाला अनुकूल राहिलो असतो. पण संकल्प सिद्ध झाल्यानंतर उपवास निष्प्रयोजन होतो. अशा गंभीर नैतिक बाबतीत बहिरंग विचार करणे चुकीचे आहे. कोण काय बोलले आणि कोण काय

बोलतील, हा सवाल अगदीच गैरलागू आहे. निंदा, उपहास करण्यात जबाबदार मानले गेलेले लोकही असतील. पण जर त्यांची टीका योग्य नाही, तर ती टीका बेजबाबदारच आहे. मग ते व्यक्तिशः कितीही जबाबदार मानले गेलेले असोत.

तुम्ही हरिजनांकरता जी चळवळ केली ती निष्काम आहे, निरुपम आहे. सज्जनांच्या हृदयाला तिने संतोष झाला आहे. 'परी अंतरी सज्जना नीववावे' असेच नीतिसूत्र आहे ना ! मग निंदा करणारे थोर, मोठे निघाले म्हणून काय झाले? म्हणून हा विचारच येथे होता कामा नये. तुम्ही निःशंकपणे उपवास रहित करावा. मन शान्त आणि गंभीर ठेवावे. माझे तर असे सूत्र आहे की ईश्वराच्या भक्ताला लोकांनी केलेली घाणेरडी निंदा, रोपाला जसे खत उपयोगी पडते तशी उपयोगी पडणारी आहे.

सत्यनारायणाला मी पत्र घेऊन पाठवला, तर तोही लोकमतात सापडला. मला त्याचे नवल वाटले नाही. तो स्फटिक-निर्मळ आहे. पण तितकाच उथळही आहे. उथळ विचार करून तुमच्या उपवासाला अनुकूल बोलणारे एक दोन जण माझ्या मित्र-मंडळीतही आहेत. पण 'परं पश्यत् माऽपरम् !'

तुम्ही जनतेत जाता हे मला फार आवडते. पण तटस्थ विचार करण्याची सवय जनसेवकाने ठेवली पाहिजे. नाही तर तो प्रवाहात वाहून जायचा. प्रवाहात वाहण्यापासून तुम्हांला वाचवण्याची गरज असू नये. पण ह्या वेळी तशी गरज भासली आहे. म्हणून हा माझा आर्त-नाद आहे.

उपवास रहित करून महिना– पंधरा दिवस शान्तीने राहा. विचार सारे सोडून नामस्मरण करून असा. उपवास रहित करण्यात दोष नसून तो आचरण्यातच दोष होत आहे. म्हणून तुम्हांला मी इतके आग्रहपूर्वक लिहिले आहे. एरवी आग्रहपूर्वक लिहिण्याचा माझा स्वभाव नाही हे तुम्ही जाणताच. काही दिवस गेल्यानंतर पुढील कामाबाबत ठरवता येईल.

तुमच्या कार्यात तुम्ही म्हणाल तशी मदत करायला मी तयार होईन. मी जरी एक काम घेऊन बसलो आहे, तरी तुम्हांला तशी गरज वाटली तर मी फिरायलाही तयार होईन. हे कार्य मला अतिशय प्रिय आहे, आणि माझ्या परी ते मी निरंतर करीतच आहे, हे तुम्ही जाणताच.

विषाद सोडल्याशिवाय कर्तव्याचे भान होत नाही. म्हणून विषाद सोडा. माझ्या आग्रहावरून उपवास रहित केल्याचे जाहीर करू शकता. पाप होत असेल तर मी ते उचलायला तयार झालोच आहे. पण जनतेलाही समोर होण्याला मी सिद्ध आहे.

विनोबांची ही दोन पत्रे. आणि गांधीजींचीही अशीच तार येते. साने गुरुजींपुढे धर्मप्रसंग उभा राहतो. पण 'सत्या–असत्यासी मन केले ग्वाही' म्हणून गुरुजी ह्या वडिलधाऱ्यांना नम्रपणे आपला निश्चय कळवतात. उपास सुरू होतो. 'आता मी स्वतःला सर्वस्वी परमेश्वराच्या हाती सोपवलं आहे. मी अश्रूंची वंचना करू शकत नाही,

अशी गुरुजींची भूमिका. वैशाखी एकादशीला गुरुजींचे उपोषण सुरू झाले. अकराव्या दिवशी बडव्यांनी आपला हेका सोडला, आणि तत्त्वतः विठ्ठल मंदिर हरिजनांसाठी मोकळे झाले. साने गुरुजींनी उपास सोडला. विनोबांचे सारे लक्ष पंढरपूरकडे होते. उपास सुटल्यावर त्यांनी गुरुजींना पत्रे लिहिली.

गुरुजी, १३-५-४७

तुम्हांला यश मिळाले. ईश्वराचे अनंत उपकार! याहून वेगळ्या परिणामांची मी कल्पनाच केली नव्हती. हिंदू धर्म सत्-पुरुषांना क्रूसावर चढवीत नाही, ही माझी श्रद्धा मी तुम्हांला मागेच कळवली होती. माझी अनुकूलता ह्या वेळी नव्हती ती वेगळ्या मुद्द्यावर. पण ती गोष्ट आपण सोडून देऊ.

एकदा प्रचीती आल्यानंतर, माझी अशी विनंती आहे की, ह्यापुढे पुन्हा सहसा देवाला संकटात टाकू नये. तुकारामाने एकदा असेच धरणे धरले होते. तेरा दिवसांच्या उपवासानंतर त्याची कामना देवाने पुरवली. त्याच्या अभंगांच्या वह्या कोरड्या निघाल्या. तो देवाला म्हणाला, " देवा! मी पुन्हा तुला कष्ट देणार नाही. "

उपवासादी सत्याग्रहांचा मला परिचय असला तरी माझी मनोवृत्ती तुकारामाच्या ह्या भावनेशी जुळते. निष्काम सेवा करीत राहावी. ईश्वराची सत्त्वपरीक्षा, निदान एकदा अनुभव आल्यानंतर तरी, पाहू नये असे मला वाटते. पाहा हा विचार पटला तर.

मधून मधून इकडे येऊन राहण्याचे माझे आमंत्रण विसरले जाऊ नये. यायचे म्हणजे विनाकारण यायचे.

वर्तमान आणि वृत्ती-मात्र मला नियमित कळत राहावे, ही माझी मागणी आहेच.

उपवासाच्या काळात ज्यांनी ज्यांनी मेहनत घेतली त्या सर्वांना माझे अभिनंदन.

श्री गुरुजी, १७-४-४७

उपवासाच्या दिवसांत देवाचे स्मरण करावे तसे मी तुमचे स्मरण करीत होतो. दुसऱ्या परिणामाची अपेक्षाच केली नव्हती. त्यामुळे एकपरी निश्चिंतच होतो.

जो आपल्याला दुर्दैवी समजेल तो अवश्य दुर्दैवी मनुष्य आहे. दुसरा दुर्दैवी मनुष्य मला माहीत नाही.

हरिजन कार्य पुढे चालवण्याची तुमची कल्पना बरोबर आहे.

तूर्त प्रकृती दुरुस्त करण्याकडे लक्ष असावे.

उन्हाळा असेपर्यंत इकडे येण्याचे काम नाही.

त्यानंतर तुमची वाट पाहीन. पण कामासाठी नव्हे! निवान्त राहण्यासाठी, बेकारपणाने.

'शान्त राहायचे' ही निःसंशय महत्त्वाची गोष्ट आहे. शान्तीशिवाय भक्ती कुठली?

गुरुजी, ८-७-४७

धावत्या दौऱ्यात तुम्हाला कुठे गाठायचे याची कल्पना होईना. आता धुळ्याला येत आहात असे कळले. म्हणून या पत्राने तुमची भेट घेत आहे.

तुमच्या तळमळीच्या प्रचाराचे बाहेरचे फलित काय, याचा विचारच मला येत नाही. मला ते काम सहजच आवडते. प्रचाराचा कार्यक्रम संपल्यानंतर कदाचित आपण भेटू. त्या वेळी तुमच्याकडून ऐकेन.

बाह्य परिस्थिती निमित्तमात्र आहे. ईश्वर सर्वांना प्रेरणा देऊन राहिला आहे. समाजाची चित्तशुद्धी होत आहे, सावकाश होत आहे, पण निश्चित होत आहे. तुम्हांला याचा अनुभव येतच असेल. मी देवाला म्हणतो, तुझ्याच इच्छेनुसार व्हायचे ते होऊ दे. माझ्या इच्छेची गरज नाही.

पुन्हा एकदा अभिनंदन करून संपवितो.

श्री गुरुजी, १८-६-४८

छात्रालयाची कल्पना चांगली आहे. पण 'हरिजन' छात्रालय असे त्याचे नाव आणि रूप नसावे. शिवाय छात्रालयापेक्षा आश्रम मी पसंत करीन. छात्रालय बाहेरच्या विद्यालयावर अवलंबून असते. विद्या, उद्योग, निवास, सर्व बाबतींत निजाधार संस्था असावी. आश्रमाचा मी असा अर्थ केला आहे. पण हे सहज सुचवले. सहजगत्या होईल तेच करायचे. 'बहुसायास' नकोत.

सहचरी निराशा नको. सहचरीच नको. अवश्यच असली तर 'आशा' ठेवायची.

लोकनागरीसंबंधी माझ्या पत्राप्रमाणे मी लोकमत तयार करीत आहे. घाई तर मला नसायचीच. शिक्षण-शास्त्र आणि साक्षरता-सौलभ्य ही माझी दृष्टी आहे. तुम्हीही त्यासंबंधी विचार करून ठेवावा.

'स्थितप्रज्ञ-दर्शन' वाचून त्यात काही सुधारणा हव्या असतील तर सुचवाव्यात.

वेळोवेळी लिहीत राहावे. म्हणजे मी तिकडील प्रवाहाशी परिचित राहीन.

पंढरपूरला तुमची स्वतःची जाण्याची आता प्रवृत्ती होत नाही, त्यात मला काही दोष दिसत नाही. तुम्ही करायचे ते केले आहे, असेच मी समजतो.

देशात अतिशय वेगाने घटना घडत होत्या. अखेर फाळणी होऊन स्वातंत्र्य आले. फाळणी झाली तरी जातीय दंगली शमल्या नाहीत. साने गुरुजी जातीयतेविरुद्ध, अमानुषपणाविरुद्ध तळमळत होते. गांधीजी माणुसकीच्या सीमांचा बचाव करण्यासाठी प्राणपणाने एकाकी लढत, झुंजत होते; आणि गांधीजींचा अचानक खून झाला! अनेकांना

आपल्या जीवनातला सूर्य मावळल्यासारखे वाटले. महाराष्ट्रात सूडाचा अग्नी भडकला ! ही आग थांबवायला हवी. साने गुरुजींची नजर विनोबांकडे वळली. त्यांनी आपल्या 'कर्तव्य' दैनिकातून 'अमृत रसायन' घेऊन येण्यासाठी विनोबांना आर्तपणे साद घातली. पण विनोबा येऊ शकले नाहीत. गुरुजींना यातना झाल्या. ते जातीयतेच्या विषवल्लीविरुद्ध एकाकी झुंजत राहिले. आणि विनोबा शरणार्थींच्या सेवेसाठी बाहेर पडले. बाहेर पडताना त्यांनी विनोबांना एक पत्र पाठवले. विनोबांनी त्याला उत्तर पाठवले.

गुरुजी, २९-३-४८

मी आता बाहेर पडलो. हरी करवील ते होईल. आकांक्षा नाही. तुमचे सारे लिखाण मला मिळायला हवेच.

प्रकृती साधारण बरी आहे.

१९४८ च्या स्वातंत्र्यदिनाला साने गुरुजींनी साधना साप्ताहिक काढले. विनोबांच्या पावनवाणीची राष्ट्राला अत्यंत गरज आहे असे त्यांचे मत होते. आणि विनोबांचे जे जे विचार कळतील ते ते ते साधनेत देऊ लागले. विनोबांच्या परिवारातील कोणी ना कोणी गुरुजींना लिहीतच असे. १९४९ साली विनोबांचा हैदराबादमध्ये दौरा ठरला. साने गुरुजींना कळले. पैठणचे नाथ मंदिर हरिजनांसाठी उघडे होणार होते. महाराष्ट्रातील सांस्कृतिक गाभा त्याच भागात. साने गुरुजींना विनोबांच्या ह्या दौऱ्याचे वृत्त आपल्या 'साधना' साप्ताहिकात यावे असे वाटत होते. त्यांनी मला पाठवले. विनोबाजींना चिठ्ठी दिली. विनोबांच्या परिवारात त्यामुळे सहज प्रवेश मिळाला. साने गुरुजींची अतिशय प्रेम-स्नेहाने त्यांनी चौकशी केली. बारीक-सारीक गोष्टी विचारल्या. साधनेचे कुशल वृत्त विचारले. हैद्राबादची यात्रा संपवून ते मुंबईवरून गुजरातमध्ये जाणार होते. त्यांनी मुद्दाम गुरुजींना भेटायला यायला कळवायला सांगितले. मुंबईच्या विनोबांच्या निवासस्थानी गुरुजी त्यांना भेटायला गेले. बरोबर एक कानडी मित्र होते. विनोबा त्यांना म्हणाले, "सण्ण दोड्ड गुरुजी– म्हणजे सान थोर गुरुजी !" त्या दोघांनी डोळ्यांनीच जणू परस्परांशी अनंत गोष्टी केल्या. गुरुजींना विनोबांनी आग्रह केला वरचेवर भेटण्याचा. दर सहा महिन्यांनी चार-आठ दिवस तरी त्यांनी आपल्याकडे यावे ही त्यांची इच्छा. विनोबांच्या हैदराबाद प्रवासाच्या वृत्तान्ताचे पुस्तक काढायचे मी ठरवले, आणि प्रस्तावना लिहिण्याची विनोबांना विनंती केली. विनोबा म्हणाले, "साने गुरुजींनाच लिहायला सांग. आमची मनं एकरूपच आहेत !"

साने गुरुजी पुण्याच्या साहित्य संमेलनात हजर राहिले. आपली आन्तर भारतीची कल्पना त्यांनी अति कळकळीने तेथे मांडली. विनोबांना त्यांची ही कल्पना अति प्रिय. स्वतःच्या जीवनात विनोबांनी आन्तर भारती साकारच केली होती. आन्तर भारतीच्या

रूपाने साने गुरुजींना नवा हुरूप येईल, अशी विनोबांची आशा. साने गुरुजींबद्दल जाणण्याची त्यांना सतत उत्सुकता असे. ते सतत कोणाकोणाला विचारीत. त्यांच्यातला पत्रव्यवहार बराच आटला होता, पण हृदयाची स्पंदने जाणण्याची उत्कंठा दोघांना लागून राही, आणि ती बहुधा साधना, सेवक, सर्वोदय यांच्यामार्फतच त्यांना भागवून घ्यावी लागे.

साने गुरुजींनी देह विसर्जन केल्याची बातमी विनोबांना कळली! अखेरच्या निरवानिरवीच्या पत्रात शेवटचे वाक्य साने गुरुजींनी लिहिले ते 'पू. विनोबांचे स्मरण!' मृत्युमातेच्या अंकावर झोपतानादेखील त्यांना शेवटच्या क्षणी विनोबांचे स्मरण झाले! विनोबांनी पत्र पाठवले त्यात लिहिले, "साने गुरुजींच्या निधनाची वार्ता ऐकली. विश्वास बसेना. पण आता ती पचवण्याचा प्रयत्न करीत आहे." पुढे त्यांनी लिहिले, "त्यांच्या मरणावर माझा विश्वास बसत नाही. हे त्यांनी नाटक केले आहे असे मी समजतो. अमृताचा पुत्र ही त्यांची वास्तविक पदवी आहे." नंतरच्या एका पत्रात त्यांनी लिहिले, "गुरुजींना असंख्य बंधू होते. तुम्ही– आम्ही त्यांच्या बंधुमंडळात होतो. आता त्यांचे काम आपण आपल्या मोडक्या शक्तीनुसार चालवू या."

पुढे विनोबांना भेटायला मी जातो. साने गुरुजींबद्दल स्वाभाविकच चर्चा निघते. विनोबाजी म्हणतात, "गुरुजी जर मला आधी भेटते तर असं घडलं नसतं... म्हणजे त्यांचं शरीर या वेळी सुटलं नसतं असं नाही, पण या पद्धतीनं ते झालं नसतं. पण यात काही दोष माझ्याकडेही येतो. माझी वृत्ती अनाक्रमक आहे. मी सुचवून पाहतो, पण आग्रह धरीत नाही. इतरांच्या बाबतीत ते योग्यच आहे, पण गुरुजींच्या बाबतीत मी वेगळं धोरण ठेवायला हवं होतं. त्यांचा संकोची स्वभाव आणि माझी अनाग्रही वृत्ती!"

आन्तर भारती, सेवा दल, साधना, कथा-माला, या साने गुरुजींच्या संस्था. त्यामुळे त्या सर्वांबद्दल विनोबांना अतिशय जिव्हाळा. सेवादलाने 'साने गुरुजी सेवापथक' चालवले. विनोबांना ती कल्पना फार आवडली. त्यांनी लिहिले, "साने गुरुजींच्या स्मरणार्थ सेवापथकाची योजना सर्व प्रकारे उत्तम आहे. जनसेवेसाठी निरंतर तळमळणाऱ्या त्या महापुरुषाचे श्राद्ध करण्याचा हा अगदी योग्य असा मार्ग आहे. रस्ता-दुरुस्ती, तलाव-सफाई इत्यादी कामांबरोबर ठिकठिकाणी विहिरी खोदण्याची मोहीम सुरू झाली तर चांगले होईल. त्याने देशाला नित्य नवजीवन मिळेल... सेवा दलाच्या कामाकडे माझे लक्ष आहे. साने गुरुजींना त्या कामाविषयी जिव्हाळा वाटत होता, तोच मला वाटतो." आन्तर भारती हा तर त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय. भूदान आंदोलन सुरू झाल्यावर साने गुरुजींची विनोबांना किती वेळा आठवण झाली!

"साने गुरुजी आज असते तर मी महाराष्ट्राबाबत निश्चिंत झालो असतो." असे उद्‌गार त्यांनी किती वेळा काढले असतील!

एकदा विनोबांना मी पत्र पाठवले. आन्तर भारतीबद्दल मार्गदर्शन मागितले. विनोबांनी लिहिले, "आन्तर भारती ही कल्पना इतकी विशाल आहे की कोणत्याही निधीने तिची सिद्धी होणार नाही, आणि निधीने व्हायची असेल तर अपारच निधी लागेल. अशा स्थितीत काय सुचवावे? आमच्या यात्रेतच तुम्ही चार दिवस येऊन का राहू नये? या प्रश्नासंबंधी मला जिव्हाळा आहे आणि त्या दिशेने माझे काम सतत चालू आहे. हिंदुस्थानच्या सर्व भाषांचे मी अध्ययन केले आहे आणि अशा अध्ययनांना उत्तेजन दिले आहे."

आणि बंगलोरजवळ मी विनोबांना भेटायला गेलो. चार दिवस त्यांच्याशी चर्चा केली. ते म्हणाले, "आन्तर भारतीची आता अतिशय निकड आहे, पण आजचं राजकारण त्याला अतिशय अपायकारक आहे. ते तुटेपर्यंत खरी आन्तर भारती होणार नाही. राजनीतीच्या जागी लोकनीती त्यासाठी आली पाहिजे. तथापि परिस्थिती विरोधी असल्यानं अधिक नेटानं काम करण्याची गरज आहे." मग भारतीय भाषांच्या अभ्यासासाठी मिशनऱ्यांनी जो प्रचंड खटाटोप केला त्याची माहिती त्यांनी सांगितली. व्याकरण, भाषापुस्तके आणि कोश तयार करण्याची आपली कल्पना त्यांनी सांगितली.

पंढरपूरच्या सर्वोदय संमेलनाच्या वेळी साने गुरुजींचे स्मरण त्यांना सतत येत होते. साने गुरुजींनी तनपुरे महाराजांच्या धर्मशाळेत उपास केला. विनोबांचे निवासस्थान तेथेच होते आणि त्याबद्दल विनोबांना अतिशय समाधान होते. गुरुजींच्या उपवासाचा उल्लेख करून ते म्हणाले, "१९४२ च्या चळवळीत ३५ महिने मी जेलमध्ये होतो. सुटून आल्यानंतर माझी जी व्याख्यानं झाली त्यांत मी एकदा म्हटलं होतं की, पंढरपूरसारख्या मंदिरात हरिजनांना अद्याप प्रवेश नाही! हे होत नाही तोपर्यंत आम्हांला स्वराज्याचा काय अधिकार? आणि साने गुरुजींनी सहा महिनेपर्यंत सबंध महाराष्ट्रात प्रचार केला आणि नामदेवाप्रमाणे भगवंताच्या दाराशी धरणं धरलं. आणि शेवटी देऊळ हरिजनांसाठी उघडं झालं!

"साने गुरुजींचं आणि माझं इतकं प्रेमाचं नातं होतं की याहून अधिक प्रेमाचं नातं कसं असतं ते मला माहीत नाही. त्यांच्या केवळ स्मरणानंदेखील माझे डोळे ओले होतात. सहा महिने आम्ही धुळ्याच्या जेलमध्ये एकत्र होतो. गीतेवर तिथं जी प्रवचनं झाली ती साने गुरुजींनी जशीच्या तशी टिपून घेतली. हिंदुस्थानच्या सर्व भाषांतून ती गेली आहेत. लाखो लोक ती प्रवचनं वाचताहेत, भक्तिमार्ग शिकताहेत. हृदयशुद्धीची दीक्षा घेताहेत. याचं श्रेय साने गुरुजींना आहे. महाराष्ट्रात हिंडत असताना जी काही पाठबळं माझ्यापाशी आहेत त्यामध्ये साने गुरुजींचेही एक पाठबळ आहे."

विठ्ठलमंदिराच्या अंगणात ते म्हणाले, "महाराष्ट्राच्या वारकरी संप्रदायामध्ये आदिपुरुष म्हणून निवृत्तिनाथ, ज्ञानदेव इत्यादी फार थोर नावं सगळ्यांच्या परिचयाची

आहेत. त्या संप्रदायातील शेवटचा महापुरुष माझ्या दृष्टीनं साने गुरुजी होत! त्यांनी दीक्षा घेतली होती की नाही मला माहीत नाही, परंतु अशा महापुरुषांना दीक्षेची गरज नसते."

विनोबांच्या आगमनप्रसंगी पंढरपूरचे विठ्ठलमंदिर सर्व भक्तांना खुले झाले.

१९५८ च्या १७-१८ जुलैला औरंगाबादला सेवा दलाचा मेळावा विनोबाजींच्या निवासस्थानी योजण्यात आला होता. विनोबांना साने गुरुजींचे या प्रसंगी अनेकदा उत्कट स्मरण झाले. "मुलांचं साने गुरुजींवर विलक्षण प्रेम होतं. ते मी डोळ्यांनी पाहिलं. असं प्रेम फारच थोड्यांच्या नशिबी येतं. गुरुजी तरुणांकडे ओढले गेले आणि गुरुजींच्या ओढीनं मी तुमच्यात आलो. साने गुरुजींचे जीवन हे तुमचं स्फूर्तिनिधान असो." असे विनोबा त्या मेळाव्यात म्हणाले.

१९६५ साली जून महिन्यात विनोबांकडे गेलो. त्या वेळी विनोबांनी क्षेत्रसंन्यास घेतलेला होता. पवनारलाच ते होते. बोलणे-ऐकणे त्यांनी बंद केले होते. सर्व चर्चा लिहून करावी लागे. आन्तर भारतीची लेखी चर्चा झाली. विनोबांनी लिहिले, "आन्तर भारती ही साने गुरुजींची एक भव्य कल्पना आहे. विश्वभारतीची भाषा आपण बोलतो, पण आंतर भारतीशिवाय ती कशी साकारणार? पण अजूनपर्यंत ती एक कल्पनाच राहिली आहे. आता तिची निकडच लागल्याने ती अंमलात येईल असे वाटते. निकड लागल्याशिवाय काहीच न करण्याची आपली सवय आहे. त्यामुळे कॉन्स्टिपेशनचा रोग जडतो!"

विनोबांचे हे भाष्य अगदी नेमके आहे. भारतीय स्वभावधर्मावर त्यात एक मार्मिक शेरा आहे. साने गुरुजी व विनोबा यांचा प्रयत्न भारताचा हा प्रकृतिधर्म बदलावा यासाठी होता-आहे. त्या उभयतांच्या जीवनांना एकत्र गुंफणारा हा धागा होता. जे उच्च, उदात्त,-ते ते स्वेच्छेने आत्मसात करण्यातच मानवाची शोभा आहे. दोघांचे प्रयत्न त्यासाठीच एकवटले होते. साने गुरुजी व विनोबा यांचे मैत्र अलौकिक होते, अद्वितीय होते! जन्मान्तर स्नेह मराणान्तरही राहतो याची साक्ष म्हणजे या उभयतांतील स्नेह!

**यदुनाथ थत्ते**

## स्थिर मेरूचे पूत विनोबा

स्थिर मेरूचे पूत विनोबा नवपवनाचे दूत तुम्ही
संसाराचे सार झोकुनी अनासक्त अवधूत तुम्ही
मातीहुनि तुम्हि माती असुनी हिमालयाहुनि भव्य तुम्ही
तुम्हि गवताचे पाते असुनी गगनदिव्याहुनि दिव्य तुम्ही

पाताळापर्यंत अंत तुम्हि बघता होउनिया पाणी
अर्थ मागुती धावत येइल अशी मुखातुन ये वाणी
तुम्हीच जळता, तुम्ही जाळता, तुम्हीच अग्नी, हव्य तुम्ही
मातीहुनि तुम्हि माती असुनी हिमालयाहुनि भव्य तुम्ही

क्रन्दनातले इंधन तुम्हा दहा दिशांतुनि दिसताहे
नवनीताहुन मऊ असुनिही वज्र तुम्हा न शिवू साहे
क्षितिजान्ताचे यात्रिक असुनी क्षितीस गणता सेव्य तुम्ही
मातीहुनि तुम्हि माती असुनी हिमालयाहुनि भव्य तुम्ही

तुम्हि पृथ्वीचे लाल बाल परि स्वर्गाशी तुमचे नाते
तुम्हि सर्वांहुनि न्यारे असुनी सर्वांशी तुमचे जमते
दासांचे अनुदास तुम्ही, परि राजांचे उपजीव्य तुम्ही
मातीहुनि तुम्हि माती असुनी हिमालयाहुनि भव्य तुम्ही

सूर्यवीर्य शशिशांति, भ्रांती वाऱ्याची भिनली अंगी
समिधेपरि वरि शुष्क असुनि तुम्हि, अंतरंग नित रसरंगी
नित्य नव्या यज्ञाचे दीक्षित, विस्मरला अपसव्य तुम्ही
मातीहुनि तुम्हि माती असुनी हिमालयाहुनि भव्य तुम्ही

— *वसंत बापट*

# गोष्टीरूप विनोबाजी

राष्ट्र सेवा दलातील माझ्या प्रिय सैनिकांनो !

तुम्हांला मी रोज आधुनिक भारतातील कोणत्या तरी एखाद्या थोर व्यक्तीविषयी गोष्टी सांगणार आहे. आधुनिक थोर व्यक्तींच्या गुणगानानंतर मी प्राचीन व मध्यकालीन थोर विभूतींविषयीही, तुम्हांला इच्छा असेल तर, गोष्टी सांगेन. परंतु आधी आजचा काळ घेऊ या.

आणि मी आज पहिल्या दिवशी पूज्य विनोबाजी भावे यांच्या पुण्यकथा सांगणार आहे. विनोबाजींचा व माझा परिचय आहे. माझ्या जीवनात ते खोल शिरलेले आहेत. त्यांच्याविषयी माझ्या मनात विलक्षण भक्तिभाव आहे, व तो शब्दातीत आहे.

महात्माजींनी १९४० मध्ये पहिला सत्याग्रही म्हणून विनोबाजींची निवड केली. त्या वेळेस ते एकदम जगासमोर आले. महाराष्ट्रातील फारच थोड्या लोकांना विनोबाजी माहीत होते. हे विनोबाजी कोण, असे जो तो विचारू लागला. थोडीफार माहिती त्यांची मिळू लागली. गीताई या गीतेच्या समश्लोकी भाषान्तराने ते महाराष्ट्रास परिचित झाले होते. परंतु त्यांचे व्यक्तिमत्त्व अलौकिक. महाराष्ट्रास अभिमान वाटावा अशी ही थोर विभूती आहे.

## पूर्वज

असे हे विनोबाजी कोठले, कोण? विनोबाजींचे आडनाव भावे. हे भावे घराणे मूळचे रत्नागिरी जिल्ह्यातील. पुढे केव्हा तरी कोणी पूर्वज देशावर आले. सातारा जिल्ह्यात लिंब गावी आले. तेथून वाईस आले. लिंबचे दैवत वाईस नेऊन तेथे त्यांनी कोटेश्वराचे मंदिर उभारले व तेथे पूजाअर्चा करू लागले. वाई हेच जणू राहण्याचे ठिकाण झाले. दुसरेही त्यांचे एक राहण्याचे

ठिकाण होते. ते तिकडे कुलाबा जिल्ह्यात होते. कुलाबा जिल्ह्यात पेणपासून काही अंतरावर गागोदे म्हणून गाव आहे. आंग्र्यांच्या काळात या गागोदे गावी या भावे मंडळींस काही इनाम जमीन वगैरे मिळाली. या गागोदे गावाला थोडाफार इतिहासही आहे. येथे एक खिंड आहे. त्या खिंडीत काही लढाया, झटापटी झाल्या होत्या. अशा या गागोदे गावी ही भावे मंडळी राहात. तेथेही त्यांची घरे-दारे, वाडे आहेत.

## विरक्त व समभावी आजोबा

शंभूराव भावे हे विनोबाजींचे आजोबा. हे बहुधा वाईसच राहात असत. आजीचे नाव गंगाबाई. आजोबा व आजी यांचे बरेचसे गुण विनोबाजींत उतरले आहेत. शंभूराव हे विरक्त वृत्तीचे होते. संसारात त्यांचे तितकेसे लक्ष नसे. कोटेश्वराच्या पूजेकडे त्यांचे सारे लक्ष असे. ब्राह्मणभोजने घालावीत, उत्सव करावेत, इत्यादींचा त्यांना फार नाद. कोटेश्वराच्या उत्सवात एक दिवस सर्वांना मुक्तद्वार असे. त्या दिवशी शंभूराव हरिजनांना बोलावीत व मंदिरात प्रेमाने जेऊ घालीत. ते म्हणायचे, " अन्नाची खरी चव या गरिबांनाच. ज्यांना भरपूर खायला आहे, त्यांना देण्यात काय अर्थ ? "

त्या काळात हरिजनांना मंदिरात आणून जेवू घालणे म्हणजे धाडसच होते ! परंतु वाईच्या ब्राह्मणांनी मंदिरावर किंवा शंभूरावांवर बहिष्कार घातला नाही. एकदा शंभूरावांच्या मनात आले की, देवासमोर रोज गायन व्हावे. गायन म्हणजे दैवी कला. मनाची तन्मयता करणारी कला. वाईत एक मुसलमान गवयी आला होता. तो उत्कृष्ट गाणारा होता. त्यालाच आपल्या मंदिरात गाण्यासाठी ठेवावे असे शंभूरावांनी ठरविले, आणि तो मुसलमान गवयीही कबूल झाला. महादेवासमोर रोज संगीत सुरू झाले. धर्ममार्तंड येऊन म्हणाले, " हे काय शंभूराव ? देवळात देवासमोर मुसलमानास काय बसवता ? "

शंभूराव म्हणाले, " देवासमोर का भेदाभेद असतो ? हा हिंदू, हा मुसलमान, हा प्रकार देवाजवळ नाही. सारी त्याची लेकरं. त्याच्याजवळ सारे समान, सारे एक. "

शंभूरावांची व्रतवैकल्ये, त्यांचे उपासतापास सतत सुरू असत. विनोबाजी एकदा सांगत होते : " आजोबा त्या वेळेस चान्द्रायण व्रत करीत होते. चान्द्रायण

व्रत म्हणजे प्रतिपदेस एक घास, द्वितीयेस दोन घास, तृतीयेस तीन घास, असे करीत पौर्णिमेपर्यंत जायचे. नंतर एकेक कमी करीत अमावास्येस पुन्हा एकावर यावयाचे ! चंद्रोदय झाल्यावरच ते पूजा, आरती वगैरे करून घास घ्यावयाचे. चंद्रोदय कधी मध्यरात्री, कधी पहाटे असे व्हायचे. आजोबा आरती सुरू करावयाचे त्या वेळेस आम्हा सर्व लहान मुलांसही उठवण्यात येई. थंडी लागत असे. डोळे चोळीत आम्ही उठत असू. ती आरती पाहात असू. चंद्र बघत असू. आजोबांच्या त्या पुण्याईमुळेच, त्या पावित्र्यामुळेच माझ्यात जर काही पावित्र्य थोडेफार असेल तर आले आहे. ती त्यांची थोर देणगी आहे. त्यांचे ते उपकार."

गागोदे गावी एका इनामी जमिनीचा त्यांना ८३ रुपये शेतसारा मिळत असे. हा शेतसारा वाढावा म्हणून शंभूरावांनी हायकोर्टात प्रकरण नेले. सरकारने ८३ रुपयांचे १२५ केले. परंतु ती जमीन ज्याची होती तो यांना ८३ रुपयेच देई. १२५ देत नसे. शंभूरावांनी १२५ रुपयांचा हक्क मिळवला होता, परंतु त्यांनी कधीही फिर्याद केली नाही. जमाखर्चात मात्र त्या माणसाच्या नावे दरसाल १२५ च्या हिशेबाने बाकी काढून ठेवीत असत ! पुढे त्यांच्या एका कर्त्या मुलाने त्यांना विचारले, " दरसाल बाकी काढण्याचा उपयोग काय ? फिर्याद तरी करा, नाही तर ८३ च घ्या व समाधान माना."

ते म्हणाले, " त्याच्या नावे मी देणे काढून ठेवीत आहे. पुढचा जन्म घेऊन हे त्याला फेडावे लागेल. मी कोर्टात जाणार नाही."

पुनर्जन्मावर त्यांचा फार विश्वास असे. ते गोष्ट सांगत की, " कोणी एकाने दुसऱ्याचे देणे बुडवले. त्याला गाय होऊन ते देणे फेडावे लागले ! "

शंभूरावांचा विरक्त स्वभाव पुढे वाढतच चालला. कोटेश्वराच्या पिंडीजवळ तासन् तास धाबळी नेसून ते बसत. रात्र झालेली असावी. सर्वत्र शान्त असावे. परंतु शंभूराव गाभाऱ्यात शंकराच्या पिंडीजवळ बोलत बसलेले असत ! देवाजवळ ते बोलायचे, भांडायचे, रडायचे, हसायचे. प्रेमाच्या भरात येऊन शिवीही द्यावयाचे. बाहेरच्या लोकांना रात्री हे सारे ऐकू येत असे. अशी ही भक्ती उत्तरोत्तर वाढतच गेली.

## कर्तृत्ववान आजी

आजोबा शंभूरावांचा हा असा स्वभाव, आणि आजी गंगाबाई, तिचा स्वभावही सामान्य नव्हता. गंगाबाई कर्तृत्ववान होत्या. मोठ्या करारी व

स्वाभिमानी होत्या. आपला वाडा सोडून त्या फारशा कधी कोणाकडे जात नसत. त्या अभिमानाने सांगायच्या, "बारा वर्षांत मी दुसऱ्याकडे कधी उगीच गेल्ये नाही. मला का उद्योग नाहीत ?" या गंगाबाई वयाच्या ५५ व्या वर्षी लिहावाचायला शिकल्या ! आपल्या मुलाला गोविंदाला त्या एकदा म्हणाल्या, "अरे, मला शिकव रे वाचायला." आणि गोविंदाने स्वयंपाकघरातील भिंतीवर ठसठशीत अशी सारी मुळाक्षरे काढून दिली. स्वयंपाक करता करता आजी ती मुळाक्षरे वाची, पाठ करी. अशा रीतीने अक्षरओळख करून घेऊन पुढे गंगाबाई शिवलीलामृत, पांडवप्रताप, भक्तिविजय इत्यादी पोथ्या वाचू लागल्या.

आजीचा स्वभाव मोठा विनोदी होता. वाईच्या विहिरी मोठ्या खोल. सुनेबरोबर रहाटाने घागर ओढता ओढता गंगाबाईस काही विनोद सुचे. त्या सुनेला म्हणत, "अशीच धरून ठेव हो घागर. मी तुला नक्कल करून दाखवते." आणि रहाटाचा हात सोडून आजी अभिनय करून, नक्कल करून दाखवायची. सासू-सुना मग पोटभर हसत. गंगाबाईंचे बोलणे मोठे ठसकेबाज व वक्तृत्वपूर्ण असे.

आजी प्रेमळ होती. परंतु मनातील प्रेम सहसा बाहेर दाखवीत नसे. होताहोईतो ती रडत नसे. रडणे तिला दुबळेपणा वाटे. तिचा स्वाभिमान त्या अश्रूंना अडवून धरी. शंभूरावांना इंग्रजी शिकणे फार आवडत नसे. त्यामुळे त्यांच्या गोविंदा नावाच्या मुलाची मुले इंग्रजी शिकण्यासाठी पेणला जाऊन राहिली. गोविंदराव मरण पावले होते. मुलांची आई मुलांना घेऊन पेणला राहात होती. पुढे एकदा नातू शिवराम वाईस उत्सवाच्या व्यवस्थेसाठी आला होता. तेव्हा आजी या नातवाला जवळ घेऊन रडली व म्हणाली, "तुझी आई आली नाही. परंतु तू तरी आलास. बरं हो."

वाईचा वाडा मोठा होता. एकदा एक गृहस्थ भाड्याने जागा देता का म्हणून विचारायला आला. गंगाबाई त्याला म्हणाल्या, "तुम्हांला जागा कशासाठी पाहिजे ? जेवणावळी घालायला इथं सोयीच्या जागा आहेत. परंतु संसाराला सोयीस्कर अशी जागा इथं नाही."

शंभूरावांनी जेवणावळी घालण्यासाठी मोठमोठे सोपे बांधून ठेवले होते. परंतु एखाद्या कुटुंबाला सोयीस्कर अशा खोल्या वगैरे नव्हत्या बांधल्या. म्हणून गंगाबाईचे हे विनोदी, टीकात्मक बोलणे.

## आई-बाप

शंभूरावांना तीन मुलगे— नरहर, गोपाळ व गोविंद. नरहर हे विनोबाजींचे वडील. नरहर अति बुद्धिमान होते. महत्त्वाकांक्षी होते. परंतु शंभूराव इंग्रजी शिकण्याच्या विरुद्ध, त्यामुळे नरहरपंतास लौकरच बडोद्यास नोकरी धरावी लागली. त्यांच्या महत्त्वाकांक्षांवर पाणी पडले. सांगलीच्या गोडबोले घराण्यातील मुलीशी त्यांचा विवाह झाला. हे गोडबोले शंभूरावांचे परम स्नेही. ते संगीतज्ञ होते. वाद्यविशारदही होते. या गोडबोल्यांस एकच मुलगी. ते शंभूरावांस म्हणाले, " माझ्या मुलीची सोय करा. "

बोलण्यातील भाव असा की, तीन मुलांतील कोणत्या तरी एकाला करून घ्या. आणि नरहरपंतांशी या मुलीचे लग्न लागले. सासरी रखुमाई नाव ठेवण्यात आले.

रखुमाई दिसायला सुंदर होत्या. गोरा वर्ण, टपोरे मोठे डोळे, हाडपेरही मोठे. कर्नाटकी वळणाच्या त्या दिसत. रखुमाबाईस माणसांची फार आवड. चार-चौघांनी आपणाकडे यावे, घरात आनंद असावा, असे त्यांना वाटे. उत्सवप्रिय अशी त्यांची वृत्ती. परंतु नरहरपंत जरा निराळ्या वृत्तीचे. त्यामुळे रखुमाबाईच्या मनाचा कोंडमारा होई.

बडोद्यास नरहरपंत व रखुमाबाई असत. बाळंतपणासाठी रखुमाई गागोद्यास येई. आली म्हणजे मग महिना दोन महिने राही. कधी लग्नमुंजीसाठी, इतर कार्य-कारणासाठीही गागोद्यास यावे लागे. रखमाई व नरहरपंत यांना एकूण पाच अपत्ये झाली. विनोबा, बाळकोबा, शिवाजी व दत्ता असे चार मुलगे, व शान्ता नावाची एक मुलगी. बहुतेक सर्वांचा जन्म गागोद्यासच झाला.

## विनोबाजींचे बाळपण

विनोबाजींचे बाळपण बरेचसे गागोद्यास गेले. हे गाव विनोबाजींना फार आवडते. येथे त्यांच्या पूर्वजांनी बल्लाळेश्वर म्हणून एक गणपतीचे मन्दिर बांधले आहे. हा देव आधी गुराख्यांनी दगडांत बसविला होता. पुढे भावे मंडळींकडून हे मन्दिर बांधण्यात आले. गागोदे गावात भावे यांचे एकच ब्राह्मणाचे घर. बाकी ५०—६० मराठ्यांची वगैरे घरे. गावात एक तळे आणि गावाजवळ खिंड. जवळच्या डोंगरावर सपाट मैदान. गावच्या आसपास जंगल.

असा हा निसर्गसुंदर गाव विनोबाजींस आवडतो. १९३५ साली ते आजारी पडले तेव्हा याच गावी ते दोन महिने येऊन राहिले होते.

विनोबाजींचे एक चुलते गोपाळराव येथे गागोद्यासच राहात. शेतीवाडीची, उत्पन्नाची सारी व्यवस्था तेच पाहात. त्यांना प्रथम बरीच वर्षे मूलबाळ नव्हते. म्हणून विनोबाजींना ते जवळ ठेवीत. गागोद्यास विनोबाजींचे आतेभाऊही असत. एका आतेभावाचे नाव महादेव. विनोबाजींचे व महादेवाचे फार प्रेम. लहानपणीही विनोबाजी मोठ्या घरात बसत नसत. जवळ गोठा असे. त्यात ते जाऊन बसत. लहानपणापासूनच ते विचारमग्न असत.

## घरचे राष्ट्रीय वातावरण

गागोद्याचे घरचे सारे वातावरण राष्ट्रीय होते. १९०५ मध्ये वंगभंगाची चळवळ सुरू झाली. घमेंडखोर व्हाइसरॉय कर्झन याने बंगालचे दोन तुकडे केले. सारे बंगाली खवळले. परंतु सरकारने स्वतःचाच हट्ट चालविला. देशभर नवीन वारे वाहू लागले. तिकडे जपानने याच वेळेस रशियाचा पराजय केला होता. पौर्वात्य राष्ट्रे मनांत आणतील, हिंमत धरतील तर, पाश्चिमात्त्यांना पिटाळून लावतील, असा आत्मविश्वास आशियातील लोकांत आला. हिंदुस्थानावरही त्याचा परिणाम झाला. १९०६ साली कलकत्त्यास राष्ट्रीय सभा भरली. महर्षी दादाभाई नौरोजी अध्यक्ष होते. त्यांनी स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण, बहिष्कार, स्वराज्य हे चार मंत्र दिले. ही चतुःसूत्री राष्ट्राला मिळाली, आणि हा नवा तेजस्वी संदेश लोकमान्यांनी महाराष्ट्रभर नेला. लोकमान्यांनी जनतेत चैतन्य यावे म्हणून श्रीशिवाजीउत्सव, गणेशोत्सव, मेळे, पैसाफंड, स्वदेशी, दारूबंदी अशा अनेक चळवळी सुरू केल्या.

या लहानशा गागोदे गावी विनोबाजींच्या घरी केसरी, भाला, काळ, राष्ट्रमत, हिंदुपंच, विहारी इत्यादी सारी राष्ट्रीय वृत्तीची वर्तमानपत्रे येत. त्याशिवाय घरात इतरही पुष्कळ पुस्तके होती. संतवाङ्मय होते. राष्ट्रीय वाङ्मय होते. घरात चर्चा चालत. बाळ विनूच्या त्या कानांवर पडत. हा लहान मुलगा वाचनात व ऐकलेल्या गोष्टींच्या चिंतनात गढून जाई. जवळच्या जंगलात त्या वेळचे क्रान्तिकारक कधी कधी जमत. तेथे नेमनिशाणांचा अभ्यास करीत. विनोबाजींच्या संस्कारक्षम अशा बालमनावर या सर्व गोष्टींचा परिणाम झाल्याशिवाय कसा राहील?

## आनंदाची वानगी

विनोबा सात वर्षांचे होते तेव्हाची गोष्ट. त्यांच्या घरी फणसाचे झाड होते. पहिला फणस पिकून कापला जाई तेव्हा गावातल्या प्रत्येक घरी जाऊन त्याचे दोन दोन गरे द्यायला आई सांगे. पन्नास-साठ घरांचे गाव. प्रत्येक घरात गरे द्यायला जावे लागे. मुलांना गरे आवडत. गरे पाहून तोंडाला पाणीही सुटायचे. पण आधी लोकांना गरे वाटायचे. त्यात खूप आनंद विनोबांना वाटायचा. स्वतः खाण्याचा आनंद तर जनावरांनाही मिळतो. पण आपल्याला इच्छा असूनही दुसऱ्याला ती वस्तू देण्यातला आनंद वेगळ्याच प्रकारचा असतो. आईने ह्या आनंदाची गोडी लावली.

## भक्तिभाव फुलवला

आई विनोबांना रोज तुळशीला पाणी घालायला लावायची. तुळशीला पाणी घालून झाल्याशिवाय ती मुलांना जेवायलाच घालायची नाही. मुले पाटावर येऊन बसली की आधी ही चौकशी ती करी. लहानसेच काम, पण ते नित्य-नेमाने मुलाने करावे असा तिचा प्रयत्न असे. मुलांमधला भक्तिभाव तिने असा फुलवला.

## विनोबांचे शिक्षण

दहा वर्षांचे होईपर्यंत विनोबा कुलाबा जिल्ह्यात गागोदे येथे होते. दिवसभर ते उनाडत. सकाळ–संध्याकाळ त्यांचे काका अर्धा तास त्यांना शिक-वायचे. संध्याकाळी परवचा आणि सकाळी अक्षरओळख, वाचन. अक्षरओळख झाल्यावर त्यांच्यासाठी सचित्र पुस्तके आणली, पण चित्रे पाहून विनोबा ती ठेवून देत. पुढे थोडेफार वाचायचे. पण बहुतेक वेळ डोंगरावर भटकण्यात, भोकरे–बोरे खाण्यात जायचा. गुराख्यांबरोबर खूप खेळत.

विनोबांना वाचनाची गोडी लागावी म्हणून चातुर्मास्यात ‘ भक्तविजय ’ ग्रंथ लावण्यात आला. सर्वांसमोर मोठ्याने वाचायचे म्हणून आधी वाचून ते जाऊ लागले. सर्वांनी कौतुक केले. ग्रंथवाचन संपले तेव्हा सांगता केली. पन्नासेक जणांना जेवायला बोलावण्यात आले.

## ब्रह्मचारी राहण्याचा संकल्प

विनोबाजींचे आता दहा-बारा वर्षांचे वय होते. ११ सप्टेंबर १८९५ चा त्यांचा जन्म. बारा वर्षांचे असताना ब्रह्मचारी राहण्याचा त्यांनी संकल्प केला. त्यांच्या डोळ्यांसमोर शंकराचार्य का होते? समर्थ रामदास का होते? त्यांच्या डोळ्यांसमोर देश होता की देव होता? काही असो. परंतु या लहान मुलाने त्या वयात प्रतिज्ञा केली. लहानपणी आपण सारेच असे संकल्प करतो. मला मुळी लग्न करावयाचेच नाही असे म्हणतो. परंतु कोटीत एखाद्याचा संकल्प टिकतो.

## केरसुणीचा मार

वडील नरहरपंत रागीट स्वभावाचे. विनोबाजींस ते पुष्कळदा मारीत. परंतु विनोबाजीही तितकेच निश्चयी होते. ते मार खात, परंतु आपला निश्चय सोडीत नसत. एकदा आईने विनोबाजींस लहान मुलीस घेण्यास सांगितले. मुलगी रडत होती. आईलाही जरा बरे नव्हते. विनोबाजींनी बहिणीस घेतले नाही! नरहरपंत संतापले. त्यांनी केरसुणीच्या बुंध्याने विनोबाजींस झोडपले. परंतु विनू रडला नाही. ओरडला नाही. मारून मारून वडील थकले, आणि विनोबाजी बहिणीला न घेता बाहेर निघून गेले!

## बडोद्यास आले

प्राथमिक शिक्षण संपल्यावर विनोबाजी इंग्रजी शिक्षणासाठी आता बडोद्यालाच राहू लागले. इंग्रजी शाळेत ते जाऊ लागले.

विनोबा बडोद्याला वडिलांकडे गेले. वडील गणिते सोडवायला सांगत. विनोबा त्यांतले सर्वांत अवघड गणित तेवढे सोडवत आणि बाकीची झाली असे समजून फिरायला निघून जात!

## बैठका काढायची सजा

विनोबांचे एक मास्तर चांगले उंचेपुरे होते. शिकवीतही चांगले. पण छडीही बाळगीत. त्यांच्या छड्या मोडून ठेवणे हा विनोबा व त्यांचे मित्र यांचा उद्योग! एकदा विनोबा घरून अभ्यास करून आले नाहीत. गुरुजींनी पाचशे

बैठका मारण्याची सजा ठोठावली! विनोबांच्या बैठका मोजायला एक विद्यार्थी ठेवला. विनोबाही मोजीत होतेच. एकशे तेवीस बैठका मारून झाल्या आणि तो मोजणारा विद्यार्थी म्हणाला, " झाल्या पाचशे! "

गुरुजीही " पुरे " म्हणाले.

विनोबा म्हणाले, " एकशे तेवीसच तर झाल्या! "

गुरुजी म्हणाले, " अठरा जास्तीच झाल्या! मी म्हणालो होतो, पाच आणि शे म्हणजे एकशे पाच. आधीच थांबायला हवे होते. "

## जेवणापुरते घरी

वडिलांचे व विनोबाजींचे पटत नसे. म्हणून जेवणापुरते व झोपण्यापुरते फक्त ते घरी असत. बाकी सर्व वेळ बाहेर असत. त्यांची एक दुसरीकडे खोली होती. तेथे ते असत. तेथे बसत, वाचीत. आपला मुलगा वेडेवाकडे काही करीत नाही याची घरच्यांना खात्री असावी म्हणून ते झोपायला घरी येत. विनोबाजींचे एक मित्रमंडळ होते. मुलांचे ते आवडते होते. त्यांचे ते म्होरके असत. वर्ध्याला निरनिराळ्या क्षेत्रांत कामे करणारे सारे त्यांचे बरोबरचे संवगडी श्री. वाळुंजकरजी, श्री. मोघेजी, श्री. गोपाळराव काळे, श्री. धोत्रेजी– सारे विनोबाजींचे बालमित्र. सारे राष्ट्रसेवेत सर्वस्वार्पणाने पडले.

## ज्ञानोपासक मित्र

हे मित्र उगीच फालतू गप्पा मारण्यासाठी एकत्र येत नसत. निरनिराळ्या विषयांवरची पुस्तके ते वाचीत. आपापल्या वाचलेल्या पुस्तकांतील विचार ते एकमेकांस सांगत. चर्चा करीत. विनोबाजींकडे चर्चेचे नेतृत्व असे. ते अति बुद्धिमान. सर्व विषयांत त्यांची मती चाले.

## वडिलांची इच्छा

वडिलांच्या आपल्या या बुद्धिमान मुलाविषयी फार मोठ्या आशा-अपेक्षा होत्या. त्याला युरोपात पाठवू, संशोधक बनवू असे ते मनात म्हणत होते. युरोपात फ्रेंच भाषा सर्वत्र चालते. वडिलांनी विनोबाजींस दुसरी भाषा फ्रेंच घेण्यास भाग पाडले. विनोबाजींचा तर संस्कृताकडे ओढा. परंतु करणार काय? खाजगी रीत्या ते संस्कृत शिकत व भूक भागवीत.

## गीतेची ओळख

विनोबा तेरा वर्षांचे असताना त्यांची आणि गीतेची पहिली ओळख झाली. ज्ञानेश्वरीचा गद्यानुवाद त्यांच्या घरी होता त्याचे वाचन ते करू लागले. पहिला अध्याय त्यांनी उत्साहाने वाचला. पण पुढे काही समजेना. लढाईबद्दल धृतराष्ट्राला जेवढी उत्सुकता होती त्याच्या किती तरी पट उत्सुकता विनोबांना होती. पण पुढे युद्ध बाजूलाच पडते आणि तत्त्वज्ञान सुरू होते ! पुढे मराठीचा अभ्यास वाढल्यावर त्यांना ज्ञानेश्वरी समजू लागली. शाळेत त्यांनी फ्रेंच विषय घेतला होता. त्यामुळे संस्कृत गीता काही त्यांना समजत नव्हती. पुढे लोकमान्यांचे 'गीतारहस्य' प्रकाशित होत आहे अशी बातमी त्यांना कळली. ते समजून घ्यायचे तर संस्कृतचे ज्ञान आवश्यक. म्हणून विनोबांनी संस्कृतचा अभ्यास सुरू केला.

तेव्हापासून विनोबांना गीतेची गोडी लागली ती कायमची. गीतेबद्दल भारतीय भाषांत जे जे साहित्य आहे ते तर त्यांनी पाहिलेच आहे. पण इंग्रजी, जर्मन आणि फ्रेंच या व इतर भाषांत जे जे मिळाले ते सारे विनोबांनी वाचून टाकले आहे.

## आईच्या कंठातले माधुर्य

विनोबांच्या आईचे वडील बळवंतराव वैद्य हे मोठे गवई होते. मामा कीर्तनकार होते. आई भाविक. तिला पुष्कळ गाणी येत. रोज दिवे-लागणीला ती देवाजवळ बसून ती पदे म्हणत असे. तिचा आवाज गोड होता. पहाटेदेखील ती भूपाळ्या म्हणत असे. विनोबांच्या कानी ती गाणी आणि त्यांच्या चाली जणू पक्क्या बसल्या. आई अतिशय भावपूर्ण रीतीने पदे म्हणत असे. विनोबांच्या रचनांतील गेयतेचा उगम आईच्या कंठातून निघालेल्या मधुर सुरावटीत आहे, असे म्हटले तर ते वावगे ठरू नये.

## प्रचंड वाचन

वाचनाची विनोबांना लहानपणापासून गोडी. बडोद्याच्या सेंट्रल लायब्ररीत त्यांचे तासच्या तास जात. त्यांनी वाचनाची स्वतःची अशी एक पद्धतच ठरवली होती. पुस्तक हाती घेऊन ते एकदा चाळीत. त्यामुळे विषयाची कल्पना

त्यांना येई. अशी हजारो पुस्तके त्यांनी चाळली. एखादे पुस्तक महत्त्वाचे वाटले तर ते समग्र वाचून काढीत. सकाळी पुस्तक आणीत ते संध्याकाळी परत करीत ! संध्याकाळचे दुसऱ्या दिवशी. शिवाय सकाळी लायब्ररीत बसून चार-पाच पुस्तकांचा फडशा पाडीत. ग्रंथपालाला माहीत नसे तेदेखील पुष्कळदा त्यांना माहीत असे. एकदा अशीच एका ग्रंथाची शोधाशोध सुरू होती. ग्रंथ सापडता सापडेना. शेवटी तो एका दुसऱ्या ग्रंथाबरोबर बांधला गेला आहे, हे विनोबांनी दाखवून दिले.

लहानपणी त्यांचे पाठान्तर दांडगे असे. दासबोध हा त्यांचा त्या काळातला आवडता ग्रंथ होता. मोरोपंतांची केकावली त्यांना खूप आवडे. खड्या आवाजात ते त्यातला भाग म्हणत.

शाळेत हुषार विद्यार्थ्यांत त्यांची गणना होत असे. त्यांना काही काळ पाठ्यवेतनही मिळत असे.

## चहा सोडला म्हण म्हणजे दार उघडतो

विनोबाजींच्या एका मित्राला चहाचा फार नाद होता. एके दिवशी तो मित्र शौचास गेला असता विनोबाजींनी बाहेरून कडी लावली. तो मित्र आतून ओरडू लागला. विनोबाजी म्हणाले, " चहा म्हणजे नरक आहे. तो सोडीत असलास तर कडी काढतो. नाही तर बस नरकालयात. " तो मित्र काकुळतीस येऊन म्हणाला, " उद्धार कर बाबा. सोडला चहा. परंतु नरकातून वाचव. " आणि कडी काढली गेली. मित्राला मोक्ष मिळाला.

## साहेबालाच का नाही फेकलेस ?

विनोबाजींचा हा मित्र एका श्रीमंताचा मुलगा होता. बडोद्याला त्याची इनामी जमीन वगैरे होती. हा मित्र चांगला तालीमबाज होता. दिसायला गोरापान. घोड्यावर बसून रपेट करायला जायचा. एकदा हा तेजस्वी युवक घोड्यावर बसून आपल्या इनाम जमिनीवरून जात होता. तो तेथे त्याला काय दिसले ? एका साहेबाने तेथे तंबू ठोकला होता.

तो तरुण संतापला. साहेबाचे नोकर तेथे होते. त्याने त्या नोकरांना तंबू उठवा म्हणून सांगितले. नोकर म्हणाले, " गोऱ्या साहेबांचा हा तंबू आहे. हो चालता. "

तो तरुण रागाने म्हणाला, “ही जमीन आमची आहे. तंबू मुकाटयाने हालवा. उद्या जर इथं तंबू दिसला तर मी तो उपटून फेकून देईन.”

दुसऱ्या दिवशी हा राजबिंडा युवक घोड्यावर स्वार होऊन पुन्हा तेथे आला. तो अद्याप तंबू तेथे उभाच! त्याने तो तंबू उपटून फेकून दिला आणि पुन्हा घोड्यावर बसून घरी आला.

“अरे विनू, त्या साहेबाचा तंबू दिला आज फेकून.” मित्र म्हणाला.

“नुसता तंबूच फेकलास वाटत? त्या साहेबालाच का नाही फेकलंस?” विनोबाजी म्हणाले.

या साहेबाने पुढे फिर्याद केली. बडोदे शहरभर खळबळ माजली. विद्यार्थी या तरुणाकडे अभिमानाने पाहू लागले. शेवटी साहेबालाच कानपिचक्या मिळाल्या.

## मी तुला कसा विसरेन?

विनोबाजींचा हा मित्र पुढे मोठेपणी ब्रह्मदेशात गेला. तो मोठा कॉन्ट्रॅक्टर झाला. त्याने खूप पैसा मिळविला. एकदा विनोबाजी नाशिकला आले होते. या मित्राने विनोबाजींस एक चिठ्ठी पाठविली.

किती तरी वर्षांनी दोघे बालमित्र भेटले. विनोबाजी त्याला म्हणाले, “अरे, तुला का विसरेन? ते आपलं बालपण का आपण कधी विसरू?”

विनोबाजी शिकत असता त्यांच्या एका मित्राचे– गोपाळाचे– लग्न झाले. गोपाळाचे लग्न झाले तरीही विनोबाजी खाली रस्त्यातून त्याला गोप्या म्हणूनच मोठ्याने हाक मारायचे.

गोपाळची आई त्यांना म्हणाली, “अरे, ह्याचं आता लग्न झालं आहे. गोप्या म्हणून खालून हाक काय मारतोस? गोपाळ आता मोठा झाला. दोहोंचे चार हात झाले त्याचे.”

विनोबाजी म्हणाले, “तुम्हांला तो मोठा झाला असेल. मला तो बरोबरचा. मी त्याला गोप्याच हाक मारणार.”

## रानात शिवजयंती

आणि इंग्रजी शाळेत असता एकदा शिवजयंतीचा दिवस आला. विनोबाजी आपल्या मित्रांना म्हणाले, " आपण शिवजयंती करू या. "

मित्र म्हणाले, " करू या. परंतु कशी करायची, कुठं करायची ? "

विनोबाजी म्हणाले, " आपण बाहेर जाऊ. मोकळ्या आकाशाखाली, स्वतंत्र रानावनांत ही जयंती साजरी करू. स्वातंत्र्यसंस्थापक शिवाजीमहाराजांचा उत्सव एखाद्या दिवाणखान्यात नको. "

आणि मुलांनी ठरविले. शाळेला सुटी नव्हती. इतिहासाचा तास बुडवून जायचे असे ठरले. मुले गेली. बाहेर पवित्र वातावरणात शिवजयंती या स्वातंत्र्यभक्तांनी साजरी केली. नंतर मित्र म्हणाले, " उद्या दंड होईल. काय करायचं ? "

विनोबाजी म्हणाले, " चार चार आणे बरोबर घेऊन जाऊ. दंड म्हणताच मास्तरांच्या अंगावर फेकू. "

दुसऱ्या दिवशी इतिहासाच्या शिक्षकांनी रागावून विचारले :

" काल तुम्ही कुठं होता ? "

" शिवजयंती साजरी करण्यासाठी गेलो होतो. "

" शाळेत नसती का साजरी करता आली ? "

" इथल्या गुलामखान्यात का शिवजयंती साजरी करता येते ? "

" तुम्ही फाजील आहात. दंड करायला हवा. "

" हा घ्या दंड. आम्ही घेऊनच आलो आहोत. " असे म्हणून भराभरा पैसे फेकले गेले !

शिक्षक स्तंभितच झाले.

## आईची दृष्टी

विनोबांची आई भारी सेवापरायण. शेजारी पाजारी कोणाला काही दुखले-खुपले की ती माउली सेवाशुश्रूषा करायला धावून जायची; स्वयंपाकसुद्धा करून द्यायची. घरचे स्वयंपाकपाणी उरकून ती शेजारी जायची.

विनोबा एकदा तिला म्हणाले, " आई, तू स्वार्थी आहेस बघ. आधी घरचं स्वयंपाकपाणी उरकून मग तू शेजारी-पाजारी जातेस. खरं ना ? "

आई म्हणाली, " आधी घरचं करून मी जाते हे खरंच आहे. पण का जाते, माहीत आहे ? अरे, शेजाऱ्यांचा स्वयंपाक आधी करून ठेवला तर त्यांना थंडगार खायची नाही का पाळी यायची ? त्यांना गरमागरम खायला मिळावं म्हणून जाते हो मागून त्यांच्याकडे. "

## प्रेमळ पक्षपात

विनोबांचे वडील घरात एखाद्या तरी गरीब विद्यार्थ्याला ठेवून घेत. आई शिळेपाके उरले तर स्वतः खायची. त्यापेक्षा जास्त उरले तर मुलांना वाढायची; गरीब विद्यार्थ्याला मात्र ताजे करून घालायची.

एक दिवस आईला विनोबा म्हणाले, " सर्वांशी सारखं वागावं म्हणून तू सांगतेस, आणि तूच पक्षपातानं कशी वागतेस ? मला आपली शिळी पोळी वाढतेस, आणि त्याला मात्र गरम गरम, ताजी ! असा भेदभाव तू कसा करतेस ? "

आई म्हणाली, " तू म्हणतोस तसा भेदभाव होतो खरा माझ्या हातून. पण त्याला कारण आहे. तो मुलगा मला प्रभूसारखा दिसतो, तर तू दिसतोस मुलासारखा ! तुझ्याबद्दल मला आसक्ती वाटते. त्यामुळं माझ्या हातून असा पक्षपात घडतो. तूसुद्धा जेव्हा प्रभूस्वरूप दिसू लागशील तेव्हा हा भेदभाव जाईल बरं !"

आईचे हे म्हणणे ऐकून विनोबा थक्क झाले.

## प्रेम असले की सुचते

कोणाच्या लग्नात जेवणावळीत जेवायचे नाही असा विनोबांनी निश्चय केला होता. १९१६ साली विनोबांच्या बहिणीचेच लग्न झाले. घरात ही धामधूम. ते आईला म्हणाले, " मी लग्नासाठी केलेल्या स्वयंपाकाचं अन्न खाणार नाही. "

त्यांच्या आईने मुलासाठी वेगळा स्वयंपाक केला. मग विनोबांना जवळ बसवून तिने वाढले. म्हणाली, " विन्या तुझा संकल्प मला मान्य आहे.

जेवणावळीतली मिठाई तू खाणार नाहीस ते ठीकच आहे. पण वरण-भात खायला काय हरकत आहे? हा आणि तो वरण-भात मीच तर शिजवला आहे. मग तो वरण-भात खाण्यात तुला अडचण रे कशाची?"

आईच्या ह्या बोलण्याने विनोबांची समजूत पटली. संध्याकाळी त्यांनी मग तोच वरण-भात खाल्ला.

आईने पहिल्या दिवशी मुलाचे म्हणणे मान्य केले. त्याच्यासाठी वेगळा स्वयंपाक केला. मग आपले म्हणणे त्याच्यापुढे मांडले. त्याच्या गळी उतरवले. सत्याग्रहाचाच जणू तो प्रकार. प्रेम असले, माया असली म्हणजे हे सगळे सुचते.

## आईच्या ओव्या

विनोबांची आई रात्री सर्वांच्या मागून झोपायची, आणि सकाळी सगळ्यांच्या आधी उठायची. जात्यावर दळायची. दळताना मधुर गाणी म्हणायची. देवाची, धर्माची गाणी. त्यातून विनोबा आणि त्यांची भावंडे शिकत, संस्कार घेत. कर्मयोग, भक्तियोग, ध्यानयोग, जणू त्या दळण्यात एकवटलेला असे. तिच्या दळण्याच्या वेळच्या गाण्यातल्या ओळी विनोबांना अजून आठवतात—

आठवी माझी ओवी, आठवे वेळोवेळा
बैसलासे डोळं, पांडुरंग।
नववी माझी ओवी, सरले दळण
चुकले मरण, संसारीचे।

## देवाघरी मी निर्दोषी आहे

वडील बोलत, रागे भरत, कधी मारीतही. परंतु वडिलांनी शिक्षा केली तर विनोबाजी लोकमान्य टिळकांचे १९०८ च्या खटल्यातील शेवटचे शब्द बोलून दाखवीत. कोणते बरे ते शब्द?

"तुम्ही जरी मला दोषी ठरवलं तरी मी निर्दोषीच आहे. माझ्या समोरील या न्यायाधिशापेक्षा वरती परमेश्वराचं उच्च न्यायमंदिर आहे. आणि परमेश्वराची अशीच इच्छा दिसते की माझं कार्य माझ्या हालअपेष्टांनीच अधिक वाढावं!"

## मारानं प्रेम नाही मिळत

विनोबाजींचे धाकटे बंधू शिवाजी हेही वडील भावाचेच अनुकरण करायचे. वडील मारू लागले तर ते म्हणायचे, "मारानं प्रेम नाही मिळत !"

## आईवर प्रेम

विनोबाजी जसजसे मोठे होऊ लागले तसतसे आईकडे अधिक ओढले जाऊ लागले. आईच्या मनाचा कोंडमारा त्यांना दिसे. वडिलांना गिरणीचे पीठ चालत नसे, म्हणून आईला घरीच दळावे लागे. पुढे पुढे विनोबाजी आईला दळताना हात लावीत. कधी कधी ते एकटेही दळून देत. आईजवळ देवाधर्माच्या गोष्टी ते बोलत. आईही बोले.

एकदा आई म्हणाली, "विन्या, तू ती गीता–गीता म्हणतोस, मला ते संस्कृत श्लोक नाही समजत. मराठी गीता नाही का रे ? दे एखादी असली तर आणून."

विनोबाजींनी वामनपंडितांची समश्लोकी आईला आणून दिली. परंतु ती समश्लोकीही आईला सारी समजेना. तेव्हा गीतेतीलच ५–२५ सोपे संस्कृत श्लोक विनोबाजींनी काढून दिले. गीतेचे सोपे समश्लोकी भाषांतर करण्याचे विनोबाजींच्या मनात तेव्हापासून होते. किती तरी वर्षे तो विचार त्यांच्या मनात घोळत होता.

हायस्कूलचे शिक्षण संपून विनोबाजी आता कॉलेजमध्ये होते. परंतु महायुद्ध सुरू झाले होते. देशात पुन्हा स्वातंत्र्याचे प्रयत्न सुरू झाले होते. 'गदर' चळवळ त्या वेळेस झाली. गदर म्हणजे बंड महाराष्ट्रातही काही मंडळींनी शस्त्रास्त्रे जमविली होती. समर्थ विद्यालयातील विद्यार्थी पिंगळे या चळवळीत पडला होता व पुढे फाशी दिला गेला.

## धारदार जीभ

लहानपणी विनोबा पायांत घालायचे नाहीत. खुशाल सदरा खांद्यावर टाकून शहरात फिरायचे. हजामतही कित्येकदा वाढलेली असायची. असा हा वरवर बेफिकीर वाटणारा मुलगा. त्याची जीभ मात्र फार धारदार. सहसा

कोणाचा मुलाहिजा न ठेवणारी. लागत नाही ती भाषा काय कामाची, अशी वृत्ती. एखाद्या वेळी त्यांचा तो अवतार पाहून कोणी म्हणे, " अरे, असे गोसावड्यासारखे अस्ताव्यस्त केस का वाढवले आहेस ? "

हा मुलगा तडकाफडकी म्हणायचा, " तुम्ही का हजाम आहात ? मग तुम्हांला ही उठाठेव कशाला ? "

समर्थ रामदास हे विनोबांचे त्या काळात दैवत होते. ते त्यांना आदर्श वाटत. समर्थांनी आध्यात्मिक साहित्यात आपला प्रवेश करवला, अशी विनोबांची धारणा. त्यातून ज्ञानदेवापर्यंत आणि पुढे संस्कृतमधून वेदापर्यंत आपण पोचलो असे त्यांना वाटते. ' दासबोध ' ही सोन्याची खाण, आणि ' मनाचे श्लोक ' ही दागिन्यांची तिजोरी, अशी विनोबांची भावना. समर्थांचा ' समुदायाचा हव्यास ' विनोबांना फार रुचला. समर्थ हा त्यांचा आदर्श तेव्हा होता, आणि त्यामुळे जणू समर्थांप्रमाणेच ते अतिशय फटकळपणे बोलत.

## शिक्षणातली लूट

विनोबा कॉलेजात असतानाची गोष्ट. त्यांना त्यांचे प्रिन्सिपाल इंग्रजी शिकवीत. पण अधूनमधून तास घेऊ शकत नसल्याच्या नोटिसा ते पाठवीत आणि तास बुडत.

एक दिवस अशीच नोटीस लागली. " बीइंग इनूडिस्पोज्ड प्रिन्सिपाल वुइल नॉट एंगेज द क्लास टुडे. प्रकृति-अस्वास्थामुळे प्राचार्य तास घेणार नाहीत."

वर्गातलाच एक मुलगा नोटिस आल्यावर उठला आणि म्हणाला, " लेट मिस्टर भावे टेक द पीरियड— ( आज भावे हा तास घेतील. )"

विनोबा उठले आणि त्यांनी एक इंग्रजी कविता शिकवली. कविता अगदीच मामुली होती. प्रोफेसर, प्रिन्सिपाल यांना शिकवायचा काहीही शीण नव्हता.

वर्ग संपल्यावर विनोबा म्हणाले, " बोला, आता देता की नाही मला प्रिन्सिपालचा पगार ? "

प्रिन्सिपालना तेव्हा बाराशे रुपये पगार होता. पण शिकवण्याची ही असली तऱ्हा ! विनोबांना वाटे, केवढी ही लूट ! कॉलेजात अशा गोष्टींमुळे त्यांचे मन रमत नव्हते.

विनोबाजींच्या मनात कोणते विचार-कल्लोळ उसळत होते ते देव जाणे. ते इंटरमीजिएटच्या वर्गात होते. त्यांचे हृदय अशान्त होते. देशाचे स्वातंत्र्य त्यांना हाक मारीत होते. बंगालभर तरुणांची धरपकड होत होती. तरुण असणे जणू गुन्हा होता ! ज्योतिन् मुकर्जींसारखे तेजस्वी तरुण टॅगार्टजवळ खंदकाची जणू लढाई रानात देत होते. विनोबाजींस स्वस्थ बसवेना. परीक्षेसाठी म्हणून ते मुंबईस जाण्यास निघाले. परंतु सुरतेस ते उतरले. तेथून तापी व्हॅली रेल्वेने भुसावळला जाऊन ते बंगालकडे जाणार होते. सुरतेहून त्यांनी वडिलांना चार ओळींचे एक कार्ड लिहिले.

" मुंबईस परीक्षेसाठी मी जात नाही. अन्यत्र जातो आहे. मी कुठेही गेलो व कुठेही असलो तरी कोणतीही अनैतिक गोष्ट माझ्या हातून होणार नाही, ही तुम्हांला खात्री आहेच."

## प्रमाणपत्रे जाळली

१९१६ साली विनोबांनी घर सोडले. घरात राहणे अशक्य व्हावे, अशी काही घरची परिस्थिती नव्हती. आई अतिशय प्रेमळ. वात्सल्याने ओतप्रोत. वडील उद्योगप्रिय, व्यासंगी. स्वच्छता आणि टापटीप यांचे भोक्ते. सज्जन. कोणालाही अनुकरण करावेसे वाटावे असे. पण हे सगळे असूनही विनोबांना वाटले की, आता घरात राहण्याने आपण गुदमरून जाऊ ! इंटरमध्ये ते होते. ' आणखी दोन वर्षं कळ काढ आणि पदवी पदरात पाडून घे.' अशी समजावणी मित्र करीत होते. विनोबा म्हणत, " माझी विचार करण्याची रीत अशी नाही." घर सोडण्यापूर्वी मिळालेली वेगवेगळी प्रमाणपत्रे, शिफारसपत्रे घेऊन ते चुली-जवळ जाऊन बसले. हात शेकता शेकता एकेक प्रमाणपत्र त्यांनी अग्नीला अर्पण केले.

आईने विचारले, " अरे हे काय करतो आहेस ? "

विनोबा म्हणाले, " ही प्रमाणपत्रे, शिफारसपत्रे जाळतो आहे. "

आईने विचारले, " का ? "

विनोबा म्हणाले, " मला त्यांचा काय उपयोग आहे ? "

आई म्हणाली, " नसला उपयोग तर राहतील पडून. तुला त्यांचं ओझं नाही ना होत ? "

विनोबा काही बोलले नाहीत, आणि प्रमाणपत्रे जाळणेही त्यांनी थांबवले नाही ! सूर्याजीची दोर कापून टाकण्याची युक्ती बाळपणीच त्यांनी अवगत केली होती.

## अद्वैताचा पराभव

विनोबा सुरतेहून निघाले ते काशीला आले. तेथे एका घराच्या चौथ्या मजल्यावर ८'×५' ची एक छोटी खोली भाड्याने घेतली. अध्ययनासाठी जागा फार चांगली होती. दिवसाकाठी एकदा जेवणासाठी काय ते खाली उतरत. अन्नछत्रात जेवत. तिथे वाढप व्हायला तास दीड तास लागे. तेवढ्यात गीतापाठ ते करून टाकीत. जेवणानंतर प्रत्येकाला दोन पैसे दक्षणा मिळे. एक पैशाचे दही आणि एक पैशाची वाफारलेली रताळी विनोबा रात्री खात आणि भागवीत.

काशीत कधीमधी शास्त्रार्थांच्या सभा होत. विनोबा अशा सभांना जात. एकदा द्वैतवादी आणि अद्वैतवादी यांची घनघोर चर्चा झाली, आणि अद्वैतवाद्यांनी वाद जिंकला ! विनोबा त्यावर म्हणाले, "तुम्ही अद्वैतवाद्यांनी द्वैतवाद्यांशी वाद मांडला त्यामुळे व्यवहारात तुम्ही द्वैताला मान्यता दिली हे सिद्धच झाले ! आपण त्यांना अद्वैतवाद्यात समाविष्ट करून घेतले असते तर आपले अद्वैत सहजच सिद्ध झाले असते !"

विनोबांच्या ह्या बोलण्यामुळे सर्वजण चकित झाले !

## काशीक्षेत्री वास

ते काशीक्षेत्री आले. ज्या गंगेच्या तीरावर ज्ञानवैराग्य पिके तेथे ते आले. संस्कृतच्या अध्ययनाची हौस येथे त्यांनी पुरी करून घेतली. अन्नछत्रात जेवत. रात्रंदिवस ज्ञानोपासना चाले. येथे मूर सेन्ट्रल लायब्ररी आहे. तिच्यातील वेचक पुस्तके त्यांनी वाचली. अशी ज्ञानाची उपासना चालली असता आयुष्यातील क्रान्तिकारक क्षण आला. गीतामाउलीच्या तळमळणाऱ्या या बाळाला महान आधार मिळाला.

## महात्माजींचे दर्शन

बनारस हिंदू विद्यापीठाचा कोनशिलासमारंभ होता. डॉ. ॲनी बेझंट

यांच्या अध्यक्षतेखाली हा समारंभ व्हायचा होता. महामना पंडित मदन मोहन मालवीय यांनी गांधींना आमंत्रण दिले होते. गांधीजी अद्याप महात्मा झाले नव्हते. साधे गांधीजीच होते. आफ्रिकेतील सत्याग्रहाचा लढा यशस्वी करून ते हिंदुस्थानात आले होते. नामदार गोखले त्यांना म्हणाले होते, "हिंदुस्थानात काही करण्यापूर्वी आधी देशभर हिंडा. देशाची नाडीपरीक्षा करा." १९१५ च्या फेब्रुवारीत गोखले निवर्तले. गांधीजी त्या वेळेस हिंडत हिंडत शान्तिनिकेतनमध्ये आलेले होते. गांधीजींची परिभ्रमणयात्रा सुरू होती, आणि ते आमंत्रण आले.

त्या वेळेस गांधीजी अंगात कुडते घालीत. डोक्यास काठेवाडी पद्धतीचा रुमाल बांधीत. धोतर नेसत. या पोशाखात गांधीजी विद्यापीठात आले. द्वारपाळ त्यांना आत सोडीना. गांधीजी निमंत्रणपत्रिका बरोबर घेऊन आले नव्हते. शेवटी मदनमोहनांस ती गोष्ट कळली. ते धावत आले व गांधीजींना घेऊन गेले.

आणि गांधीजींचे तेथे ते ऐतिहासिक असे भाषण झाले. तेथे अनेक राजेमहाराजे दागदागिन्यांनी सजून आले होते. ते रानटी नटणे– सजणे महात्माजींस बघवेना. महात्माजी बोलू लागले :

"आपण शिकतो, परंतु गरिबांची आपणास आठवण नसते. हे राजेमहाराजे माणिकमोत्यांनी नटून इथे बसले आहेत. परंतु त्यांची प्रजा उपाशी आहे. जनतेला ज्ञान नाही, अन्न नाही, उद्योग नाही, आरोग्य नाही. शेतसारे वाढलेले. वास्तविक हे सारे दागदागिने गरिबांचे संसार सुखी करण्यासाठी दिले पाहिजेत. सुखविलास करायला आपल्याला परवानगी नाही. ही चोरी आहे. आपण जनतेचे विश्वस्त आहोत. ..."

अशा आशयाचे ते भाषण सुरू झाले. श्रोत्यांत खळबळ सुरू झाली. राजेमहाराजे अस्वस्थ झाले. डॉ. ॲनी बेझंट कावऱ्याबावऱ्या झाल्या. त्यांनी महात्माजींस भाषण थांबवायला सांगितले.

## गांधीजींशी पत्रव्यवहार

विनोबाजी त्या वेळी काशीत होते. नवपुरुष-दर्शन त्यांना झाले. या पुरुषाच्या ठिकाणी काही तरी निराळेच निर्भय तेज आहे असे त्यांना वाटले. आफ्रिकेत कित्येक वर्षे सत्याग्रहाचा संग्राम करणारा तो महावीर त्यांनी पाहिला

आणि त्याच्याशी त्यांनी पत्रव्यवहार सुरू केला. पत्रांतून अनेक प्रश्नोत्तरे झाली. महात्माजींनी तिकडे साबरमतीच्या तीरी, जेथे दधीची ऋषींनी स्वतःचे बलिदान केले होते त्या पवित्र स्थानी, सत्याग्रहाश्रम सुरू केला होता. विनोबाजींना त्यांनी बोलाविले. काशीहून विनोबाजींनी जाण्याचे ठरविले. जगात आनन्द, शान्ति, न्याय, समता, स्वातंत्र्य नांदावीत म्हणून सर्व प्रकारच्या हालअपेष्टांचे हालाहल प्राशन करणाऱ्या या प्रत्यक्ष महादेवाजवळ जाण्याचे विनोबाजींनी निश्चित केले.

## लिखाण गंगार्पण

या वेळपर्यंत विनोबाजींनी खूप लिहिले होते. बाडे जवळ पडली होती. बडोद्यास असतानाच मोरोपंतांवर एक मोठा निबंध त्यांनी लिहिला होता. संतांवरही लिहिले होते. अनेकविध असे तेजस्वी लिखाण त्यांच्याजवळ पडलेले होते. परंतु एके दिवशी गंगेच्या तीरावर ते बसले आणि ते सारे वाङमय त्यांनी गंगेला अर्पण केले ! जवळचा सारा पत्रव्यवहारही गंगेस समर्पिला. जणू नवीन अंक सुरू होणार होता. पूर्वीच्या २२ वर्षांच्या संसारातील मांगल्य तेवढे त्यांनी बरोबर घेतले. त्यातील ज्ञान, वैराग्य, स्फूर्ती यांचा संचय बरोबर घेतला, आणि साबरमतीस जाण्यासाठी ते निघाले.

## सत्याग्रहाश्रमात

साबरमतीच्या आश्रमात विनोबाजी राहू लागले. महात्माजी व विनोबाजी दोघे दळीत. एका खुंटयाला दोघांचे ते हात असत. ते दृश्य मी माझ्या डोळ्यांसमोर आणून अनेकदा सद्गदित झालो आहे.

‘ सतां सद्भिः संगः कथमपि हि पुण्येन भवति । ’ असा थोर कवी भवभूती याचा चरण आहे. संतांची परस्पर भेट म्हणजे ते एक दुर्मिळ असे दिव्य दर्शन असते.

विनोबाजींनी सुरतेहून ते चार ओळींचे जे एक पत्र लिहिले, त्यानंतर पुन्हा त्यांनी घरी कधी काही कळविले नाही. महात्माजींना हे बरे वाटले नाही. घरी आई-बाप काळजी करीत असतील. आई-बापांस कुशल कळविणे हा धर्म होता. त्यांना ताटकळत ठेवणे म्हणजे हिंसाच होती. अहिंसेच्या थोर आचार्याने

त्यांच्या घरी चार ओळींचे एक कार्ड लिहिले.

" तुमचा विनोबा माझ्याजवळ आहे. इतक्या लहान वयात तुमच्या मुलाने इतकी तेजस्विता, इतके वैराग्य मिळविले आहे की, तसे वैराग्य अंगी येण्यासाठी मला कित्येक वर्षे धडपडावे लागले. "

असे ते पत्र होते. या पत्रातच प्रथम विनोबाजींना ' विनोबा ' हे नाव लावण्यात आले. त्यांचे नाव विनायक. महात्माजींनी ' तुमचा विनोबा ' असे प्रेमाने लिहिले. आणि ते नावच आता रूढ झाले.

## विनोबाजी वाईस येतात

वाईच्या प्राज्ञपाठशाळेचे थोर आचार्य नारायणशास्त्री मराठे यांच्याजवळ शांकरभाष्य वाचण्याची विनोबाजींस अति तीव्र इच्छा होती. महात्माजींच्या अनुज्ञेने ते वाईस आले. वाईस त्यांचे घर होतेच. आजी होती. अध्ययन सुरू झाले. याच वेळेस त्यांनी खूप देहदंडना केली. एका वस्त्राने राहात. रात्री पांघरायला घ्यायचे नाही; पाऊस पडत असला तरीही गंगेच्या घाटावरच पडून राहायचे. कधी खायचेच नाही. खाण्याचे नाना नियम केले. अमूकच खायचे. इतकेच खायचे. एवढेच पदार्थ खायचे. उन्हातच कधी जाऊन बसत. असे हे प्रयोग चालले. शारीरिक तपश्चर्या जणू त्यांनी मांडली होती. बौद्धिक तपश्चर्या सुरूच होती.

## अलौकिक वाक्शक्ती

आश्रमातून वर्षाची सुट्टी घेऊन विनोबा वाईला आले. नारायणशास्त्री मराठे ( केवलानंदसरस्वती ) तेथे प्राज्ञ पाठशाळा चालवीत. विनोबा त्यांच्याजवळ पढत. सहा महिन्यांत त्यांनी शांकर-प्रस्थानत्रयीवर उत्तम पारंगतता मिळवली. विनोबा गावात राहात आणि पाठापुरते आचार्यांकडे येत. एक दिवस दुसरे शिष्य पाठ घेत होते म्हणून विनोबा आंब्याच्या सावलीत येरझारा घालीत पाठ गुणगुणत होते. त्यांचे अस्खलित उच्चार आणि मधुर गुणगुणणे यांमुळे आत आचार्यही प्रभावीत झाले आणि म्हणाले, " गीर्वाणवाणीचे असे सुन्दर उच्चारण ऐकले की ही देववाणी आहे हे प्रत्ययास येते. आद्यशंकराचार्यांची ही वाणी आहे अशी ओळख पटते. विनोबांसारखे पठण करता आले पाहिजे. विनोबांची वाक्शक्ती अलौकिक आहे. "

## महाराष्ट्राचा पायी प्रवास

शांकरभाष्य संपले. आणि महाराष्ट्राची पायी यात्रा त्यांनी केली. जेथे मुक्काम करीत त्या गावी एखाद्या शेतकऱ्याकडे— ब्राह्मणेतराकडे— ते भाकर खात. महाराष्ट्रातील किल्ले, महाराष्ट्रातील पवित्र तीर्थे,— सारे त्यांनी पाहिले. कृष्णा, गोदावरी व भीमा यांच्या तीरांवरून हिंडले आणि पुण्यास आले.

## डोकी तपासली

विनोबांनी त्या काळात महाराष्ट्रात चारशे मैलांची पदयात्रा केली. गावोगाव जात. गीतेवर प्रवचने करीत. 'वेदशास्त्रसंपन्न विनायकशास्त्री भावे' म्हणून लोक त्यांना ओळखीत ! त्यांनी त्या काळात आपल्या एका मित्राला पत्रात लिहिले, " अनवाणी पायांनी आणि बोडक्या माथ्याने महाराष्ट्र धांडोळला. ... महाराष्ट्रातील अव्वल दर्जाच्या गणल्या गेलेल्या एकवीस जणांची डोकी तपासली ! "

## खरा शिक्षक

वाईला विनोबांनी एक वाचनालय सुरू केले. त्यासाठी दळण दळून ते पैसे मिळवीत. एक दिवस विनोबा दळत असतानाच एक शिक्षक आले आणि चर्चा करू लागले.

" शिक्षणात सुधारणा केली पाहिजे ही गोष्ट आपणाला मान्य असेलच. " शिक्षकांनी विचारले.

" दुसऱ्याला शिकवण्याऐवजी शिक्षकानं स्वतःच शिकलं पाहिजे. जो कमीत कमी शिकवतो तो खरा शिक्षक. "

" पण शिक्षकानं आपला विषय उत्तम तयार करावा ही गोष्ट सर्व-मान्य आहे. "

" शिकवणं म्हणजे स्वतः आचरण करणं. आचरण करतो तो आचार्य. आचार्य काय बोलतो त्यापेक्षा काय करतो ते महत्त्वाचं आहे. "

" ज्ञान देणं हेच आचार्यांचं काम असतं. "

" ज्ञान देऊ म्हटल्यानं देता येत नाही. ते स्वतःच मिळवावं लागतं.

आचार्य नुसतं बोट दाखवतो. त्यामुळंच त्याला देशिक म्हणतात. डोळे उघडे पाहिजेत. म्हणजे ज्ञान कुठूनही मिळतं. ”

विनोबांचे बोलणे असे परखड असे.

## वर्षभराचा अहवाल

वाईच्या नारायणशास्त्री मराठे ऊर्फ केवलानंदसरस्वतींकडे अभ्यास करण्यासाठी विनोबा आश्रमातून वर्षाची सुट्टी घेऊन बाहेर पडले होते. ह्या वर्ष-भरात त्यांनी काय काय केले त्याचा एका पत्रात गांधीजींना त्यांनी अहवाल दिला आहे. विनोबांनी वर्षभरात किती प्रचंड उद्योग केला त्यांची त्यावरून कल्पना येते.

१ ) उपनिषद, गीता, ब्रह्मसूत्र व शांकरभाष्य, मनुस्मृती व पातंजल-योगदर्शन या ग्रंथांचा अभ्यास केला. शिवाय न्यायसूत्र, वैशेषिक सूत्र, याज्ञ-वल्क्यस्मृती हे ग्रंथ वाचले.

२ ) गीतेचा वर्ग चालवला. सहा विद्यार्थ्यांना कोठल्याही प्रकारचा मोबदला न घेता अर्थासह गीता शिकवली.

३ ) ज्ञानेश्वरीचे सहा अध्याय चार विद्यार्थ्यांना शिकवले.

४ ) नऊ उपनिषदे दोन विद्यार्थ्यांना शिकवली.

५ ) विद्यार्थ्यांसाठी हिंदी वर्तमानपत्र वाचण्याचा उपक्रम केला.

६ ) दोन विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषा शिकवली.

७ ) रायगड, सिंहगड, तोरणा वगैरे ऐतिहासिक स्थळांची चारशे मैलांची पायी सफर केली.

८ ) प्रवासात गीतेवर पन्नास प्रवचने दिली.

९ ) वाईत विद्यार्थी मंडळाची स्थापना केली. पैशाला दोन शेर या भावाने पंधरा विद्यार्थी दळत. त्या पैशांतून दोन महिन्यांत चारशे पुस्तकांचे वाचनालय एक स्थापन केले.

१०) सत्याग्रहाश्रमाच्या तत्त्वांचा प्रचार करण्याचा प्रयत्न केला.

## लोकमान्यांचे दर्शन

१९१४ साली लोकमान्य सुटले होते. स्वराज्याची चळवळ त्यांनी सुरू केली होती. “ स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे ” हा मंत्र म्हणायला ते

शिकवीत होते. विनोबाजी त्यांच्या दर्शनास गेले. लोकमान्य बसलेले होते. विनोबाजींनीं प्रश्न त्यांना विचारले :

१. तुम्ही संपूर्णपणे निर्भय झाला आहात का ?

२. कबीराचा बीजक हा वेदान्तावरील ग्रंथ तुम्ही वाचला आहे का ?

३. मोक्षप्राप्ती ज्ञानाने होईल असे आपल्याला वाटते का ?

विनोबाजी ही गोष्ट सांगताना म्हणाले, " त्या महापुरुषाने पहिल्या दोन प्रश्नांची उत्तरे न देता माझ्याकडे पाहिले. त्या पाहण्यात मला उत्तरे मिळाली.

तिसऱ्या प्रश्नाचे उत्तर देताना टिळक म्हणाले : " होय, ज्ञानाने मोक्ष मिळू शकेल. " आणि पुढे म्हणाले, " परंतु ज्ञानी लोकसंग्रहासाठी कर्मे करील. "

साष्टांग प्रणाम करून विनोबा निघून आले. "

## डोळे बिघडले

विनोबाजी पुन्हा आश्रमात आले. परंतु त्यांचे डोळे फारच बिघडले; जणू काही दिसेना. तरी ते चष्मा घेत ना. बडोद्यास शिकत असताना त्यांनी पायात कधी घातले नाही. उन्हातून तसेच जात. आणि अपरंपार केलेले वाचन. आणि वाईच्या त्या देहदंडना. या सर्वांचा परिणाम डोळ्यांवर झाला. महात्माजींनी शेवटी चष्मा घ्यायला लावले आणि चष्मा आला.

## सम्यक् दृष्टी हवी

डोळ्यांची ही गोष्ट सांगताना एकदा विनोबाजी म्हणाले, " आश्रमातील ज्या खोलीत मी राहात असे त्या खोलीत खूप मुंग्या असत. मला त्या दिसत नसत. परंतु डोळ्यांना आरशी आली आणि त्या मुंग्या दिसू लागल्या. वाटलं, आजपर्यंत किती चिरडल्या गेल्या असतील हरी जाणे ! जसं बाहेरच्या डोळ्यांचं तसंच बुद्धीच्या डोळ्याचंही. विचाराची स्वच्छ दृष्टी नसेल, ज्ञानचक्षू आंधळा असेल, तर आपल्या हातून किती अनुचित प्रकार होतील त्याची सीमा नाही. "

## आईला आदरांजली

१९१८ सालची गोष्ट. आई अत्यवस्थ असल्याचे विनोबांना त्यांच्या

मित्रांनी कळवले. शुश्रूषेसाठी ते येऊ शकले तर चांगले, असेही मित्राने कळवले. विनोबा बडोद्याला घरी आले. आईला त्यामुळे बरे वाटले.

पुढे दुखणे विकोपाला गेले आणि आई वारली. उत्तरक्रियेचा प्रश्न निर्माण झाला. आईचे विचार ध्यानी घेऊन उत्तरक्रिया करावी असे वडिलांचे म्हणणे. विनोबांना स्मशानातले कर्मकांड पसंत नव्हते. त्यांनी स्मशानात जाण्याचे नाकारले. घरी बसून त्यांनी गीतेचे अठरा अध्याय म्हटले व आपली आदरांजली अर्पण केली.

## आई गेली तरी ओलावा देतच आहे

आईवर त्यांचे अतोनात प्रेम. आईच्या आठवणी ते किती हळुवारपणाने सांगतात. ते सुरतेहून निघून गेले, तेव्हा आई घरी म्हणाली, " कुठं नाटक-तमाशासाठी तर नाही ना तो पळून गेला ? चांगल्या गोष्टींसाठीच तो गेला आहे. देशाच्या, देवाच्या कामासाठी गेला आहे. त्याचा मला अभिमानच वाटेल. "

एकदा विनोबाजी म्हणाले, " तीन जणांचे आत्मे मला जणू सारखे दिसत असतात. माझ्या आईचा, लोकमान्यांचा, व विधायक कामातील महात्माजींचे उजवे हात मगनलाल गांधी यांचा. "

एकदा ते म्हणाले, " दुपारी कुणी भिकारी आला तर माझी आई त्याला घास द्यायची. म्हणायची, त्याच्या रूपानं देव आला असेल. देव अनेकांच्या रूपानं येतो. "

विनोबाजींनी विचार लिहून ठेवले आहेत. विचार-पोथी असे नाव. त्यांची ती वही वर्ध्यास मी वाचली होती. एके ठिकाणी ते लिहितात—

" आई गेली; परंतु तिच्या प्रेमाचा ओलावा मला आतून मिळतच आहे. अमरत्वाचा हा पुरावा नाही काय ? "

विनोबाजींनी अत्यन्त सोपी व प्रासादिक गीताई महाराष्ट्रास दिली. मातृप्रेमातूनच त्या गीताईचा जन्म आहे.

## आत्मा अमर आहे

अमदाबादला आश्रमात असतानाची गोष्ट. सकाळी विनोबा नदीवर आंघोळीला गेले. एकाएकी ते गटांगळ्या खाऊ लागले. ' वाचवा-वाचवा '

असे ओरडण्याऐवजी ते ओरडले, " बापूंना माझे प्रणाम सांगा. विनोबा गटांगळ्या खात गेला कळवा, आणि सांगा– आत्मा अमर आहे ! "

पण लोकांनी आरडाओरडा केला आणि काठाकाठाने शोधाशोध घेत लोक धावू लागले. पुढे एका दगडाला विनोबा लागले आणि सावरले. दगडावर बसून ते म्हणत होते, ' आत्मा अमर आहे. आत्मा अमर आहे. ' लोक ते दृश्य पाहातच राहिले. नंतर विनोबा हसले आणि आश्रमात परत आले.

## शक्ती कोठून ?

साबरमती आश्रमातील गोष्ट. विनोबा एखाद्या जडभरताप्रमाणे अखण्ड श्रमत. गांधीजींच्या जवळ जवळ वावरत नसत. दुरून सहज दिसेल ते पाहात, ऐकत. गांधीजींची आश्रमातील प्रत्येक व्यक्तीवर बारीक नजर असे. एक दिवस गांधीजींनी विनोबांना बोलावले. म्हणाले, " चल माझ्याबरोबर फिरायला. "

दोघे फिरायला निघाले.

गांधीजी थोडे लांबवर गेल्यावर त्यांना म्हणाले, " माझं तुझ्याकडे लक्ष नाही असं नको समजूस. "

" बापू, तसं मी नाही समजत. "

" तुझं शरीर तर हे असं दुबळं. मग कामाची एवढी शक्ती तुला कोठून येते ? "

" शक्ती शरीराची नाही, आत्म्याची आहे. "

त्यानंतर दोघांत खूप चर्चा झाली. गांधीजींनी मनाशी खूणगाठ बांधली की, ज्या आध्यात्मिक भूमिकेवर पोचण्यासाठी आपण धडपडत आहोत तेथून पुढची वाटचाल याने सुरू केली आहे.

## एक गंमत

गुजरातेत वडिलांना ' बापू ' आणि आईला ' बा ' म्हणण्याची प्रथा आहे. स्त्रीच्या नावापुढे बा लावतात. आश्रमीयांचे गांधीजी हे बापू आणि कस्तुरबा या बा. पण या दोघांप्रमाणेच विनोबा हेदेखील आश्रमीयांच्या बोलण्यात नेहमी निघणारे नाव.

आश्रमात नेहमी पाहुणे-रावळे येत. कुतूहलाने तिथल्या माणसांची चौकशी करीत.

एकदा एक गुजराती गृहस्थ आले. विनोबांचा उल्लेख झाल्यावर त्यांना वाटले, कस्तुरबांप्रमाणे याही कोणी आश्रमातील प्रमुख स्त्रियांपैकी असतील. त्यांनी अभावितपणे विचारले, "ह्या विनोबा कोण? कुठल्या? काय करतात?"

हा प्रश्न ऐकून कार्यकर्त्यांना हसू फुटले. 'विनोबा ही एक बाई नसून पुरुषच आहे.' हे त्याने सांगितले तेव्हा त्या गृहस्थालाही हसू फुटले.

विनायकाला विनोबा बनवून एका बाजूला गांधींनी त्यांना संतांच्या मालिकेत बसवले, दुसऱ्या बाजूला मातेच्या!

## रागांची वर्गवारी

आश्रमातही संगीत सुरू व्हावे असे एकदा गांधीजींच्या मनात आले. विष्णू दिगंबर हे त्या काळातले मोठे संगीतज्ञ. गांधीजींनी त्यांना पत्र पाठवून एका माणसाची मागणी केली. 'संगीतशास्त्र जाणणारा आणि भक्त' अशा दोन गुणांचा तो असावा अशी गांधीजींची अपेक्षा. त्यांनी खरे शास्त्र्यांना पाठवले.

त्यांची आणि विनोबांची दोस्ती झाली. 'संगीत–रत्नाकर' नावाचा संस्कृत ग्रंथ पंडितजींना वाचायचा होता. विनोबांनी त्यांना ग्रंथ वाचून दाखवावा आणि तो समजावून देता यावा म्हणून शास्त्रीबुवांनी विनोबांना रागांचे ज्ञान द्यावे, अशी योजना ठरली. शास्त्रीबुवांनी अनेक राग शिकवले आणि विनोबांनी ग्रंथ समजावण्याचे काम पार पाडले.

पुढे विनोबा त्यांना म्हणाले, "जिथं अर्थाचा संबंध येतो तिथं त्याबरोबर मी वाहवत जातो आणि रागाचं अनुसंधान सुटतं. मला सरगम शिकवा."

शास्त्रीबुवांनी मग सरगमचे धडे दिले. पद्यापेक्षा त्यात विनोबांना अधिक आनंद मिळाला. मग विनोबांनी रागांना वेगळी नावे दिली. अमूक राग वीरश्रीचा, तमूक शान्तीचा, तिसरा समाधीचा. असे नवे वर्गीकरण त्यांनी केले. मग विनोबांनी सतार शिकायला सुरवात केली. सूक्ष्म, सूक्ष्मतर, सूक्ष्मतम स्वर एकाच तारेतून काढायची कला त्यांनी अवगत करून घेतली. त्यात त्यांना अपार आनंद मिळू लागला. सूक्ष्म स्वरविस्ताराचा आनंद विशेष असतो

असे त्यांचे मत. सूक्ष्मात अर्थ अधिक खुलतो असा त्यांचा अनुभव. सूक्ष्मात आनंद प्रभावी होतो, परिष्कृत होतो, शुद्ध होतो, असे त्यांना वाटते.

पोलिसांना स्वैर सत्ता देणारा व वैयक्तिक स्वातंत्र्य नष्ट करणारा असा रौलेट कायदा सरकारने विरोध न जुमानता केला. महात्माजींनी सत्याग्रहाचे प्रचंड आंदोलन सुरू केले. विनोबाजी त्या वेळेस पुन्हा एकदा आपल्या गागोदे गावी आले. पेणला त्यांनी व्याख्यान दिले. गागोद्याहून चुलतभाऊ रघुनाथ याला ते साबरमतीस घेऊन गेले. हा रघुनाथ पुढे जवळ जवळ १९२५–२६ सालापर्यंत साबरमतीच्या आश्रमातच होता.

## वर्ध्यास

इकडची यात्रा संपवून विनोबाजी पुन्हा साबरमतीस गेले. आणि १९१९ –२० साल आले. लोकमान्य दिवंगत झाले. असहकार सुरू झाला. ते तेजस्वी दिवस होते; वकील वकिल्या सोडीत होते. विद्यार्थी शाळा-कॉलेजे सोडीत होते. कोणी आपल्या सर वगैरे पदव्या भिरकावीत होते. व्यापारी राष्ट्रीय कार्यात येत होते आणि एके दिवशी स्वर्गीय जमनालालजी साबरमतीला आले. ते महात्माजींस म्हणाले, " मला जवळ घ्या. स्वतःचा मुलगा मला माना !" आणि जमनालालजी महात्माजींचे मानसपुत्र झाले. एकदा ते महात्माजींस म्हणाले, " महात्माजी, इथं साबरमतीच्या आश्रमात खूप गर्दी आहे. वर्ध्याला एक शाखा काढा ना."

आणि वर्ध्याला शाखा निघाली. ती शाखा चालवायला विनोबाजींस पाठवण्यात आले. तेव्हापासून ते वर्ध्याचे झाले.

## वर्ध्याचा सत्याग्रहाश्रम

वर्ध्यासच विनोबाजींची सेवामय व कर्ममय तपश्चर्या सुरू झाली. हजारोंना त्यांनी स्फूर्ती दिली. नवीन दृष्टी दिली. महाराष्ट्र–धर्म नावाचे मासिक त्यांनी सुरू केले. त्याचे चारच अंक निघाले. उपनिषदातील तत्त्वज्ञानावर त्यात सुंदर लेख आहेत. नागपूरचा सुप्रसिद्ध झेंडा-सत्याग्रह त्या वेळेस सुरू होता. चौथ्या अंकाच्या शेवटच्या स्फुटात 'धर्मक्षेत्रे नागपुरे' या शीर्षकाखाली अत्यंत तेजस्वी असा लेख आहे. तिरंगी राष्ट्रीय झेंड्यावर तो लेख आहे. सेवा दलाच्या निबंधावलीत तो असला पाहिजे.

महाराष्ट्र-धर्म मासिक पुढे बंद झाले. महाराष्ट्र-धर्म नावाचे साप्ताहिक त्यांनी सुरू केले. मासिकात वा या साप्ताहिकात जाहिरात नसे; आणि सारे विनोबाजीच लिहीत. या साप्ताहिकात तुकारामांचे अभंग म्हणून एक सदर असे. त्या सदराखाली निवडक अभंग देऊन त्यावर भाष्य असे. समानार्थक ज्ञानेश्वरीतील ओव्या वगैरे देत. अशी ती सुंदर प्रबोधवाणी होती. या साप्ताहिकातील निवडक लेखांचे ' मधुकर ' म्हणून पुस्तक आहे. अती अमोल असे ते स्फूर्तिदायी पुस्तक आहे. ते तुम्ही अवश्य वाचा.

महाराष्ट्र-धर्म साप्ताहिकातील ते लिखाण प्राणमय असे होते. बुद्धीची प्रखरता व सूक्ष्मता, भावनेची ऊब, साभिप्राय तेजस्वी शब्दरचना, यांमुळे ते लिहिणे बुद्धीची व हृदयाची पकड घेते. महाराष्ट्र-धर्म या मासिकातील भाषेपेक्षा महाराष्ट्र-धर्म या साप्ताहिकातील भाषा अधिक सुटसुटीत आहे. मासिकातील भाषेत क्वचित कृत्रिमता वाटते. अनुप्रासांची हौस दिसते. " तर्काच्या कर्कश किसणीत किसून कीस काढणे " असे शब्दप्रयोग मासिकात आढळतात. परंतु विनोबाजी त्या वेळेस तरुणच होते.

## झेंडा सत्याग्रह

राजद्रोहाला प्रोत्साहन देणारा लेख लिहिल्याबद्दल गांधीजींवर सरकारने खटला भरला. त्या खटल्याचा निकाल १८ मार्च १९२२ रोजी लागला. गांधीजींना सहा वर्षांची सजा ठोठावण्यात आली ! या गोष्टीला एक वर्ष पूर्ण झाले. त्या दिवशी राष्ट्रीय झेंडा हाती घेऊन नागपुरात एक विराट मिरवणूक काढण्यात आली. पोलिसांनी मिरवणुकीवर अमानुष लाठीमार केला. त्यावर खवळून राष्ट्रीय सप्ताहाच्या शेवटच्या दिवशी १३ एप्रिलला पुन्हा प्रचंड मिरवणूक काढण्यात आली. नागपूरच्या सिव्हिल लाइन विभागात ती अडवण्यात आली. आपल्याच देशाच्या भूमीवर आपला झेंडा मिरवण्याला परक्या सरकारने बंदी केली, तेव्हा लोक खवळले आणि झेंडा सत्याग्रहाला तोंड लागले. ह्या सत्याग्रहात विनोबांना अटक झाली. त्यांना सजा झाली. तेथे गिट्टी फोडणे आणि सव्वा मण धान्य दळणे अशी सक्त कामे करावी लागली. वॉर्डर अमानुषपणे वागत. मारहाण करीत. शिवीगाळ करीत.

## एकान्ताचा लाभ

झेंडा सत्याग्रहाच्या वेळची गोष्ट. विनोबांना एकान्त कोठडीची सजा

देण्यात आली. काम काहीच दिलेले नव्हते. आठ फूट लांब आणि नऊ फूट रुंद अशी ती खोली. एका कोपऱ्यात एक जाते आणि दुसऱ्यात लघवीचे भांडे! तुरुंगाधिकाऱ्यांना वाटले, या सजेने विनोबा नरमतील.

पण विनोबांनी त्या खोलीतल्या खोलीतच फेऱ्या सुरू केल्या. ताशी दीड मैल त्यांची चाल. त्या कोठडीत ते दहा मैलांची रपेट करू लागले. सहा-सात तास त्या रपेटीत जात. त्यांना जी पदे आठवत ती ते दिवसभर गात.

रात्री तीन घंटे विनोबा त्या कोठडीत ध्यान करीत. एक पहारेकरी येऊन तिथे पाहात बसे. एकदा तो दिवा घेऊन आला. विनोबांचे डोळे मिटलेलेच होते. तो हलक्या आवाजात म्हणाला, "मला तुमच्याशी थोडं बोलायचं आहे."

विनोबांनी डोळे उघडले. तो म्हणाला, "उद्या मी इथून जाणार. मला काही सांगा." त्याला वाटले ध्यानधारणा नियमाने करणाऱ्या विनोबांचा उपदेश घ्यावा. विनोबांनी चार हिताच्या गोष्टी त्याला सांगितल्या. तो कृतज्ञतेने म्हणाला, "आपले उपकार मी कधी विसरणार नाही."

लिहिणे-वाचणे, भेटीगाठी यांना बंदी असूनही तो एकान्त विनोबांना दुस्सह झाला नाही.

दोन आठवडे त्या एकान्त कोठडीत राहूनही त्यांच्यावर काहीच परिणाम झाला नाही असे पाहून तुरुंगाधिकाऱ्यांनी त्यांना इतर कैद्यांत परत पाठवले.

## उलटी सर्कस

विनोबांच्या मुलाखतीला आलेल्या एका व्यक्तीने विचारले, "कसा काय आहे जेल?"

विनोबा म्हणाले, "तुरुंग म्हणजे उलटी सर्कस! तिथे माणसं पशूंना खेळवतात, कामे करून घेतात. इथे पशू माणसांना खेळवतात, त्यांच्याकडून कामं करून घेतात."

राजाजी या कैद्यांच्या भेटीला गेले होते. भेटीहून परतल्यावर राजाजींनी त्या प्रसंगाचे वर्णन केले. ते म्हणाले, "हे पहा विनोबा! देवदूतासारखा त्यांचा आत्मा. विद्वत्ता, तत्त्वज्ञान, आणि धर्म यांच्या उच्च शिखरांवर वावरणारा. पण केवढी त्यांची नम्रता! त्यांना न ओळखणारांना आकळू नये असं त्यांचं वागणं.

आपल्याला नेमून दिलेलं गिट्टी फोडण्याचं काम ते निमूटपणं पूर्ण करीत. त्यांच्या हातांना घट्टे पडले आहेत !"

महादेवभाई गांधीजींचे चिटणीस. विनोबांसंबंधीची हकीकत ऐकून ते कासाधीस झाले. त्यांनी 'नवजीवन'मध्ये एक लेख लिहिला. दीनबंधू अँड्र्यूजना गांधी म्हणाले होते ते त्यांनी दिले. "आश्रमातील दुर्मिळ रत्नांपैकी विनोबा एक आहेत. आश्रमात संस्कार घ्यायला ते आले नाहीत तर जणू आश्रमालाच संस्कारित करायला आले आहेत. आश्रमाच्या रसोड्यात आणि भंगीकामात आठ आठ तास एक अवाक्षर न बोलता ते राबले !"

पुढे विनोबांना नागपूरहून अकोल्याच्या तुरुंगात पाठवण्यात आले. तेथील तुरुंगाधिकारी मराठे हे मात्र विनोबांचे जणू शिष्य बनले.

## धोक्याची इनोसंट पुस्तके

जेलमध्ये राजकीय कैदी वाचण्यासाठी काहींना काही पुस्तके मागवीत. राजकीय पुस्तके असली की त्यांची कसून तपासणी करण्यात येई ; आणि अशी पुस्तके देण्याचे अधिकारी बहुधा नाकारीत. सरकारला त्यामुळे दगा होईल, अशी त्यांना भीती वाटायची. विनोबा उपनिषदे, वेद, पुराणे मागवायचे. तुरुंगाधिकारी त्या पुस्तकांबाबत कधी आक्षेप घ्यायचे नाहीत. ते म्हणायचे, "ही पुस्तके इनोसंट–बिन धोक्याची आहेत. राज्याला ज्या पुस्तकांनी धोका पोचण्याचा संभव, ती पुस्तके देणे आम्हांला शक्य नाही."

विनोबा म्हणायचे, "आपल्याला काही समजत नाही. खरे म्हणजे जी पुस्तकं मी मागवतो तीच राज्याच्या दृष्टीने अधिक घातक आहेत. जी पुस्तकं मी मागवतो ती वाचणारे असं रद्दी राज्य क्षणकालही चालू देणार नाहीत. ही पुस्तकं एकदा दिल्यावर इतर राजकीय पुस्तकं दिल्यानं बिघडून बिघडून आणखी काय बिघडणार ?"

## सर्व-धर्म-परिषद

महात्माजींना सहा वर्षांची शिक्षा झाली. असहकाराचे आंदोलन थांबले होते. देशातील स्पृहणीय ऐक्य जाऊन हिंदू–मुसलमानांचे झगडे पुन्हा सुरू झाले होते. इकडे तुरुंगात महात्माजी आजारी पडले. ॲपेंडिसाइटिसचा आजार. ससून हॉस्पिटलमध्ये त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. आणि पुढे

महात्माजीस सोडून देण्यात आले. ते बरे झाले. देशात सारी अशांतता होती. हिंदू–मुसलमानांचे झगडे पाहून तर महात्माजी तळमळत. शेवटी दिल्लीस हकीम अजमलखान यांच्या घरी हिंदू–मुस्लिम ऐक्यार्थ महात्माजींनी २१ दिवसांचा उपवास सुरू केला. उपवास सुखरूप पार पडला आणि देशात ऐक्य नांदावे म्हणून दिल्लीस सर्व-धर्म-परिषद भरली. सर्व धर्मांचे प्रतिनिधी आले.

## मंडपात ठरल्या वेळेस फक्त दोन माणसे

त्या वेळची हकीकत सांगताना विनोबाजी म्हणाले, " परिषदेची सकाळी ९ ची वेळ होती. परंतु ९ वाजता मंडपात फक्त दोनच माणसे हजर होती. डॉ. ॲनी बेझंटबाई व दुसरा मी ! " विनोबाजी अत्यंत नियमित वागतात. त्यांच्याजवळ घड्याळ असते. ते एकदा म्हणाले, " घड्याळाचा शोध पाश्चिमात्यांनी लावला. त्यांना वेळेची अधिक किंमत कळते ! "

## सुशिक्षित दगड

या उपवासाच्या वेळचा एक अनुभव विनोबाजींनी एकदा सांगितला. दिल्लीची सर्व-धर्म-परिषद होऊन ते परत येत होते. आगगाडीत कोणी तरी त्यांना प्रश्न केला, " सध्या महात्माजी काय करतात ? कुठं असतात ? "

तो प्रश्न ऐकून विनोबाजींस अत्यंत वाईट वाटले. प्रश्न विचारणारा कदाचित खेड्यातील शेतकरी असेल, तो अशिक्षित असेल, आणि वर्तमानपत्रे वाचणारा नसेल. पण महात्माजींचे नाव त्याला माहीत होते; आणि विनोबाजींची खादीधारी तपस्वी मूर्ती पाहून यांना महात्माजींची माहिती असेल असे त्याला वाटले असेल.

विनोबाजी त्या माणसावर नाही रागावले, ते आम्हा सुशिक्षितांवर रागावले. हिंदू–मुस्लिम ऐक्यासाठी महात्माजी उपवास करीत होते. परंतु त्याची देशातील जनतेस वार्ताही नाही ! महात्माजी अग्निदिव्य करीत होते; त्या अग्निदिव्याचा संदेश लाखो खेड्यांतून कोण नेणार ? शक्तिगृहात वीज नुसती उत्पन्न होऊन भागत नाही. ती लहान-मोठ्या तारांनी सर्वत्र पोचवावी लागते. तेव्हा सर्वत्र प्रकाश होतो. अंधार दूर होतो. पूर्वीच्या काळात साधुसंत सर्वत्र घुमत. नामघोष सर्वत्र दुमदुमवीत, परंतु आज राष्ट्रीय विचारांचा घोष सर्वत्र कोण नेणार ?

महात्माजी ऐक्य निर्माण व्हावे, भेद व भांडणांचे पाप मिटावे म्हणून तपश्चर्येची पावनगंगा निर्मीत होते; परंतु ही गंगा सर्वत्र कोण नेणार ? तिचे निर्मळ पाणी जिकडे तिकडे कोण खेळवणार ?

विनोबाजी म्हणाले, " हे आजचे सुशिक्षित स्वतःही ओले होत नाहीत; अंतरी द्रवत नाहीत; परंतु प्रवाह मात्र अडवून ठेवतात ! दगडासारखे मध्ये आडवे पडतात. राष्ट्राला हजारो व्रती प्रचारकांची, सेवकांची आज जरूरी आहे. राष्ट्राने अशी मागणी केली पाहिजे व ती पुरी झाली पाहिजे. समर्थांना ११ शे मठ चालवायला जर माणसे मिळाली तर आज आपल्याला का मिळू नयेत ? आम्ही का दगड झालो ? 'जोपर्यंत अशी माणसे मिळत नाहीत तोपर्यंत आशा नाही."

## दोन आण्यांत निर्वाह

दोन आण्यांत निर्वाह करण्याचा प्रयोग विनोबांनी वर्षभर केला. दोन आण्यांपेक्षा जास्त खर्च करायचाच नाही. एक पैशाचे जळण, एक पैसा कापडापोटी. सकाळी १ तोळा शेंगा, २॥ तोळे गूळ नास्ता म्हणून, दुपारी ३० तोळे ज्वारीची भाकरी, ७॥ तोळे डाळीचे वरण, २ तोळे पालेभाजी, मोजके तेल आणि मीठ. तेच संध्याकाळी. हे सगळे सहा पैशांत.

याच काळात गांधीजींचा हिंदू-मुस्लिम ऐक्यासाठी दिल्लीत उपवास सुरू झाला आणि विनोबांना तेथे जावे लागले. तिथेही हा दोन आण्यांचा हिशोब त्यांनी चालूच ठेवला. दोन आण्यांत दूध, तूप कुठचे मिळायला ? ते विनोबांनी सोडूनच दिले.

पुढे दिवसांतली जेवढी श्रमाची कमाई होईल तेवढयातच भागवायचा प्रयोग सुरू झाला. त्या कमाईत सकाळचा नास्ता आणि दुपारचे जेवण एवढेच भागे. दुपारी हिशोब होई आणि जेवढे उरे त्यांतून संध्याकाळच्या जेवणाची योजना. कधी त्यामुळे संध्याकाळचे जेवण रद्द करावे लागे. कधी अर्धेमुर्धे होई. शरीरश्रमावर जगण्याच्या ह्या प्रयोगात वल्लभस्वामी व इतर काही मंडळीही सामील झाली होती.

## विडी फेकून दिली

आगगाडीतील प्रवासाच्या वेळच्या गमती विनोबाजी कधी कधी सांगत

असतात. एकदा त्यांच्या समोरचा एक मनुष्य विडी ओढीत होता. आणि सारा धूर विनोबाजींच्या समोर सोडीत होता. विनोबाजींनी नाकाला पदर लावला होता. परंतु त्या माणसाला त्याची फिकीर नव्हती. शेवटी विनोबाजींनी त्याच्या हातातील विडी ओढून बाहेर फेकली. तो जरा गुरगुरू लागला. विनोबाजी शांतपणे म्हणाले, " शेजाऱ्याला त्रास होत असेल तर गाडीत विडी ओढण्याची मनाई असते. तुम्हांला ओढायचीच होती तर जरा बाजूस जाऊन ओढता आली असती. तो धूर मला सहन होत नव्हता हे तुम्हांला दिसत होतं. "

## वेस्टेजचा हिशोब

एकदा आगगाडीत जागा होती म्हणून चरखा उघडून ते सूत कातीत बसले. विनोबाजींचे सूत होता होईतो कधी तुटत नसे. परंतु कातताना तुटले तर तो धागा ते सांधत. फुकट दवडीत नसत. जवळ एक तरुण पदवीधर होता. तो विनोबाजींस म्हणाला, " हे तुटलेलं सूत सांधण्यात वेळ जातो तेवढयात अधिक सूत कातून नाही का होणार ? "

" परंतु हे धागे तरी फुकट का दवडायचे ? " विनोबाजी म्हणाले.

" कोणत्याही उद्योगात आपण काही वेस्टेज धरतोच की नाही ? "

" शेकडा किती वेस्टेज धरणार तुम्ही ? "

" पाच टक्के तरी धरलं पाहिजे. "

" शेकडा पाच टक्के वेस्टेज सर्वत्र धरलं तर किती भयंकर प्रकार होतील त्याची कल्पना करा. आयुष्यातील ५ वर्षं फुकट दवडायला तुम्ही तयार आहात का ? हिंदुस्थानात जी शेतीची जमीन आहे तिच्यातील शेकडा ५ पडीक ठेवली तर काय होईल ? हिंदुस्थानात चाळीस कोटी लोक आहेत. त्यातील शेकडा ५ म्हणजे २ कोटी मेले तरी हरकत नाही का ? गड्या, आपण काहीच फुकट जाऊ नये म्हणून खटपट करावी. त्याउप्पर गेले तर इलाज नाही. "

त्या तरुणावर विनोबाजींनी भराभर प्रश्नांची अशी सरबत्ती केली. तो गारठूनच गेला.

## वैकोमचा सत्याग्रह

वर्ध्याच्या सत्याग्रहाश्रमातील तपश्चर्या सुरू होती. विनोबाजींचे दोघे धाकटे बंधूही आश्रमात आले. चौथा भाऊ दत्तु हा मानमोडीच्या साथीत मरण पावला

होता तिघेच भाऊ आता होते. तिघे आश्रमात होते. विनोबाजी या तिघांत मोठे. अशी तपस्या सुरू असताना तिकडे त्रावणकोर संस्थानात वैकोम येथे हरिजनांचा सत्याग्रह सुरू झाला. मंदिरावरून जाणाऱ्या एका रस्त्याने हरिजनांना जाण्याची बंदी असे. सत्याग्रहात ढिलाई येत आहे असे गांधीजींना कळले, आणि हे शैथिल्य घालवण्यासाठी त्यांनी विनोबांना पाठवले.

सत्याग्रह संपून ते परत येत होते आद्य शंकराचार्यांचे जन्मस्थान केरळात कालडीला. विनोबाजींना शंकराचार्यांविषयी अत्यंत भक्तिभाव. शंकराचार्यांचा तो जन्मग्राम पाहावा असे त्यांच्या कितीदा तरी मनात आले. परंतु त्या वेळी गेले नाहीत. "ज्या कार्यासाठी आलो ते संपवून परत जाणे माझे काम. वाटेत इकडे तिकडे जाणे योग्य नाही. सत्कर्माचाही कधी कधी मोह असतो." तो टाळावा लागतो. विनोबाजींनी ती इच्छा तेव्हा मनातच जिरविली.

## सोऽहंची गर्जना करणारा समुद्र

त्याच वेळचा एक अनुभव ते एकदा सांगत होते. एका मित्राकडे वाटेत मुक्काम होता. त्या गावाला समुद्र होता. सायंकाळी ते समुद्रतीरी फिरायला गेले. भरती होती समुद्र उचंबळत होता. प्रचंड लाटा उसळत होत्या. विनोबाजी वाळूत बसले व ते प्रचंड तांडव पाहू लागले. ते विचारात रमले. हा समुद्र जणू सोऽहंची गर्जना करीत आहे– ते ब्रह्म ते मीच– असे जणू सांगत आहे असे त्यांना वाटले 'मामनुस्मर युद्धयच' माझे स्मरण ठेव व झगडत राहा, असे जणू तो सांगत आहे, असे त्यांना वाटले. विनोबाजींची समाधी जणू लागली. ते सारे विसरून गेले आणि यजमान त्यांचा शोध करीत फळे व दूध तेथे घेऊन आला.

"हे घ्या महाराज, फलाहार करा, दूध घ्या." तो नम्रपणे म्हणाला.

विनोबाजी गोष्ट सांगताना म्हणाले, "मला आकाशातून एकदम खाली पडल्यासारखं झालं! उच्च विचारांतून एकदम खाण्यापिण्याच्या विचारात आलो!!"

## विनोबाजी प्रखरता व तीव्रता आणतील

१९२५ चा काळ असावा. साबरमतीच्या आश्रमात काही आश्रमविरोधी वर्तन घडले होते. महात्माजी अस्वस्थ झाले होते. त्यांनी सात दिवसांचा

उपवास सुरू केला, आणि त्यांनी विनोबाजींस साबरमतीस बोलावून घेतले. त्या वेळेला विनोबाजींचे पाठचे भाऊ बाळकोबा हे तेथे होते.

त्यांना त्यांच्या एका चुलतभावाने विचारले, " महात्माजींनी विनोबाजींस का बोलावलं ? "

बाळकोबा म्हणाले, " आश्रमात थोडी कठोरता व प्रखरता यायला हवी आहे. ती विनोबाजीच आणू शकतील असं महात्माजींस वाटलं, म्हणून त्यांनी त्यांना बोलावलं. "

तेथे सात दिवस रोज सकाळ–सायंकाळ प्रार्थनेनंतर आश्रमीय जीवनावर विनोबाजींनी प्रवचने केली. त्याच वेळेस शिवजयंतीचाही दिवस आला होता. त्या दिवशी शिवजयंतीवर ते बोलले.

## डोळ्यांतून सारखे अश्रू वाहात होते

वर्ध्याच्या आश्रमात उत्सवसमारंभ कधी होत नसे. आश्रमाचा वाढदिवस वगैरे नसे. आश्रम कधी सुरू झाला ते तरी कोणाला माहीत ? आश्रमाचा अहवाल वगैरे नसे. प्रत्येक क्षण जेथे सेवेत जात होता तेथे अहवाल कशाचा ? परंतु एकदा काही आश्रमवासी विनोबाजींकडे आले व म्हणाले, " उद्या रामनवमी आहे; आपण साजरी करू. "

" हरकत नाही. कशी साजरी करणार ? "

" आपण पंधरा मिनिटं सूत कातू. "

" ठीक. "

आणि रामनवमीचा दिवस आला. दुपारी सारे सूत कातायला बसले. गभीर शान्ती तेथे होती. विनोबाजी सूत कातू लागले, आणि त्यांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहू लागल्या. हात सूत कातीत होते. डोळे अश्रू कातीत होते ! प्रभू रामचंद्रांची का अनंत स्मरणे त्यांना होत होती ? सीतादेवी, लक्ष्मण, भरत, मारुती, जटायू, शबरी, गुह, अहल्या, बिभीषण, आणि सेतुबंधनात वाळूचे कण आणून टाकणारी ती खारकुंडी, या सर्वांचे का त्यांना स्मरण येत होते ? त्यांच्या डोळ्यांसमोर का वाल्मीकी आले, तुलसीदास आले, कबीर आले, रामदास आले ? रामनामाने आजपर्यंत कोट्यवधी जीवांच्या जीवनांतील हालाहलाची आग शमविली असेल. त्या नामाने पाषाणही तरले.

विनोबाजींच्या त्या अश्रुधारांतून कोणते रामायण स्रवत होते? कोणते भाव त्यांच्या हृदयात होते? संतांच्या अनंत मनःसिंधूत कोण डोकावणार? काही असो, परंतु ते अति उदात्त व पवित्र दृश्य होते! असा रामजन्म किती जण साजरा करीत असतील बरे?

## कुऱ्हाड घेऊन शिंदीची झाडे तोडावयास निघाले

विनोबाजी सर्व सत्याग्रहांतून होते. तीस सालचा तर प्रचंड सत्याग्रह. त्या वेळेस विनोबाजी हातात धार लावलेली कुऱ्हाड घेऊन शिंदीची झाडे तोडायला जात. त्यांची स्फूर्ती अलौकिक होती.

## अहिंसक युद्धात सर्वांस वाव

१९३१ साली सत्याग्रहसंग्राम थांबला. खानदेशात सर्व सत्याग्रहींचे संमेलन भरले होते. विनोबाजी तेथे अध्यक्ष होते. त्यांचे तेथे फार सुंदर भाषण झाले.

ते म्हणाले: "महात्माजींचा सत्याग्रह सर्वांना हाक मारतो. स्त्रिया, पुरुष, मुलं म्हातारे,– सर्वांना इथं वाव आहे. आणि खरोखरच सर्वांनी भाग घेतला. राम-नाम ज्याप्रमाणं सर्वांस घेता येतं तसं इथं आहे. लष्करी युद्धात काही ठराविक लोकांनाच भाग घेता येतो. परंतु देशातील सर्व प्रकारच्या लोकांनी लढून घेतलेलं स्वराज्य अधिक मोलाचं आहे. जे सारे मिळून घेतात, ते सारे मिळून सांभाळतात. हे स्वराज्य मिळवण्यात मीही भाग घेतला आहे, असं सर्वांना समाधान असतं. सत्याग्रहाची अहिंसक चळवळ सर्व राष्ट्राला स्पर्श करते. महात्माजींचा मार्ग सर्वांच्या आत्म्यास जागृती देणारा आहे. सर्वांना प्रेरणा देणारा असा आहे."

## आणि पुरणपोळीचे जेवण नको का?

कोणी तरी त्या परिषदेत विचारले, "आमचे दंड आम्हांला परत नाही का मिळणार?"

विनोबाजींचे डोळे रागावले. ते म्हणाले, "आणि पुरणपोळीचं वर जेवण नको का? तुम्ही स्वातंत्र्य म्हणजे काय समजता? स्वातंत्र्य म्हणजे अपरंपार त्याग!"

आणि ३२ सालच्या आरंभीच देशात पुन्हा सत्याग्रहसंग्राम सुरू झाला. त्या वेळेस धुळ्यास मार्केटात उन्हात झेंडयासमोर त्यांचे भाषण झाले. अति तेजस्वी असे ते भाषण होते.

ते म्हणाले, "स्वराज्यासाठी प्राण द्यावे लागतात. आपणास प्राण घ्यायचे नाहीत, तर द्यायचे आहेत. लाठीमारासमोर डोकी करायची आहेत. स्वातंत्र्यदेवतेसमोर नारळ फुटायचे आहेत. अतःपर गुलामगिरीत तर नाही ना राहायचं? स्वतंत्र व्हायचं आपण ठरविल आहे. हा झेंडा जो आपण उभारला आहे तो आता वाकता कामा नये. राष्ट्र त्यागाची अपेक्षा करीत आहे. तुम्ही ती पूर्ण करा."

## दरिद्री लोक तुम्हांस काकडीप्रमाणे खातील

त्याच दिवशी धुळ्याच्या धर्मशाळेत त्यांचे व्यापाऱ्यांसमोर आणखी एक व्याख्यान झाले. ते भाषण अपूर्व होते.

"व्यापारी बंधूंनो, नवीन वारे देशात येत आहेत. जगातील घडामोडी पाहा. रशियात काय झालं ते पाहा. आपल्या देशात रक्तपाताचे प्रकार न होवोत. गरीब व श्रीमंत यांच्या लढाया न होवोत. परंतु या व्हायला नको असतील, तर तुम्ही श्रीमंतांनी त्याग करायला हवा. आज महात्माजी मध्ये उभे आहेत. ते रक्तपात थांबवीत आहेत. त्यांनी विरोध थोपवून धरले आहेत. परंतु तुम्ही ऐकलं नाही तर? ती क्रान्तीची प्रचंड लाट येत आहे. दरिद्री लोकांचा अन्त नका पाहू. हिंदी संस्कृतीनं समाधान शिकविलं आहे. परंतु अशा समाधानी जनतेचाही जर तुम्ही अन्त पाहाल तर ते दरिद्री लोक रुद्र होतील. आणि मी स्वच्छ सांगतो की– तुम्हांला ते काकडीसारखे खाऊन टाकतील. असं व्हायला नको असेल, या देशात इतर देशांतल्यापेक्षा निराळ्या मार्गानं प्रश्न सुटावे असे वाटत असेल, तर महात्माजींचं ऐका. ते किती वर्षं सांगत आहेत. परदेशीला पायबंद लावा. देशी माल घ्या. खादीला जवळ करा. किती सांगायचं?" असे म्हणून

"आता तरी पुढे हाचि उपदेश
नका करू नाश आयुष्याचा

सकळांच्या पाया माझे दंडवत
आपुलाले चित्त शुद्ध करा
हित ते करावे देवाचे चिंतन
करूनीया मन एकविध
तुका म्हणे हित होय, तो व्यापार
करा, काय फार शिकवावे ”

हा अभंग त्यांनी म्हटला. “ सकळांचे पायां माझे दंडवत ” हा चरण त्यांनी इतक्या करुणेने म्हटला की सर्वांचे डोळे भरून आले !

## आम्ही जरूर तो आटा पुरवीत जाऊ

परंतु विनोबाजी धुळ्याहून जळगावला गेले व तेथे त्यांना अटक झाली. तेथे ते भाषण करणार होते. परंतु सभाबंदी होती. त्यांना सजा झाली. धुळे-जेलमध्ये ते आले आणि सर्व धुळे-जेलचा जणू राष्ट्रीय आश्रम झाला. जेलर काय करी, जे कोणी सत्याग्रही येतील त्यांना आधी चक्की देई. हा म्हातारा आहे, हा अशक्त आहे वगैरे तो फारसे बघत नसे. शेवटी विनोबाजी जेलरला म्हणाले, “ आम्ही दळण्यासाठी आमच्यातले स्वयंसेवक देतो. ते सर्व जेलला पुरेसा आटा दळून देतील. ” आणि तसे ठरले. आम्ही आनंदाने स्वयंसेवक झालो. गाणी गात दळण करीत असू. विनोबाजी रोज यायचे, धीर द्यायचे, गोड शब्द बोलायचे.

## विनोबाजी स्वतः दळू लागले

परंतु कोणी तरी म्हणाला, “ विनोबाजींना ‘ तुम्ही दळा ’ असे सांगायला काय जाते ? स्वतः तिकडे वाचीत बसतात, कातीत बसतात ! ”

ते शब्द विनोबाजींच्या कानांवर गेले आणि दुसऱ्या दिवशी ते दळायला आले. त्यांनी एक लहान चक्की घेतली. हळूहळू २१ पौंड ते दळून देऊ लागले. त्यांच्या हाताला प्रथम फोड आले. परंतु पुढे सवय झाली.

## प्रश्नाचा निकाल लागल्याशिवाय उपवास कसा सोडू ?

एकदा चक्की बरॅकमध्ये अधिकाऱ्यांशी भांडण झाले. घंटा घणघणा वाजू लागली. हत्यारी पोलिस धावत आले. शेवटी शान्त झाले. परंतु आम्ही सर्वांनी

उपवास सुरू केला. तिकडे विनोबाजींनीही अन्न घेतले नाही. परंतु प्रश्न सुटणार असे वाटले आणि आम्ही उपवास सोडला! परंतु विनोबाजींनी अन्न घेतले नाही. ते म्हणाले, " मी कधी उपवास करीत नाही. एकादशी नाही, शिवरात्र नाही. रोज मी मोजकंच खातो. गेल्या बारा वर्षांत मी उपवास केला नसेल– आज केला. तो का प्रश्नाचा नीट शेवट लागल्याशिवाय सोडू ? "

शेवटी त्यांची खात्री पटली तेव्हाच त्यांनी अन्न घेतले.

## तुमच्या भगवतीचा हा प्रसाद

जेलमध्ये आम्हा राजकीय कैद्यांत तिखीवाले, फिकीवाले वगैरे प्रकार असत. ज्यांना तिखट नको असे त्यांच्यासाठी फिकी डाळ, भाजी करण्यात येई. परंतु एके दिवशी जेलरची लहर फिरली. सर्वांना तिखटच भाजी-आमटी असा हुकूम सुटला. विनोबाजींनी कित्येक वर्षांत तिखटाला स्पर्शही न केलेला. त्या दिवशी त्यांनाही ती तिखटच डाळ मिळाली. ते जेवत होते. डोळ्यांतून पाणी येत होते. नाकासही धारा लागल्या आणि त्याच वेळेस जेलर त्यांच्याकडे आला.

" विनोबाजी, हे काय ? " त्याने प्रश्न केला.

" तुमच्या भगवतीचा हा प्रसाद ! " ते म्हणाले.

" मी तुमच्या आमटीत तिखट घालायला नव्हतं सांगितलं. "

" जे सर्वांना तेच मला ! "

जेलरने पुन्हा पूर्वीची फिकी–तिखीची परवानगी दिली.

## गीतेवरील प्रवचने

धुळे जेलमधील सर्वांत मोठी गोष्ट म्हणजे विनोबाजींची गीतेवरील प्रवचने. दर रविवारी एका अध्यायावर एक अशी एकूण अठरा प्रवचने त्यांनी दिली. ती अपूर्व मेजवानी होती. अमृतधारा स्रवत होती. गीता म्हणजे विनोबाजींचा प्राण. ते म्हणायचे, " आईच्या दुधावर मी पोसलो आहे, त्यापेक्षा गीतेच्या दुधावर अधिक पोसलो आहे. मी नेहमी गीतासमुद्रातच डुंबत असतो. कधी वरती तरंगत असतो, वर खेळतो; तर कधी खोल बुडी घेतो. गीतेवर बोलण्यासाठी मला कधी तयारी करावी लागत नाही. हृदयात ती भरलेलीच आहे ! "

## प्रवचनाच्या वेळेस डोळ्यांतून पाझर

गीता विनोबाजींच्या रोमरोमी आहे. गीतेवर प्रवचने देताना ते तन्मय होत. गीतेचे सारेच अध्याय पवित्र. परंतु काही अध्याय अधिक पवित्र वाटतात. पाचवा, नववा, बारावा, पंधरावा हे असे अध्याय आहेत. प्रवचनाला आरंभ करताना विनोबाजी कधी कधी अक्षरशः स्फुंदू लागत ! नवव्या अध्यायावरील प्रवचनासाठी ते उभे राहिले आणि अश्रुधारा वाहू लागल्या. पाच मिनिटे त्यांना बोलता आले नाही. रविवारी बाजरीची भाकरी व गूळ मिळणार या कल्पनेने तेथे आमच्या जिभेस पाणी सुटे. विनोबाजींच्या डोळ्यांना गीतेचे स्मरण होऊनच पाणी सुटे. ती व्याख्याने म्हणजे अमोल ठेवा आहेत. वाईच्या प्राज्ञ पाठशाळेचे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री त्या वेळेस धुळे जेलमध्ये होते. ते एके दिवशी मला म्हणाले, “ विनोबाजी कधी कधी संस्फूर्त होऊन ( लाइक वन इन्स्पायर्ड– असे शब्द त्यांनी वापरले होते. ) बोलत आहेत असं वाटतं. ”

## गीताईचा जन्म

विनोबाजींची आई, गीता समजावी म्हणून कशी तडफडत असे ते मागे सांगितले आहे. विनोबाजींच्या मनात ती गोष्ट सदैव होती. स्त्रिया, मुले, खेड्यापाड्यांतील लोक सर्वांना समजेल असे गीतेचे मराठी भाषान्तर करण्याचे त्यांच्या मनात होते. बारा वर्षे हा विचार मनात घोळत होता.

## पाचवा किल्लीचा अध्याय

गीतेचा समश्लोकी मराठी अनुवाद करायचे विनोबांनी ठरवले तेव्हा सुरवातीला पाचवा अध्याय त्यांनी निवडला. त्यानंतर इतर अध्याय. पाचवा अध्याय हा कसोटीचा आहे. गीतेवर भाष्ये लिहिणारांनी त्याचे इतके वेगवेगळे अर्थ लावले आहेत की विचारता सोय नाही ! तेव्हा पाचवा अध्याय विनोबांनी आधी हाती घेतला, आणि तो उलगडल्यावर इतर काम सोपे झाले. योग आणि संन्यास एकच होत, हा विचार एकदा पक्का झाला, आणि गीता हा मतभेदाचा नसून समन्वयाचा ग्रंथ आहे हे जाणवले तेव्हा गीताईची रचना करणे सहज साधले.

ते एकदा सारे सांगत असता म्हणाले, “ गीतेचे गांभीर्य जाऊ न देता

जितका सोपेपणा आणता येईल तितका आणण्याची माझी इच्छा होती. रोज पहाटे प्रार्थना झाली की मी अनुवाद करीत बसे. केलेला अनुवाद आश्रमातील मुलींना देई. त्यांना नीट समजलं तर अनुवाद पास करीत असे. एकदा ' यज्ञशिष्टामृतभुजो ' या चरणाचा ' यज्ञावशिष्ट जे खाती ' असा अनुवाद मी केला होता. परंतु मुली ' यज्ञावशिष्ट, यज्ञा वशिष्ट ' असे करू लागल्या. मी लगेच बदल केला. ' यज्ञात उरले खाती ' असे शब्द घातले.

गीताईच्या रचनेस आरंभ करण्यापूर्वी त्यांनी आधी व्याकरण ठरवले. ' करून ' म्हणायचे की ' करूनि ' ? गीताईत सर्वत्र ऊन प्रत्यय लावूनच केलेली धातुसाधिते आहेत. ऊनि, उनी असे प्रत्यय नाहीत. च, हि, ही अव्यये संस्कृतप्रमाणे त्यांनी अलग लिहिली आहेत. कारण ती शब्दयोगी अव्यये नाहीत. ती लागून पाठीमागच्या शब्दाचे सामान्यरूप होत नाही. किती तरी बारीकसारीक व्याकरणाचा विचार त्यांनी आधी केला. एकदा कारवारकडच्या कोणी गृहस्थाने एक चूक कळविली. विनोबाजींनी ती लगेच पुढच्या आवृत्तीत दुरुस्त केली. व्याकरणदृष्टया अति शुद्ध व निर्दोष अशी ही गीताई आहे.

## बंधू शिवाजी

गीताईच्या लाखो प्रती खपल्या. विनोबाजींचे धाकटे बंधू शिवाजी हे सर्व महाराष्ट्रभर गीताईचा प्रचार करीत हिंडत. ' गीताईचे व्याकरण ' म्हणून त्यांनी एक निबंध लिहिला. शिवाजींना व्याकरणाची अत्यंत आवड. त्यांनी फार खोल अभ्यास केला आहे. विनोबाजींजवळ राहून ते व्युत्पन्न झाले आहेत. अभिजात विचारकर्ते आहेत. शिवाजींनी ही गीताई महाराष्ट्रभर पोचविली.

## मी अहिल्येचा दगड

एकदा धुळे जेलमधून काही सत्याग्रहींची तुकडी विसापूरला जायची होती. त्यांना निरोप देण्याची सभा होती. अनेकांची भाषणे झाली. शेवटी विनोबाजींचे भाषण झाले. भाषणात ते म्हणाले, " हल्ली रामायणाच्या भाषेत बोलण्याची रूढी पडत आहे. इंग्रज सरकार म्हणजे रावण. महात्माजी म्हणजे राम, वल्लभभाई म्हणजे हनुमान. जवाहरलाल म्हणजे अंगद, असं वक्ते म्हणत

असतात. मी विचार करू लागतो, की या रामायणातील मी कोण ? पाहता पाहता मला अहिल्येची शिळा दिसते. मी ही शिळा झालो तरी पुरे; कृतार्थ होईन, असं मनात येतं ! ”

## जेलर वाईट नाही

आम्ही जेलरला नेहमी नावे ठेवायचो. एके दिवशी तर कोणी त्यांच्याजवळ म्हणाला, “ तुम्ही नाही काय म्हणता ? खरोखरच हा जेलर खुनशी आहे. ”

विनोबाजी म्हणाले, “ रागावू नका. क्रोधानं नीट ज्ञान होत नाही. जेलर अगदीच वाईट नाही. त्याच्यातही चांगुलपणा आहे. परवा माझ्या खोलीत तो आला होता. तिथं तुलसीरामायण होतं. जेलरचा त्या रामायणाला पाय लागला. त्यानं त्या पुस्तकाला नमस्कार केला. आपणा सर्वांत चांगलं व वाईट आहे. कधी आपण मंगलावतार असतो, तर कधी आपण राक्षस बनतो. आपण दुसऱ्याचं चांगलं पाहावं. दया दुसऱ्यांसाठी आहे. क्रोध स्वतःसाठी आहे. दुसऱ्याचे दोष पाहून त्याची करुणा करावी. स्वतःचे दोष असतील तर स्वतःवर रागवावं ! ”

## ईश्वरावर श्रद्धा

जेलमध्ये असताना त्यांना कोणाचे तरी एक टाइप केलेले पत्र आले. त्या पत्रातील काही भाग नीट उठला नव्हता. जवळचे लोक “ हा शब्द असेल, तो असेल. ” असे तर्क करीत होते. शेवटी विनोबाजी म्हणाले, “ ते न उठलेले शब्द मी वाचू नयेत अशीच प्रभूची इच्छा असेल. कशाला डोकेफोड करता ? ” विनोबाजींनी ते शब्द सहज उच्चारले. परंतु त्यांची बारीकसारीक गोष्टींतही असणारी ईश्वरावरची श्रद्धा दिसून येत होती.

## गाढ झोप

विनोबाजी नेहमी मोकळ्यावर आकाशाखाली झोपत. पाऊसच आला तर आत झोपत. जेलमध्येही ते आपली खाट बाहेर टाकून झोपत. एके दिवशी रात्री झिमझिम पाऊस आला. विनोबाजी जागे झाले नाहीत. त्यांची झोप अगदी गाढ असे !

## देशभक्तांची वैशिष्टये

विनोबाजी जेलमध्ये जेथे राहात होते तेथे त्या वेळेस मोठमोठी माणसे होती. धुळे जेल गजबजला होता. जमनालालजी, प्यारेलालजी, डॅ. पुरुषोत्तमदास, गुलझारीलाल नंदा वगैरे मोठी माणसे तेथे होती. श्री. मणिलाल कोठारी होते. तेथे चर्चा चालत. विनोबाजींनी काही दिवस राष्ट्रीय पुरुषांचे वैशिष्टय काय त्यावर विचार सांगितले. न्यायमूर्तींनी व्यापक व उदार दृष्टी दिली; ॲनी बेझंटनी हिंदू संस्कृतीकडे सुशिक्षितांचे लक्ष वेधले; लोकमान्यांनी राष्ट्रीय कर्मयोग व राष्ट्रीय ऐक्य दिले; रवीन्द्रनाथांनी सौंदर्यदृष्टी दिली इत्यादी वैशिष्टये ते विवरून सांगत.

## महात्माजी म्हणजे स्मृती

एके दिवशी महात्माजींविषयीं ते बोलत होते. महात्माजींनी सत्याग्रह सामुदायिक केला. स्त्री-पुरुषांनी एकत्र काम करायचे तर स्त्रियांना निर्भय वाटले पाहिजे. सत्याग्रही अनुशासनात त्यांनी त्यासाठी ब्रह्मचर्याचा समावेश केला. ब्रह्मचर्य म्हणजे स्त्रियांना टाळणे नव्हे. ब्रह्मचर्य म्हणजे स्त्रियांना निर्भय-पणे सामाजिक कार्यांत भाग घेता येणे. ते शेवटी म्हणाले, "महात्माजींना कोणी ख्रिस्ताची उपमा देतात. कोणी बुद्ध म्हणतात. मी त्यांना माझी श्रुती असे नाही म्हणत, परंतु स्मृतीची त्यांना उपमा देतो !"

## आधी तुम्ही पोटभर खा

विनोबाजी सौम्य भाषेत क्रान्तिकारक विचार मांडीत असत. एकदा एका खेडेगावात बोलताना ते म्हणाले, "कर्ज द्यायचं नाही असं नका म्हणू. परंतु सावकाराला सांगा की तुझं कर्ज देण्यासाठी जिवंत राहिलं पाहिजे; म्हणून मला पोटभर खाऊ दे. तुझं कर्ज देण्यासाठी मी मेलो, तर माझी मुलं जगली पाहिजेत; म्हणून त्यांनाही थोडं दूध, तूप देऊ दे, असं सांगत जा. तुम्ही श्रमता. तुम्ही आधी पोटभर खा, धष्टपुष्ट राहा."

## मंत्र्यांनी राजीनामे द्यावेत

त्या वेळेस अतिवृष्टीने मध्य प्रांतातील पिके बुडाली होती. शेत-कऱ्यांच्या सभा सर्वत्र भरत होत्या. साऱ्यात सूट मिळावी म्हणून चळवळ

सुरू होती. वर्धा तालुक्याची परिषद भरली होती. विनोबाजी अध्यक्ष होते. ते म्हणाले, " मी गणिती आहे. फिरायला जाताना मी कपाशीची बोंडं मोजीत असे. आणि पाऊस पडल्यावर किती झडून गेली व झाडावर किती राहिली तेही मी पाहिलं आहे. काँग्रेसच्या मंत्र्यांना शेतकऱ्यांचं दुःख दूर करता येत नसेल तर त्यांनी राजीनामे द्यावेत. "

## पोट भरल्याने का स्वातंत्र्यप्रीती कमी होते ?

विनोबाजी प्रतिपक्षीयास कधी समर्पक प्रश्नाने, कधी वाद करून, कधी उपहासात्मक प्रखर उत्तराने गप्प बसवतात. जळगावला एकदा एका कम्युनिस्टाने त्यांना विचारले, " खादीचा धंदा दिल्याने लोकांना दोन पैसे मिळतील, दोन घास मिळतील ही गोष्ट खरी; परंतु यामुळे त्यांची स्वातंत्र्याची धार बोथट नाही का होणार ? "

विनोबाजी म्हणाले, " तुम्ही दोन्ही वेळा पोटभर जेवता, तुमची स्वातंत्र्यतृष्णा कमी नाही ना झाली ? खादीनं घास मिळतो, परंतु नुसता घासच नाही मिळत. खादी बोलत असते. प्रचार करीत असते. हा खादीचा धंदा कुणी दिला ? गांधींच्या लोकांनी, काँग्रेसच्या लोकांनी, असं त्यांना कळतं. काँग्रेस काय, गांधी काय, स्वराज्य काय, चळवळ काय, सारं त्यांच्या कानांवर जातं. खादी स्वातंत्र्याची तृष्णा अधिकच वाढवील, स्वाभिमानाला जागवील, नवीन विचारही देईल. "

## मनुष्याची अधिक जोरदार प्रवृत्ती कोणती ?

एकदा श्री जयप्रकाश विनोबाजींकडे आले होते. दोघांचे बरेच बोलणे झाले. समाजवादावर चर्चा झाली. विनोबाजी म्हणाले, " तुमच्या तत्त्वज्ञानात देव नसेल; माझ्या असेल. परंतु हा देव आपण बाजूस ठेवू या. देवाखालोखाल जर मी कोणती वस्तू मानीत असेन तर ती बुद्धी होय. माझ्या बुद्धीला पटवा. मी तुम्हांला एक प्रश्न विचारतो. मनुष्यात हिंसेची प्रवृत्ती अधिक आहे की अहिंसेची ? मनुष्याचं सारं जीवन पाहा नि सांगा. "

" मनुष्याला अहिंसकच म्हटलं पाहिजे. अहिंसेचीच वृत्ती त्याच्यात अधिक आहे असं म्हटलं पाहिजे. " जयप्रकाश म्हणाले.

" त्या प्रवृत्तीचा आधार घेऊन महात्माजी जाऊ पाहतात. ती प्रवृत्ती जागृत होईल असं त्यांना वाटतं. " विनोबा म्हणाले.

## ज्याने त्याने आपले विचार पसरीत राहावे

एके दिवशी असेच बोलणे चालले होते. कोणी विचारले, " स्वातंत्र्य मिळायच्या आधीच हे समाजवादी विचार कशाला? उगीच बुद्धिभेद का माजवावेत ? "

विनोबाजी म्हणाले, " स्वातंत्र्य आज ना उद्या आता येणारच. थोडा अधिक त्याग केला म्हणजे झालं. परंतु स्वातंत्र्य म्हणजे काय? स्वातंत्र्य म्हणजे आपणास जे काही करायचं आहे ते करण्याची शक्ती. उद्या स्वराज्य मिळालं तर कशा प्रकारची समाजरचना करायची, नवीन हिंदुस्थान कसा बनवायचा त्याची आपणास कल्पना नको का ? उद्या अधिक गिरण्या उभारायच्या की अधिक चरखे पसरावयाचे ? ग्रामोद्योगवाल्यांनी आपली विचारसरणी देत राहावं. यंत्रवाद्यांनी आपली विचारसरणी मांडीत राहावं. उद्या बहुमत ठरवील त्याप्रमाणे करू. परंतु लोकांसमोर आता हे सारे विचार आलेच पाहिजेत. इंग्रजांशी लढताना हे वाद आड येणार नाहीत एवढं पाहावं म्हणजे झालं ! "

## हिंदू-मुस्लिम ऐक्याची मूर्ती

विनोबाजींचे हिंदुधर्मावर प्रेम आहे. परंतु सर्व धर्मांविषयी त्यांना आदर आहे. धर्म म्हणजे माता. जो तो आपल्या आईच्या दुधावरच चांगला पोसतो. खरा मातृभक्त तो, जो दुसऱ्या मातांचीही कदर करतो. खरा स्वधर्मपूजक तो, जो दुसऱ्या धर्माविषयीही आदर दाखवील. विनोबाजींनी सर्व धर्मांचा खोल अभ्यास केला आहे. इस्लामचाही केला आहे. हिंदू-मुसलमान आपण शेजारी राहतो. एकमेकांच्या धर्मांची, संस्कृतीची आपण सहानुभूतिपूर्वक ओळख करून घेतली पाहिजे.

## कुराणाचा अभ्यास

छत्तीस-सदतीस सालातील गोष्ट. आश्रमात एक मुसलमान मुलगा होता. तो काती, विणी, विनोबा मुलांना शिकवीत, तोही शिके. एक दिवस तो विनोबांना म्हणाला. " मला कुराण शिकवाल ? "

विनोबांनी इंग्रजीतून कुराण वाचले होते. त्या मुलाला शिकवण्यासाठी त्यांनी कुराणाचा मराठी अनुवाद आणवला; मग इतर भाषांतले अनुवादही पाहिले पण मुळातले कुराण पाहिल्याशिवाय त्यांचे समाधान होईना. त्यांनी कुराणाचा मूळातून अभ्यास करण्याचे ठरवले. पौनारमधल्या एका मुस्लिम शिक्षकाला बोलावले. त्याला बिचाऱ्याला फक्त कुराण पढता येत होते. पण त्याचे उच्चार विनोबांना पटेनात, त्यांनी मग ग्रंथांचा आसरा घेतला.

विनोबा कुराणाचा अभ्यास करीत आहेत हे गांधीजींना समजले. ते म्हणाले, "आपल्यातल्या कोणी तरी कुराणाचा अभ्यास करायलाच हवा होता. विनोबाच करतात हे चांगलं झालं."

उच्चारांसाठी विनोबांनी रेडियोचा उपयोग सुरू केला. उच्चार आत्मसात केले. कुराण त्यांनी सात वेळा मुळातून वाचले. नंतर ते अर्थनिश्चितीकडे वळले. त्यासाठी अरबी भाषेच्या व्याकरणाचा अभ्यास त्यांनी सुरू केला.

त्यातील किती तरी सुंदर उतारे त्यांनी पाठ केले आहेत. एकदा महात्माजींनी मौलाना अबुल कलम आझाद यांच्यासमोर विनोबाजींस कुराण म्हणावयास सांगितले. आणि विनोबाजी ते पवित्र अरबी कुराण मुखोद्गत म्हणू लागले. अरबी भाषा ऐकायला अति सुंदर आहे. मौलाना प्रसन्न झाले. एकही उच्चार चुकला नव्हता.

थोर महंमद पैगंबर यांची कोणी निंदा केली किंवा त्यांच्याविषयी कुत्सित विचारले तर विनोबा प्रक्षुब्ध होत. एकदा धुळे जेलमध्ये कोणी प्रश्न केला— "पैगंबरांनी किती तरी लग्नं केली !" विनोबाजींचे मुखमंडल आरक्त झाले, परंतु पुन्हा शान्त होऊन पैगंबरांची थोरवी ते सांगू लागले. ते म्हणाले, "पैगंबरांचे जीवन डोळ्यांसमोर येऊन माझी जणू समाधी लागते. कार्लाइल, गिबन, यांच्यासारख्या महान इंग्रज पंडितांनीही महंमदाची स्तुतिस्तोत्रं गायिली आहेत. त्यांना का कुणी लाच दिली होती ? पैगंबरांनी अनेक विवाह केले, परंतु ते भोगमूल नव्हते. निरनिराळ्या भांडखोर जातीजमातींत ऐक्य व्हावें म्हणून काही लग्नं होती. काही लग्नं धर्मासाठी बलिदान केलेल्या हुतात्म्यांच्या अनाथ पत्नींशी होती. त्या अनाथ स्त्रियांचं त्यांच्याजवळ लग्न करूनच ते नीट रक्षण व पोषण करू शकले असते. महंमद जर एक भोगासक्त किडा असता तर शेकडो वर्षं कोट्यवधी लोकांच्या हृदयांत ते कसे राहते ?

"मुसलमान म्हटला म्हणजे का वाईट ? ईश्वरानं सारे मुसलमान

वाईटच निर्मिले असतील, तर तो ईश्वर पै किंमतीचाच मानला पाहिजे. तुम्ही मुसलमानांत जात नाही, मिसळत नाही, त्यांच्याशी मैत्री जोडत नाही. अलग राहता. तुम्ही त्यांना जवळजवळ अस्पृश्यच समजता! हे बरं नाही. मुसलमानही भले आहेत. मागच्या महायुद्धात युद्धकैद्यांना सर्वांत चांगल्या रीतीनं कुणी वागवलं असेल तर ते तुर्कस्थाननं असं प्रशंसापत्र साऱ्या युरोपनं दिलं."

एकाने प्रश्न केला, "त्यांच्या कुराणात असं नाही का, की स्वर्गात पेयं मिळतील, सुंदर स्त्रिया मिळतील?"

विनोबाजी म्हणाले, "तुमचाही स्वर्ग असाच नाही का? तिथं अप्सरा व अमृत तुम्हीही ठेवलं आहे. सामान्य लोकांसाठी हे स्वर्ग-नरक असतात. सुखाचं आमिष किंवा शिक्षेचं भय दाखवून त्यांना नीतीच्या मार्गावर ठेवावं लागतं. परंतु अशी वर्णनं म्हणजे धर्माचा गाभा नव्हे."

एकाने प्रश्न केला, "शत्रू म्हटला की त्याला ठार करावं असं नाही कुराणात?"

विनोबाजी म्हणाले, "कुराणात जी अशी वाक्ये आहेत ती पुनःपुन्हा फसवणाऱ्यांना उद्देशून आहेत. ज्यूंना महंमद किती राजी राखू इच्छित होते, परंतु महंमदाचे शत्रू मक्केहून मदिनेवर चालून आले असता मदिनेतील ज्यूंनी आतून शत्रूशी कारस्थानं केली. अशा वेळेस काय करायचं? आजची राष्ट्रं काय करतील? महंमद केवळ धर्मस्थापक नव्हते; तर त्यांना राज्याचाही कारभार चालवावा लागे. स्वतःच्या खाजगी जीवनात त्यांनी सर्वांना क्षमाच केली. कुराणातील काही वाक्यांचा अर्थ तत्कालीन परिस्थितीपुरता आहे. आणि आमच्या शत्रूचा नायनाट होवो, असं आपण नाही का म्हणत? आपल्या वेदांत

'योऽस्मान् द्वेष्टि, यं च वयं द्विष्मः, तं जहि'

जो आमचा द्वेष करतो व ज्याचा आम्ही द्वेष करतो, त्याला हे प्रभो, ठार कर असे नाहीत का मंत्र? परंतु हा धर्माचा प्राण नव्हे."

विनोबाजी शेवटी गंभीरपणे म्हणाले, "परधर्माचा अभ्यास अत्यंत सहानुभूतिपूर्वक करावा लागतो. एक पाश्चिमात्य पंडित वेदांचा अभ्यास करीत होता. तो एके ठिकाणी लिहिता झाला– 'वेदकालीन लोक सोमरसाबरोबर गोमांस खात.' कशावरून? तर वेदांत

असं वाक्य आहे. त्यानं ‘ गोभिः ’ याचा अर्थ ‘ गायीचं मांस ’ असा पटकन केला. परंतु वेदांवर भाष्य लिहिणारे सायणाचार्य यांनी अर्थ केला ‘ गोभिः ’ म्हणजे ‘ गाईच्या दुधासह. ’ गायीचं दूध मिसळून सोमरस घ्यावा. अशी गोष्ट असते. आपण जशी दृष्टी घेऊ तसा अर्थ दिसतो. ”

## मी येथे गुदमरत आहे

धुळे शहरात श्री. क्षीरे यांची समर्थ सेवकाश्रम म्हणून एक संस्था आहे. एकदा त्यांनी विनोबाजींना तेथे बोलावले. ते आपला अहवाल वाचू लागले. त्या अहवालात हिंदू–मुसलमान प्रश्नावर बरेच लिहिलेले होते. हिंदूंच्याच दुकानातून हिंदूंनी माल घ्यावा, जशास तसे पाहिजे, वाइटाशी वाईट का न व्हावे.. इत्यादी होते. तो अहवाल ऐकताना विनोबाजी संतापाने जणू थरथरत होते. ते शेवटी म्हणाले, “ इथल्या हवेत मला गुदमरल्यासारखं होतंय. तुम्ही हे काय वाचीत आहात ? तो वाईट म्हणून मी वाईट झालो, तर जगात दोन वाईट होतील ! अशानं का जग सुधारतं ? ” विनोबाजी तेथून पटकन निघून गेले.

## आधी लहान भावाला उठू दे

धुळ्याला एका दिवाणखान्यात सभा भरली होती. प्रश्नोत्तरे व्हायची होती. विनोबाजी प्रश्नांना उत्तरे देत होते. एका वकिलांनी विचारले, “ अमुक केवळ ब्राह्मणेतर आहे म्हणून का त्याला मत द्यावं ? काही योग्यायोग्यता नको का बघायला ? ”

विनोबाजी म्हणाले, “ तुमच्या म्हणण्याचा आशय समजला. परंतु मी महाभारतातील एक कथा सांगतो. पांडव वनात होते. धर्मराजाला तहान लागली. त्यांनी पाणी आणायला सांगितलं. अर्जुन धावत गेला. एका सरोवराच्या काठी आला. तिथं एक यक्ष होता. तो यक्ष म्हणाला, ‘ माझ्या प्रश्नांची उत्तरं दे, मग पाणी ने.’ अर्जुनानं ते ऐकलं नाही. तो पाणी नेऊ लागला व मरून पडला ! भीम आला, त्याचं तसंच झालं. नकुल आला, त्याची तीच गत. सहदेव आला व तोही मरून पडला. शेवटी स्वतः धर्मराज

आले. ते यक्षाला म्हणाले, ‘ विचार प्रश्न. मी उत्तरं देतो. ’ यक्षाने प्रश्न विचारले व धर्मराजाने उत्तरे दिली. यक्ष प्रसन्न झाला व म्हणाला, ‘ वर माग. ’ धर्म म्हणाला, ‘ सर्वांत लहान हा सहदेव उठू दे. ’ यक्ष हसला व म्हणाला, ‘ भीम, अर्जुन हे तुझे रुख्खे व पराक्रमी भाऊ, त्यांना प्राणदान मागण्याऐवजी या सहदेवाला उठवायला काय सांगतोस ? ’ धर्म म्हणाला, ‘ जो सर्वांहून लहान असेल तोच आधी उठू दे. ’ यक्ष प्रसन्न झाला व त्यानं सर्वांनाच उठवलं ! आपणही असंच म्हणू या, की जो सर्वांत मागासलेला आहे तो आधी पुढं येऊ दे. जे मागं आहेत, जे पडलेले आहेत, ते उठू दे. तुम्ही ब्राह्मणांनी आजपर्यंत पुढाकार मिरवलात. आता त्यांना येऊ दे पुढं. तुम्ही त्यांना मदत करा. स्वतःजवळचं ज्ञान, माहिती त्यांना द्या. त्यांना कारभार करू दे. त्यांना नको का समाधान ? ते नको का पुढं यायला ? आपण सारे भाऊ ना ? ”

असे म्हणून त्यांनी पुढील अभंग-चरण म्हटला :

‘ देह आणि देहसंबंधे निंदावी
आणिक वंदावी श्वानसुकरे ’

हा माझा, हा माझा नातलग, हा माझ्या जातीचा, असं नये पाहू. आपल्या जवळच्या लोकांचे दोष बघावे, व जे आपल्याला दूरचे वाटतात त्यांचे गुण बघावे. अशी दृष्टी घ्याल तरच या महान देशाचे प्रश्न सुटतील. ”

## बाहेरून स्वच्छ, परंतु आत काळे

विनोबाजींची ही अशी समदृष्टी आहे. हिंदू-मुसलमान, ब्राह्मण-ब्राह्मणेतर, स्पृश्यास्पृश्य हे भेद त्यांना सहन होत नाहीत. हरिजनांविषयी त्यांना किती प्रेम ! एक हरिजन मुलगा त्यांच्याबरोबर नेहमी असे. तो मद्रासकडचा. त्याचे नाव सत्यन. तो संस्कृत वाचतो. एकदा धुळ्यास हरिजनांविषयी बोलताना एका सभेत ते म्हणाले, “ आपण तोंडानं सेवा सेवा– पुष्कळ म्हणतो, परंतु खरी तळमळ नसते. आपलं सारं करणं तोंडदेखलं ! आपण लोटा वरून घासून लख्ख करतो. परंतु आत पाहू तर काळाकुट्ट असतो. तसं आपलं आहे. बाहेरून छान, पोटात घाण. हृदयात प्रेम हवं. हरिजनांना घरात घ्या. हरिजन नोकर ठेवा. एखादा हरिजन मुलगा आपल्या मुलांबरोबर शिकायला ठेवा.

असं करा. आपण ' सहनाववतु...' वगैरे मंत्र म्हणतो. ज्याच्या-ज्याच्याविषयी आपणास दुजाभाव वाटत असेल त्याच्या-त्याच्याजवळ जाऊन आपण म्हटलं पाहिजे की, आपण दोघे एकत्र बसू, खेळू, शिकू, समर्थ होऊ. सारा द्वेष-मत्सर विसरून जाऊ !"

## नदीवर स्नानाला गेले

तो सत्यन नेहमी बरोबर असे. एकदा एका सज्जनाकडे विनोबाजी उतरले होते. परंतु हरिजन मुलाला घरातील विहिरीवर स्नान करता येईना. त्या सद्गृहस्थाची हरकत नव्हती. परंतु ती सामाईक विहीर होती. दुसरे भाऊबंद त्या विहिरीवर पाणी भरीत.

विनोबाजी म्हणाले, " बरोबरच्या सत्यनला जर इथं स्नान नसेल करता येत, तर मीही इथं नाही करीत. आम्ही नदीवर जातो."

आणि नदीवरून ते स्नान करून आले.

ज्या मंदिरांत हरिजनांना जाता येत नाही, त्या मंदिरांत ते जात नाहीत. तेथे प्रवचन करीत नाहीत.

एकदा एक सनातनी म्हणाला, " आम्ही का चोखा मेळ्याला पवित्र नाही मानीत ?"

विनोबाजी म्हणाले, " तुमच्या मंदिरांतून यायला हरिजनांनी चोखा मेळ्याच्या योग्यतेचं झालं पाहिजे. आणि तुम्ही ?"

महात्माजींनी हरिजनांसाठी उपवास केल्यावर विनोबाजी वर्ध्याजवळच्या नालवाडी गावी हरिजन वस्तीतच जाऊन राहिले होते. विनोबाजी म्हणजे मूर्तिमन्त समभाव आहेत.

## तुमच्या स्वतःच्या उद्धाराची काळजी घ्या

एकदा एका सनातनीने यांना प्रश्न केला, " अस्पृश्य सनातन धर्मा-विरुद्ध जर वागू लागतील तर त्यांचा उद्धार कसा व्हायचा ? नरकात पडतील !"

विनोबाजी म्हणाले, " अस्पृश्यांच्या उद्धाराची तुम्हांला नको काळजी. अस्पृश्यांना दूर ठेवून स्वतःचा उद्धार होणार आहे का, याचा विचार करा. स्वतःला नरकप्राप्ती होणार का मोक्ष मिळणार त्याची चिंता करा."

## हजामत बंद

विनोबा पूर्वी दर आठवड्याला क्षौर करीत. गावातला न्हावी येऊन करी. शनिवारी कोणी हजामत करीत नसे. तेव्हा विनोबांनी तोच वार ठरवला होता. रविवारी येणारांना गुळगुळीत गोटा दिसे.

आश्रमातल्या एका हरिजनाची हजामत करायला त्याने नकार दिला तेव्हा विनोबांनी त्याच्याकडून हजामत करून घेणे बंद केले !

## हवीहवीशी पत्रे

एकदा गांधीजींनी विनोबांना लिहिले—

कृतयुगी विनोबा,

गरीबांना तुम्ही चांगलेच फुसलावतासे दिसते. माझ्यासारख्या गरीबाला तुमच्या पत्राची चिंता वाटते, तेव्हा लिहायचे नाही, आणि जेव्हा तो मृत्यु-शय्येवर पहुडण्याची तयारी करीत असेल तेव्हा लिहायचे—'आता आरंभ केलाच आहे तर नियमित लिहीन !' परमेश्वरच जाणे, पण कृतयुगींची प्रतिज्ञा खोटी झाल्याचे ऐकिवात नाही. तेव्हा तुमची प्रतिज्ञा खरी ठरावी म्हणून तरी मला ह्या रुग्णशय्येवरून उठावे लागणारसे दिसते. तुमची पत्रे नियमित यावी, अशी आशा बाळगून आहे.

## गांधींचे बोलावणे

गांधीजींची एकदोन पत्रे वर्षाकाठी विनोबांना यायची, आणि एखाद दोन पत्रेच विनोबांची गांधींना जायची. क्वचित सल्ला—मसलतीसाठी निरोप पाठवून गांधीजी विनोबांना बोलावून घ्यायचे.

एकदा विनोबांनी गांधींना विचारले, "मी तर कामात प्रत्यक्ष भाग घेत नाही. माझे जीवन प्रायः चिंतन आणि ध्यानप्रधानच राहिले आहे. अध्ययन—अध्यापन, काही ग्रामसेवा, गरीबांची सेवा हेही थोडे चालते. तुमच्या थोरामोठ्यांशी चर्चा होत राहतात. तेव्हा मी त्यापेक्षा अधिक ते काय सांगणार ?"

गांधीजी म्हणाले, "पुष्कळदा त्या खेळात रममाण झालेल्या माणसाला खेळाचं स्वरूप नीट आकलन होतं असं नाही. अशा वेळी तो पाहणाऱ्या

तटस्थ माणसाच्या सल्ल्याचा चांगला उपयोग असतो. तुमच्याकडून तशीच अपेक्षा मी बाळगीत असल्यानं तुम्हांला बोलावणं पाठवतो. ”

## गरीबांचा कळवळा

वर्धा शहरात सर्वत्र गाईचे दूध पुरवावे अशी योजना घडत होती. विनोबांनी सुचवले, “ जे पाव-अर्धा शेर दूध घेतात त्यांना दूध स्वस्त भावानं पुरवावं. जे दोन–चार शेर घेतात त्यांच्याकडून थोडा जास्त भाव घ्यावा. पाव–दोन पाव दूध घेतात ते मुलांसाठी घेतात. त्यांना दूध स्वस्त मिळायला हवं. जास्त दूध घेणारे पैसेवाले असतात. त्यांच्या घरी दुधाचा इतर गोष्टीं-साठीही वापर केला जातो. त्यांना थोडं महाग मिळायला हरकत नाही. ”

विनोबांची ही सूचना गो-सेवा-संघाला व्यवहार्य वाटली नाही. विनोबांचे म्हणणे यात सिद्धान्त आहे, आणि त्याची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

## व्यवस्थितपणा

विनोबाजी नियमितपणा व व्यवस्थितपणा यांचे भक्त आहेत. त्यांना बावळटपणा आवडत नाही. एकदा पश्चिम खानदेशातील त्यांचा दौरा सुरू होता. धुळ्याहून कोठे तरी आम्ही जात होतो. परंतु त्यांच्या बरोबरचा सत्यन त्यांचा पंचा विसरला. विनोबाजी अशान्त झाले. शेवटी एक मनुष्य सायकल-वरून गेला. पंचा आला. मग त्यांनी स्नान केले. विसरणे त्यांना सहन होत नाही. विसरणे म्हणजे तमोगुण !

## नवीन ज्ञानाची हौस

विनोबाजींना फार वाचवत नाही. डोळ्यांना फार त्रास होतो. त्यांनी मला एकदा लिहिले, “ तुम्ही जे वाचीत असाल त्यांतील भाव, त्यातील विचार मला कळवीत जा. म्हणजे नवीन विचारांशी परिचित राहीन. ”

नागपूरच्या जेलमध्ये असताना ते निरनिराळी पुस्तके वाचायला सांगत व स्वतः ऐकत.

## तुम्ही लिहिता, परंतु वाचणार कोण ?

मी त्यांना एकदा म्हटले, “ मी पुष्कळ लिहून ठेवलं आहे. ”

ते म्हणाले, "परंतु वाचणार कोण? शेकडा ९० लोक निरक्षर. त्यांना साक्षर तरी कसं करता येईल? आज शिक्षणावर देशात दहापंधरा कोटी रुपये खर्च होत असले समजा, परंतु तेवढया खर्चात शेकडा दहाच लोक साक्षर झाले. उद्या सर्वांना शिकवायचं म्हटलं, तर १०० कोटी रुपये लागतील. कोठून उद्या एकदम पैसे आणाल? सर्व हिंदुस्थानचं प्रांतिक व मध्यवर्ती उत्पन्न मिळून दोन अडीचशे कोटी होईल. त्यातलं निम्मं शिक्षणालाच द्याल, तर इतर राष्ट्रसंवर्धक कामं कशी होतील? आणि शिक्षण सक्तीचं करूनही भागणार नाही. जपानसारख्या देशातही शेकडा दहा टक्के मुलांना सक्तीतून वगळावं लागलं. कारण ती मुलं घरी कामास येत. घरी फार दारिद्र्य. मग आपल्या देशात तर विचारायलाच नको. मुलगा ७-८ वर्षांचा झाला की तो शेण गोळा करायला जातो. गुरं घेऊन जातो. बकऱ्या चारतो. तुम्ही सक्ती कशी कराल? म्हणून ही वर्धाशिक्षणपद्धती. मुलं शाळेत जातात व शाळेतून काही कमावून घरी आणतात असं जर गरीब श्रमजीवी आईबापांस दिसलं, तर मुलांना मोठ्या खुषीनं ते शाळेत पाठवतील. म्हणून उद्योगातून शिक्षण द्या. यानंच प्रश्न सुटेल."

## लहान मुलांना कसे शिकवावे?

एकदा लहान मुलांच्या शिक्षणासंबंधी येवल्याच्या श्री. आपटे गुरुजींनी त्यांना प्रश्न विचारला. विनोबाजी म्हणाले, "मी लहान मुलांना आधी अक्षरं काढायला लावणार नाही. त्यांना आधी चित्रकला शिकवीन. रेषा, वर्तुळं, नाना आकार, आकृत्या काढायला लावीन; त्याचबरोबर सोपी सुंदर गाणी, सोप्या कविता, सोपे अभंग, सोपी संस्कृत वचनं हे पाठ करून घेईन. अर्थात हसतखेळत. त्यात सक्ती नाही वाटता कामा. 'सत्यं वद, धर्मं चर, मातृदेवो भव, पितृदेवो भव' अशी सोपी संस्कृत वचनं तो सहज पाठ करील. थोडी चित्रकला व थोडं पाठान्तर झालं म्हणजे मी काय करीन? ते पाठान्तर ज्या पुस्तकात मोठ्या अक्षरांत छापलेलं असेल असं पुस्तक त्याला देईन. आणि मग तो तोंडानं पाठ केलेलं म्हणेल व ते समोर पाहील. 'का रे नाठवीसी' म्हणेल, व 'का रे ना' अशी अक्षरं डोळ्यांत ठसतील. निरनिराळ्या भाषांची लिपी मी अशा मार्गानंच शिकलो. तामीळ, तेलगू, कानडी, बंगाली- सर्व भाषांतील संस्कृत गीता मागवल्या. कानडी गीतेतही

‘ धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे ’ असंच असणार. हा कानडी ‘ ध ’, हा कानडी ‘ म ’– असं त्यावरून शिकत गेलो. ”

## इतिहास व भूगोल कसा शिकवावा ?

बोलता बोलता इतिहास व भूगोलाचा विषय निघाला. ते म्हणाले, “ लहान मुलांना गोष्टींतून इतिहास द्यावा. गोष्टी सर्व देशांच्या घ्याव्या. सर्व जगाचा तो नागरिक होऊ दे. राम, कृष्ण, बुद्ध, अशोक यांच्याबरोबरच सॉक्रेटिस, ख्रिस्त, कन्फ्यूशियस, महंमद हेही येऊ देत. आणि मुलं मोठी झाली की त्यांना इतिहासात कशा प्रचंड लाटा उठतात व जगभर पसरतात ते सांगावं. ख्रिस्तपूर्व पाचव्या– सहाव्या शतकांत सर्व जगभर प्रचंड वैचारिक लाट उठली होती. ग्रीस देशात सॉक्रेटिस, प्लेटो वगैरे थोर तत्त्वज्ञानी झाले. चीनमध्येही त्याच सुमरास लाओत्सी, कन्फ्यूशिअस झाले. हिंदुस्थानात बुद्ध, महावीर झाले. अशा रीतीने या प्रचंड लाटा पाहाव्या. युरोपात धर्मसुधारणा सुरू झाली, पोपविरुद्ध बंड सुरू झालं, बायबल लोकभाषांत येऊ लागलं. त्याच सुमारास हिंदुस्थानातही संतांची चळवळ सुरू झाली. संस्कृतातील ज्ञान जनतेच्या भाषांतून येऊ लागलं. या लाटा कधी कधी दोनदोनशे वर्षं पसरत असतात.”

“ आणि भूगोल तर अति गोड विषय. पृथ्वीच्या पोटात शिरण्याचा विषय. भूमातेशी एकरूप होण्याचा विषय. मी भूगोल रसाळ व गोड करून शिकवीन. हे पेरू इथं का होतात ? द्राक्षं अफगाणिस्थानात का होतात ? कापूस अमुकच ठिकाणी का फुलतो ? किती मौज आहे ? वारे, पाऊस यांच्या लीला सांगणं, डोंगर कसे बनतात, दिवस-रात्र कसे होतात– सारं काव्य आहे. रसाळ शास्त्र आहे. परंतु भूगोलात इतिहास मिसळा. सोलापूरजवळची बार्शी; बारस म्हणजे द्वादशी. अंबरीष राजा एकादशीव्रत करी. द्वादशीस पारणं करी. त्याची ही राजधानी. त्याच्यासाठी भगवान आले. अशा कथा सांगा. महाराष्ट्राची खरी नदी भीमा–चंद्रभागा. तिचाच महाराष्ट्रात अधिक प्रवाह. कृष्णा, गोदावरी आपण वाढवल्या, परंतु त्या मद्रासला देऊन टाकल्या. आपली अशी ही भीमा. अशी गंमत सांगावी. ”

## आश्रम कसा असावा ?

विनोबाजींनी अनेक प्रश्नांचा अभ्यास व विचार करून ठेवलेला आहे.

आणि आश्रम चालवणाऱ्याजवळ सर्व प्रश्नांचा खोल अभ्यास हवाही. एकदा ते म्हणाले, " प्राचीन काळी राजे मधून मधून ऋषींच्या आश्रमांत जात. ऋषी तिथं विचार करत असत. सर्व सामाजिक व राजकीय प्रश्नांचा तिथं निर्विकार मनानं खल होई. निरनिराळे ऋषी जमत. विचारविनिमय होई. अशा आश्रमांतून राजे लोक नवीन विचार, नवीन दृष्टी घेऊन जात. पावित्र्यही घेऊन जात. आश्रम म्हणजे ज्ञान–विज्ञानाचं, संयमाचं, उद्योगांचं, प्रयोगांचं, कर्माचं स्थान. आश्रमात गेल्यानं आनंद वाटावा. गावाबाहेरच्या देवळात गेल्यानं मनाला क्षणभर जसं मोकळं वाटतं, बरं वाटतं, तसं आश्रमात गेल्यानं वाटावं. संसारातील त्रस्त जीवास इथं आनंद वाटेल, उल्हास वाटेल, स्फूर्ती मिळेल, नवीन दृष्टी येईल, असं ते स्थान असावं. तेथील हवा घेऊन संसार अधिक सुंदर व तेजस्वी करण्यासाठी जायचं. "

आणि विनोबाजी असेच आहेत. किती लोक त्यांच्याकडे येत असतात. नाना प्रश्न विचारीत असतात. राजनीतीचे प्रश्न, वैवाहिक नीतीचे प्रश्न, शिक्षणासंबंधी, उद्योगासंबंधी, धर्म व तत्त्वज्ञान, कला नि साहित्य, हिंसा-अहिंसा, गांधीवाद की समाजवाद, शेकडो प्रकारचा ऊहापोह त्यांच्या तेथे चालत असतो आणि विनोबाजी शान्तपणे सांगत असतात.

## कर्ममूर्ती व सेवामूर्ती विनोबाजी

परंतु विनोबाजींनी आपले सारे ज्ञान कर्मात, सेवेत ओतले आहे. गणित व तत्त्वज्ञान हे त्यांचे आवडते विषय. त्यांची गणितविषयक बुद्धी आश्चर्यकारक आहे. ते मोठे गणितशास्त्रज्ञ झाले असते. परंतु आपली सारी गणिती बुद्धी त्यांनी चरख्यात ओतली. चरख्याची गती कशी वाढेल, अधिक सूत कसे निघेल, अधिक मजुरी कशी मिळेल, यांत त्यांचा आत्मा. महात्माजी एकदा म्हणाले, " आठ तास काम करून पोटभर खायला मिळालंच पाहिजे. पोटभर नीट खायला मिळावं म्हणून महिना पंधरा रुपये हवेत. म्हणजे रोज आठ आणे हवेत. मी आठ तास सूत कातून घेईन, तर त्या कातणाराला आठ आणे मला देता आले पाहिजेत. "

परंतु हा प्रयोग कोण करणार ? खादी महाग होईल. ती कोण घेणार ?

महात्माजी म्हणाले, " रक्तशोषण करण्यापेक्षा खादी मेली तरी चालेल. "

महाराष्ट्र चरखा-संघ प्रयोग करायला उभा राहिला. आठ आणे दूर राहिले, निदान चार आणे तरी देऊ या, असे ठरले. विनोबाजींना आनन्द झाला. ते स्वतः प्रयोग करू लागले. रोज आठ तास कातू लागले. किती मजुरी मिळते, ते पाहू लागले. त्यांचा उजवा हात थके. ते डाव्या हाताने कातू लागले. आणि सहा आण्यापर्यंतही मजुरी मिळेल असे त्यांनी दाखविले. अर्थात त्यांच्या सुताचा नंबर अधिक होता म्हणून अधिक मजुरी.

## प्रयोगी मुले

विनोबाजींच्या भोवती सेवकांची सेना आहे. किती तरी तरुण त्यांच्याजवळ आहेत. हे बुद्धिमान तरुण विनोबाजींची स्फूर्ती घेऊन प्रयोग करीत असतात. तकलीवरच भराभरा सूत कसे निघेल, याचे प्रयोग सुरू झाले आणि युक्ती सापडली. कसा वेग द्यावा, कसे भर्रकन गुंडाळावे याचे नवीन शास्त्र झाले. आणि भाऊ पानसे, सत्यन वगैरे तरुण तासात तकलीवर चारचारशे तार कातू लागले. चरख्याइतके सूत. पुन्हा तकली सुटसुटीत. खिशात मावते. विनोबाजी तिला वस्त्रपूर्णा म्हणत. चरख्यातही शोधबोध होऊ लागले. सत्यनने चरख्यात सुधारणा केली. मगनचरखा आणखी निघाला. परंतु ही सारी स्फूर्ती कोठून येत आहे ? या स्फूर्तीचा अखंड झरा म्हणजे विनोबाजी.

## महात्माजी का आकृष्ट झाले ?

महात्माजी गुजरात सोडून वर्ध्यास का आले ? सेवाग्रामला का आले ? एक तर १९३० साली स्वातंत्र्य मिळवीन तेव्हा आश्रमात परत येईन, असे म्हणून ते दांडीयात्रेला निघाले. साबरमतीचा तो ऐतिहासिक आश्रम त्यांनी हरिजनकार्यास देऊन टाकला. मग आता कोठे राहायचे ? कोठे मिळतील ग्रामसेवक ? ग्रामोद्योगाचे निरनिराळे प्रयोग करायचे आहेत. कोठे मिळतील भरपूर माणसे ? त्यांचे लक्ष विनोबाजींकडे गेले; आणि स्वर्गीय जमनालालजीही तेथे होते. पुन्हा वर्धा मध्यवर्ती ठिकाण. सर्वांना भेटायला बरे. परंतु मुख्य आकर्षण येथील व्रती सेवकांचे होते.

## सेवामय मित्रमंडळ

विनोबाजींचे भाऊ, त्यांचे सारे बरोबरचे मित्र त्यांच्याभोवती तेथे होते. श्री. मोघेजी, श्री. वाळूंजकरजी, श्री. गोपाळराव काळे, श्री. धोत्रेजी, सारे

विनोबाजींचे बडोद्याचे स्नेही. हे कित्येक वर्षे सेवाकार्यात मग्न होते. हिंदुस्थानात महारोग्यांसाठी फक्त मिशनरी लोकांनी दवाखाने चालविले होते. परंतु विनोबाजींचे स्नेही श्री. मनोहर दिवाण यांनी महारोग्यांच्या सेवेला वाहून घेतले; व वर्ध्याजवळ दत्तपूरला महारोग्यांसाठी सुंदर व आदर्श असे रुग्णालय सुरू केले. श्री. वाळूंजकरजी यांनी चर्मालयाला वाहून घेतले. गुरे मरतात, त्यांचे कातडे कसे काढावे, चरबी कशी काढावी, खूर वगैरेंतून सरस कसा काढावा, हाडांचे खत कसे करावे– हे दाखविण्यासाठी त्यांनी आदर्श चर्मालय सुरू केले. अशा प्रकारे विनोबाजींभोवतालची मंडळी राष्ट्रसंवर्धक व राष्ट्रोद्धारक कार्यात रात्रंदिवस मग्न असत. निरहंकारपणे परंतु शास्त्रीय अशी सेवा करीत.

## प्रेमळ विनोबाजी

विनोबाजी कठोर वाटले तरी ते तसे नाहीत. सभोवतालच्या मुलांवर त्यांचे किती प्रेम ! ही मुले लहानाची मोठी त्यांच्या आश्रमात झाली. विनोबाजींचा पट्टशिष्य म्हणजे वल्लभ. वल्लभला त्यांनी वाढविले; शिकविले. वल्लभ वेद वाची, उपनिषदे जाणी, सुंदर चर्चा करी. कोणतेही काम व्यवस्थित करी. विनोबाजी त्या त्या मुलांना त्यांना झेपेल असे शिकवीत. श्री. अण्णासाहेब दास्ताने यांचा मुलगा दत्तू आश्रमातच मोठा झाला. त्याच्याजवळ विनोबाजी शांकरभाष्य वाचीत. त्यांनी सभोवतालच्या तरुणांना नुसते कामसू नाही केले, तर त्यांना विचारही दिले. विचार करण्याची शक्तीही दिली. आणि या तरुणांवर त्यांचे किती प्रेम ! त्या मुलांनी चालविलेले प्रयोग, त्यांच्या गोष्टी ते किती प्रेमाने सांगत ! भाऊ पानसे रोज सूत्रयज्ञ करणारा. त्याच्यावर एकदा शस्त्रक्रिया करण्यात आली होती. सूत्रयज्ञाचे व्रत का आज मोडणार ? परंतु पडल्या पडल्याच भाऊने कसे कातले ते सांगताना विनोबाजी गहिवरले होते. कोणी आजारी पडला, कोणाचे वजन कमी झाले तर त्याला दूध देतील, त्याच्यावर प्रयोग करतील. आश्रमात गोखलेजी म्हणून एक आध्यात्मिक वृत्तीचे तरुण. ते इंजिनियरच्या शेवटच्या परीक्षेत पहिल्या वर्गात आले होते. परंतु ३३–३४ सालापासून ते महात्माजींच्या साधनेकडे वळले. नुकतेच पास झालेले, परंतु सारे सोडून ते मुमुक्षू होऊन बाहेर पडले. काही दिवस सासवडच्या आश्रमात राहून ते विनोबाजींकडे गेले. ते अत्यन्त अशक्त होते. आजारी असत. क्षय होईल की काय असे वाटे. परंतु विनोबाजींनी त्यांच्यावर

प्रयोग सुरू केले. गायीच्या दुधाचे दही भरपूर देऊ लागले आणि वजन वाढू लागले. १९४२ च्या एप्रिल–मे महिन्याच्या सुमारास विनोबाजी धुळे जेलमध्ये मला भेटायला आले होते. दौऱ्यासाठी आले होते. मलाही भेटायला आले. त्या वेळेस गोखलेजींवर केलेला प्रयोग सांगताना त्यांना किती आनन्द होत होता !

विनोबाजी आश्रमीयांचे आईबाप आहेत. कधी कठोर होतात, रागावतात. परंतु आईचा हळुवारपणा व प्रेमळपणाही त्यांच्याजवळ आहे.

## मी का तुमची उष्टेखळी ?

फैजपूर काँग्रेसच्या वेळेस विनोबाजी आम्हा खानदेशी काँग्रेस सेवकांस अडचणीत धीर व सल्ला देण्यासाठी, तसेच आम्हा सर्वांत ऐक्य राहावे म्हणून आधीपासून येऊन बसले होते. खानदेशाला विनोबाजी घरचे वाटत. खानदेशाने किती तरी माणसे त्यांना दिली. धुळे जेलमध्ये निकट संबंध आले. आम्ही आमची भांडणे त्यांच्याकडे नेत असू. ते गमतीने म्हणत, “ मी का तुमची उष्टखेळी ? सारी घाण माझ्याजवळ आणून टाकता वाटतं ? ”

विनोबाजींचे खानदेशावर प्रेम. फैजपूरला काँग्रेसचे काम सुरू झाले. परंतु मुसळधार पाऊस पडला. पुन्हा का काँग्रेसची जागा बदलतात, अशी भीती आम्हांला वाटली. तर विनोबाजी म्हणायचे, “ मी इथं पाय रोवून बसलो आहे. भिऊ नका.”

## चरखा अविरोधी श्रमाची खूण

फैजपूरला काँग्रेसच्या अधिवेशनाची तयारी सुरू करताना आरंभी विनोबाजींच्या हस्ते ध्वजारोहण झाले. राष्ट्रीय ध्वज उभारताना ते म्हणाले, “ या ध्वजावर चरख्याचं चित्र आहे. चरखा अविरोधी श्रमाचं प्रतीक आहे. हा झेंडा सर्वांना काम देईल, बेकारी दूर करील. आजच्या यांत्रिक भांडवलशाही उद्योगांत स्पर्धा आहे आणि त्यामुळं युद्ध. चरखा स्पर्धाहीन उद्योग देईल. ”

## सुभानसाठी चिखलातून पायी आले

विनोबाजी त्या पावसात फैजपूरला होते. धीर देत होते. आणि धुळे जेलमध्ये त्यांच्या निकट परिचयाचा झालेला सुभान नावाचा मुलगा

आपल्या घरी आजारी आहे असे त्यांना कळले. सुभानला ३० साली फटके बसले होते! ३२ साली तो पुन्हा तुरुंगात होता. नंतर नगरच्या आयुर्वेद महाविद्यालयात तो शिकत होता. तो आपल्या घरी आला होता. तापाने आजारी पडला. विनोबाजींना सुभानचा तेजस्वीपणा आवडे. धुळे जेलमध्ये गीताप्रवचन झाल्यावर तहान लागली तर ते सुभानला पाणी आणण्यास सांगायचे सुभान आजारी आहे असे कळताच ते निघाले. भादली स्टेशनवर उतरून पायी निघाले. खानदेशातील काळ्या जमिनीची ती शेते! ढोपर ढोपर चिखल! बाभळीचे काटे त्यात पडलेले! पाऊस पडत आहे! परतु विनोबाजी तशातून सुभानच्या त्या लहान झोपडीत आले. सुभानच्या आईला धन्य वाटले. गावातल्या लोकांना आश्चर्य वाटले. दोन दिवस त्याच्याकडे राहिले व जाताना म्हणाले, "आता बरा होशील. तुझा ताप मी घेऊन जातो हो."

## फक्त गुलामगिरीच शक्य

देशाची चिंता वाहणारे पुष्कळ, पण त्यांची चिंता कार्यरूपाने कधी प्रकटत नाही. हे वाईट, ते अयोग्य, ते अशक्य– असे शेरे मारून ते आपल्या चिंतेचे समाधान करून घेतात. त्यांची चिंता वांझोटी असते. देशहिताच्या लंब्याचवड्या गप्पा मारण्यात व इतरांचे उणे-दुणे काढण्यात ही मंडळी पटाईत असतात.

एके ठिकाणी विनोबांशी असा वाद एक जण घालू लागले. विनोबा रागाने म्हणाले, "आम्हांला सारं अशक्य असतं. खादी विकत घेणं अशक्य. काँग्रेसचे सभासद होणं अशक्य. चार-सहा महिने देशासाठी तुरुंगात जाणं अशक्य. अशा लोकांना जगात एकच शक्य असतं ते म्हणजे गुलाम राहणं!"

## दोषांची जाणीव

एखाद्या वेळी विनोबा कठोरपणे बोलतात. पश्चिम खानदेशातला सवाई मुकटी गावचा हा प्रसंग. खादीधाऱ्यांचे तेथे संमेलन होते. पुष्कळ कार्यकर्ते तेथे जमले होते. त्यात जळगावजवळच्या असोदे गावचे चावदस भाऊही होते. ते फार भावनाप्रधान आणि निरागस. विनोबाजींजवळ ते काही बोलत होते.

चावदसभाऊ आपल्या अडचणी सांगत होते. आणि एकदम विनोबाजी

म्हणाले, " तकलीवर नीट गती नाही. चरख्यावर नाही. ती आधी मिळवा, आणि नंतर दुसऱ्याच्या उठाठेवी करा. "

चावदसभाऊंना वाईट वाटले. ते एकदम पायी निघून गेले. विनोबांना ते कळले. त्यांना वाईट वाटले. रात्र गेली. पहाटे प्रार्थना.

माझे मज कळो येती अवगुण । काय करू मन अनावर ।

हा अभंग त्यांनीच म्हटला. नंतर त्यांनी थोडे प्रवचन केले. म्हणाले, " मी जरा रागानं बोललो. तो भला माणूस निघून जाईल असं मला वाटलं नाही. परंतु झालं खरं असं. क्रोध थोडाही आला तरी वाईट. लगेच आपण आंधळे होतो. लगेच चुकतो. माणसंच आपण सारी. चुका होणारच. सांभाळणारा तो प्रभू ! "

विनोबांची ती सकंप, करुण, आर्त वाणी ज्यांनी ऐकली त विसरणे शक्य नाही.

## नम्रतेची मूर्ती

विनोबाजी अति नम्र. एकदा मोतीलाल नेहरू वर्ध्याच्या आश्रमात आले होते. ती भव्य, त्यागमय मूर्ती पाहून विनोबाजींनी साष्टांग नमस्कार घातला.

महात्माजी पूर्वी साबरमतीस असत. ते जेव्हा वर्ध्याच्या अश्रमात येत तेव्हा विनोबाजी म्हणायचे, " तुम्ही येथे आहात तोवर मी कोणी नाही. येथे असाल तोवर तुम्ही चालक. सर्व पाहणारे. "

वर्ध्याचा आश्रम सुरू होऊन एक तप झाले तेव्हा आपण सर्वत्र हिंडावे असे त्यांच्या मनात येऊ लागले. त्यांनी महात्माजींना ती गोष्ट कळवली. त्या पत्रात त्यांनी लिहिले होते, " गेली बारा वर्षे मी वर्ध्यात नव्हे, तुमच्या आज्ञेत राहिलो होतो. " पण गांधीजींनी त्यांच्यावर अनेक कामे सोपवली. विधायक कार्याबद्दल त्यांनी चिंतन आणि प्रयोग करावेत अशी कल्पना. गांधीजींची जणू ते प्रयोगशाळा बनले होते. ते एकदा म्हणाले, " महात्माजींच्या प्रतिभेला अंत नाही. ते नवीन नवीन काढीतच असतात. ख्रिस्त एकदा म्हणाला— कोळी मासे पकडतो, मी माणसं पकडतो. तसं महात्माजींचं आहे. ते माणसं पकडतात. त्यांना नाना उद्योगांत गुंतवतात. खादी घे, नाही तर गोरक्षण

उचल. हरिजन सेवा कर. साक्षरता प्रसार कर. राष्ट्रभाषा प्रचार कर. आदिवासींच्या भागात जा. चर्मालयात ये. मधुसंवर्धन विद्या शीक, मधमाशा पाळ. व्यसनमुक्तीचा प्रयत्न कर. गावाची स्वच्छता कर. एक ना दोन,– शेकडो गोष्टी ते तुम्हांला दाखवतील व सेवेत ओढतील. असा हा महापुरुष आहे. ”

## विनोबांचा खानदेश

खानदेश विनोबांचा असे म्हणण्याची प्रथाच पडून गेली होती. खानदेशच्या कार्यकर्त्यांवर विनोबांचा भारी लोभ. खानदेशात काम कसे करावे याची एकदा चर्चा चालली होती. एक ज्येष्ठ कार्यकर्ते म्हणाले, “ कागदावर सारी योजना नीट आखू. ”

विनोबाजी म्हणाले, “ कागदावर नको. ती योजना मग कागदावरच राहील. कागदी योजनांची मला भीती वाटते. ही असली आखाआखी नको. कामाला लागले की त्याला आकार येईल. तालुक्यागणिक दहा तरी कार्यकर्ते असावेत. एकेकाकडे पंधरा वीस गावे. एकदा तरी महिन्यातून त्या गावची भेट झालीच पाहिजे. गावाची सारी माहिती त्याच्याजवळ हवी. त्याचा काही तरी संकल्प हवा. आपलं वर्तुळ त्यानं वाढवीत जावं. तीसच्या लढयात एका वर्धा तालुक्यातून शे-सव्वाशे स्त्रिया तुरुंगात गेल्या ! एकदा एक प्रचारक एका गावी गेला. तेथे कॉलरा होता. तो जावा म्हणून बोकडाची मिरवणूक काढून गावकरी त्याला पुरणार होते. प्रचारकानं परोपरीनं समजावलं की बोकडाचा आणि कॉलऱ्याचा काही संबंध नाही. जंतूंमुळे कॉलरा होतो. पाणी उकळून प्यावं. गाव स्वच्छ ठेवावं. परंतु कोणी ऐकेना. शेवटी तो प्रचारक बोकडासाठी खणलेल्या त्या खड्डयात जाऊन बसला. रामधून म्हणत होता. गावकरी आल्यावर तो म्हणाला, ‘ मलाच पुरा. बोकडापेक्षा माणसाचे प्राण मोलाचे. देव तुष्ट होईल, आणि गावातून कॉलरा कायमचा जाईल ! ’ लोक विरघळले. ती रूढी बंद पडली. असे कार्यकर्ते हवेत ! प्रत्येक गावात एक बिभीषण हवा. रामाचं काम सोपं होईल. प्रत्येक कार्यकर्त्याला सांगता आलं पाहिजे की, मी म्हणजे दहा माणसं, पंचवीस माणसं, शंभर माणसं समजा. जिल्ह्यात शंभर कार्यकर्ते असले आणि प्रत्येकाच्या मागं शंभर माणसं असली तर दहा हजारांची सत्याग्रही सेना तिथं उभी राहील ! ”

## कलोपासना !

एकदा एक रसिक विनोबांकडे आला. एक सुंदर चित्र त्यांना दाखवू लागला. विनोबांनी ते चित्र पाहिले. पण तेवढ्याने त्यांचे समाधान होईना. तो म्हणाला, "तुम्हांला कलेची गोडी नाही! हा पहा इथला हिरवा रंग, इथला हा गुलाबी–आणि हा...असे पहाल तर तुम्हांला चित्राचं रसग्रहण करता येईल."

विनोबाजी म्हणाले, "चला माझ्याबरोबर, माझी कलोपासनाही तुम्हांला दाखवतो."

आणि निघाले दोघे. हरिजन वस्तीकडे ते गेले. तो कलापूजक कुरकुरू लागला, "इकडे कुठं घाणीत नेता ?" तो म्हणाला.

विनोबा म्हणाले, "माझं कलामंदिर इकडेच आहे."

हरिजन वसती आली. तेथे हरिजनांची निःसत्त्व, अशक्त मुले होती. विनोबा म्हणाले, "ते चित्र तू पन्नास रुपयांना विकत घेतलंस, ते जर ह्या मुलांना दूध देण्यासाठी तू दिले असतेस तर या मुलांच्या फिक्कट चेहऱ्यावर थोडा गुलाबी रंग आला असता. ही देवाची चित्रं फुकट जात आहेत, आणि ती निर्जीव चित्रं तुम्ही उराशी धरीत आहात. त्यांच्या तोंडावर थोडा गुलाबी रंग यावा यासाठी धडपडणं ही आहे माझी कलोपासना !"

## बोर्डिंग बंद करा असे लिहू ?

एकदा एका बोर्डिंगात विनोबाजींना नेण्यात आले. ते ओस्वाल बोर्डिंग असावे. विनोबा म्हणाले, "जातीय बोर्डिंगं कधी बंद करणार ? सर्वांना जवळ घेणारी बोर्डिंगं का नाही काढीत ? बरं, मारवाडी बोर्डिंग तरी काढायचं–तर तेही नाही. ओस्वाल असं आणखी त्यात. काय देऊ अभिप्राय ? हे बोर्डिंग बंद करा, असं लिहू ?"

विनोबाजींना जातीयतेचा वारादेखील सहन होत नाही.

## नवे क्षेत्र

एकोणीसशे सदतीसमध्ये देशभर प्रथमच नव्या प्रांतिक स्वायत्ततेच्या कायद्यान्वये निवडणुका झाल्या. आठ प्रांतांत काँग्रेसची मंत्रिमंडळे अधिकारावर आली. हाती आलेली सत्ता गरिबांच्या कल्याणासाठी कशी वापरता येईल,

याचा विचार सुरू झाला. गांधीजी मार्गदर्शन करायला होते. विनोबाजींनी केलेले विविध प्रयोग गांधीजींच्यापाशी होते. त्या अनुरोधाने विचार चालला होता. खादी-ग्रामोद्योगांची जोड देऊन ग्रामीण भागातील आर्थिक हलाखी दूर करण्याचा प्रयत्न करायचा होता. हरिजनांना बरोबरीचे स्थान समाजात द्यायचे होते. सात लाख खेड्यांतील मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न होता. किसान कामगारांची व्यसनांतून मुक्तता करून त्यांच्या घरकुलांतून आनंद फुलवायचा होता.

शिक्षण हा विनोबांचा खास विषय. त्यामुळे नव्या पद्धतीची शिक्षण-योजना करण्यात त्यांचा वाटा मोठं. ' समवाय ' पद्धतीचे शिक्षण द्यावे ही विनोबांची शिफारस. शिक्षण वरून लिंपल्यासारखे नसावे, तर जीवनाशी त्याचा अंगांगी संबंध असावा. हवा-पाण्याखालोखाल माणसाची गरज वस्त्राची. अन्न त्यानंतर येते. अब्रुदार माणूस उपाशी राहू शकेल, पण नागडा राहू शकणार नाही. तेव्हा अन्नाप्रमाणेच वस्त्र हाही एक मूलोद्योग समजावा. खेडोपाडी वस्त्र व्हावे. दारिद्र्यात पिचणाऱ्या समाजातील मुलांनादेखील चार पैसे मिळवावे लागतात. शिक्षणाबरोबरच हे साधले तर उत्तम. उद्योगाच्या अनुषंगाने सर्व विषय शिकवायचे. विनोबांनी आपली सर्व शक्ती जणू या नव-शिक्षणामागे उभी केली.

शिक्षणाबाबत विनोबांना फार तीव्रपणे वाटते. एका प्रवचनात ते म्हणाले, " स्वातंत्र्य मिळाल्यानंतर एक क्षणभरही आपण परदेशी झेंडा राहू दिला नाही. मग ती जुनीच शिक्षणपद्धती आपण कशाला चालू दिली ? ही शिक्षण-पद्धती इतकी रद्दी आहे की, मुकाट्यानं विद्यार्थी ती तशीच चालू देतात हेच मोठं आश्चर्य आहे ! "

वर्धा शिक्षण योजना म्हणजे जणू स्वातंत्र्यातील नवशिक्षणपद्धतीची तयारीच होती. गांधीजी याच दृष्टीने म्हणत असत की, विधायक कार्याची परिपूर्ती म्हणजेच स्वराज्याची प्राप्ती. विनोबा स्वराज्याची तयारीच जणू करीत होते.

### मल्ल झालो आहे पाहा !

विनोबाजींची प्रकृती अशक्त. त्यातून त्यांनी शरीराला असे राबवले.

त्यांचे वजन बरेच घटले. जमनालाल बजाज यांनी ते पाहिले. ते गांधीजींकडे गेले. म्हणाले, " बापू, तुम्हीच आता विनोबांकडे लक्ष द्या. "

गांधीजींनी विनोबांकडे निरोप पाठवला, " तुला आता मला ताब्यात घ्यावं लागेल. त्याशिवाय तुझी तब्येत सुधारणार नाही. "

विनोबाजींनी कळवले, " तुम्हांला अनंत कामं. आणखी माझ्या प्रकृतीचं काम तुमच्याकडे नको. मला तीन महिन्यांची मुदत द्या. "

आणि मग विनोबा स्वतःच प्रकृतीकडे लक्ष देऊ लागले. रोज पायी रपेट, शेतात खणणे, टोमॅटो खाणे, इतरही पौष्टिक आहार. तीन महिन्यांत त्यांनी आपले वजन वीस पौंडांनी वाढवले. सवाशे पौंड वजन झाले. म्हणू लागले, " कसा मल्ल झालो आहे ! "

## तुम्ही काय करीत आहात ?

पवनारला विनोबा राहात होते. त्यांनी आदल्या दिवशी शेजारच्या गावी काही उपाशी माणसे पाहिली होती, आणि त्यामुळे ते अस्वस्थ झाले होते. त्या दिवशी सायंकाळच्या प्रार्थनेनंतर ते बोलले, " इकडे तुमच्या शेजारच्या गावी लोक उपाशी मरत आहेत, आणि तुम्ही काय करीत आहात ? काय सांगायचं तुम्हाला ? "

विनोबाजींनी त्या गावी परिश्रमालय काढले. गावातील कोणीही बेरोजगाराने यावे, कातावे; त्याला भाकरीपुरते देण्याची सोय झाली.

विनोबा परिश्रमालयात रोज जात. येणारांची प्रेमाने चौकशी करीत. त्यांना कातण्यात प्रावीण्य मिळावे यासाठी खटपट करीत. शेवटी हाताचे कौशल्य एका दिवसात वाढत नसते. यासाठी सतत प्रयत्न करावा लागतो.

## पहिला सत्याग्रही

१९४० साली पहिला सत्याग्रही म्हणून गांधीजींनी विनोबांची निवड केली तेव्हा सर्वांना फार मोठे आश्चर्य वाटले. ' हे कोण विनोबा ? ' असे जो तो विचारू लागला. गांधींनी ' हरिजन 'मध्ये त्यांची ओळख करून देणारा एक लेख लिहिला. ते म्हणाले, " १९१६ साली विनोबांनी कॉलेज सोडलं आणि आश्रमात प्रवेश केला. आश्रमाच्या अगदी आरंभीच्या सभासदांपैकी ते एक. संस्कृतबद्दल त्यांना फार प्रेम. आश्रमातून वर्षभर सुटी घेऊन ते संस्कृत अभ्यासा-

साठी गेले आणि बरोबर वर्षाने ठरल्या दिवशी, ठरल्या घडीला आश्रमात येऊन ते चुपचाप कामात गढून गेले. त्यांना त्या दिवशी परत यायचं आहे ही गोष्ट मी पार विसरून गेलो होतो. स्वयंपाकापासून संडास-सफाईपर्यंत आश्रमाच्या सर्व कामांत त्यांनी भाग घेतलेला आहे. स्वभावतःच ते अध्ययनशील आहेत. शिक्षक आहेत. स्पृश्यास्पृश्य भेद त्यांना माहीत नाही. जातीय ऐक्यावर माझ्याइतकीच त्यांची नितान्त श्रद्धा आहे. कुराणाचे बारकावे समजण्यासाठी मूळ अरबीतून त्यांनी कुराणाचा वर्षभर अभ्यास केला. त्यासाठी ते अरबी शिकले. ”

## मोकळे मन

१९४० च्या व्यक्तिगत सत्याग्रहाच्या वेळची गोष्ट. पहिले सत्याग्रही म्हणून विनोबा तुरुंगात होते. त्यांच्याबरोबर तेथे काही कम्युनिस्टही होते.

एक कम्युनिस्ट मित्र त्यांना म्हणाले, “ तुम्ही अद्याप कम्युनिस्ट साहित्य वाचलेलं दिसत नाही ! तुम्ही ते वाचायला हवं. ”

विनोबांनी मार्क्सच्या विचारांचा गाभा समजता येईल असा ‘ कॅपिटल ’ हा त्याचा ग्रंथ पूर्वीच, बाहेर असताना वाचला होता. पण ते म्हणाले, “ ठीक आहे. मी कातायला बसतो तेव्हा तुम्हीच मला वाचून दाखवा, मी ऐकेन. ”

कॅपिटल ग्रंथ आधी वाचलेला असल्याने त्यांनी जे वाचून दाखवले ते समजण्याला विनोबांना अडचण पडली नाही. वाचनासाठी पुस्तके त्या कम्युनिस्ट मित्रानेच निवडली होती. रोज तास– दीड तास कम्युनिस्ट साहित्याचे ते श्रवण करीत. अनेक महिने हा कार्यक्रम चालला होता.

विनोबांचे मन असे मोकळे आहे. नव्या विचारांबद्दल त्यांच्या मनात आस्था असते.

## भाकित आणि होरा

इतिहासाचे सखोल आणि संपूर्ण परिशीलन केल्यानंतर मार्क्सने आपले क्रान्तिशास्त्र तयार केले. प्रथम क्रान्ती कोठे कोठे होणार त्याचे भाकित देखील मार्क्सने वर्तवून ठेवले ! यमराजाचे पाऊल जसे टाळता येत नाही त्याप्रमाणे क्रान्तीची अपरिहार्यताही टाळता येत नाही. अशा स्थितीत त्या क्रान्तीत सहभागी होणे, तिला मदत करणे एवढेच आपल्या हाती आहे, अशी एक विचारसरणी कम्युनिस्ट प्रसृत करीत असतात. तिचा परामर्श घेताना विनोबांनी

म्हटले आहे, “ म्हणतात की, वाल्मीकीनं रामाचं चरित्र आधीच लिहून ठेवलं होतं, आणि नंतर अक्षरशः त्याप्रमाणं राम वागले. त्यामुळं त्यांना कोठलीच अडचण आली नाही. पुस्तक वाचीत गेले आणि त्याप्रमाणं वागत गेले! परिणामही लिहून ठेवलेला. त्यामुळं त्याची चिंता करण्याचंही काहीच कारण नव्हतं ... साम्यवाद्यांची स्थिती काहीशी अशीच आहे! ”

## मरणारालाही दिलासा

एकदा विनोबांना शिवनीच्या तुरुंगाधिकाऱ्याने एका फाशीच्या कैद्याचा संदेश सांगितला. त्या फाशी जाणाऱ्या कैद्याने विनोबांना कळवले होते, “ तुम्हाला कृतज्ञतापूर्वक वंदन. तुम्हांला परमेश्वर दीर्घायुरारोग्य देवो. ”

फाशीची सजा झालेले कैदी ‘ गीताई ’ची मागणी करीत. काहींनी तर फाशीच्या तख्तावर चढतानाही गीताई मागून घेतली. त्यांना तिचा खूप उपयोग झाला.

त्या फाशीच्या कैद्याचा संदेश विनोबांपर्यंत पोचला, तेव्हा विनोबांच्या आनंदाला सीमा राहिली नाही.

## उलटा परिणाम

९ ऑगस्ट १९४२ ला सरकारने सर्वत्र धरपकड केल्याची बातमी आली, तेव्हा विनोबा पौनारहून वर्ध्याला आले. शहरातल्या लोकांनी विचारले, “ आता आम्ही पुढं काय करावं? ”

विनोबा म्हणाले, “ इंग्रजांचं राज्य गेलं, इंग्रजांचं राज्य गेलं, इंग्रजांचं राज्य गेलं– हे सर्वत्र सांगा. ”

सर्व लोकांनी हे सांगायला सुरुवात केली.

विनोबांचा हा संदेश जिल्हाधिकाऱ्यांनी ऐकला आणि गावोगाव युनियन जॅक घेऊन ते धावले! पण त्याचा परिणाम उलटाच झाला.

## गांधीजींचा विश्वास

एकोणीसशे बेचाळीसचा ‘ चले जाव ’ लढा सुरू होण्यापूर्वीची गोष्ट. गांधीजी वेगवेगळ्या मंडळींशी त्यासंबंधी चर्चा करीत होते. उपवासाचे शस्त्र चळवळीत वापरावे, असे गांधीजींना वाटत असावे. गांधीजींच्या उपवासाच्या

कल्पनेने गांधीजींच्या जवळचे लोक व्याकूळ होत. विनोबा गांधीजींच्या उपवासाच्या कल्पनेला मोडता घालतील अशी महादेवभाईंची अटकळ, पण विनोबांनी गांधीजींना सांगितले, " प्राणान्तिक उपवास हे अहिंसक लढयातले एक साधन होऊ शकतं. राम ज्ञानपूर्वक ते वापरील, हनुमान श्रद्धापूर्वक वापरील, तुमच्या आणि आमच्या उपवासात तसं अंतर राहू शकेल; परंतु तुम्ही जे कराल ते आम्हीही करू शकू. "

नऊ ऑगस्टला धरपकड झाली. विनोबांनाही पकडले. जेलमध्ये गेल्या-बरोबर विनोबा जेलरकडे गेले आणि म्हणाले, " आजवर तुमचे जेल आम्हीच सांभाळले आहेत. यापुढं तसं होणार नाही. आज माझं जेवण झालं आहे त्यामुळं जेवायचं नाही; उद्यापासून माझा उपवास राहील, आणि त्याची जबाब-दारी तुमच्यावर राहणार नाही ! "

गांधीजींनाही तिकडे वाटत होते की विनोबा तुरुंगात जाताच उपास सुरू करतील. स्वतः गांधीजींचा उपवास लगेच सुरू करण्याचा विचार ठरला नव्हता; तेव्हा तुरुंगात जाता जाता त्यांनी आठवणीने प्यारेलालजींना सांगितले की, विनोबांना हे कळवण्याची ताबडतोब व्यवस्था कर. प्यारेलालजींनी किशोरीलाल मश्रुवालांना तसे कळवले. त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निरोप दिला. जिल्हाधिकारी म्हणाले की, गव्हर्नरच्या परवानगीवाचून काही कळवता येणार नाही ! पण शेवटी कलुंजकरांनी गांधीजींचा निरोप कळवला, आणि विनोबांचा तो उपवास थांबला !

## वेलोरच्या तुरुंगात

' चले जाव ' चळवळीत अटक झाल्यानंतर विनोबांना वेलोरच्या तुरुंगात डांबण्यात आले. तेथे त्यांनी प्रेमसंग्रहासाठी दक्षिणेतल्या तमिळ, तेलगू, मल्याळम् आणि कन्नड या चारी भाषा आत्मसात केल्या. तेथेही विनोबाजींचे प्रयोग चालत.

तुरुंगातून फक्त नातेवाइकांनाच पत्रे पाठवण्याची मुभा असे. गांधीजी विनोबांचे नातेवाईक नाहीत म्हणून गांधींना पत्र पाठवण्याला विनोबांना अनुमती मिळाली नाही. विनोबा म्हणाले, " गांधींच्या इतके जवळचे मला दुसरे कोणीच नाही. त्यांना पत्र पाठवण्याची मुभा नसेल तर दुसऱ्या कोणालाही

मी पत्र पाठवणार नाही. " आणि तीन वर्षांत त्यांनी कोणाला पत्र पाठवले नाही !

वेलोरच्या तुरुंगात विनोबांनी कपाशीची झाडे लावून ठेवली होती.

वेलोरहून पुढे त्यांना शिवणीच्या तुरुंगात पाठवण्यात आले.

## स्थितप्रज्ञदर्शन

महात्मा गांधींनी आश्रमीय प्रार्थनेत गीतेच्या दुसऱ्या अध्यायातले शेवटचे अठरा श्लोक कधीचेच दाखल केलेले. गीतेने जे आदर्श समाजापुढे उभे केले त्यात स्थितप्रज्ञ हा एक आदर्श. गांधीजींना तो परमप्रिय. सेवकापुढे तो सतत राहावा, त्याच्या गुणांचे चिंतन त्यांनी नित्य करावे, त्या दिशेने पावले टाकावीत, त्यासाठी धडपडावे, असे गांधीजींना वाटे. आश्रमीय अनुशासनाचाच तो भाग. तो सत्याग्रही चळवळीत आला. तुरुंगात प्रार्थनेत हे अठरा श्लोक म्हटले जात. त्यावर चर्चा होत. तुरुंगात असताना सत्याग्रहींनी त्यांना आग्रह केला की, आम्हांला हा स्थितप्रज्ञाचा आदर्श समजावून द्या. विनोबांनी तीस वर्षे निदिध्यास केलेला. त्यांनी त्या अठरा श्लोकांवर अठरा प्रवचने दिली. स्थितप्रज्ञ कल्पनेचे सुंदर विवेचन केले. ते विवेचन कित्येकांनी लिहून घेतले. पुढे दोन वर्षांनी ते पुस्तकरूपाने प्रसिद्धही झाले. गीतेचा कोणीच अभ्यासक ते पुस्तक वाचल्याशिवाय राहू शकत नाही. स्थितप्रज्ञाचे गहनगूढ चित्र त्यांनी इतक्या मनोरम, तर्कशुद्ध व प्रासादिक भाषेने उभे केले आहे की, त्या दिशेने चार पावले तरी टाकून पाहावीत असे सहजच कोणालाही वाटावे; व ती चार पावले टाकल्याने मिळणारा आनंद उपभोगल्यावर आणखी पुढे जावेसे वाटावे.

**आयुक्तास नसे बुद्धी त्यामुळे भावना नसे**
**म्हणून न मिळे शान्ति शान्तिविण कसे सुख**

हा जीवनमंत्र त्यांनी या प्रवचनांतून मनावर ठसवला आहे. जो जीवनातल्या कोणत्याच आव्हानाशी जोडला गेलेला नाही त्याची बुद्धी कधी बहरूनच येत नाही, आणि बुद्धी बहरल्याशिवाय भावना निर्माण होत नाही. शांतीचे उगमस्थान भावना आहे, आणि भावना म्हणजे परिनिष्ठित बुद्धी, परिपक्व बुद्धी. तीच शांततादायिनी असते आणि अशी शांतता नसेल तर माणूस

ज्या सुखासाठी धडपडतो ते सुखही त्याला मिळू शकत नाही. अति सुंदर अशी ही त्यांची रचना आहे.

## मुक्तीची दोन साधने

१९४२ च्या चलेजाव चळवळीत विनोबांना स्थानबद्ध करण्यात आले होते. भारताच्या स्वातंत्र्यासाठी चाललेल्या चळवळींबद्दल ते सखोल चिंतन तेथे करीत होते. तेथे त्यांना जाणवले की, विज्ञान आणि अध्यात्म एकत्र आल्याशिवाय भारत स्वतंत्र होणार नाही. प्रथम मनाला मुक्त केले पाहिजे. अध्यात्मच मनाला मुक्त करू शकते, आणि विज्ञान त्याला भौतिक बंधनांतून सोडवू शकते.

## आकाश-पाताळ भेद असणारी समानता !

कोणी एकजण विनोबांना म्हणाला, " कम्युनिझममधून हिंसा वर्ज्य केली म्हणजे तो गांधीवाद झाला. "

विनोबा म्हणाले, " अशी समीकरणे मांडणे योग्य नाही. हिंसा-अहिंसेचा फरक हा असा मामुली फरक नव्हे. "

आपले म्हणणे त्यांनी एक दृष्टान्त देऊन स्पष्ट केले, " दोन माणसे नाक, कान, डोळे या दृष्टीने अगदी एकसारखी होती. एकाच्या जागी आणून दुसऱ्याला बसवले तर ओळखू येणेदेखील कठीण. त्यांच्यात एकच मामुली फरक होता, आणि तो म्हणजे एकाच्या नाकातून श्वासोच्छवास होत होता, आणि दुसऱ्याचा बंद पडला होता ! त्याचा परिणाम असा झाला की, एकासाठी भोजनाची तयारी सुरू होती, आणि दुसऱ्यासाठी चिता रचली जात होती ! हिंसा-अहिंसेचा भेद वगळता शिल्लक राहणारी समानता, ही अशा प्रकारची आहे ! "

यावर चर्चा करणारा काय सांगणार ?

## स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर

जगातली परिस्थिती बदलली. जपान आणि जर्मनीचा पराभव दृष्टिपथात आला. ह्या बदलत्या वातावरणामुळे सत्याग्रही सुटू लागले. देशाला स्वातंत्र्य मिळणार अशी लक्षणे दिसू लागली. विनोबाजी नागपूरच्या तुरुंगातून सुटले.

नागपूरहून वर्ध्याला रेल्वेने जाताना त्यांना जे दृश्य दिसले त्यामुळे ते अत्यंत व्यथित झाले. रेल्वेच्या दोन्ही कडांनी लोक खुशाल परसाकडे बसलेले! स्वातंत्र्याला आपण पात्र असल्याची का ही लक्षणे? आपल्या काही राष्ट्रीय दुर्गुणांमुळे आपण परतंत्र झालो.

स्वातंत्र्यासाठी होणाऱ्या चळवळीला गांधीजींनी विधायक कार्याची जोड दिली होती, एवढेच नव्हे तर विधायक कार्याची परिपूर्ती म्हणजेच स्वराज्य असे ते म्हणत. पण त्या सकाळी जे दृश्य दिसले ते मेळ खाणारे नव्हते. विनोबांना त्यातूनच एक नवा कार्यक्रम सुचला. त्यांनी पौनार-जवळच्या सुरगावी भंगी-काम करायचे ठरवले. नव्या पिढीला तयार केले म्हणजे त्यानंतर तरी असे काही दृश्य पुन्हा देशात दिसू नये, अशी कल्पना! त्यांना कोणी विचारले की, किती दिवस हे काम करणार? तर विनोबा म्हणत, वीस वर्षे ते करण्याची मी तयारी ठेवली आहे. स्वराज्य म्हणजे प्रत्येक कृतीवर विचारांचा अंकुश स्वच्छेने ठेवणे, आणि प्रत्येक विचारातली सत्यता कृतीने तपासून पाहाणे. स्वातंत्र्य म्हणजे जबाबदारी. स्वातंत्र्य म्हणजे नव-जीवनाचा संकल्प. स्वातंत्र्यात उधळपट्टी, अस्वच्छता, सामाजिक जाणीवेचा अभाव— या गोष्टी चालतच नाहीत.

विनोबा तुरुंगातून सुटून पवनारला आले ते सरळ भंगी-कामाला लागले. सूर्याच्या नियमितपणे त्यांनी चौदा महिने हे कार्य केले!

## संस्थांतून मुक्त

'चले जाव' चळवळ ओसरली. मंडळी तुरुंगाबाहेर आली. मुळात विनोबा एकान्तप्रिय माणूस. तुरुंगात, समाजात राहिले तिथे काँग्रेसजन, समाजवादी, फॉरवर्ड ब्लॉकवाले, आणि गांधी विचाराचे—असे सर्व प्रकारचे लोक. त्यांच्याशी निकट संबंध आला. जी सज्जनता गांधीवाल्यांत ती त्यांना इतरांतही आढळली, आणि जी दुर्जनता इतरांत ती गांधीवाल्यांतही दिसली. तेव्हा त्यांनी कोणत्याही एका विशिष्ट पक्षात वा संस्थेत राहायचे नाही असे ठरवले. बाहेर येताच त्यांनी गांधीजींजवळ आपले विचार बोलून दाखवले. गांधीजींनी विनोबांच्या ह्या विचारांचे फार मार्मिक वर्णन केले. ते म्हणाले, "तू सेवा करणार आहेस, अधिकार राखणार नाहीस असा याचा अर्थ! तुझा विचार योग्यच आहे."

आणि ज्या ज्या संस्थांत विनोबा होते तेथून तेथून त्यांनी राजीनामे दिले. त्यांनी वाढवलेल्या, त्यांना अत्यंत प्रिय असलेल्या संस्थाही त्यांत होत्या.

आपले म्हणणे लोकांना पटले तर ते त्यांनी ऐकावे. त्यासाठी आपल्या पदाचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष दडपण पडता कामा नये. त्याचप्रमाणे संस्थेच्या सभासदत्वामुळे येणारी बंधनेही नकोत. पटलेला विचार अमलातच आणावा, दडपणाशिवाय अमलात आणावा, ही त्यांची भूमिका.

## वडिलांचा मृत्यू

विनोबांचे वडील नरहरपंत एकटेच बडोद्याला राहात. रंगकाम आणि संगीत हे त्यांचे आवडीचे विषय. त्यात ते रमत. पण वयपरत्वे त्यांची प्रकृती ठीक राहीना. विनोबांचे धाकटे भाऊ शिवाजीराव धुळ्याला असत. ते वडिलांना घेऊन आले. विनोबांना कळले तेव्हा विनोबा धुळ्याला गेले. शरद् पौर्णिमेला नरहरपंतांचे धुळ्याला देहावसान झाले. विनोबांनी शवाला अग्नी दिला. गीतापाठ केला. गीतेतील सर्व विषय चिंतनासाठी एकत्र समोर उभा राहावा म्हणून तयार केलेली अधिकरणमाला त्यांनी त्या वेळी प्रथम म्हटली. साठ आकड्यांत अवघी गीता एकदम चित्तासमोर उभी राहाते. विनोबा त्यानंतर तेथेच राहिले. त्यांनी स्वतःच्या प्रकृतीकडे थोडे लक्ष दिले. रोज जुनी-नवी किती तरी मंडळी त्यांना भेटायला येत. नाना विषयांवर चर्चा चालत. प्रवचनेही होत. धुळ्याच्या तुरुंगात झालेल्या गीताप्रवचनांची अनेकांना आठवण होई.

## एक आठवण

विनोबांचे वडील त्यांना जेवावे कसे ते देखील शिकवीत. म्हणत, " हे पाहा, तोंडात घास घातला की तो गोड लागतो. पोटात गेल्यावर लागतो का ? मग पोटात ढकलायची एवढी घाई कशासाठी ? जिथं पदार्थ गोड लागतो तिथं जरा जास्त वेळ ठेवावा. "

विनोबांचे वडील त्यांना असे गमतीगमतीने शिकवीत. या अशा अनेक गोष्टींचे संस्कार खूप खोलवर विनोबांवर झाले आहेत.

## महात्माजींचा मृत्यू

महात्मा गांधी देशातील जातीय आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न करीत होते. नंतर पाकिस्तानात जाण्याचा त्यांचा विचार होता माणसाने माणसाशी माणसासारखे वागावे एवढी साधी अपेक्षा, पण ती पुरी होत नव्हती! अंतरीच्या साक्षीने निर्भयपणे ते कार्य करत होते. ' आले देवाजीच्या मना, तेथे कोणाचे चालेना ' अशी अविचल त्यांची श्रद्धा. आणि तीस जानेवारी एकोणीसशे अठ्ठेचाळीसचा तो भीषण दिवस उजाडला! प्रार्थना-भूमीकडे जाताना गांधीजींवर पिस्तुलाने आघात करण्यात आला! ' हे राम ' या उद्‌गारांसह त्यांची प्राणज्योत मालवली. सॉक्रेटिस—येशू यांच्यासारखे निर्भयपणे ते मृत्यूला सामोरे गेले. सर्वत्र अंधार पसरल्यासारखे वाटले. वर्ध्याशी गांधीजींच्या किती आठवणी निगडित, विनोबांनी त्यांचे पुत्रपद मिळवलेले, त्यांनी पितृवारसा चालवण्याचा निर्धार केला. गांधीजींचे जीवनरहस्य उकलून दाखवणारी प्रवचने त्यांनी दिली.

स्वातंत्र्योत्तर बदललेल्या परिस्थितीचा गांधीजींना अंदाज आला होता. २१ मे १९४७ रोजी पाटण्यात त्यांचे प्रार्थना प्रवचन झाले. ते म्हणाले, " आपल्याला इंग्रजांप्रमाणे शस्त्र-बळाने सत्ता हाती राखता येईल अशा भ्रमात कोणी राहू नये. काँग्रेसने जनतेचा विश्वास संपादन केला, अनेक प्रकारचा त्याग करून आणि तप करून. पण आताच्या ह्या आणीबाणीच्या क्षणी जर त्यांनी आपण कोणी राज्यकर्ते आहोत अशा तोऱ्यात जनतेला दूर लोटले, जन-सेवेची भूमिका सोडून आपण जनतेचे स्वामी आहोत असा मद त्यांना चढला तर माझ्या सर्व अनुभवाच्या आधारावर असा इषारा मला द्यावासा वाटतो की, त्या वेळी कदाचित मी जिवंत असेन—नसेन; पण एक क्रान्तीचा फेरा देशात येऊन जाईल आणि मग लोक एकेका पांढरी टोपीवाल्याला वेचून वेचून काढतील; आणि या सर्व प्रकारात एका तिसऱ्याच शक्तीचे फावेल!"

गांधीजींनी हे जे भाकित वर्तवले होते ते टाळण्याचा त्यांचा प्रयत्न होता. पुन्हा त्याग—तपाला लोकांना प्रवृत्त करायचे होते. स्वातंत्र्यपूर्व काँग्रेसच्या पुण्याईवर सत्तेचा मलिदा कोणाला चाखता येऊ नये म्हणून काँग्रेसचे विसर्जन करण्याची सूचना त्यांनी केली होती. विधायक कार्यकर्त्यांना एकत्र बोलावून

सत्ताधाऱ्यांना अंकुशात ठेवील अशी लढाऊ, क्रान्तिकारी, विधायक, पक्षमुक्त संघटना उभारायचा त्यांचा विचार होता. पण त्यांच्या देहावसानामुळे ते संमेलन पुढे ढकलावे लागले !

## गांधीजींचे जंगली जनावर

गांधी सेवा संघाने मग या कामी पुढाकार घेतला. तेरा, चौदा, पंधरा मार्च एकोणीसशे अठ्ठेचाळीसला त्यांनी सेवाग्रामला देशभरच्या कार्यकर्त्यांना बोलावले. सरकारातली मंडळीही आली होती. डॉ. राजेन्द्रप्रसाद होते. जवाहरलाल होते.

या संमेलनात विनोबाजींनाही बोलायला सांगितले. विनोबांची तीन भाषणे तेथे झाली. ' मी गांधीजींचं एक पाळीव जंगली जनावर आहे ' असा स्वतःबद्दल त्यांनी प्रारंभीचा उल्लेख केला आणि ' सर्वांत कमी इतरांशी परिचित असणारा ' अशी आपली ओळख करून दिली. पहिल्या भाषणात त्यांनी दोन गोष्टींवर भर दिला. लोकशाहीत विचारभिन्नतेला वाव असणार, व असला पाहिजे. परंतु साधनशुचितेचे बंधन न पाळू तर विचारभिन्नता लोकशाहीला मारक ठरेल, हा एक मुद्दा,' आणि दुसरा मुद्दा. ट्रस्टीशिपचा–विश्वस्त वृत्तीचा अंमल न झाला तर हिंसा अटळ होईल. ट्रस्टीशिपच्या नावाखाली आहे तीच विषम समाजरचना आपण चालवू तर सद्‌विचार रक्तपात थांबवू शकणार नाहीत !

गांधीजींच्या मृत्यूनंतर त्यांच्या नावाने काही करावे असे मंडळींच्या मनात होते. विनोबांना व्यक्तीच्या नावाने विचार पुढे मांडणे फारसे रुचले नाही. स्वतंत्रपणे लोकांना विचार समजवावे, लोकांना ते पटले, ते त्यांनी आत्मसात केले, आणि अंमलात आणले म्हणजे झाले, असे विनोबांचे म्हणणे. " मंत्राक्षरे कागदावर लिहिलेली असतात. ती समजून घेऊन जो जीवनात बदल करतो त्याच्या ती उपयोगीदेखील पडतात. नाही तर एक किडा त्या मंत्रांना कागदासह खाऊन टाकतो ! तरीदेखील त्याला त्यापासून काही लाभ होत नाही ! " असे विनोबांनी या वेळी बजावले.

तेथे सर्वोदय समाज आणि सर्व-सेवा-संघ अशा दोन अभिनव संस्था स्थापण्यात आल्या विनोबाजींनी संमेलनाला निश्चित अशी दिशा लावून

दिली. गांधीजींच्या विचारांतील क्रान्तिकारी आशय साकार करण्याला उपयुक्त ठरतील अशा या संस्था. ' या रे या रे अवघे जण ' असे म्हणणाऱ्या.

विनोबांनी संमेलनात राष्ट्रपती– पंतप्रधानांना सांगितले, " तुमच्याकडून कोणत्याही प्रकारच्या मदतीची मी अपेक्षा राखीत नाही. पण तुमच्या कामात माझी काही मदत होण्यासारखी असेल तर ती द्यायला मी तत्पर असेन. योग्यता माझी अल्प आहे, पण मी प्रयत्न अवश्य करीन. "

## भ्रातृ-मंडळ

सर्वोदय समाज हे एक भ्रातृमंडळ असावे अशी विनोबाजींची कल्पना. भ्रातृमंडळाला शिस्त, अधिकार असे काही लिखित शास्त्र नसते. प्रेमाने एकत्र यायचे, विचारविनिमय करायचा, पटेल ते घ्यायचे, आपापल्या क्षेत्रात जाऊन कार्य करीत राहायचे. प्रयोग आणि चिंतन करणाऱ्या मंडळींना वर्षाकाठी एकत्र जमण्याची सोय म्हणजे सर्वोदय संमेलन !

एकोणीसशे एकूणपन्नास साली मध्य प्रदेशात राऊ या ठिकाणी पहिले सर्वोदय संमेलन भरले. विनोबा त्या संमेलनाला हजर राहिले होते.

## शरणार्थींची सेवा

शरणार्थींचा प्रश्न अतिशय बिकट बनला होता. जे घडले होते ते इतके भीषण होते की, शरणार्थींची मने थाऱ्यावर नव्हती. मायेची फुंकर घालून, भूतकाळ विसरून भविष्यकाळाकडे आशेने पाहायला त्यांना शिकवायचे होते. सहा महिन्यांसाठी विनोबा दिल्लीला गेले. ' संपर्क राखण्याचे नारदमुनींचे काम मी करीत आहे ' असे विनोबा म्हणत.

पाकिस्तानातून आलेल्या लोकांना जमिनी देण्याचे पंजाब सरकारने ठरवले होते. पण पाकिस्तानात ज्यांच्या जमिनी होत्या त्यांनाच जमिनी देण्याचे त्यांनी ठरवले ! विनोबांना या धोरणाचा अचंबा वाटला. पुन्हा मजुराने मजूरच का राहावे ? विनोबांनी सरकारला सांगितले की, शरणार्थी जमीनमालक असो की मजूर, त्या सर्वांनाच जमीन देण्याचे धोरण ठेवणे उचित होईल. पंजाब सरकारने प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले आणि पुढे ' अशक्य ' म्हणून पंजाब सरकार हात झटकून मोकळे झाले !

शरणार्थींमध्ये मजूर होते. त्यांत पुष्कळसे हरिजनही होते. त्यांना

सरकार वंचित ठेवणार, याचे विनोबांना दुःख झाले; आणि सरकार अशा बाबतीत दुबळे आहे हेही त्यांना कळून चुकले.

नोकरशाहीचा असा विचित्र अनुभव विनोबांना आला. पं. नेहरू एक गोष्ट सांगत, पण ज्यांच्याकरवी अंमलबजावणी व्हायची त्यांचे नोकरशाही डोके तिरपगडेच चालत असे. तीन तीन महिने दिलेले हुकूम या टेबलावरून त्या टेबलावर रेंगाळत राहात. अंदाधुंद कारभार! विनोबांनी पराकोटीचे प्रयत्न केले, पण सहा महिन्यांतच त्यांची खात्री पटली की, या प्रयोगातून हाती काही लागणार नाही. पंडितजींच्या कानी विनोबांनी सगळा प्रकार घातला आणि ते परत फिरले.

## नव्या मार्गाचा शोध

'गांधीजींच्या विधवा' अशी हेटाळणी गांधीजींच्या खऱ्या सेनेच्या वाट्याला येऊ लागली! विनोबा विचारमग्न झाले. नव्या परिस्थितीत शासन-निरपेक्ष असे काही तरी कार्य हाती न घेता आले तर सर्व विधायक कार्य तेजोहीन होईल असे त्यांना वाटू लागले.

## हैदराबाद राज्यात यात्रा

हैदराबाद राज्यातील जनतेच्या इच्छा प्रभावी होऊन निजामी जुलूम-शाहीचा अंत झाला. भारतीय संघराज्यात निजामी राज्य सामील झाले; परंतु निजामाच्या राज्यातील वर्षानुवर्षांच्या जुलुमाने पोळलेल्या मंडळींचा क्षोभ शमला नव्हता. सूडाची भावना धगधगत होती. अशी सूडाची आग धगधगत असताना नवरचना अशक्य असते. जुने विसरूनच नव्याचे प्रस्थान ठेवता येते. विनोबांनी त्या तप्त भूमीवर अमृतसिंचन करण्यासाठी जावे आणि माणसा-माणसातील अंतराय दूर करून स्नेह-सौहार्दाने वागण्याची शिकवण द्यावी, अशी पंडित नेहरूंनाही उत्कंठा होती.

प्रकृति-अस्वास्थ्यामुळे विनोबा लगेच काही तिकडे जाऊ शकले नाहीत; पण १९४९ च्या मार्च महिन्यात त्यांनी तिकडे जाण्याचे योजले.

मराठवाडा म्हणजे ज्ञानदेव-एकनाथ-रामदास यांच्या जन्माने, वास्तव्याने पुनीत झालेली भूमी. त्यातून नाथषष्ठीला नाथमंदिराचे दरवाजे हरिजनांसाठी

खुले होणार होते. श्राद्धाचे जेवण हरिजनांना खाऊ घालणाऱ्या नाथांच्या गावी इतके दिवस अस्पृश्यता टिकून राहावी, हीच दुःखाची गोष्ट होती !

औरंगाबादच्या पहिल्या मुक्कामातच त्यांनी सांगितले, " सर्वांनी माझ्याकडे यावे. मी कोणत्या पक्षाचा आहे असे समजू नये. माझ्याभोवती कोण आहेत ते पाहू नये. माझे दार सर्वांसाठी खुले आहे. " आणि त्याप्रमाणे विविध मत–पंथांची माणसे त्यांच्याकडे येत राहिली. चर्चा–विचारविनिमयाचे अखंड सत्र सुरू राहिले. ज्ञानाचा तो जणू अपूर्व असा सोहोळा होता !

पैठणचे नाथषष्ठीचे त्यांचे प्रवचन म्हणजे विचारवैभव आणि भाव-समृद्धी यांचा अपूर्व असा संगम होता. नाथांचा गुणगौरव करताना विनोबांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहू लागल्या आणि त्यांचा गळा रुद्ध झाला. " नाथ हे जन तोचि जनार्दन मानणारे. ते सेवाप्रधान होते. नाथांनी जनार्दनांची आरती करताना ' अवलोकिता जन, दिसे जनार्दन ' असे आळवले आहे. नाथांनी शेजारधर्माची महती गायिली. मानवरूपातील परमेश्वराची सेवा म्हणजे शक्ती हे त्यांनी सांगितले. नाथांची थोरवी यात आहे. भूतदया मानणारे जेव्हा शेजारधर्म विसरतात तेव्हा त्यांच्या नशिबी दास्य येते ! "

## आई-बापांची ओळख नाही

महाराष्ट्रातील काही मंडळींच्या मनात गांधींबद्दल अढी आहे. त्या संदर्भात विनोबा म्हणाले, " गांधीजींची शिकवण ही आपली शिकवण नाही असे महा-राष्ट्रातले काही लोक मानतात. ते म्हणतात, जशास तसे ही आमच्या पूर्वजांची शिकवण आहे. पण त्यांना आपल्या आई-बापांची ओळख नाही ! रेड्याच्या पाठीवर मारलेल्या फटक्यांचे वळ ज्यांच्या पाठीवर उमटले ते ज्ञानदेव, आणि थुंकणाऱ्या यवनाला क्षमा करून स्नान-सत्याग्रह करणारे नाथ– हे आमचे मायबाप आहेत. आई-बापांची ओळख आपल्याला असली पाहिजे. "

## आपेगावी

पैठणहून ज्ञानेश्वरांच्या आपेगावी विनोबा गेले. ज्ञानेश्वरांच्या गावात ज्ञानेश्वरी वाचली जात नसल्याचे ऐकून त्यांना विस्मय आणि खेद वाटला ! ज्ञानेश्वरांचा वाडा त्यांनी पाहिला. ज्ञानदेवांचे आजोबा ज्या विठ्ठलमूर्तीची पूजा करीत ती त्यांनी डोळे भरून पाहिली. ज्ञानदेवांबद्दल विनोबांना अपार आदर,

प्रेम. ज्ञानदेवांची अनंत स्मरणे त्यांना आली. ‘ साच आणि मवाळ, मितले आणि रसाळ, शब्द जैसे कल्लोळ, अमृताचे । ’ ही ज्ञानदेवांची भाषाविषयक निष्ठा. ज्ञानेश्वरांबद्दल प्रवचनात बोलताना त्यांनी सांगितले की, “ त्यांची क्षमा अनाक्रोशक होती. त्यामुळे समाजाने इतका छळ केलेला असूनही त्यांच्या वाणीत कुठेही कटुतेचा लेशही नाही ! ”

## श्रमिकांचा उथळ उमाळा

पैठणच्या तरुणांच्या मेळाव्यात विनोबा म्हणाले, “ श्रमिकांच्याबद्दल कळवळ्यानं बोलण्याचा रिवाज पडला आहे. श्रमिकांबद्दल कळवळ्यानं बोलणारांनाही श्रमाबद्दल काही खास प्रेम किंवा आस्था असते असं म्हणावं तर तसंही दिसत नाही. श्रमिक जीवनाची सुखदुःखं अनुभवल्याशिवायच हा सगळा उमाळा आणि कळवळा असतो !

“ समजा, उद्या रशियात किंवा अमेरिकेत असं संशोधन झालं की, दळण्याचा व्यायाम हा सर्वांत उत्तम व्यायाम आहे तर यांच्या जिम्नॅशियममध्ये जाती आणून ठेवतील आणि व्यायामासाठी ते ती फिरवतीलदेखील. पण त्यात धान्य मात्र घालणार नाहीत ! कारण त्या जातं फिरवण्यामुळं पीठ पडू लागलं तर आपण मजूर ठरू; ही भीती त्यांना वाटत राहील ! ”

विनोबांची विनोदबुद्धी कशी टवटवीत असते ते पाहण्यासारखे आहे.

विनोबांनी एखाद्या श्रमिकासारखे जीवन घालवले आहे. कातण्याची मजुरी केली आहे. शेतात राबले आहेत. तेवढयाच उत्पन्नात स्वतःचा गुजारा करण्याचा प्रयत्न केला आहे. प्रसंगी उपासही काढले आहेत. श्रमिकांचा त्यांचा कळवळा बौद्धिक नाही स्वानुभवातून उगम पावलेला आहे.

## भक्तिमार्गातील तीन दोष

लिन युटांग या प्रसिद्ध चिनी लेखकाने भारताचे वर्णन गॉड–इन्टॉक्सिकेटेड लँड–देववेडा देश असे केले आहे. देवभक्ती विपुल असली तरी तिच्यात पुष्कळ दोष शिरले आहेत. सकामता हा ईश्वरभक्तीत शिरलेला पहिला दोष. या सकामतेमुळे देवाशीच सौदेबाजी सुरू होते. नवससायास हा त्यातलाच प्रकार. दुसरा दोष मूढ विश्वास. त्यामुळे भक्तीत ढोंग शिरते. तिसरा

दोष तोंडाळपणा. जीवन तसेच राखून माणूस भक्तीच्या लंब्याचवडया गप्पा मारू लागतो.

हे तीन महादोष नाहीसे केल्याशिवाय देववेडा समजला गेलेला देश खऱ्या अर्थाने भक्तिमार्गी होऊ शकणार नाही, असे विनोबांनी तेथे सांगितले.

## समर्थांच्या गावी

हैदराबाद राज्यातील विनोबांचा शेवटचा मुक्काम समर्थांच्या जांब गावी होता. संत तुकडोजी महाराजही जांबला आले होते. दिवस रामनवमीचा. विनोबा तेथे म्हणाले, " धर्मांचा अभ्यास त्या त्या लोकांच्या भाषेतून लोकांना करता आला पाहिजे. न समजता केलेल्या पाठान्तरानं संस्कार होत नाहीत. ख्रिश्चन लोक बायबलचा मूळच्या भाषेतून अभ्यास करण्याचा आग्रह धरीत नाहीत. मूळ बायबल अर्धं ग्रीक, अर्धं हिब्रू आहे. इंग्रज लोक इंग्रजीतून बायबल वाचतात. मराठी मुसलमानांनी कुराण मराठीतून वाचावं. न समजता धर्मग्रंथाची काही पानं वाचली तरी मोक्ष मिळतो अशी भाबडी समजूत ! त्यामुळं धर्माचा आचाराशी काही संबंधच राहात नाही. धर्म जर जीवनात उतरायचा असेल तर निर्बुद्ध पाठान्तर बंद झालं पाहिजे. "

## भाबडा तर्क

रामदास रामनवमीला रामजन्माच्या वेळी जन्मले अशी समजूत आहे, व त्यांच्या थोरवीचा पुरावा म्हणून या गोष्टीचा लोक उल्लेख करतात ! विनोबा या गोष्टीचा निर्देश करून म्हणाले, " रामदास रामजन्माच्या वेळी जन्मले म्हणून का महान ? त्या क्षणी अगणित प्राणी जन्माला येत असतील. थोरवीचा चमत्काराशी काय संबंध ? त्याला कशाला महत्त्व द्यायचं ? खणताना मूर्ती सापडली की त्याचाही असाच वृथा गौरव करतात. मलासुद्धा खणताना एक मूर्ती सापडली. त्यात चमत्कार वगैरे काही नाही. कस्तुरबांचं निधन झालं तेव्हा एक जण म्हणाला, ' महाशिवरात्रीला त्या गेल्या, त्या महापतिव्रता होत्या. ' मी म्हणालो, ' महाशिवरात्रीला त्या गेल्या म्हणून त्या महापतिव्रता. इतर कोणत्या दिवशी गेल्या असत्या तर ? असला भाबडेपणा उपयोगी नाही ! "

तीन आठवडे विनोबांनी हैदराबाद राज्यात प्रवास केला आणि लोकांची मने जिंकली.

## अपरिग्रह करा, अपहार टळेल

स्वातंत्र्य मिळाले. देशातील अज्ञान, दारिद्र्य, विषमता यांचे गाठोडे टांगण्याची साम्राज्यशाहीची खुंटी नाहीशी झाली! आपल्या भवितव्याचे आपणच नियंते झालो. आता दलितांना आपण जवळ करणार का? समता आणणार का? स्वेच्छेने काही प्रयत्न करणार का? दंड आणि दंडुका यांशिवाय जेथे कार्य घडत नाही तो देश लोकशाहीला लायक नाही. विनोबा सांगू लागले, "देशातला दरिद्रनारायण हा आपल्याच कुटुंबातला एक घटक समजा आणि त्याचा वाटा त्याला द्या. अपरिग्रह स्वीकारा, अपहार टळेल. अपरिग्रह नाकारा, अपहार अटळ होईल. साठा करणारा आपलं मरणच साठवीत असतो. पोटभर खा, पेटी भरून ठेवू नका."

## आत्मनिर्भरतेशिवाय तरणोपाय नाही

अन्नाबाबतचे परावलंबन ही स्वतंत्र देशाच्या दृष्टीने एक अत्यंत नामुष्कीची गोष्ट आहे. पण शेतीपासून जर बुद्धीची फारकतच झाली असेल तर शेती भरभराटणार कशी? आणि त्याशिवाय अन्नाबाबत देश स्वावलंबी होणार तरी कसा? भारत खेड्यांत वसलेला. खेड्यांचा मुख्य आधार शेती. तिची उपेक्षा करून कसे चालेल? छोट्या तुकड्यातही शेतकऱ्याला चांगले उत्पन्न काढता आले पाहिजे. त्यासाठी त्याने दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहात बसू नये. अंगमेहनत करावी. विज्ञानाचा वापर करावा. त्याचे उदाहरण आश्रमांनी घालून द्यावे. विनोबांनी पौनारला शेतीचा प्रयोग सुरू केला. शेतीचे चार प्रकार केले. शेतीची सर्व कामे केवळ हातांनी करायची– ऋषी-शेती. प्राचीन काळचे ऋषी हेच करत. 'सहना भवतु– सहवीर्यं करवावहै' म्हणत करत. बैलांची मदत घेऊन धान्य पिकवण्याची शेती. विहिरीवर पाण्याचा पंप बसवून भाजीपाला, फळफळावळ, चाराघास यांचे उत्पादन आणि औषधींचा बगीचा हे चार प्रकार.

रोज चार घंटे याप्रमाणे वर्षातले दोनशे पंचाऐंशी दिवस आश्रमीय मंडळींनी शेतीत काम केले. दोनशे पंचाऐंशी रुपये उत्पन्न झाले. ताशी मजुरी चार आणे पडली. आसपास पुरुषाला बारा–तेरा आणे आणि स्त्रीला सहा–सात आणे रोज मिळे. शेतीचा अनुभव नसणाऱ्या मंडळींनी मन लावून, बुद्धिपूर्वक काम केले, जमिनीची मालकी त्यांच्या स्वतःचीच होती; त्यामुळे हा सर्व फरक!

अर्थ स्पष्ट होता. जमिनीची मालकी कसणाराकडे असली, त्याने कष्टून मेहनत केली, विज्ञानाचा सुबुद्धपणे वापर केला तर हा फरक पडू शकेल. प्रयोगशाळेत एक प्रयोग सिद्ध झाला होता. स्वतंत्र भारताची भरभराट करण्याची शक्ती असलेला प्रयोग. भारताचे स्वातंत्र्य अबाधित राखण्याची शक्ती असणारा प्रयोग.

विनोबा या प्रयोगात रमले. सामान्यतः हिंदुस्थानातला माणूस निवृत्त होतो अशा वयात त्यांच्या जीवनाला हा नवा धुमारा फुटला होता. यामुळे त्यांच्या अध्ययन-अध्यापनात कोणताही व्यत्यय आलेला नव्हता. सगळे जोमाने चालू होते. आता सायंकाळची आश्रमाची प्रार्थना विहिरीवर रहाटाने पाणी ओढता ओढता होऊ लागली. ज्या राष्ट्राला समृद्ध व्हायचे त्याने श्रमाला कंटाळून चालत नाही.

## जयप्रकाशांची भेट

जयप्रकाश त्या वेळी राजकारणाच्या आखाड्यात होते. समतेची आणि समृद्धीसाठी कष्ट करण्याची प्रेरणा समाजात निर्माण व्हावी हा त्यांना ध्यास. समतेसाठी कसणाराला जमीन मिळावी म्हणून जमीनदारीविरुद्ध त्यांनी निदर्शने केली, आणि समृद्धीसाठी 'एक घंटा देशको' ही चळवळ त्यांनी सुरू केली. देशातील वीस कोटी सक्षम लोक देशासाठी रोज एक घंटा देतील तर देशाचा कायापालट करता येईल अशी श्रद्धा यामागे होती. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सरकारवर अवलंबून निष्क्रिय राहण्याची नवी गुलामी देशात निर्माण होत होती ! एकदा निष्फळ ठरलेल्या अर्जविनंत्या, सरकार-दरबारी खेटे, निवडणुका या मार्गाकडे लोक वळत होते. आपल्या हातांच्या शक्तीचा त्यांना भरवसा वाटेनासा झाला होता. ही स्थिती भयंकर होती ! विहारमध्ये नवी लाट उठवण्याचे समाजवाद्यांचे प्रयत्न होते. गावोगाव रस्ते होऊ लागले. अवधारा नदीचे वीस मैल पात्र खोल करण्यात आले. आणखी किती तरी कामे. स्वातंत्र्य-पूर्वकाळात चरख्याच्या गूंगूंने जनतेची आत्मशक्ती जागृत केली; आता कुदळ-फावड्याच्या खणखणाटाने ती करण्याचा समाजवाद्यांचा प्रयत्न होता.

जयप्रकाशांना विनोबांच्या प्रयोगाबद्दल समजले होते. ते परंधामला गेले. विनोबांच्या साम्ययोगाच्या प्रयोगाची त्यांनी आस्थेवाईकपणे पाहणी केली. संध्याकाळी सर्वांबरोबर रहाटालाही ते भिडले. पाण्याच्या धारेबरोबर विचारांची धाराही वाहू लागली. विनोबा म्हणाले, " जयप्रकाशजी आश्रमात

आले ही आनंदाची गोष्ट. हिंदुस्थान देश मोठा, त्या मानानं त्याचे प्रश्नही मोठे. त्याची चिंता सर्वांना. मार्गही वेगवेगळे. जयप्रकाश आपल्यापरी गरीबांसाठी तळमळत आहेत. आपल्या पद्धतीनं काम करीत आहेत. ईश्वर माझ्याकडून कोणतं काम करून घेऊ इच्छितो, याबद्दल जेव्हा मी विचार करतो तेव्हा मला वाटतं की तो माझ्याकडून स्नेहवर्धनाचंच काम करून घेऊ चाहत आहे. "

जयप्रकाशांनी म्हटले, " विनोबांच्याबरोबर रहाट फिरवताना माझं विचारचक्रही तीव्र गतीनं फिरू लागलं. "

## तेलंगणाकडे कूच

साम्ययोगाचा प्रयोग सुरू असताना देशातील घटनांचे त्यांचे अवधान कायम होते. किंबहुना त्या घटनांवरील एक तोडगा शोधण्यासाठीच विनोबांचा प्रयोग सुरू होता. जमिनीच्या मालकीमुळे तेलंगणात भीषण प्रकार घडत होते. दिवसा पोलिसांचा, लष्कराचा धुमाकूळ, रात्री कम्युनिस्टांचा धुमाकूळ! जनता संत्रस्त झालेली. जमिनीचा प्रश्न सौहार्दाने न सुटला तर काय घडेल याची ती चुणूक होती. अशा ऐन आणीबाणीच्या प्रसंगी सर्वोदय कार्यकर्ते काय करणार ? पर्याय नसेल तर अगतिक जनता काहीही करते.

सेवाग्रामला तालीमी संघातर्फे एक्कावनच्या मार्चमध्ये एक शिक्षण संमेलन घेण्यात आले होते. देशभरातून लोक आलेले होते. विनोबाही त्या मेळाव्यासाठी गेले होते. तेथेही त्यांची कुदळीची उपासना चालू होती. छप्पनाव्या वर्षीचा त्यांचा तो उत्साह आणि जोर पाहून आश्चर्य वाटावे ! संमेलन संपताच विनोबा आपल्या साम्ययोगाच्या प्रयोगाकडे वळणार होते. पण काही मंडळी त्यांच्याकडे आली. म्हणाली, " तुमच्या सांगण्यावरून आम्ही सर्वोदय संमेलन सुरू केलं आणि तुम्ही हजर राहात नाही. यंदा हैदराबादजवळ शिवरामपल्लीला संमेलन घेणार. तुम्ही यायला पाहिजे. तेलंगणातल्या घटना का आपण सारे स्वस्थ बसून पाहणार ? काही तरी मार्ग काढायला हवा. तुम्ही यायलाच हवं. "

कार्यकर्ते कळवळून बोलत होते आणि विनोबा म्हणाले, " ठीक आहे. मी येईन. पण पायी येईन. "

कार्यकर्ते बुचकळ्यात पडले. या वयात विनोबांना साडेतीनशे मैल पायी यायला लावायचे ? पण इलाज नव्हता. आणि सहा मार्चला विनोबांनी हैदराबादच्या दिशेने कूच केले. निरोप घेताना म्हणाले, " कदाचित आपली

ही भेट शेवटचीच ठरण्याची शक्यता आहे ! " विनोबांच्या त्या निर्वाणीच्या भाषेने अंतःकरणे हेलावली. रणांगणावर जाताना निरोप घेण्यासारखा तो प्रसंग होता !

मजल दरमजल करीत विनोबा निघाले. स्वतंत्र भारतातील स्थिती पाहात निघाले. गावांचा कायापालट कसा करता येईल, हाच एक ध्यास मनी मानसी होता. लोकांशी त्यासाठी ते बोलत होते. शतखंड झालेली गावे एकवटली पाहिजेत. त्यांच्यात एकोपा पाहिजे. भेदाची कारणे दूर झाली पाहिजेत. पायांबरोबर विचारांचे चक्र जोराने फिरत होते.

शिवरामपल्लीचे सर्वोदय संमेलन आटोपले. देशभरचे कार्यकर्ते भेटले. विधायक कार्यकर्त्यांना ते पुरेसे वाटत नव्हते. काळाचे आव्हान स्वीकारता येईल असे काही तरी त्यांना हवे होते. विनोबांनी तेलंगणात जाण्याचा आपला मनोदय जाहीर केला.

## तर त्यांचा वाली कोणी नाही

१९५१ चा एप्रिल महिना. रामनवमीचा दिवस. विनोबा तुरुंगात कम्युनिस्ट बंद्यांना भेटायला गेले होते. दोन तास त्यांच्याशी मनमोकळेपणाने त्यांचे बोलणे झाले. तेलंगणात कम्युनिस्टांच्या प्रेरणेने अत्याचार झालेले. पोलिस आणि कम्युनिस्ट यांच्या दहशतीत जनता भरडली गेलेली. हवालदिल झालेली. ते स्वतःकडे ज्या दृष्टीने पाहात, स्वतःचे समर्थन करीत ते सर्व समजून घेण्याचा विनोबांचा प्रयत्न होता. मनुष्य स्वतःकडे ज्या दृष्टीने पाहतो त्या दृष्टीने त्याच्याकडे न पाहणे म्हणजे आंधळेपणा पत्करणेच असते !

विनोबाजी सकाळी दहा वाजता तुरुंगात पोचले. तुरुंगात डांबण्यात आल्यानंतर बंद्यांना तत्पूर्वी कोणीही सार्वजनिक कार्यकर्ता येऊन भेटला नव्हता की कोणी त्यांची विचारपूस केली नव्हती. विनोबांनी शान्तपणे त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. त्यांच्याशी चर्चा केली. बदलत्या परिस्थितीत हिंसेशिवाय तरणोपाय नाही असे त्यांना वाटते काय, असे विचारले. लोकशाहीत मताचा अधिकार सर्वांना मिळाला असून आपल्या बाजूला लोकांना वळवून सरकार बनवता येण्याची शक्यता आहे, हेही विनोबांनी त्यांच्या कानी घातले. जेलमध्ये काही तरी काम मागून घ्या, असा प्रेमाचा सल्ला त्यांना दिला. काम करण्याने मनःस्वास्थ्य टिकण्याला मदत होते, असा स्वतःचा अनुभवही त्यांनी सांगितला.

विनोबा राजबंद्यांना भेटून बाहेर आले. बाहेर दोनशे लोकांचा समुदाय जमला होता. त्यामुळे विनोबांचा परतीचा प्रवास म्हणजे एक मिरवणूकच बनली. दिवसभर वेगवेगळ्या लोकांशी विनोबांची चर्चा होत राहिली. दुसऱ्या दिवशी ते तेलंगणाकडे निघाले. तेलंगणातील जनता त्रस्त होती. विनोबांच्या आगमनाने त्यांना दिलासा मिळाला. विनोबांचे त्यांनी उत्साहाने स्वागत केले. विनोबांनी गावकऱ्यांची प्रेमाने विचारपूस केली. संध्याकाळी प्रार्थना आणि सभा. हजारो लोक सभेला आले. दुसऱ्या दिवशी हाच क्रम. प्रार्थना-सभेत विनोबांनी सांगितले, " श्रीमंत लोक आपला पैसा, आपली बुद्धी आणि शक्ती गरीबांसाठी लावतील तर त्यांना भिण्याचं कारण नाही. पण त्यांनी तसं न केलं तर त्यांचा वाली कोणीही नाही ! "

## आकाश टाळ्यांनी दुमदुमले

नलगोंडा आणि वरंगळ या दोन जिल्ह्यांत कम्युनिस्टांनी प्रचंड धुमाकूळ घातला होता. पोलिसांचा दंडुका आणि कम्युनिस्टांची दहशत यांनी लोक जेरीला आले होते. १८ एप्रिल १९५१ ला विनोबांनी नलगुंडा जिल्ह्यात प्रवेश केला. पोचमपल्ली या गावी त्यांचा मुक्काम होता. पहाटे दहा मैल पदयात्रा करून विनोबा गावात पोचले. गावकऱ्यांनी उत्साहाने स्वागत केले. गावाची लोकसंख्या तीन हजाराच्या घरात. साडेसहाशे विणकर आणि दोनशेवर हरिजन. दारूचे व्यसन निम्म्यावर लोकांना !

नऊ– सव्वानऊ वाजता विनोबा ग्राम-प्रदक्षिणेसाठी निघाले. हरिजन वस्तीकडून सुरवात. हरिजन जमले. त्यांना स्वतंत्र शाळा हवी होती ! विनोबा म्हणाले, " लहानपणापासून असा भेदभाव त्यांच्या मनात पेरू नका. सर्वांना एकाच शाळेत जाऊ द्या. एकत्र शिकू द्या. "

गोष्टी शेवटी उपजीविकेकडे वळल्या. हरिजन म्हणाले, " आम्हांला ना रोजगार, ना शेती. पोट कसं भरणार ? काम करायची इच्छा आहे. काम करायची शक्तीही आहे. पण संधी नाही ! उपास काढावे लागतात. जमीन मिळेल तर इज्जतीनं दिवस काढता येतील. "

त्यांना ४० एकर कोरडवाहू आणि ४० एकर पाण्याखालची जमीन पुरणार होती.

विनोबांनी विचारले, " समजा, तुमच्या मागणीप्रमाणे तुम्हांला जमीन मिळाली तर एकत्रच कसाल की वेगवेगळी ? "

" एकत्र कसू. "

मग विनोबांनी त्यांना एक अर्ज तयार करून द्यायला सांगितले. पण सरकारच्या दप्तर-दिरंगाई कारभारात किती वेळ लागेल नि किती नाही ! समोर गावकरी बसले होते, त्यांनाच का विचारू नये ? विनोबांनी विषय काढला आणि श्री रामचंद्र रेड्डी उभे राहिले. म्हणाले, " या गरीबांना काही जमीन द्यायची माझ्या वडलांची इच्छा होतीच. आम्ही पाच भाऊ मिळून त्यांना ५० एकर जिराइत आणि ५० एकर बागाइत जमीन देतो ! " आणि त्यांनी लगेच कागदावर दानपत्र लिहून काढले.

संध्याकाळच्या प्रार्थना-सभेत विनोबांनी ही गोष्ट जाहीर केली, आणि आकाश टाळ्यांच्या कडकडाटाने निनादून उठले !

## अद्‌भुत संवाद

विनोबा बिछान्यावर गेले. पण त्यांना झोप आली नाही. तीन चार तास जागेच होते. मनात गणित मांडीत होते. हिंदुस्थानातल्या भूमिहीनांचा प्रश्न सोडवायचा तर किमान पाच कोटी एकर जमीन लागेल ! आणि मग जणू प्रत्यक्ष ईश्वराशी संवाद सुरू झाला. ' श्रद्धा राख आणि माग ' असा आदेश मिळाला. ' बाळाच्या पोटात ज्यानं भूक निर्माण केली त्यानं आईच्या स्तनांत दूधही ठेवलं हे विसरू नकोस ' असा दिलासा त्यांना मिळाला.

दुसऱ्या दिवशी पहाटेच नित्यकर्मे सुरू झाली. विनोबांना रात्री नीट झोप लागली नसावी असे चेहऱ्यावरून दिसत होते. पण अलौकिक अशी प्रसन्नताही तेथे विलसत होती.

आणि नंतर भू-दान मिळतच गेले.

## प्रेमाने लुटतो

एक दिवस एक तरुण आला. काकुळतीने म्हणाला, " कम्युनिस्ट रात्री अपरात्री येतात; आम्हांला दम भरतात. त्यांना जेवायला घातलं, आश्रय दिला की दुसऱ्या दिवशी पोलिस येतात. धाक दाखवतात. रात्री कम्युनिस्ट छळतात;

दिवसा पोलिस पिळतात ! आम्ही जुलमाला कंटाळलो, वैतागलो आहोत. करावं तरी काय ? "

विनोबा म्हणाले, " मृत्यू कोणालाच टळत नाही. प्रत्येकाला मृत्यूच्या स्वाधीन व्हावं लागतं. तेव्हा मृत्यूचं भय सोडलं पाहिजे. देव तारी त्याला कोण मारी ? जे लोक मृत्यूला भितात त्यांचं जगणं-मरणं सारखंच ! निर्भयता ही खरी शक्ती होय. मीसुद्धा लोकांना लुटतोच, पण घाबरवून नाही लुटत. प्रेमानं लुटतो; आणि धाक दाखवून त्यांना जे मिळतं त्यापेक्षा मला जास्त मिळतं ! "

## कळवळ्यातून क्रान्तीचा उगम

नलगुंडा हे कम्युनिस्टांच्या धुमाकुळाचे एक महत्त्वाचे केन्द्र. तिथल्या तुरुंगात अनेक कम्युनिस्ट तुरुंगात पडले होते. विनोबांच्या कार्यामुळे आपले समूळ उच्चाटन होईल, अशी धास्ती वाटून त्यांनी विनोबांच्या विरुद्ध तेलुगूतून एक पत्रकही काढले होते ! पण विनोबा त्यांना भेटले. त्यांची समजूत काढण्याचा त्यांनी प्रयत्न केला. चर्चेची सुरवात त्यांनी तावातावाने केली. पण विनोबांच्या आर्जवांचा परिणाम त्यांच्यावरही झाला. विनोबा त्यांना म्हणाले, " उपासमारीमुळं क्रान्तिकारी प्रेरणा प्रखर होते, हा तुमचा अपसमजच आहे. तुम्हा मंडळींना काही दोन वेळच्या जेवणाची पंचाईत नव्हती आणि तरीही तुमची क्रान्तिकारी वृत्ती जिवंत राहिली. गरीबांच्याबद्दल तुम्हांला करुणा आली, कळवळा वाटला. ही करुणा आणि हा कळवळा क्रान्तिकारक वृत्तीला जन्म देतो. उपासमारीनं भीक फोफावू शकते, हे विसरू नका. " विनोबांनी त्या लोकांना समजावले की जमीन देणे हा एक संकेत आहे. जमीन देण्याने सर्व गुंता उलगडत नाही. आई-बापांप्रमाणे वात्सल्याने लोकांनी गरीबांची काळजी घेतली पाहिजे. आपापली गावे सोडून भीतीने लोक शहरांत येऊन राहिले होते. विनोबांनी त्यांना निर्भयपणे परत आपल्या गावी जायचा सल्ला दिला. गाववाल्यांचे प्रेम संपादन कराल तर भीतीचे काहीच कारण नाही, असे विनोबांनी त्यांना समजावले.

चरकूपल्ली गाव उद्ध्वस्त आणि भीतिग्रस्त झालेले. विनोबांच्या आगमना-बरोबर कित्येक दिवसांनी गावात आनंद आणि उत्साह आला. विनोबांनी सांगितले, " घरात नवीन मूल जन्माला आलं तर आपण त्याला वाटा देतोच. गरीबाला घरातलेच एक मूल समजा, आणि त्याला त्याचा सहावा हिस्सा द्या. प्रत्येकानं तसा द्यावा. "

## कोदंडरावांचा किस्सा

सूर्यपेठ गावात तर गंमतच झाली. कोदंडराव रेड्डी या गृहस्थांचे एकत्र कुटुंब. दोघे भाऊ. कोदंडरावांनी जमीन द्यायचे ठरवले. भाऊ बाहेरगावी गेलेला. त्याला विचारल्याशिवाय कसे द्यायचे? पण राहवले नाही. आपल्या वाट्यातला चौथा हिस्सा त्यांनी देऊन टाकला. ११६ एकरांचे ते दानपत्र होते!

संध्याकाळी त्यांचे धाकटे भाऊ आले. मोठ्या भावाने ११६ एकर जमीन दिल्याचे त्यांना ठाऊक झाले होते. प्रार्थनेनंतर ते विनोबाजींकडे आले. भांडणाच्या सुरात म्हणाले, " आमचं एकत्र कुटुंब. आजवर सगळ्या गोष्टी समायिक रीतीने केल्या. विश्वासानं केल्या. पण आज आमच्या दादांच्या मनात जणू काही कली शिरला. त्यांनी मला आज वेगळं लेखलं! मला राग का येऊ नये? त्यांनी माझ्या हिश्शातली जमीनही का दिली नाही? माझा त्यांच्यावर राग आहे. माझ्या वाट्यातला चौथा हिस्साही आपल्याबरोबर त्यांनी द्यायला हवा होता. आता हा घ्या, आणि आमच्यातलं भांडण मिटवा!"

त्यांनीही आणखी ११६ एकर जमीन दिली.

## प्रश्न माणसं मरतात हा नाही

विनोबांचा यात्रेतील प्रत्येक दिवस म्हणजे विचार आणि भावना यांचा संगम घडवणारा कार्यक्रम. लोकांच्या व्यथा–वेदना ऐकायच्या. त्याचे निदान करायचे. चिकित्सा सांगायची. एका ठिकाणी विनोबा म्हणाले, " वरंगळ आणि नलगुंडा या दोन जिल्ह्यांची मिळून लोकसंख्या ३० लाख. गेल्या पाच वर्षांत हजार खून झाले म्हणतात! म्हणजे लाखात चार पाच असं प्रमाण पडलं. हे प्रमाण फार नाही. प्लेग–कॉलरा आला की यापेक्षा जास्त पटापट लोक मरतात. प्रश्न माणसं मरतात हा नाही, माणूस माणसाला मारायला तयार होतो आणि मृत्यूच्या भीतीनं अन्यायापुढं माणसं लोटांगण घालतात, हा खरा प्रश्न आहे! बंदुका–तोफांनी माणसं मारता येतात, विचार असे मारता येत नाहीत. विचारांशी विचारांनीच लढावं लागतं. तशी हिंमत आपल्यात असली पाहिजे. मार्क्सनंही दहशतीच्या मार्गावर जोर दिला नाही. मार्क्सला आम्ही नीट समजूनच घेत नाही. त्यानंही 'विदरिंग अवे ऑफ स्टेट'– राज्यशक्तीच्या विसर्जनाचीच आकांक्षा प्रकट केली आहे."

एका ठिकाणी विनोबा म्हणाले, " हिंसेचं तांडव फक्त तेलंगणातच आहे असं समजू नका. जिथं जिथं विषमता तिथं तिथं हे घडण्याची शक्यता आहे. तिथं कम्युनिस्ट नसले तर दुसरे कोणी अवतार घेतील. जिथं चार हजारांच्या वस्तीत आठशे हरिजन भूमिहीन आहेत, जिथं गलिच्छ आणि मोडक्या तोडक्या झोपड्यांच्यामध्ये महाल उभा आहे, जिथं भीक आणि भूक सभोवती असताना आत मिष्टान्नांच्या पंक्ती उठत आहेत, तिथं त्या विषमतेविरुद्ध कोणी ना कोणी बंडावा करणारच ! "

## नवा हुरूप आला

मंचेरियालला तेलंगणातला विनोबांचा शेवटचा मुक्काम होता. मृग लागला होता. विनोबांच्या यात्रेने तेलंगणातले वातावरण बदलू लागले होते. गरीबांना विसरून चालणार नाही, याची जाणीव लोकांना झाली होती. विषमतेतच हिंसा उगम पावते, हे लोकांच्या ध्यानी आले होते. दोन महिने विनोबा तेलंगणात फिरले होते. परतण्याच्या दिवशी भू-दान कार्यकर्त्यांचे एक संमेलन स्वामी सीताराम यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते.

विनोबा मंचेरियालहून परत निघाले आणि २७ जूनला परत परंधाम पवनारला येऊन पोचले. चार महिन्यांत केवढा फरक पडला होता ! देशभर भू-दानाची चर्चा सुरू झाली होती. डोकी उडवून नव्हे तर डोकी बदलूनही समाजात बदल घडू शकतो, असा आत्मविश्वास लोकांत निर्माण झाला होता. जनमानसातील रामरायाला हाक दिली तर तो जागा होतो, अशी प्रचीती लोकांना आली होती. स्वातंत्र्यानंतर आलेले शैथिल्य दूर झाले होते. नव्या हुरूपाने विधायक कार्य सुरू झाले होते. विषमता निवारणाशिवाय देशात शान्तता निर्माण होणार नाही आणि एकोपा वाढणार नाही, ही गोष्ट दिसून आली होती.

दोन महिन्यांची विनोबांची तेलंगणयात्रा झाली. बारा हजार एकर जमीन या काळात दान मिळाली. रोजची सरासरी दोनशे एकर पडली ! सर्वशक्तिमान समजल्या जाणाऱ्या सरकारलाही या गतीने हे साधले नव्हते !

## आनंदवनाचे उद्घाटन

तेलंगणाची पदयात्रा संपवून परतताना विनोबा वरोड्याला थांबले. बाबा आमटे हे त्यांचे एक भक्त. खांद्यावर गीताई आणि गीताप्रवचने टाकून प्रचारार्थ

फिरलेले. अभयसाधक आणि करुणांकित. महारो याच्या सेवेला त्यांनी वाहून घेतले होते! महारोग्यांसाठी अपंगाश्रम नव्हे तर आनंदवन निर्माण करण्याची त्यांची जिद्द होती. गावाबाहेर निबिड जंगलात चौदा पंधरा रुपये, लुळ्या-लंगड्या गाई, टिनाची शेड, आणि महारोगी घेऊन नवी स्वप्ने ते पाहात होते. त्यांच्या पत्नी साधनाताई यांची त्यांना साथ. महारोग्यांना पुरुषार्थी बनवण्याची प्रतिज्ञा करून हे मनस्वी जोडपे तेथे उभे ठाकले होते. विनोबांनी आनंदवनाचे औपचारिक उद्घाटन केले आणि त्या दांपत्याला आशीर्वाद दिला. त्यांचे शुभ चिंतले.

## योजना आयोगाचे निमंत्रण

भारताच्या नियोजित विकासाचा कच्चा खर्डा प्रसिद्ध झाला होता. त्यावर देशभर चर्चा सुरू होती. विनोबांना त्या मसुद्याने धक्का बसला! गांधीजींचे सहकारी म्हणवणारांनी तयार केलेला का हा मसुदा? छे, छे, अशक्य आहे! दरिद्रनारायणाचा उपासक म्हणवणारे त्यांची अशी उपेक्षा, अवहेलना कशी करू शकतात? शेवटी विकास कोणाचा आणि कोणासाठी? विनोबांनी त्या मसुद्याबद्दल आपला तीव्र असंतोष प्रकट केला. तेव्हा योजना आयोगाने श्री. रा. कृ. पाटील यांना त्यांचे म्हणणे समजून घेण्यासाठी वर्ध्याला पाठवले. विनोबा त्यांना म्हणाले, " ही कसली राष्ट्रीय योजना? यात गरीबांना रोजगाराची व अन्नाची हमी कुठं आहे? कोट्यवधींना कसलंही आश्वासन देऊ न शकणारी योजना राष्ट्रीय योजना म्हणवून घेऊ शकत नाही. सर्वांना रोजी व रोटी देण्याची प्रतिज्ञा करून मगच योजना आखायला लोकांनी बसावं!"

विनोबांची ही मीमांसा ऐकून पाटील परतले. योजना आयोगाच्या मंडळींनी विनोबांशी विचारविनिमय करणे आवश्यक आहे, असा पंडित नेहरूंचा अभिप्राय पडला. नेहमीच्या पद्धतीने सरकारी यंत्रणेने विनोबांना दिल्लीला येण्याचे निमंत्रण दिले. आपण त्यांच्याकडे जाण्याचा विनय दाखवला नाही!

विनोबांनी कळवले, " तुमच्या निमंत्रणाबद्दल आभार, तातडीनं निघत आहे, पण पायी. पोचल्यावर चर्चा करू." निदान या गरीब देशाच्या योजना-आखणीच्या खर्चात विनोबांच्या नावे एक पै-देखील खर्ची पडलेली नाही!

दिल्लीकडे कूच करताना ते म्हणाले, " क्रान्ती टाळणं हा माझा उद्देश नाही. आपल्या देशाची सुख-शान्ती जमिनीचा प्रश्न शान्ततामय मार्गानं सुटण्यावर

अवलंबून आहे. क्रान्ती अटळ आहे, हे लोक समजून चुकले आहेत. हिंसा टाळून ती करता आली तर लोकांना हवी आहे. कम्युनिस्टांनी जिथं विध्वंस केला नाही, भीतीचं साम्राज्य पसरवलं नाही तिथं जमीन न मिळाली तर त्याचा अर्थ होईल, सर्वोदयापूर्वी सर्वनाश आवश्यक आहे !"

## योजना : जनतेसाठी की जनताभिमुख ?

पंडित नेहरू हे नियोजनाचे खंदे पुरस्कर्ते. स्वातंत्र्यपूर्व काळात काँग्रेस-तर्फे नियोजन मंडळाची नेमणूक करून त्यांनी व सुभाषबाबूंनी नियोजित विकासाची कल्पना लोकमानसात रुजवण्याचा प्रयत्न केला होता. स्वातंत्र्य मिळताच त्यांनी त्या विषयाकडे लक्ष वळवले आणि योजना आयोगाची नेमणूक केली. स्वातंत्र्य-पूर्वकाळात चळवळी केलेले काही नेते, बरेचसे तज्ज्ञ, काही व्यवहारपटू, व काही परदेशी सल्लागार यांनी मिळून पहिल्या योजनेचा खर्डा तयार केला. लोकमत जाणून घेण्यासाठी तो खर्डा प्रकाशित करण्यात आला. स्वातंत्र्या-नंतरची ही राष्ट्रीय दृष्ट्या फार महत्त्वाची अशी दुसरी घटना. आपली संपूर्ण प्रभुत्वसंपन्न गणराज्याची घटना ही त्या आधीची अशा तऱ्हेची पहिली महत्त्वाची राष्ट्रीय घटना होती. स्वाभाविकच ह्या योजनेच्या आराखड्यावर उलटसुलट चर्चा देशभर होऊ लागली. कोणाही देशप्रेमी माणसाला ह्या आराखड्याची उपेक्षा करणे शक्य नव्हते. विनोबांनीही हा आराखडा काळजीपूर्वक वाचला. तो वाचून त्यांचे चित्त व्यथित झाले. गांधीजी ज्या दरिद्रनारायणासाठी स्वातंत्र्य मागत होते त्या दरिद्रनारायणाचे नियोजकांना तोंडदेखलेच स्मरण होते ! अंत्योदयाची पुसटशीदेखील तज्ज्ञांना ओळख असावी की नाही, याची शंका वाटावी असा हा खर्डा. ही पहिली वीटच चुकीची लागली तर त्यावर उभा राहणारा इमला तशाच चुकीच्या घाटाचा होणार हे उघड होते. विनोबांनी त्या खर्ड्याचा सखोल अभ्यास केला. त्यासंबंधी ते एका-दोघांशी बोललेदेखील. गरीबांचे विस्मरण हा एक महादोष ह्या खर्ड्यात आहे, असे त्यांना वाटले. योजकांना विकासाच्या कल्पनेने झपाटले होते, माणूस त्यात उपेक्षिला गेला होता. भारत खेड्यांत वसला आहे, हे गांधीजींनी कानी-कपाळी ओरडून सांगितलेले सत्य त्यात विसरले गेले होते ! तेलंगणाच्या पदयात्रेत त्यांनी दारिद्र्याचे जे भीषण जिवंत दर्शन घेतले होते त्या वास्तवतेची पंडितांना जाणही नसावी, याचा विनोबांना फार अचंबा वाटत होता. विनोबा अस्वस्थ होते. पण

महापुरुषाची अस्वस्थतादेखील मायाळू असते, आणि त्यामुळे विनोबांनी ती अतिशय खुबीदारपणाने व्यक्त केली.

## एक विलक्षण गणित

विनोबांना जनविन्मुखता हा फार मोठा दोष योजनेच्या खडर्याला चिकटलेला दिसत होता. सत्ताधारी नेते होयबांच्या कोंड्याळात अडकल्याने जनतेला दुरावलेले. श्रमिकांच्या व ग्रामीणांच्या दुःखांची त्यांची जाणीव फक्त काव्यात्म होती. त्या कठोर जीवनाची अनुभूती त्यांना कधीच नव्हती. बरेचसे तज्ज्ञ हे पुस्तकी जगातच वावरलेले असल्याने त्यांना जनता म्हणजे फक्त आकडे वाटत होते ! परदेशी सल्लागारांचा सल्ला त्यांच्या आंतरराष्ट्रीय डावपेचांनी कलुषित झालेला होता. एका गमतीच्या गणिताने योजनेच्या खडर्याच्या नेमक्या वर्मावर विनोबांनी बोट ठेवले.

स्वच्छता हादेखील योजनेचा विषय होऊ शकतो. परिसराची स्वच्छता, वस्त्रादींची स्वच्छता, व व्यक्तिगत शारीरिक स्वच्छता. अशा तिन्ही स्तरांवर स्वच्छतेचा विचार सुरू होता. शारीरिक स्वच्छतेत दातांची स्वच्छता महत्त्वाची. चाळीस कोटी लोकांचे दात नित्य स्वच्छ राहणे त्यासाठी आवश्यक. तज्ज्ञ विचार करू लागतात....

एका माणसाचे दात घासायचे तर निदान पंधरा मिनिटे त्यासाठी लागणार. म्हणजे तासाला चार माणसे, हा हिशोब झाला. चोवीस तास एक मजूर लावून हे काम करायचे ठरवले तर एक मजूर जास्तीत जास्त शंभर लोकांचे दात घासू शकणार; चाळीस कोटींचे दात दिवसाकाठी एकदा घासून होणे स्वच्छता व आरोग्य ह्या दृष्टीने आवश्यक आहे. शंभर माणसांचे दात घासायला एका मजुराला अक्षरशः चोवीस तास लागणार. कोणी मनुष्य झाला तरी त्याला आठ तासांहून अधिक राबवणे हा सामाजिक न्यायाच्या दृष्टीने गुन्हाच म्हटला पाहिजे. तेव्हा किमान तीन पाळ्या कराव्या लागणार, म्हणजे दिवसाकाठी शंभर माणसांचे दात घासायचे तर त्याला आठ आठ तासांची पाळी करणारे तीन मजूर तरी हवेत. शंभरांचे दात घासायला जर तीन मजूर तर चाळीस कोटींचे दात घासायला किती ?

आकडेमोड सुरू झाली ! तोंडाचे बोळके झालेले म्हातारे व दात न आलेली मुले हिशोबातून वगळली तर निदान एक कोटी मजूर तरी या कामासाठी

लावावे लागणार, आणि तेव्हा कोठे एका दिवसात एकदा सर्वांचे दात घासून होणार ! खरे म्हणजे अगदी म्हाताऱ्या, मुलांसकट सर्वांचेच दात घासायचे म्हणजे तोंड धुवायचे म्हटले तर एक कोटी वीस लाखांपर्यंत तरी मजूर लागणारच !

आता ह्या मंडळींना किमान ग्रामीण भूमिहीनाइतकी मजुरी द्यायची म्हटले तर आठ आणे तरी द्यायला पाहिजेत. म्हणजे दातांची स्वच्छता करण्यासाठीच रोजी अर्धा कोट रुपये हवेत ! वर्षाकाठी एकशेऐंशी कोटी, आणि पाच वर्षांत नऊशे कोटींवर ही रक्कम जाणार !

लोकांचा नित्य जीवनाशी संपर्क तुटला म्हणजे अशा तऱ्हेची ऊर धपापायला लावणारी गणिते मांडली जातात, आणि प्रचंड कार्य केल्याचे समाधान मानतात ! ह्या गणितात गणित या दृष्टीने कोठलीच चूक नाही ! उद्दिष्ट रास्त, आकडे योग्य, आणि त्रैराशिक अचूक;– मग आणखी काय हवे ?

आणखी हवे असते दर्शन ! हे दर्शन नसले तर अचूक गणितही गफलत करते. पहिल्या योजनेच्या खडर्यात असा दर्शनाचा अभाव विनोबांना आढळला, व तो त्यांनी शासनातील मंडळींजवळ बोलूनही दाखवला. पं. नेहरूंनी याची दखल घेतली आणि योजना आयोगाच्या सदस्यांशी चर्चा करण्यासाठी विनोबांना दिल्लीला पाचारण केले.

## दिल्लीकडे कूच

खरे म्हणजे योजना आयोगाच्या सदस्यांनीच विनोबांकडे जाणे साजून दिसले असते. पण त्यांची पंडिती अहंता आड आली. विनोबांना तसा उद्योगच काय ? गावोगाव फिरायला मोकळा असणारा तर हा माणूस ! एका सर्वोदय संमेलनासाठी हा माणूस चक्क साठ दिवस घालवू शकतो, हा त्याच्या रिकामपणाचा पुरावाच होय. याउलट योजना आयोगाचे सदस्य किती उद्योगात गढलेले. आठ आठ तास डोकेफोड करूनही कामे उरकता उरकत नव्हती. मदतीसाठी किती तरी हाताखाली माणसे. त्याचा क्षण न् क्षण महत्त्वाचा. शिवाय चर्चा करायची तर कागदपत्रे, लघुलेखक, एक ना दोन– हजार गोष्टी. विनोबांना तसे कोणतेच पाश नाहीत. तेव्हा त्यांनीच दिल्लीला येणे योग्य. शिवाय या माणसाचा टी. ए. (प्रवास खर्च) डी. ए. रोजचा भत्ता मामुली.

त्यांना पाचारण करण्यात राष्ट्रीय संपत्तीचे रक्षण केल्याचा देशभक्तिमय आनंदही होता.

विनोबा एकदा गमतीने एका ठिकाणी म्हणाले होते, " व्याख्यानाला-प्रवचनाला लोक बोलावतात. त्यांच्याकडे आपल्या नावे प्रवासखर्च तेवढा दाखवला जातो. जमेच्या बाजूला ? काही नाही ! प्रवचन व्याख्यान वाऱ्यावर गेलेले असते. तेव्हा पायी गेले म्हणजे आपल्या नावे तरी काही पडलेले दिसायला नको ! "

आणि बारा सप्टेंबर एकोणीसशे एक्कावन्न रोजी विनोबांनी दिल्लीच्या रोखाने कूच केले. आदल्याच दिवशी विनोबांनी वयाची पंचावन्न वर्षे पूर्ण करून छप्पन्नाव्या वर्षात पदार्पण केले होते. ज्या वयात लोक सेवाकार्यातून सामान्यतः निवृत्त होतात त्या वयात विनोबा आठशे मैलांचा टप्पा ओलांडून दिल्लीला जायला निघाले होते !

ज्यांचा लोकांशी साक्षात संबंध आहे अशा कार्यकर्त्यांनी वाटेत आपल्याला भेटावे व चर्चा करावी असे विनोबांना वाटत होते. नियोजनाची पहिली वीट महत्त्वाची. ती बसताना विधायक कार्यकर्त्यांनी गाफील राहू नये असे विनोबांना वाटत होते. विनोबांचे दिल्लीकडील प्रस्थान हा त्या सर्वांना जागे करण्याचा एक निकराचा प्रयत्न होता. शिवाय भू-दानाची कल्पनाही त्यांना अजमावून पाहायची होतीच !

## भिक्षा नव्हे– दीक्षा !

तर्कटी लोक भारतात विपुल. तेलंगण यात्रेच्या दोन महिन्यांत विनोबांना बारा हजार एकर जमीन दान मिळाली. कमाल धारणेच्या कायद्यांमुळेदेखील अशा वेगाने भूमीचे हस्तान्तरण झालेले नव्हते. विनोबांवर त्यांनी आक्षेप घेतला, " आधी तेलंगणात कम्युनिस्टांनी जाळपोळ, लुटालूट, खुनाखुनी केली होती म्हणून विनोबांचे हे भूदान तिथं चाललं. इतरत्र हे काय चालणार ? "

विनोबांच्या कानीदेखील अशा गोष्टी येत असत. ह्या आक्षेपाचा उल्लेख करून ते म्हणाले, " खरोखरच आक्षेपक म्हणतात तशी स्थिती असेल तर त्याचा अर्थ असा होईल की, सर्वोदयापूर्वी सर्वनाश अपरिहार्य आहे ! पण मला तसे वाटत नाही. मानव मूलतः सत्प्रवृत्त आहे. परिस्थितीच्या काचामुळं तो वाईट गोष्टी केव्हा तरी करतो इतकच. मानवाच्या ह्या मूलभूत सत्प्रवृत्तीच्या

निखाऱ्यावर कधी राख धरते व तो निखारा विझल्यासारखं वाटतं. पण जर ही राख फुंकली तर सत्प्रवृत्तीचा अंगार पुन्हा धगधगू लागतो. " या विश्वासाने विनोबा दिल्लीला पायी निघाले होते. ते वाटेने भू-दान मागणार होते. पण भू-दान म्हणजे भिक्षा नव्हे. ते निघतानाच म्हणाले, " मी भीक मागतो असा गैरसमज कोणी करून घेऊ नये. मी भिक्षा मागायला नव्हे तर दीक्षा द्यायला जात आहे. गरीबांचा हक्कच मी मागतो आहे. ह्या हक्काकडे आज जरी कोणी दुर्लक्ष केले तरी उद्या हा हक्क त्यांना ज्याचा त्याला द्यावाच लागणार आहे. "

पवनार ते दिल्ली आठशे मैल. साठ दिवसांनी विनोबांनी दिल्ली गाठली. या साठ दिवसांत रोज तीनशे एकर जमीन त्यांना मिळाली होती. साठ दिवसांत अठरा हजार एकर ! तेलंगणाच्या यात्रेत रोजची सरासरी दोनशे एकरांची पडली होती. पण कम्युनिस्टांनी विध्वंसातून पूर्वतयारी केलेली नसून आंध्राबाहेर हे घडले होते ! आत्मविश्वास निर्माण करणारा हा अनुभव होता. तो गाठी बांधून विनोबा योजना आयोगाच्या सदस्यांशी चर्चा करणार होते.

## राष्ट्रीय योजनेचे गमक

दिल्लीतील राजघाटावर विनोबा अकरा दिवस राहिले. योजना आयोगाच्या सदस्यांशी दोन दिवस चर्चा झाली. इतरही कित्येक मंडळी भेटली. योजना आयोगाच्या मंडळींना विनोबा म्हणाले, " सर्वांना रोजी-रोटीचे आश्वासन देत नाही ते नॅशनल प्लॅनिंगच नव्हे ! "

विनोबांच्या ह्या विधानाने सगळे चमकले ! एक विद्वान म्हणाले, " डोण्ट कॉल इट ए नॅशनल प्लॅन, कॉल इट अ पार्शल प्लॅन ! ( वाटलं तर योजनेला राष्ट्रीय नका म्हणू, आंशिक म्हणा ! ) "

त्यावर विनोबा म्हणाले, " इफ इट इज अ पार्शल प्लॅन, लेट द पार्शलिटी बी टोवर्ड्स द पुअर ! ( ही योजना आंशिक आहे म्हणता, तर मग कोणता अंश तुम्ही विचारात घेता ? गरीबांचा अंश विचारात घेऊन तरी आखणी करायची ! ) "

' पार्शल ' ह्या शब्दाचा वेध घेऊन विनोबांनी गरीबांना पक्षपात दाखवा हे जेव्हा सुचवले तेव्हा ती विद्वान मंडळी चमकली ! हे पाणी काही वेगळे आहे; हे त्यांना जाणवले. पुढे तपशिलात चर्चा झाली. जास्तीत जास्त लोकांना रोजगार मिळाला तर क्रयशक्ती विभागली जाईल व नित्य उपयोगाचे व्यवसाय

भरभराटतील, चैनीच्या वस्तूंच्या नफेखोर निर्मितीत पैसा गुंतणार नाही. दुर्बल घटक सबळ झाले तर ते देश भक्कम बनवतील. युद्धाचा धोका मोठ्या उद्योग-धंद्यांना, विखुरलेल्या उद्योगांचा सहजासहजी नायनाट होत नसतो. किती तरी गोष्टी. अनाग्रही वृत्ती हे विनोबांचे वैशिष्ट्य. त्यामुळे आपले विचार परखडपणे मांडून त्यांनी दिल्ली सोडली आणि उत्तर प्रदेशाच्या रोखाने ते निघाले.

निघण्यापूर्वी विनोबांना अचानक तापाने येऊन घेरले. मित्र–चाहते म्हणू लागले, "थांबा, विश्रान्ती घ्या." विनोबांना ही व्याकुळता समजेच ना. 'कार्यं वा साधयेत् देहं वा पातयेत्' अशी निष्ठा शिकवणाऱ्या देशात असे कसे लोक ! ते थांबा म्हणणाऱ्यांना म्हणाले, "राम काज साधेविना मोहीं कहाँ विश्राम– रामरायाचं कार्य झाल्याशिवाय आता विश्रान्ती कुठली ?"

विनोबांनी उत्तर प्रदेशाच्या दिशेने आपली यात्रा सुरू ठेवली. नित्य नव्या उत्साहाने कार्यकर्ते कामाला लागले. विनोबांनाच जमीन मिळत होती असे नव्हेत तर असे वातावरण निर्माण झाले होते की, सर्वसामान्य कार्यकर्त्यांनाही दानपत्रे मिळू लागली होती. गरीब–दलित यांना दिलासा वाटू लागला होता.

## नाममाला

एकोणीसशे एकावन्न–बावन्नमधली गोष्ट. विनोबा हृषीकेशहून हरि-द्वारला जात होते. वाटेत कालीकमलीवाल्यांची– त्यांची भेट झाली. त्यांनी विनोबांना चंदनाची एक मणिमाला भेट म्हणून दिली. रात्री निजताना विनोबा ती आपल्याजवळ ठेवू लागले. त्याबरोबर त्यांचे चिंतनही सुरू झाले. भक्त-मंडळींना जी नावे आवडली त्यांतून विनोबांनी काहींची निवड केली. प्रत्येक नाव गुणांचे सूचन करणारेही होते आणि त्यांची नाममाला त्यांनी तयार केली. छत्तीस नावाची माला. विनोबांचा एकादश व्रतांचा श्लोक जसा सर्वांना पोचला तशीच ही नाममालाही सर्वत्र गेली आहे. नाममालेत गेयता आहे. स्वतः विनोबांच्या कंठातून ज्यांनी ती ऐकली त्यांना तिच्यातील आपर गोडी समजते.

**ॐ तत् सत् श्री नारायण तू पुरुषोत्तम गुरु तू**
**सिद्ध बुद्ध तू, स्कंद विनायक सविता पावक तू**
**ब्रह्म मज्द तू यह्व शक्ति तू ईशुपिता प्रभु तू**
**रुद्र विष्णु तू, राम कृष्ण तू रहीम ताओ तू**

**वासुदेव गो-विश्वरूप तू चिदानंद हरि तू**
**अद्वितीय तू अकाल निर्भय आतमलिंग शिव तू**

१९६४ साली विनोबा पौनारला आले होते. दहा दिवसांसाठी आलेल्या विनोबांचा मुक्काम वाढतच चालला, आणि एक दिवस प्रार्थनेनंतर विनोबांनी मुलांशी बोलायला सुरुवात केली. नाममालेबद्दलच ते बोलू लागले.

नाममालेबद्दलचे बोलणे संपताना विनोबा म्हणाले, " ही नाममाला प्रेमानं म्हणत जा. आईच्या मांडीवर निजतो तशी ही नाममाला म्हणून ईश्वराच्या मांडीवर झोपायचं ! "

## वर्षाचा ताळेबंद

विनोबांची पदयात्रा वर्षभर चालली आणि ते उत्तर प्रदेशात वाराणसी-जवळ सेवापुरी येथे आले. सर्वोदय संमेलन तेथे भरले होते. वर्षभरात एक लाख एकर जमीन दान मिळाली होती ! विनोबा विनोदाने म्हणाले होते, " आता मी लखपती झालो ! " पण विनोबांचे गणित सांगत होते की, देशातला भूमिहीनांचा प्रश्न सोडवायचा तर किमान पाच कोटी एकर जमीन लागेल. हिंदुस्थानच्या एकूण पिकाखालच्या जमिनीचा हा सहावा हिस्सा. विनोबा म्हणत, " षष्ठांश मधुयायी– सहावा हिस्सा राजाचा असं वचन आहे. दरिद्रनारायण हा आपला गणराज्यातला राजा. त्याला सहावा हिस्सा मिळायला हवा. " एका ठिकाणी ते म्हणाले, " जमिनीचं तसं मला महत्त्व वाटत नाही. लोक म्हणतात, आम्ही जमिनीचे मालक. पण एक दिवस ते मरून जातात. त्यांची माती होते. जमिनीत मिसळून जाते. जमीन मात्र कायम असते आणि ते म्हणणार– आम्ही जमिनीचे मालक ! अरे, तुम्ही जमिनीचे मालक की, जमीनच तुमची मालक ? " कधी विनोबा म्हणत, " हवा–पाण्यावर जशी सर्वांची मालकी तशी जमिनीवर सर्वांची मालकी असली पाहिजे." डॉ. लोहिया एके ठिकाणी म्हणाले होते की, विनोबांच्या या मार्गाने जमिनीचा प्रश्न सोडवायचा तर तीनशे वर्षे लागतील ! तेव्हा विनोबा म्हणाले, " वर्षात लाख एकर जमीन मिळाली. ह्या हिशोबानं खरं म्हणजे पाच कोटी एकर जमीन मिळायला पाचशे वर्षं लागतील असं त्यांनी म्हटलं असतं तरी वावगं झालं नसतं. पण ठिणगी पडायला युगं गेली तरी राख व्हायला युगं थोडीच लागतात ? " आणि याचा प्रत्यय सेवापुरीला लगेच आला. दोन वर्षांत पंचवीस लाख एकर भूदान

मिळवण्याचा संकल्प कार्यकर्त्यांनी केला. झाल्या कामाने तेवढा आत्मविश्वास त्यांच्यात निर्माण केला.

वैशाखी पौर्णिमा हा बुद्धाच्या जीवनातला एक अपूर्व दिवस. जन्माचा, साक्षात्काराचा व निर्वाणाचा. लखनौला त्या दिवशी विनोबा होते. ते म्हणाले, " हे भूदान म्हणजे देखील धर्मचक्रप्रवर्तनच होय. " विनोबांचे हे वाक्य कवींच्या हृदयात निनादले आणि—

धर्मचक्र फिरले, पडता एकाकी पावले,
एकाकी पावलामागुनी लक्षावधि चालले—

अशी गीते कंठाकंठांतून गर्जू लागली !

भूदानात मिळालेल्या जमिनींच्या वाटपाचे कामही सुरू झाले. भूमिहीनांचा पहिला हक्क. तिसरा हिस्सा तरी हरिजनांना मिळाला पाहिजे. ज्याला उपजीविकेचा दुसरा धंदा नाही त्याचा पहिला हक्क. सर्व गावकऱ्यांची जाहीर सभा घेऊन त्यात निवाडा केला जावा. ही जमीन विकण्या-गहाण ठेवण्याचा अधिकार नसावा.

एका सभेतली ही गोष्ट, जमीन कोणा कोणाला द्यायची याची चर्चा सुरू होती. एक गरीब हरिजन उभा राहून म्हणाला, " मला नको, त्या दुसऱ्याला आधी द्या. त्याची गरज माझ्याहून जास्त. त्याची कच्चीबच्ची, माझी मुलं त्या मानानं मोठी. करू मोलमजुरी आणि भरू पोट; पण त्याची गरज अधिक ! "

या उद्गारांनी सभा गहिवरली आणि आणखी जमीन दान मिळून सर्वच भूमिहीनांची सोय झाली. असे महाभारत विनोबांच्या पदयात्रेत घडत होते !

## पुढचे पाऊल

उत्तर प्रदेशातला हमीरपूर जिल्हा. बेतवा नदीचा काठ. त्यावरील मंगरौठ हे गाव. दिवाण शत्रुघ्नसिंह आणि त्यांच्या पत्नी राजेंद्रकुमारी हे त्या गावातले राष्ट्रीय चळवळीतले कार्यकर्ते. त्यांनी स्वतःची जमीन भूदानात द्यायचे ठरवले. गावकऱ्यांना त्यांनी कल्पना सांगितली. गावकरी म्हणाले, "तुमची सर्वांत मोठी जमीन गावात. ती तुम्ही देता तर आम्ही सर्वजणही देतो. सर्व गावच्या गावच दान होईल. ' सब भूमी गोपालकी ' असे विनोबा नाही

तरी म्हणतातच!' आणि विनोबांच्या हाती गावच्या सर्व लोकांच्या जमिनीची दानपत्रे आली. पहिले ग्रामदान झाले. विनोबा म्हणाले, "असा प्रसंग येईल अशी कल्पना मी केलेलीच होती." ग्रामदानात सर्व जमीन आली. व्यक्तिगत मालकी संपली म्हणजे ग्रामीण जीवनाच्या नवरचनेची वाट खुली झाली.

## फोल आक्षेप

भूदान यज्ञाला यश मिळू लागले तसे काही लोक अस्वस्थ होऊ लागले. एक भाबडे गृहस्थ म्हणाले, "तुमच्या या कामामुळं क्रांतीची धार बोथट होते."

विनोबा म्हणाले, "तुम्हांला दोन वेळचं जेवण मिळतं तरी तुमची क्रान्तीची तहान काही कमी झाल्याचं दिसत नाही! मग गरीबाला चार घास मिळाले की त्याची तहान लगोलग कमी होईल काय?"

केवळ उपासमारीने कधी क्रान्ती होत नसते. उपासमारीबरोबर विचार लागतो आणि शिवाय काही किमान त्राणही जनतेत लागते. असे किमान त्राण नसले तर उपासमारीत, बंगालच्या दुष्काळात लाखो माणसे टाचा घासून मेली तशी मरू शकतात—

एक कम्युनिस्ट कार्यकर्ते म्हणाले, "बडग्याशिवाय जमीनदार बदलायचे नाहीत!"

विनोबा म्हणाले, "मार्क्स काही तुमच्यामागं बडगा घेऊन लागलेला नव्हता ना?"

एके ठिकाणी विनोबा म्हणाले, "आजची समाजरचनाच चुकीची आहे. इथं चोरी करणाराला सजा आणि त्याच्या बापाला प्रतिष्ठा, अशी स्थिती आहे! चोराचा बाप परिग्रही असतो. अपरिग्रह न केला तर अपहार अटळ ठरतो. परिग्रह हा बाप आणि चोर हा मुलगा. मुलाला तुरुंगात पाठवायचं आणि बापाला बाहेर ठेवायचं, हा कुठला न्याय?"

## जीवनसमर्पण

उत्तर प्रदेशातून विनोबांनी बिहारकडे मोर्चा वळवला. बिहारबद्दल त्यांना मोठी आशा. बुद्ध-महावीरांचा हा प्रदेश. जयप्रकाशजींसारखा क्रान्तिकारी नेता भूदानाकडे आकृष्ट झालेला आणि साथ द्यायला सिद्ध झालेला.

भूदानामुळे देशाचा कायापालट होऊ शकेल असे लोकांना वाटू लागलेले. त्यामुळे कार्यकर्ते उत्साहाने कामाला लागले आणि एकरामागून एकराची दानपत्रे मिळू लागली. बत्तीस लाख एकर जमीन एकट्या बिहारात मिळवून बिहारमधील भूमिहीनता संपवता येईल, असे कार्यकर्त्यांना वाटू लागले! विनोबा अत्यंत निष्ठेने पदयात्रा करीत होते. एके ठिकाणी ते म्हणाले, "पहले मरे और पीछे गिरे—आधी मृत्यू यावा आणि मगच शरीर कोसळावे" अशी माझी मनोकामना आहे. त्यामुळे प्रकृतीची पर्वा न करता ते पदयात्रा करीतच राहिले. बिहारमध्ये चांडीलला त्यांना हिवतापाने येऊन घेरले तरी त्यांनी ध्यास सोडला नाही.

एकोणीसशे बावन्न साली बिहारात विनोबांनी प्रवेश केला. बत्तीस लाख एकरांची अपेक्षा वर्षभरात पूर्ण झाली नाही तरी बावीस लाख एकर मिळाले. विनोबांची अपेक्षा पूर्ण करता आली नाही याची जयप्रकाशांना तीव्र व्यथा होती. गयेला भरलेल्या सर्वोदय संमेलनात भाषण करताना त्यांनी जमिनीच्या प्रश्नासाठी आपण जीवनदान करीत असल्याचे जाहीर केले. त्याचा अद्भुत परिणाम झाला. दुसऱ्या दिवशी पहाटेसच विनोबांनी जयप्रकाशांकडे एक चिठ्ठी पाठवली.

श्री जयप्रकाश,

आपण काल आवाहन केले त्यानुसार, भूदानमूलक ग्रामोद्योगप्रधान अहिंसक क्रान्तीसाठी माझे जीवन समर्पण.

—विनोबा

विनोबांची ही चिठ्ठी जयप्रकाशांनी वाचून दाखवली आणि वातावरण अतिशय चैतन्यमय झाले. कामाचा वेग वाढला.

विनोबा १९५५ अखेरपर्यंत बिहारमध्ये राहिले आणि पुढे ते चैतन्य–रामकृष्ण– रवीन्द्रनाथांच्या बंगालकडे गेले.

## प्रेमयात्रा

बिहारमधून विनोबांनी आपल्याकडे यावे, असा ओरिसातील कार्यकर्त्यांचा मोठा आग्रह. श्री. गोपबंधू चौधरी, नबकृष्ण चौधरी, श्रीमती रमादेवी, मालतीदेवी हे अवघे कुटुंब गांधीजींच्या विचाराने अनुप्राणित झालेले. अंत्योदयाच्या

कल्पनेने झपाटलेले. आदिवासींच्या भल्यासाठी तळमळणारे. ओरिसात भू-दानाची चळवळ पसरू शकेल, मूळ धरील अशी त्यांची कल्पना. विनोबांना त्यांनी आग्रह केला आणि विनोबांनी जायचे मान्यही केले. जाताना बंगालमध्ये पंचवीस दिवसांची पदयात्रा झाली. एकोणीसशे पंचावनचे वर्ष बंगालमध्ये पदार्पण करताना उगवले. बंगालमध्ये झालेले स्वागत अपूर्व असे होते. रवीन्द्रांचे गीत मुली गात होत्या. अनुरूप अर्थाचे गीत.

**भेंगेछ द्वार एशछ ज्योतिर्मय तोमारि होक जय**
**हे विजयी वीर नवजीवनेर प्राते**
**नवीन आशार खड्ग तोमार हाते**

द्वार उघडून प्रवेश करणाऱ्या, हे तेजस्वी वीरा, तुझा जयजयकार असो. नवजीवनाने पूर्वदिशा फटफटत असताना नव्या आशांचे खड्ग घेऊन तुझे आगमन झाले आहे.

रामकृष्ण परमहंस, चैतन्य आणि रवीन्द्रनाथ यांचे स्मरण विनोबांनी लोकांना पुनःपुन्हा करून दिले. विवेकानंदांनी भारताला ' दरिद्रनारायण ' हा शब्द दिला, आणि त्यांची सेवा हीच ईश्वरसेवा हे प्रत्यक्ष कृतीने शिकवले. रामकृष्ण मिशनची स्थापना केली. बंगालला फाळणीच्या वेदना झोंबत होत्या. निर्वासितांचा फार मोठा प्रश्न उभा होता. कलकत्त्यात ऐश्वर्य आणि विपन्नता शेजारी शेजारी वावरत होती ! बंगाली मनुष्य भावनाशील. ह्या सर्व प्रकाराने त्याचे मन ताळ्यावर नव्हते. विनोबांनी भक्तीला ज्ञानाने डोळस करावे आणि कार्याने सगुण-साकार करावे असे सांगितले.

पंचवीस दिवसांचा टप्पा पूर्ण करून विनोबा ओरिसात आले.

## बारावे व्रत

गांधीजींच्या प्रार्थनेत अकरा व्रतांचा समावेश आहे. विनोबांचे म्हणणे, अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, असंग्रह, अस्वाद, अभय, शरीरश्रम– ही मुख्य आठ व्रते; सर्वधर्म-समभाव, स्वदेशी, आणि स्पर्शभावना ही तीन उपव्रते; यांच्या जोडीला ' अनिंदा ' ह्या आणखी एका व्रताची भर घालण्याची फार आवश्य-कता आहे. निंदेपायी सगळ्या जगभरचा कचरा आपल्यापाशी जमा होतो !

## तीन शक्ती

वेदान्तो विज्ञानं विश्वासश्चेति शक्तयः तिस्रः ।
यासां स्थैर्ये नित्यं शान्तिसमृद्धिः भविष्यति जगति ॥

वेदान्त, विज्ञान आणि विश्वास या तीन शक्ती जगात एकत्र आल्या तर जगात शान्ती आणि समृद्धी कायम राहील. वेदान्त याचा अर्थ वेद, बायबल, कुराण यांचा अंत, भिन्न भिन्न पंथ, धर्म यांचा अंत.

## सौम्य–सौम्यतर–सौम्यतम

जगन्नाथपुरीला १९५५ च्या मार्चमध्ये सातवे सर्वोदय संमेलन भरले. विनोबांच्या प्रेरक सहवासाच्या ओढीने देशभरातून हजारो कार्यकर्ते संमेलनाला येत. सर्वोदय संमेलनातला विनोबांचा कार्यक्रम म्हणजे कर्मयोगाचा पदार्थपाठच असे. पहाटे प्रार्थनेनंतर आणि सायंकाळी प्रार्थनेनंतर एकेका प्रान्तातील मंडळींशी विनोबांच्या चर्चा होत. विनोबा हजारो कार्यकर्त्यांना ओळखत. त्यांचे कुशल-वृत्त विचारत. त्या त्या प्रांताची विशिष्ट परिस्थिती ध्यानी घेऊन विनोबा त्यांच्याशी बोलत. संमेलनात त्यांची भाषणे होत ती वेगळीच, विनोबा पुरीच्या संमेलनात म्हणाले, "१७५७ मध्ये प्लासीची लढाई आणि आपली गुलामगिरी सुरू झाली. शंभर वर्षांनी १८५७ मध्ये या गुलामगिरीविरुद्ध पहिला मोठा उठाव झाला. आता १९५७ जवळ येत आहे. येती दोन वर्षं सर्वांनी भूदानाच्या कामावर लक्ष केन्द्रित करून आर्थिक क्रान्तीपाशी अडलेला रथ जोराने पुढे न्यावा. शान्ततामय मार्गानं समाजरचना बदलण्याचा हा एक मोठा प्रयोग आहे. हिंसक युद्धात तीव्र, तीव्रतर, तीव्रतम अशी चढत्या क्रमाने शस्त्रे वापरतात. सत्याग्रहाचा मार्ग वेगळाः त्यात उत्तरोत्तर सौम्य, सौम्यतर, सौम्यतम साधने वापरली जातील."

सत्तावन्न जवळ आल्याची उत्साही जाणीव घेऊन कार्यकर्ते परतले. तरुणांमध्ये विशेष चैतन्य निर्माण झाले. स्वातंत्र्याची परिणती समतेत करता न आली तर स्वातंत्र्यही टिकत नाही. भूदानाच्या निमित्ताने ह्या समतेच्या चळवळीला गती येत होती.

## कोरापूट

विनोबा ओरिसात पोचण्यापूर्वी कोरापूट ह्या आदिवासींच्या जिल्ह्यात सव्वीसवर ग्रामदाने झाली होती. त्यामुळे कोरापूटची विनोबांना विशेषच ओढ

होती. पण दिवस पावसाळ्याचे. प्रदेश जंगलांचा. पण विनोबा त्या सर्वांची तमा न बाळगता तिकडे निघाले. गांधी–विनोबांची माणसे ही आदिवासींकडे प्रेमाने जाणारी पहिली माणसे ! तत्पूर्वी लोक जात ते त्यांना लुटायला. सरकारी नोकर आणि ठेकेदार यांचा त्या भागात वावर. ह्या गरीब–भाबडया लोकांना ते खुशाल लुटत–नाडत. हे सर्व पाहून कार्यकर्ते दुःखी कष्टी होत. स्वातंत्र्यानंतर अर्धे तप होऊनही त्यांची स्थिती पालटली नव्हती ! ओरिसाची जंगले ' आमागारे भूमिहीन कोई रहिबे नाही, रहिबे नाही ' अशा घोषणांनी दुमदुमू लागली. ' आपल्या गावाचे एक कुटुंब करायचे ' ही कल्पना आदिवासींना सहजच मानवली. मानपूर हे ओरिसातले पहिले ग्रामदान. त्यानंतर ग्रामदानांचा वर्षाव झाला. सहाशे ग्रामदाने ह्या एका सलग पट्ट्यात झाली ! विनोबा म्हणत, " या छोट्या मानपूरचं आक्रमण आता ऑस्ट्रेलियावर होईल. आपण त्यांना सांगू की, चीन–जपानसाठी तुमचे दरवाजे आता उघडा. अमेरिका, कॅनडा, रशिया आणि आफ्रिका यांनाही आपण तसं सांगू शकू. अवघं जग हाच एक घटक आता मानावा लागेल. पण जगाचं कुटुंब म्हटल्यानं वस्तू अव्यक्त होते, चटकन ध्यानी येत नाही. ग्राम हे प्रत्यक्ष असतं. त्याचं एक कुटुंब सहज समजतं, प्रत्यक्षात जाणवेल अशा पद्धतीनं करता येतं. "

शहरी लोकांना ग्रामदान हे एक कोडे वाटे. एका प्राध्यापकाने एका ग्रामदानी गावच्या व्यक्तीला विचारले तेव्हा तो फटकळपणे म्हणाला, " देवानं अक्कल वाटली तेव्हा ग्रामीण लोक चाळण्या घेऊन गेले होते असं का तुम्हांला वाटतं ? आम्हांला आमचं हित–अनहित कळतं. शहरांनी आम्हांला नागवण्याचं जे काम चालवलं आहे ते थांबवायचं तर ग्रामदान हाच त्यावर तोडगा आहे. आम्ही पिकवतो आणि उपासमार कंठतो, शहरवाले दाणादेखील पिकवत नाहीत, पण पोट भरून ढेकरा देतात ! हे थांबवायचं तर ग्रामदान हाच त्यावर तोडगा आहे. "

## तुम्हांलाही शिकवीन

ओरिसाच्या भावजीवनाच्या घडणीत जगन्नाथदास यांच्या भागवताचा वाटा मोठा. विनोबांच्या विवेचनात जगन्नाथदासाचे भागवतच जणू प्रतिध्वनित होई.

एकदा बोलण्याच्या ओघात विनोबा म्हणाले, " भागवत म्हणजे रसांची

खाण. जगन्नाथदासांचे भागवत तुम्ही वाचता तसं एकदा संस्कृत भागवतही वाचा. अपूर्व असा भक्तिरस तुम्हांला चाखायला मिळेल. जगन्नाथांचं भागवत तुम्हांला त्या भागवताकडे नेईल. ”

परंपरागत विचारात गुरफटलेल्या त्या भाबडया मनांनी विचारले, “ आम्ही ते भागवत वाचू–शिकू शकतो ? ”

“ का ? काय अडचण आहे ? ”

“ आम्हांला आहे अधिकार ? ”

“ हो, मी शिकवीन तुम्हांला. ”

त्या आदिवासींना यामुळे अपार आनंद झाला आणि, विनोबा व्यथित झाले ! ज्ञानापासूनदेखील या लोकांना असे वंचित ठेवले गेले, ही गोष्ट त्यांना फार बोचली !

## साठ वर्षे पूर्ण

११ सप्टेंबर १९५५. विनोबांची पदयात्रा ओरिसातून चालली होती. रूढ कल्पनांप्रमाणे विनोबांची षष्ठयब्दपूर्ती समारंभपूर्वक करावी असे त्यांच्या कित्येक चाहत्या व मित्रांना वाटत होते. विनोबांनी सांगितले की, कागदोपत्रीच्या गौरवात काय ठेवले आहे ? भूदानाचे, ग्रामदानाचे कार्य जमिनीवर उमटेल तो खरा गौरव. विनोबाजींनीच मोडता घातल्यामुळे मंडळी चूपचाप झाली; पण वाढदिवसाच्या दिवशी आपल्या शुभेच्छा व्यक्त करण्यासाठी जयप्रकाशजी ओरिसात आले. त्यांना राहवलेच नाही.

विनोबा नित्याप्रमाणे पहाटे अडीच वाजता उठले. हळूहळू त्यांच्या कंठातून मंजुळ, मधुर, प्रबोधक शब्द उमटू लागले. तासभर विनोबांचा अभिनव असा हा स्वाध्याय चालला.

साडेतीन वाजता मंडळी जमली. उडिया भाषेतून ईशावास्याचा पाठ झाला. ‘ इहलोकी कर्मे करीत करीत शंभर वर्षं जगण्याची इच्छा धरावी, तुला देहवंताला हाच मार्ग आहे, याहून वेगळा मार्ग नाही. मनुष्याला कर्म चिकटत नाही, फलवासना मात्र चिकटते... जो निरंतर आत्म्यात सगळी भूते आणि सगळ्या भूतांत आत्मा पाहतो, तो मग कोणालाही आणि कशालाही कंटाळत नाही. ’ हे ईशावास्याचे श्लोक जणू विनोबांच्या रूपाने समोर समूर्त आणि साकार झाल्यासारखे वाटत होते ! ‘ ज्याने सगुण साकार केले त्याने देव

मूर्तिमान केला' ह्या म्हणण्याचा प्रत्यय येत होता. प्रार्थना संपली आणि पावणेपाचला 'राधारमण गोविंद हर 'चा घोष करीत विनोबांनी कूच केले. पाऊस पडून गेला होता. चिखलातून चालावे लागत होते. विनोबा बरोबरच्या मंडळींशी हास्यविनोद करीत होते. म्हणाले, "चिखलातून चालण्याचे तीन फायदे होतात: चिखलातून चालताना जास्त व्यायाम होतो, हा पहिला फायदा. पायांना मालीश होतं हा दुसरा फायदा, आणि निसर्गोपचारपद्धतीप्रमाणं पायांना मातीचा लेप बसतो हा तिसरा फायदा!" अशा हास्यविनोदात ही यात्रा आनंदाने चालायची.

विक्रमपूरच्या दिशेने मंडळी निघाली होती. उजाडता उजाडता एका पुलावर जयप्रकाशजी शुभेच्छा व्यक्त करण्यासाठी आतुरतेने उभे होते. प्रभावतीही बरोबर होत्या. त्यांनी प्रणाम केला आणि तेही यात्रिकांत मिसळून गेले.

साडेआठ वाजता विक्रमपूरमध्ये एक घरगुती, छोटासा कार्यक्रम झाला. ओरिसातील एक ज्येष्ठ कार्यकर्ते गोपबंधू चौधरी यांनी शुभचिंतन केले. जयप्रकाशांच्या तोंडून शब्द उमटत नव्हता, पण कसेबसे ते बोलले. असे ते मंगल वातावरणातील शुभचिंतन! विनोबा शतायू व्हावेत अशी सर्वांची सदिच्छा.

## पास-नापास

विनोबांनी आयुष्याचेही एक गणित बसवले आहे. विक्रमपूरच्या शुभचिंतनाच्या सभेत त्यांनी ते मांडले. म्हणाले, "आयुष्याच्या पहिल्या पन्नास वर्षांपर्यंत प्रत्येक वर्षाला अर्धा मार्क, एकावन ते पंचाहत्तर दर वर्षाला एक मार्क, आणि शहाहत्तर ते शंभर ह्या शेवटच्या वर्षांना दर वर्षामागं दोन मार्क, या हिशोबानं ज्यानं साठी ओलांडली त्याला पहिल्या पन्नास वर्षांचे पंचवीस मार्क आणि नंतरच्या दहा वर्षांचे दहा मार्क,– असे पसतीस मार्क मिळून तो जेमतेम काठावर पास!"

आपल्या एकसष्टीच्या दिवशी विनोबांनी हा हिशोब लोकांना सांगितला, आणि आपण जेमतेम काठावर पास झालो आहोत असे त्यांनी जाहीर केले! विनोबांच्या आयुष्याची पंचाहत्तर वर्षे होतील तेव्हा त्यांना फक्त पन्नास मार्क मिळून दुसऱ्या श्रेणीत ते उत्तीर्ण झाले असे ह्या हिशोबाने ठरेल! यापुढील

प्रत्येक वर्षाला मात्र दोन मार्क मिळतील. विनोबा एकशे एक टक्क्यांवर मार्क मिळून उत्तीर्ण व्हावे असेच कोणीही इच्छील !

## साम्यसूत्रे

गीता साम्ययोगाचा संदेश देते असे विनोबांचे विवेचन आहे. गीतार्थाचे त्यांचे चिंतन सतत चालू असते. या चिंतनासाठी गीतेची साप्ताहिक आवृत्ती करण्याचे वेळापत्रक त्यांनी गांधीजींना तयार करून दिले होते. त्यानंतर गीतेत आलेल्या विषयांचे सहज चिंतन घडावे म्हणून त्यांनी ' एक ऐतिह्य-कथन, दोन दैन्य-प्रदर्शन ' अशी एक मालिका तयार केली होती. तिचाही आधार गीता-तत्त्वचिंतनासाठी अनेकांना झाला. कोरापूटमधील रमणीय सृष्टीचे सान्निध्य आणि एकान्त यामुळे विनोबांना आपल्या जीवनाचा आदर्श सूत्र-रूपात ग्रथित करावा असे वाटले. योग-सूत्रासारख्या सूत्रांची रचना विनोबांना त्यातून स्फुरली. अशा सूत्रांचा अध्ययनाला खूप उपयोग होतो. विनोबांनी संस्कृतमध्ये एकशे साठ सूत्रांची रचना केली आहे. एका अर्थाने गीतेच्या मंथनातून वर आलेली, पण स्वतंत्र अशी ही सूत्रे आहेत. ग्रामदानाला कोरापूटने स्थिरता आणली हे जसे खरे, तसे ही साम्यसूत्रे तेथे रचली गेली हेही कोरापूटचे संस्मरणीयत्व म्हणावे लागेल ! वेद, गीता, ब्रह्मसूत्रे, भागवत, मनुस्मृती, संत-वाङ्मय यांचे निनादही या सूत्रांत आहेत. दोन महिने या सूत्रांच्या परिष्करणात विनोबांनी खर्च केले, आणि मग ही साम्यसूत्रे प्रकाशात आली. भारतीय जीवनातले सर्व नवनीत या साम्यसूत्रांत साठवले आहे. आधुनिक काळातील अपूर्व अशी ही रचना आहे.

म्हैसूरला देशातील शांति-सैनिकांचे शिबिर भरले होते. त्या शिबिरा-तील व्याख्यानात ' संयतेन स्वैरम् ' या एका सूत्राचा विनोबांनी उल्लेख केला तेव्हा कार्यकर्त्यांना वाटले, विनोबा या सूत्रांचे मर्म समजावून सांगतील तर काय बहार होईल. आणि त्यानंतर चार दिवस विनोबांनी काही निवडक सूत्रांचे विवेचन केले : ' अभिध्येयं परम् साम्यम् ' हे पहिले सूत्र त्यांनी विवरले तेव्हा त्याची गोडी आणि खोली लोकांच्या ध्यानी आली. जीवनाची दिशा म्हणजे अभिध्येय. हे ध्येय नुसते साम्य नाही तर परम साम्य हे आहे. आर्थिक, सामाजिक साम्य तर अभिप्रेत आहेच, पण मानसिक साम्यसुद्धा त्यात अपेक्षित आहे. ह्या तीन साम्यांतून परम साम्याचा सहज साक्षात्कार होतो.

ही साम्यसूत्रे आणि त्यांतील काही सूत्रांचे विनोबांनी केलेले विवेचन ही एक अपूर्व रचना आहे. या सर्वच एकशे आठ सूत्रांचे विवेचन विनोबांनी उपलब्ध करून द्यावे, अशी स्वाभाविक इच्छा व्हावी, असा इसारच म्हैसूर राज्यातील त्या चार-पाच प्रवचनांनी दिला.

## आंध्रकडे

ओरिसातून विनोबा आंध्रात आले. पोतना हा आंध्रचा एक भक्त कवी. त्याने तेलुगूत भागवत लिहिले. त्याचे ते भागवत अति लोकप्रिय. विनोबांनी आंध्रात प्रवेश करताच त्याच्या भागवताचा अभ्यास सुरू केला. त्यांच्या विवेचनात पोतना हळूच डोकावे आणि लोकांच्या हृदयांची कवाडे किलकिली होत. पोतना हा साधा शेतकरी होता. भक्तिभावाच्या उमाळ्याने त्याने तेलुगू भागवत रचले. त्याला कोणी सुचवले की राजाला ग्रंथ अर्पण कर, तू मालामाल होशील. पण त्यांने सांगितले, माझा ग्रंथ देवासाठी. त्यालाच तो अर्पण. असा हा पोतना ! जनतेच्या हृदयाचा स्वामी. त्याच्या भाषेत विनोबा सांगू लागले की हृदयाची ते पकड घेत असे.

आंध्रात कम्युनिस्टांचा बराच जोर. निवडणुकीतही त्यांना चांगले यश मिळालेले. पण त्यांनीदेखील आपल्या जाहीरनाम्यात वीस एकर पाण्याखालची जमीन ठेवण्याला मुभा द्यायची घोषणा केलेली ! विनोबा म्हणत, " ही कमाल-मर्यादा म्हणजे विषमता कायम ठेवण्याची हमीच आहे ! जमीन गावाची करतो म्हणणे ही खरी क्रान्ती. " पुढे एका ठिकाणी कम्युनिस्टांना ते म्हणाले, " तुमची हुकुमशाही रोख आणि शासनविहीन राज्य उधार आहे ! "

## परदेशीयांना आकर्षण

युद्धांनी पोळलेल्या युरोपातील, अमेरिकेतील, आशियातील मंडळींना विनोबांच्या या चळवळीचे मोठे आकर्षण. अधूनमधून ही परदेशी मंडळी विनोबांकडे येत व त्यांच्याशी चर्चा करत. पदयात्रेत त्यांच्याबरोबर राहत. भाषेची अडचण असली तरी त्यांच्या हृदयाला काही तरी जाणवतच राही.

एकदा युद्धासंबंधी चर्चा निघाली. तेव्हा एक अमेरिकन म्हणाला,

"युद्धासाठी लागणारी शस्त्रास्त्रं बनवणं हा आमच्याकडे एक मोठा उद्योग आहे. लाखो लोकांना रोजगार त्यातून मिळतो."

विनोबा म्हणाले, "शस्त्रास्त्रांच्या कारखान्यांतूनच जर रोजगार मिळत असेल तर ते कारखाने खुशाल चालू ठेवा व लोकांच्या पोटापाण्याची सोय करा. बेकारांना काम तर मिळालंच पाहिजे. पण दरवर्षी ख्रिस्तजयंतीला सर्व शस्त्रास्त्रं समुद्रात बुडवून टाकीत जा, आणि दुप्पट उत्साहानं हाच उद्योग सतत चालू ठेवा!"

## तमिळनाडूत

आंध्रानंतर विनोबा तमिळनाडूमध्ये गेले. तिरुवल्लुवर हा तमिळ वेदाचा जनक. तो हरिजन होता. पण त्याची वचने अतिशय मार्मिक. लोकांच्या हृदयांवर कोरलेली. विनोबांच्या भाषणात लोकहृदयात सुप्रतिष्ठित झालेली ही वचने सहज ओघाने येत, तेव्हा लोकांचा उत्साहपूर्ण प्रतिसाद मिळे.

त्रिचनापल्लीच्या मुक्कामात विनोबा द्रविड कळघमचे वयोवृद्ध नेते श्री रामस्वामी नायकर यांना अगत्याने भेटले. त्यांच्याशी मनमोकळी चर्चा केली. विनोबा जाहीर सभेत लोकांना उद्देशून म्हणाले, "तमिळ लोकांनी हिंदी उत्साहानं शिकावं. तरच त्यांना भारतीय जीवनावर आपली काही छाप पाडता येईल. शंकर, रामानुज दक्षिणेतले. पण त्या काळची राष्ट्रभाषा संस्कृत. ती ते आवडीने शिकले, आणि साऱ्या भारतावर आपली छाप पाडू शकले. अवघ्या भारताचं त्यांच्यावर प्रेम. प्रेमसंग्रहासाठी भाषा शिकायच्या असतात, प्रभुत्व गाजवण्यासाठी नव्हे! तमिळनाडूचे लोक प्रेमळ आहेत. त्यांनी प्रेमसंग्रहासाठी हिंदी आणि इतर भारतीय भाषांचा अभ्यास करावा. इतरांच्या भाषा आपण न शिकू तर त्यात त्यांचं काहीच नुकसान नाही, आपलंच आहे. तेव्हा भारता-सारख्या मोठ्या देशात राहायचं तर अनेक भाषा शिकायची तयारी ठेवली पाहिजे."

दक्षिण हे भक्तीचे आगर, पण आता भक्ती ओसरत चालली आहे. नव्या पिढ्यांत भक्तिभाव नाही असे कोणी म्हणाले तेव्हा विनोबा उद्‌गारले, "आस्तिकांच्या करुणाशून्य वृत्तीतूनच नास्तिकतेचा उदय होतो. मानवसेवा हीच भक्ती हे ओळखून आस्तिक म्हणवणारे लोक करुणेचे कार्य करतील तर नास्तिकता आपोआपच कमी होईल."

## मदुराईत ग्रामदाने

मदुराई जिल्ह्यात गांधीग्राम म्हणून एक चांगले केंद्र आहे. गांधी विचारांचे अनेक कार्यकर्ते या जिल्ह्यात. जगन्नाथन हे तरुण भूदान-ग्रामदानाच्या कल्पनेने भरलेले. निरलस, निरहंकार. आपल्या तरुण सहकाऱ्यांच्यासह त्यांनी जोमाने ग्रामदान कल्पना पसरवण्याचा खटाटोप केला. कावेरी नदीच्या परिसरात ग्रामदाने मिळाली. ही ग्रामदाने आदिवासी भागातली नव्हती. त्यामुळे त्यांचे एक आगळे महत्त्व होते. पाच-पाच, सात-सात हजार एकर भावाची जमीन-देखील दात्यांनी ग्रामदानात दिली. ही गावे संमिश्र वस्तीची. भिन्न जाति-धर्मांच्या लोकांनी ग्रामदाने दिलेली. ग्रामदानानंतर खादी, ग्रामोद्योग, जातिभेद-निरसन, व्यसनमुक्ती, व मूलोद्योग शिक्षण यावे आणि गावची प्रथा फाकावी अशी स्वाभाविकच अपेक्षा असे. 'व्यापक चिंतन व विशिष्ट सेवा' असा आपला मार्ग असल्याचे विनोबा सर्वत्र सांगत. सेवा गावाची आणि विचार विश्वाचा केल्याशिवाय आधुनिक विज्ञानाच्या जगात तरणोपायच नाही, असे विनोबा जागजागी सांगत. तमिळनाडूमध्ये साडेतीनशेवर ग्रामदाने झाली तेव्हा लोकांना तो एक चमत्कारच वाटला.

## थोरांचे आशीर्वाद

विनोबाजींची पदयात्रा तमिळनाडमध्ये होत होती. राजाजी वृद्ध असले तरी सर्व गोष्टी बारकाईने पाहणारे. विनोबांच्या पदयात्रेचा प्रभाव त्यांनाही जाणवला. ते मोकळेपणाने म्हणाले, "तमिळनाडू अहिल्येप्रमाणे जडवत, नास्तिक, भक्तिशून्य जणू झाला होता. विनोबा आले आणि परिस्थिती किती पालटली !"

पांडेचेरी हे योगी अरविंदांचे स्थान. विनोबा पांडेचेरीला गेले. रामकृष्ण, अरविंद, आणि गांधी— या तिघांचा भारतावर मोठा प्रभाव. अतिमानस अवस्थेला माणसाने पोचल्याशिवाय त्याचे प्रश्न सुटणार नाहीत असे अरविंदांचे म्हणणे. 'मन मावळो, तृष्णा जिरो, भूतदया पसरो' असे विनोबाही नित्य प्रार्थनेत म्हणत. अरविंदाश्रमातच विनोबा राहिले. माताजींनी त्यांना आशीर्वाद दिला.

प्रार्थना प्रवचनात विनोबा सांगत, "अण्वस्त्रांच्या युगात मनाच्या वर आपण उठलं पाहिजे. अतिमानस भूमिका गाठण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

मानसिक भूमिकेच्या वर आपण न जाऊ तर आपण विनाश आणि विध्वंस ओढवून घेऊ. "

एकाने विचारले, " श्री अरविंदांचं ठीक आहे, पण सर्वसामान्यांना हे कसं जमणार ? "

विनोबा म्हणाले, " रशियन कुत्री लायका अंतराळात जाते, मग माणसा-सारख्या माणसांनी कच का खावी ? "

## तीन अलवारांची गोष्ट

महाराष्ट्रात जसे पंढरपूर तसे दक्षिणेत श्रीरंगम. रामानुज, नम्मालवार यांसारखे संत तिकडे झाले. अशा अनेक संतांच्या गोष्टी सहृदयतेने विनोबा सांगत असतात. श्रीरंगमला त्यांनी तीन अलवारांची गोष्ट सांगितली.

पावसाळ्याचे दिवस होते. रात्रीची वेळ. मुसळधार पाऊस पडत होता. एका छोट्याशा खोलीत एक अलवार कसाबसा आडवा झाला होता. एवढयात दारावर टकटक वाजले. बाहेरून आवाज ऐकू आला, " बाबा रे, रात्र अंधारी आहे. बाहेर पाऊस कोसळत आहे. रात्रीपुरती जागा मिळेल का ? "

खोलीतला अलवार म्हणाला, " ये बाबा, एकाला झोपण्यापुरती इथं जागा आहे; पण दोघांना बसता येईल. ये, आपण दोघं बसून रात्र काढू तुला पावसात, अंधारात निवारा होईल. "

बाहेरचा माणूस आत आला, आतला झोपलेला उठून बसला. दोघे बसून रात्र काढू लागले. एवढयात पुन्हा दारावर टकटक वाजले. " बाबा रे, रात्र अंधारी आहे. पाऊस कोसळतो आहे. रात्रीपुरतं घ्याल मला घरात ? "

आतले अलवार म्हणाले, " एकाला झोपण्यापुरती जागा असली तर दोघं तिथं बसू शकतात, आणि दोघांना बसायला जी जागा पुरते तिच्यात तिघांना उभं राहता येईल. तेव्हा ये आत, आपण तिघेजण उभे राहू, आणि रात्र काढू. "

त्या तिघा अलवारांनी उभ्याने ती पावसाची रात्र काढली ! असे असत अलवार. दक्षिणेतले संत. तपश्चर्या हीच त्यांची संपत्ती, हाच त्यांचा वारसा. संतांकडून भारताला ही संपत्ती वारशाने मिळाली आहे. भूदान-ग्रामदान म्हणजे ह्या वारशाचे रक्षण !

हे सर्व सांगताना विनोबांच्या डोळ्यांतून घळघळ अश्रुधारा वाहू लागल्या.

## रामानुज आणि मंत्र

संतांच्या कथा विनोबांच्या जिभेवर सतत असतात. त्यांच्या विवेचनात त्या सहज ओघाने येतात. जीवनावर प्रकाश टाकणाऱ्या कथा! भारतातल्या सर्व संतांच्या जीवनाचे विनोबांनी किती सखोल परिशीलन केले आहे त्याची ओळख करून देणाऱ्या ह्या कथा. गोड आणि मार्मिक.

रामानुज हजार वर्षांपूर्वी झाले. रामानुजांच्या गुरूंनी त्यांना एक मंत्र दिला. गुप्त मंत्र. इतरांना न सांगण्याचा. पण मुक्ती देणारा.

रामानुजांनी जाहीरपणे त्या मंत्राचा उच्चार केला. एवढेच नव्हे तर ज्या कोणाला तो मंत्र हवा असेल त्यांना देण्याचीही तयारी त्यांनी दाखवली. झाले, अनेकांनी तो मंत्र घेतला. ही बातमी गुरुजींच्या कानी गेली. त्यांनी रामानुजांना तातडीने पाचारण केले. रामानुज आले. विनम्रपणे गुरुजींपुढे उभे राहिले. गुरुजी अस्वस्थ होते. रागात होते. ते म्हणाले, " गुप्त मंत्र प्रकट करू नकोस म्हणून मी तुला बजावलं होतं की नाही ? "

रामानुज नम्रपणे म्हणाले, " होय गुरुजी; आपण तसं बजावलं होतं खरं. "

" तरीही तू जाहीरपणं तो मंत्र लोकांना दिलास ? "

" अपराधाची क्षमा करावी, गुरुजी. "

" क्षमा कशाची ? गुरुजींची तू अवज्ञा केलीस, तू नरकात जाशील ! " गुरुजी रागावून म्हणाले.

रामानुज नम्रपणे म्हणाले, " गुरुजी, ज्यांनी तो मंत्र माझ्याजवळून घेतला तेही नरकात जातील ? "

गुरुजी म्हणाले, " ते कसे नरकात जातील ? ते नरकात जाणार नाहीत. "

गुरुजींच्या ह्या उत्तराने रामानुज आनंदले. म्हणाले, " गुरुजी, त्या मंत्रामुळं लोकांचं भलं होणार असेल तर मी नरकात जायला तयार आहे ! "

रामानुजांच्या या भावनेमुळे गुरुजी प्रसन्न झाले.

अशा किती तरी गोष्टी विनोबाजी रंगून सांगतात.

## कम्युनिस्टांच्या राज्यात

लोकशाहीच्या, निवडणुकांच्या मार्गाने कम्युनिस्ट सरकार अधिकारावर आलेले केरळ हे पहिले राज्य. विनोबा तमिळनाडूमधून केरळ राज्यात आले. मुख्यमंत्री नंबुद्रीपाद यांनी विनोबांचे स्वागत केले. केरळ हे एक निसर्गरम्य असे राज्य आहे. विनोबांना केरळचे आकर्षण होते ते मुख्यतः आद्य शंकराचार्यांची ती जन्मभूमी म्हणून. केरळमध्ये हिंदू, खिस्ती आणि मुसलमान अशा तिन्ही धर्मांचे लोक. विनोबा वैकोमच्या सत्याग्रहाच्या निमित्ताने पूर्वी केरळात येऊन गेले होते.

केरळच्या मुख्य मंत्र्यांनी विनोबांचे स्वागत केले तेव्हा विनोबा म्हणाले, "भूमीच्या स्वामित्वाचं संपूर्ण निराकरण होऊन खरं म्हणजे अवघं केरळ राज्यच दान व्हायला हवं !" पण कम्युनिस्ट पक्षाच्या निवडणूक जाहीर-नाम्यात त्याचा उल्लेखही नव्हता. वीस एकरांपर्यंत बागायती जमीन ठेवण्याचा अधिकार द्यायला कम्युनिस्टांची ना नव्हती. ही कमाल मर्यादा एवढी मोठी होती की, त्यामुळे गरीबांची भूक भागवण्याला पुरेशी जमीन मिळण्याचा संभव नव्हता, समता निर्माण होण्याच्या दृष्टीने फारसे पुढे पाऊल पडणार नव्हते की, उत्पादनाच्या मूलभूत महत्त्वाच्या साधनावरील स्वामित्वाचे निराकरण होणार नव्हते. साम्ययोगी विनोबा आणि साम्यवादी सरकार यांच्या भूमिकेतील हा फरक ध्यानात घेण्यासारखा होता !

## मिशनऱ्यांशी चर्चा

केरळमध्ये जवळपास तीस टक्के लोक ख्रिश्चन आहेत. राज्यसत्तेच्या आधाराने तिथे ख्रिश्चन धर्म आलेला नाही. त्यामुळे खिस्ती धर्माबरोबर इतरत्र जो बाह्य फरक कपड्यांत वगैरे आला तो केरळात आला नाही. तिथला ख्रिश्चन कोठल्याही बाह्य उपाधीमुळे इतरांहून वेगळा दिसत नाही. विनोबांनी शेजाऱ्या-वर प्रेम करण्याचा येशूचा संदेश परोपरीने लोकांना समजावून सांगितला. येशूच्या वचनांचा उल्लेख त्यांच्या विवेचनात वारंवार येई. खिस्त चरितातले अनेक मधुर प्रसंग ते सांगत.

विनोबांना भेटायला खिस्ती मिशनरी येत. एकदा एक खिस्ती मिशनरी आले. विनोबांना म्हणाले, "तुमचं भूदानाचं काम आम्हांला पसंत आहे. पण

स्वामित्व हिरावून घेणारं जे ग्रामदान ते काही आमच्या विचारात बसत नाही. स्वामित्व ही आम्ही एक पवित्र गोष्ट मानतो. आमच्या धर्मग्रंथात तसा निर्देश आहे. ”

विनोबा म्हणाले, “ भूदान हे तर ख्रिस्ताचंच काम आहे. येशू शत्रूवरसुद्धा प्रेम करायला सांगतो. मी म्हणतो, शेजाऱ्यावर प्रेम करा, शत्रूवरही प्रेम करा आणि परस्परांवर प्रेम करा. प्रेम शेवटी वस्तुरूपानंही व्यक्त होतं. त्याशिवाय त्याला अस्तित्वच नाही. तेव्हा भू-दानाला तुमचा पाठिंबा गृहीतच आहे. किंबहुना हे तुमचंच काम आहे. ”

“ पण मालकी हक्काचं विसर्जन ? ”

“ येशूनं सांगितलं आहे की एक वेळ सुईच्या नेढ्यातून उंट जाऊ शकेल, पण परिग्रहीला काही ईश्वराच्या राज्यात प्रवेश मिळणार नाही ! तेव्हा फार मोठी संपत्ती ही ख्रिस्ती धर्मात बसत नाही. तेव्हा मर्यादित संपत्तीलाच येशूची अनुमती आहे. ही संपत्ती कोणी स्वकष्टानं संपादन केली असेल तर ती जबरदस्तीनं काढून घेणं योग्यही होणार नाही. खाजगी मालकी पवित्र तर खरीच, पण ती स्वेच्छेनं सोडून देणं पवित्रतर आहे ! स्वेच्छा त्याग करण्याला कुठल्याही धर्माची आडकाठी असू शकत नाही. ख्रिस्ती धर्माचीही आडकाठी असणार नाही. मी तर भू-दान स्वेच्छेनं मागतो, ग्रामदानही स्वेच्छेनंच मागतो. तेव्हा त्यात धर्माला अमान्य व्हावं असं काहीच नाही. संग्रह हा चोरीचा बाप आहे. चोरी जर पाप, तर संग्रह हेही पाप; आणि अशा पापातून कसं सुटावं ते सांगणं हे तर धर्माचं कामच आहे. ”

विनोबांचे हे विवेचन इतके नेमके होते की, ख्रिस्ती पुरोहितांनाही ग्रामदान मान्य करण्यावाचून गत्यंतर नव्हते.

केरळ हा अतिशय दाट लोकवस्तीचा भाग. जमीन फार भारी, पण तेथे भू-दानच नव्हे तर ग्रामदानेही झाली.

## शंकराचार्यांच्या जन्मस्थानी

कालडी हे शंकराचार्यांचे जन्मस्थान. कालडीलाच १९५७ चे सर्वोदय संमेलन घेतले जावे असे विनोबांनी सुचवले. स्वाभाविकच ते लोकांनी मान्य केले. एकोणीसशे सत्तावनशी भूमिक्रान्ती विनोबांनी निगडित केली होती. त्यामुळे अनेक अपेक्षा निर्माण झाल्या होत्या. जमिनीवरील स्वामित्व आता

टिकणार नाही, असे वातावरण देशभर पसरले होते. जमिनीच्या किंमती उतरल्या होत्या. जमिनी काढून टाकण्याची श्रीमंतांना घाई झाली होती. तरुणांनाही ह्या वातावरणाचा स्पर्श जाणवला होता. साम्ययोगाच्या स्थापनेचे सत्तावन हे वर्ष ठरेल, स्वराज्याचे ग्राम-स्वराज्यात रूपान्तर होईल, अशी फार मोठी अशा घेऊन हजारो मंडळी देशाच्या कानाकोपऱ्यांतून कालडीला आली होती.

विनोबांची भाषणे–प्रवचने नेहमीसारखी हृदयस्पर्शी झाली. जे कायद्याने साधले नाही, कत्तलींनी झाले नाही, ते करुणेने काही प्रमाणात करून दाखवले होते यात शंकाच नाही. कम्युनिस्ट सरकारातील एका मंत्र्याने कालडीला येऊन ग्रामदानाच्या कल्पनेची भलावण केली होती. पण तरुणांना अपेक्षित असलेला क्रान्तीचा लखलखाट कालडीला झाला नाही! पुष्कळांना त्यामुळे उदास वाटले. संमेलनाच्या समारोपाच्या वेळी अचानक पाऊस आला. विनोबा नाचू–गाऊ लागले. कीर्तन-रंगी दंग झाले. अपूर्व असा तो सोहळा होता. अवघी सभा अनिमिष नेत्रांनी ते अपूर्व असे दृश्य पाहात होती.

## खरी शान्तिसेना

विनोबा तामीळनाडूमधून १९५७ साली केरळमध्ये आले; आणि केरळमधून कर्नाटकाकडे वळले. २३ ऑगस्ट १९५७ रोजी त्यांनी केरळचा निरोप घेतला. निरोपाच्या वेळी आठ जणांनी शान्तिसैनिक म्हणून स्वतः प्रतिज्ञा घेतली.

विनोबा म्हणाले, "तामिळनाडूमध्ये ग्रामराज्याचा पाया घातला गेला. ते बळ घेऊन मी केरळमध्ये आलो. येथे आमची शक्ती वाढली आणि या ठिकाणी शान्तिसेनेची स्थापना झाली. आता हे बळ घेऊन मी कर्नाटकात ताज आहे. अशान्तीच्या मुळावरच जी प्रहार करते ती खरी शान्तिसेना होय!"

## सर्वांचा पाठिंबा

१९५७ च्या सप्टेंबर महिन्यात म्हैसूर राज्यात येलवाल या ठिकाणी ग्रामदान परिषद भरली. अनेक विचारांचे नेते तेथे जमले होते. विविध मत-पंथांच्या या नेत्यांनी दोन दिवस चर्चा केली. त्यानंतर सर्वसंमत असे एक निवेदन तयार करण्यात आले. त्यात म्हटले आहे, "विनोबांनी सामाजिक प्रश्नांची

उकल करण्यासाठी जी अहिंसात्मक आणि सहकारी पद्धत आपलीशी केली ती आम्हांला मान्य आहे." या परिषदेला राजेन्द्र प्रसाद, पंडित जवाहरलाल नेहरू, गोविंद वल्लभ पंत, जयप्रकाश, ढेबरभाई, नंदा, मोरारजी, दिवेकर, प्यारेलाल, श्रीमन्नारायण, चव्हाण, डे, सुचेता कृपलानी, प्राणलाल कापडिया, हरेकृष्ण मेहताब, कामराज, गंगाबाबू, झेड. ए. अहमद, नंबुद्रीपाद, भक्तवत्सलम हे हजर होते.

विनोबांनी सर्वसंमत निवेदनातील अहिंसा आणि सहकार या दोन शब्दांचे स्पष्टीकरण करताना सांगितले की, अहिंसा हा शब्द अध्यात्मवाचक झाला; आणि सहकार हा शब्द विज्ञानवाचक झाला. त्यानंतर त्यांनी दोन दृष्टान्त देऊन विज्ञानशून्य अहिंसा आणि अहिंसाशून्य विज्ञान कसे असते, ते समजावून सांगितले.

चीनमध्ये लाओ त्से नावाचा एक तत्त्वज्ञ होऊन गेला. त्याने आदर्श गावाची आपली कल्पना मांडली आहे. सर्व बाबतींत स्वावलंबी गाव हे आदर्श गाव. सर्व वस्तू गावातल्या गावात तयार करायच्या. गाववाले त्यात संतुष्ट, समाधानी होते. कदाचित एखादे गाव जवळपास असावे अशी शंका त्यांना कुत्र्यांच्या भुंकण्याच्या आवाजावरून यायची ! याला म्हणायचे विज्ञानविरहित अहिंसक योजना ! यात एक गाव दुसऱ्या गावाचे शोषण करीत नाही, हिंसा करत नाही, पण परस्परांना संपर्काची जरूरच वाटत नाही ! अशी अहिंसा आपल्याला नको आहे.

अहिंसेशिवाय वैज्ञानिकता पाहायची तर रशियाकडे नजर टाकावी. तिथे सगळी शेती एकत्र केली आहे. त्याबद्दल कोणाला विचारले–पुसले नाही. शेतीबाबत आपण बैलाचा घेतो का कधी सल्ला ? आपण त्याच्याकडून फक्त काम तेवढे घेतो. शेतकरी योजना ठरवील, बैलाने फक्त ती यशस्वी करण्यासाठी राबायचे ! त्यांना पोटभर खाऊ–पिऊ घातले म्हणजे शेतकऱ्याने आपले कर्तव्य चोख बजावले. अशीच जवळ जवळ स्थिती आहे रशियन शेतीची. योजना सरकारने बनवायची. शेतकऱ्यांनी ती राबवायची. त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था सरकारने केली की झाले ! याला विनोबांनी नाव दिले अहिंसाविरहित विज्ञान. ग्रामदानात मात्र अहिंसा म्हणजे अध्यात्म आणि सहकार म्हणजे विज्ञान यांचा संगम झालेला आहे.

## विश्वासाची लक्षणे

ट्रस्टीशिप किंवा विश्वस्त वृत्ती यासंबंधी चर्चा पुष्कळदा होते. गांधी-विचाराची ही एक मोठी देणगी आहे असे मानले जाते. विनोबांना आई-वडील आणि मूल यांच्या संबंधात विश्वस्त कल्पना पूर्णतः स्पष्ट होते असे वाटते.

विश्वस्ताची लक्षणे कोणती ? पहिले लक्षण असे : आई-वडील स्वतःपेक्षा आपल्या मुलाची चिंता जास्त वाहतात, तशी विश्वस्ताने सर्वांची घ्यावी, नुसत्या संपत्तीच्या संरक्षणाची नव्हे.

दुसरे लक्षण असे की, मुलाला लौकरात लौकर समर्थ करून त्याच्या हाती ते कारभार सोपवू इच्छितात. विश्वस्ताची वृत्ती संपत्ती स्वतःच्या हाती राखण्याची नव्हे तर जनतेकडे सुपूर्द करण्याची असायला हवी.

ह्या दोन लक्षणांनी विश्वस्त-कल्पना स्पष्ट होते. विनोबांना अशी विश्वस्त-कल्पना मान्य आहे.

## स्वयंप्रेरित कामांचे महत्त्व

आपापले संसार सांभाळून जे कोणी सार्वजनिक कार्य करतात त्यांचे सत्त्व अधिक असते असे विनोबांना वाटते. ज्यांचा निर्वाहच सार्वजनिक कार्यावर अवलंबून त्यांच्यापेक्षा निर्वाहासाठी गरज नसताना जे सार्वजनिक काम करतात ते अंतःकरणात काही दुर्दम्य प्रेरणा असल्यामुळेच. असे लाखो लोक देशात असले तरच स्वयंप्रेरित कामे बहरतील, आणि स्वयंप्रेरित कार्यांच्या भरभराटीवरच लोकशाहीची भरभराट अवलंबून असते. स्वयंप्रेरित कामे जेथे निस्तेज तेथील लोकशाही क्षीण, सर्व कामे जेथे सर्वस्वी सरकारी आश्रयावरच चालतात तेथे हुकूमशाही निर्माण होण्याला अवसर असतो. एखाद्या माणसाची, पक्षाची, किंवा नोकरशाहीची ती असू शकते.

## तीन घोष

कर्नाटकातील हावेरी गाव. विनोबांचे लोकांनी भावविभोर होऊन स्वागत केले. विनोबा म्हणाले—

> " मुलांचा घोष जय जगत् हा आहे
> प्रौढांचा घोष जय भारत हा आहे
> आणि जीर्णांचा घोष जय कर्नाटक हा आहे ! "

## महाराष्ट्राला आवडेन

महाराष्ट्राच्या कार्यकर्त्यांसमोर विनोबाजींचे भाषण झाले. म्हैसूरमध्ये झालेले हे भाषण. ' विनोबाजी महाराष्ट्रात येणार ' अशी अपेक्षा निर्माण झालेली होती. १९५७ सालचा ऑगस्ट महिना सरत आला होता.

विनोबा या कार्यकर्त्यांना उद्देशून म्हणाले, " महाराष्ट्रात काही प्रकृती आहे, काही विकृती आहे, काही संस्कृती आहे. चक्रधर, मुकुंदराय, ज्ञानदेव यांच्यापासून महाराष्ट्राच्या संतपरंपरेत दिसून येते ती महाराष्ट्राची संस्कृती आहे. आणि त्या संस्कृतीशी माझा दर दिवशी, दर क्षणी संबंध आहे. त्यामुळे मी महाराष्ट्रात नव्याने येणार असे मला वाटतच नाही. मी महाराष्ट्रात केव्हाचाच येऊन चुकलो आहे. ' या माणसाने आपल्या संस्कृतीचे ग्रहण केले आहे, आणि त्याला थोडाफार उजाळाही दिलेला आहे ' या गोष्टीची जाणीव महाराष्ट्राला आहे. त्यामुळे माझ्या दृष्टीने महाराष्ट्रात येण्या न येण्याने खास फरक पडत नाही. ' मंगलावाचूनि उमटे ना वाणी ' असे तुकारामांनी म्हटले आहे. महाराष्ट्रामध्ये आता मंगलाशिवाय शब्दच निघू नये. अंतरी निर्मळ, वाचेचा रसाळ, आणि पायाचा मजबूत– असा मनुष्य महाराष्ट्राला मिळाला की महाराष्ट्राला तो जिंकू शकेल. एखादा बालक आईपाशी जावा तसा मी महाराष्ट्रात येईन. आणि मी जो काय वेडा, वाकडा, गोड, आंबट– जसा आहे तसा प्रकट झालो तरी महाराष्ट्राला आवडेन अशी मला खात्री आहे. "

## ज्ञानेश्वरांबद्दल अपार प्रेम

मराठी भाषिकांचा ज्ञानेश्वर हा देवदूत आहे, अशी विनोबांची भावना आहे. ज्ञानदेवांनीच म्हटल्याप्रमाणे तेज परी शीतल शशांकाचे किंवा मार्तंड जे तापहीन यासारखी त्यांची स्थिती आहे. शंकराचार्यांची करुणासुद्धा प्रखर, याउलट ज्ञानदेवांची ज्ञानप्रभादेखील सौम्य ! त्यामुळेच त्यांना ' माउली ' अशी पदवी आम मराठी जनतेने प्रेमाने दिली आहे. मराठी भाषिकांना ज्ञानेश्वरी हा एक ग्रंथदेखील पुरेसा आहे, असे विनोबांना वाटते. पण ज्ञानेश्वरांमधील मार्दव या गुणावर विनोबा विशेष भाळून जातात. त्यांचा छळवाद काही कमी झाला नाही, पण एकाही ठिकाणी कटू वचन त्यांच्या तोंडून निघाले नाही !

'साच आणि मवाळ। मितले आणि रसाळ। शब्द जैसे कल्लोळ। अमृताचे।' हे वाणीचे वैभव फक्त ज्ञानेश्वरातच आढळते, असे विनोबा म्हणतात.

ज्ञानदेवांचे आपल्याला संतत स्मरण असते असे विनोबा सांगतात. ज्ञानेश्वरांच्या स्मरणाने त्यांच्या डोळ्यांतून अनंत वेळा अश्रूंचा पूर वाहू लागतो. मराठवाड्यात ज्ञानदेवांच्या जन्मगावी आपेगावला विनोबा गेले होते. पैठणपासून सात-आठ मैलांवरच आपेगाव आहे. विनोबांना ही दोन स्थाने परमपवित्र. या दोघांच्या साहित्याच्या सहवासात ते सतत तेथे डुंबत होते. तो एकच त्यांच्या बोलण्याचा जणू विषय. सर्वधर्मांची म्हणून जी प्रार्थना विनोबांनी तयार केली आहे त्यात ज्ञानेश्वरांचीही एक ओवी त्यांनी ओवली आहे! भक्तजीवनाचे सर्वस्व जणू त्या ओवीत सामावलेले आहे. ज्ञानेश्वरांनी आपले अवघे जीवनरहस्य त्यात गोवले आहे :

**माळिये जेउते नेले। तेउते निवांतची गेले।**
**तया पाणिया ऐसे केले। होआवे गा॥**

परमेश्वराच्या हाती एकदा आपल्या जीवनाची सूत्रे सोपवली की मग चिंता कशाची? खटाटोप कशाचा? पाणी जसे निवान्तपणे वाहते तसे जीवन जाऊ द्यावे, माळ्यावर तशी श्रद्धा मात्र असावी!

## महाराष्ट्रात स्वागत

२३ मार्च १९५८. लिंगनूर ही म्हैसूर-महाराष्ट्राची सरहद्द. कर्नाटकच्या कार्यकर्त्यांना उजाडताच, प्रार्थना झाल्यानंतर विनोबांनी निरोप दिला. लिंगनूरजवळ विनोबा येताच लोक सामोरे गेले. नंतर सर्व समुदाय खडकेवाड्याच्या रोखाने निघाला. सात वर्षे निरंतर पुरुषार्थ करून हा सुपुत्र महाराष्ट्रात आला होता! संतांच्या प्रसादानेच जे घडले ते आपल्या हातून घडले अशी विनयाची भावना त्यांच्या मनात दाटून आली. ज्ञानेश्वरांच्या स्मरणाने त्यांचे हृदय उचंबळून आले, आणि डोळ्यांतून अश्रुधारा ओघळू लागल्या. नंतर ते सावरून म्हणाले, "मी मोकळ्या मनाने, सर्व उपाधी-अभिमान सोडून महाराष्ट्रात येत आहे. येथे येताना माझ्या मनात कसलीही अभिलाषा नाही; कामना नाही. माझ्याजवळ मते नाहीत, प्रेम आहे, विचार आहेत. विचार पटवून घ्यायला

आणि पटवून द्यायला माझी तयारी आहे. शक्ती विचारातच असते. विचारांची सत्ता अबाधित आहे, अगाध आहे. विज्ञानाच्या आजच्या युगात महत्त्व विचारांनाच आहे. माझ्या आगमनप्रसंगी अनेकविध चर्चा सुरू झाली आहे. प्रेम, संशय, आक्षेप अशी नानाविध त्याची स्वरूपे आहेत. हे सगळे मला परमप्रिय आहे. कारण त्यामुळे हृदये उघडी झाली, धुतली गेली. विचारांच्या देवाण-घेवाणीत विनोबा रागावणार नाहीत. राग असेल तेवढ्यापुरता विनोबा मेला असे समजा ! ”

असे होते विनोबांचे ते आर्जवी भाषण, केवढी नम्रता, किती सुहृद्भाव, विचारांवरची केवढी अक्षुण्ण श्रद्धा. विचारांवरील अशा श्रद्धेनेच लोकशाही बाळसे धरते.

## महाराष्ट्राचे त्रिदोष

अखिल भारतीय तोलामोलाची माणसे आता कमी कमी होत चालली आहेत. अशी माणसे म्हणजे देशाच्या ऐक्याची ग्वाही असते. महाराष्ट्रातूनही इतर प्रांतांप्रमाणेच अखिल भारतीय तोलामोलाची माणसे निघावीत व त्यांनी देशाचे ऐक्य मजबूत करावे, असे स्वाभाविकपणेच कोणालाही वाटावे. परंतु अशा भारतीय पातळीला पोचण्याच्या मार्गात काही अडथळे असतात. ते दूर करण्याचा प्रयत्न केला गेला पाहिजे. विनोबांनी या दृष्टीने महाराष्ट्राच्या त्रिदोषांची एके ठिकाणी चर्चा केली आहे. महाराष्ट्राचे त्रिदोष असे : ( १ ) खोल रुजलेला जातिवाद, ( २ ) हिंसेचे समर्थन व तरफदारी करणारे हाडीमाशी खिळलेले तत्त्वज्ञान, आणि ( ३ ) इतिहासाचा वृथा अभिमान. ह्या त्रिदोषांच्या जोडीला एक प्रकारची आपल्यावर अन्याय करण्याची इतरांची नियत आहे, अशा संशयाने महाराष्ट्र पछाडलेला दिसतो ! त्यामुळे अखिल भारतीयतेचा परिपोष करण्याची पात्रता व परिस्थिती असूनही महाराष्ट्रात हव्या त्या प्रमाणात हे कार्य घडून आलेले दिसत नाही.

## स्वप्नातील आजाराचा इलाज

आजची पक्षीय लोकशाही देशातील अनेक दुर्गुणांना प्रोत्साहक ठरली आहे. आजच्या राजनीतीचे लोकनीतीत रूपान्तर करून या दुर्गुणांच्या

विळख्यातून तिला सोडवावे, असे विनोबांना वाटते. राजनीतीचे लोकनीतीत रूपान्तर करण्याऐवजी डागडुजी करून तिच्यात सुधारणा करण्यापर्यंतच राजकीय कार्यकर्त्यांच्या विचारांची झेप असते. त्या संदर्भात विनोबा म्हणाले, " एक मनुष्य स्वप्नात आजारी पडला. स्वप्नातच तो इलाज करू लागला. त्याचे इलाज चालू असेपर्यंत त्याचा आजार संपणार नाही, आणि त्याला जाग येणार नाही ! स्वप्नात इलाज करीत राहण्याऐवजी इलाज करणे थांबले म्हणजेच तो त्या स्वप्नातून आणि आजारातूनही बाहेर पडण्याची शक्यता. त्याचप्रमाणे आजच्या राजनीतीतून बाहेर पडून लोकनीतीचा अवलंब केला तरच लोक-शाहीत शिरलेले दोष नाहीसे होतील. आजचा एक सत्तारूढ पक्ष पदच्युत होऊन दुसरा अधिकारावर येण्याने लोकांचे समाधान होईल, असे मानणे हा एक भ्रम आहे ! "

## पंचसूत्री

ग्रामदानातील विचार–प्रचार, आणि नवनिर्माण ही दोन्ही कामे महत्त्वाची. विचारप्रचाराशिवाय पुनर्निर्माण कार्य निष्प्राण, आणि पुनर्निर्माणाशिवाय विचार–प्रचार म्हणजे कल्पनारम्यता ! अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांनी या दृष्टीने एक पंचसूत्री एका चर्चेत सांगितली. बैठकीच्या शेवटी विनोबांनी एका श्लोकात ग्रथित करून ती लोकांपुढे मांडली—

**अंत्योदयोऽभिक्रमश्च**
**सामूह्यम्, संविभाजनम् ।**
**तज्ज्ञत्वं कार्यकर्तॄणाम्**
**एतद् ' अण्णा '–विचारणा ॥**

समाजातल्या सर्वांत खालच्या थरातील मानवांची भरभराट करणे हे पहिले तत्त्व. दुसरा काय करतो त्याची वाट पाहात न थांबता पटलेली गोष्ट अमलात आणणे हे दुसरे तत्त्व. सर्व गोष्टी सामुदायिक रीतीने करणे हे तिसरे तत्त्व. सर्वांनी विभागून काम व फळ घेणे हे चौथे तत्त्व. कार्यकर्त्यांनी आपापल्या विषयांत तज्ज्ञत्व मिळवणे हे पाचवे तत्त्व. सार्वजनिक कार्याचे हे जणू पंचप्राणच होत !

## पब्लिक सेक्टर– पब्लिक स्कूल

समाजवादाच्या नावाखाली ‘ पब्लिक ’ म्हणून अनेक उपक्रम घाई-गर्दीने हाती घेतले जातात. माणसांच्या अनुषंगाने योजना करण्याऐवजी योजनांच्या अनुषंगाने माणसांची शोधाशोध होते. अशा अर्धवटपणे हाती घेण्यात येणाऱ्या उपक्रमांमुळे चांगल्या गोष्टींची बदनामी होते.

पब्लिक सेक्टरची व्याख्या करताना विनोबा एके ठिकाणी म्हणाले, “ पब्लिक सेक्टर म्हणजे ज्यांना समाजाविषयी उमाळा नाही, धंद्यातील अक्कल नाही– अशांच्या हाती व्यवसाय सोपवणे, आणि बिघडले म्हणजे चौकशी करणे ! ”

आजच्या पब्लिक स्कूलसबद्दलही त्यांनी फार मार्मिक उद्गार काढले आहेत : “ आजचे पब्लिक स्कूल म्हणजे पब्लिकला ( सामान्य माणसांना ) ज्याचे दरवाजे बंद असतात अशी शिक्षण संस्था ! ”

हे सर्व बदलले पाहिजे.

## स्वयंप्रज्ञतेचे महत्त्व

रत्नागिरी जिल्ह्यात विनोबांची यात्रा सुरू होती. विनोबा नित्य नवे विचार प्रकट करीत होते. विज्ञानाने विचार प्रसाराची नवनवी साधने माणसाला आज दिली आहेत. पण ज्ञानप्रसाराची साधने मतप्रचारासाठी वापरली जात आहेत. माणूस स्वतंत्र विचार करण्याऐवजी तयार मते घेण्याला सिद्ध होत आहे ! ही परप्रत्ययवृत्ती लोकशाहीला घातक आहे. यातूनच व्यक्ति-प्रामाण्य, ग्रंथप्रामाण्य वाढत जाते. विनोबा म्हणाले, “ स्वयंप्रज्ञ मनुष्य हा स्वयंपूर्ण गावापेक्षा अधिक महत्त्वाचा आहे. स्वयंप्रज्ञता गमावून सुख वाढवण्यात स्वारस्य नाही. दुसऱ्यांच्या कष्टांवर जगण्यापेक्षा दुसऱ्यांच्या प्रज्ञेवर जगणे हे अधिक मोठे पाप आहे ! ”

## साधनेवर लोभ

साधनेवर विनोबाजींचा अपरंपार लोभ. साधनेची ते सतत चौकशी करीत. साधनेचे एक दशक पूर्ण झाले. त्यानिमित्ताने विनोबांनी लिहिले, “ साधनेवर माझा लोभ आहे, हे तुम्हाला माहीतच आहे. विचारभेद जगात

राहायचाच आहे; आणि त्याचा उपयोगही आहे. पण विचारप्रकाशनाची सौम्यतम रीत आपण जगापुढे ठेवू या. ती आपली साधना आहे. साधना 'विश्वमानुषा'च्या आकांक्षेचे मुखपत्र बनो."

## पंढरपूरमधील ऐतिहासिक प्रसंग

एकोणीसशे अठ्ठावन्नचे सर्वोदय संमेलन कोठे घ्यायचे, याची चर्चा सुरू झाली तेव्हा विनोबा त्या काळात महाराष्ट्रात राहणार असल्याने संमेलन महाराष्ट्रात व्हावे, असे सर्वांचेच मत पडले. ते शक्य असले तर पंढरपूरला व्हावे, अशी विनोबांनी आपली इच्छा व्यक्त केली. अध्यात्म विद्येचे पंढरपूर हे महाराष्ट्रातील आदितीर्थ आहे, अशी विनोबांची भावना या विचारामागे होती. पंढरपूरच्या जवळ विनोबा आले तेव्हा पुंडलिकाच्या मंदिराचे पुजारी त्यांच्या पडावावर आले. म्हणाले, "आमच्या देवळात तुम्ही यायला पाहिजे."

"माझ्या परिवारात हरिजन आहेत, तसेच इतर धर्मीयही आहेत."

"असू द्या हरिजन–अन्य धर्मीय, पण ते सारे भक्त आहेत. त्यांनाही घेऊन."

"तुमच्या शब्दांवर माझा पूर्ण विश्वास आहे; पण तुम्ही तसं एक पत्र लिहून द्या."

"पत्र?"

"म्हणजे त्याचं असं आहे की, पूर्वी एकदा जरा चमत्कारिक अनुभव मला आला आहे."

"आमचा?"

"तुमचा नाही. वैद्यनाथधामला अशीच परवानगी आम्हांला मिळाली होती. पण प्रत्यक्ष गेल्यावर मार बसला. चांगले पाच मिनिटं मारीत होते. स्त्री-पुरुष त्यांनी काही पाहिलं नाही! एका मुलीच्या छातीवर त्यांनी असे मारलं होतं की, तिला पंधरवडाभर रुग्णालयात ठेवावं लागलं! सगळ्या माराचा रोख माझ्यावर होता. इतर मला वाचवण्यासाठी मध्ये पडले. पण एक फटका निसटता माझ्या कानावर बसला आणि आधीच अधू असलेला माझा कान पूर्ण बहिरा झाला!"

आणि त्यांनी विनोबांना तसे लेखी पत्र दिले. पुंडलिकाच्या मंदिराचे दरवाजे अशा रीतीने उघडले तेव्हा विनोबा विनोदाने म्हणाले, "ही तर

किल्लीच माझ्या हाती आली. आता त्या विठ्ठलाच्या मंदिराला लागलं कुलूप तर लागो बापडं !"

आणि दोन दिवसांनंतर रुक्मिणीच्या मंदिराचे पुजारी विनोबांच्या पडावावर आले. म्हणाले, "रुक्मिणीमातेचं मंदिरही तुमच्यासाठी मोकळं आहे. तुमच्या सगळ्या परिवारासह तुम्ही या."

"भगवंताला जशी रुक्मिणीनं पत्रिका लिहून दिली तशी तुम्ही मला लिहून द्या, म्हणजे मी विचार करीन." विनोबा त्यांना म्हणाले आणि त्यांनी खुल्या दिलाने तसे पत्र लिहून दिले.

अशी ही दोन पत्रे हाती आल्यावर विनोबा प्रसन्न झाले. मनात म्हणाले, "विठोबा हा इतर दासांचा दास. पुंडलिकासाठीच तर हे पंढरपूर. 'का रे पुंड्या मातलासी, उभे केले विठ्ठलासी। ऐसा कैसा रे तू धीट, मागे भिरकावली वीट !' त्या विटेवर अद्याप तो उभाच आहे! पुंडलिकानंच तर त्याला इथं आणले, नाही तर ती इथं येताच कशाला?"

आणि पंढरपूरला विनोबा पोचल्यावर बडव्यांनी विनोबांना चिठ्ठी पाठवली, आणि आपल्या सर्वधर्मीय परिवारासह विठ्ठलाचे दर्शन घेण्याला आपली अनुमती असल्याचे त्यांनी कळवले.

## दर्शन-सोहळा

एकोणतीस मे एकोणीसशे अठ्ठावन्नचा दिवस. विनोबा नित्याप्रमाणे ब्राह्ममुहूर्तावर उठले. साडेचार वाजता ते निघाले. चंद्रभागेच्या वाळवंटातल्या पुंडलिकाच्या मंदिरात ते आधी गेले. दर्शनानंतर मंडपात चार शब्द ते बोलले. म्हणाले, "आईबापांची, दुःखितांची, दलितांची सेवा ईश्वरसेवेच्या भावनेनं केली तर ती फार मोठी सेवा ठरते. 'हा कोणत्या धर्माचा?' हे बघणं ही भागवत धर्माची रीत नव्हे. 'भेदाभेद भ्रम अमंगळ' ही तर विठ्ठलसंप्रदायाची खूण आहे. 'या रे, या रे लहान थोर। भलते याति नारी नर।' असा भागवंतांचा बाणा आहे. 'कलीलागी झाला असे बौद्ध मौनी' अशी विठ्ठलाची प्रशंसा केली जाते. हरिजनांनी बौद्ध धर्माचा काही ठिकाणी स्वीकार केला आहे. त्यांना आपण सांगू की, तुम्ही बुद्धाची गाणी गात या. रामकृष्ण हरी म्हणजे रामकृष्ण बुद्ध. म्हणून त्यांनी इथं यावं. धम्मपद वाचावं. वारकरी संप्रदायानं बुद्धाची गाणी शिकायला तयार व्हावं."

पुंडलिकाच्या दर्शनानंतर महाद्वार घाटाने विनोबा विठ्ठलमंदिराकडे आले. नामदेवाच्या पायरीला भक्तिपूर्वक स्पर्श करून विनोबा विठ्ठलमंदिरात आले. विठ्ठलाच्या दर्शनाने ते सद्‍गतित झाले. विनोबांच्या बरोबर जर्मन कन्या हेमा आणि मुस्लिम कन्या फातिमा ह्या होत्या. त्यांनीदेखील पादस्पर्शपूर्वक दर्शन घेतले. नंतर तो भक्तांचा मेळा रुक्मिणीच्या दर्शनाला गेला. त्यानंतर विनोबा म्हणाले, "आज ही जी घटना घडली ती हिंदुस्थानच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी अंकित होण्यासारखी आहे. हिंदु धर्मात संकुचिततेला यत्किंचितही वाव नाही, हे आज इथं सिद्ध झालं आहे."

पंढरपूरच्या सर्वोदय संमेलनात विनोबांनी काश्मीरकडे जाण्याची घोषणा केली. ही यात्राही अर्थात पायीच होणार होती. मध्ये लागणाऱ्या प्रांतांतून विनोबा जाणार होतेच, पण आता त्या प्रांतात जास्त वेळ देण्याची त्यांची कल्पना नव्हती.

पंढरपूरहून ते मराठवाड्यात गेले. सर्वोदय पात्रांवर त्यांचा विशेष भर होता. सेवकाला त्याची शिदोरी त्या सेवाक्षेत्रातून मिळाली पाहिजे. गावकऱ्यांनी सेवकाच्या निर्वाहाची चिंता वाहिली पाहिजे. सेवकाला निःस्पृहपणे म्हणता आले पाहिजे, "आम्ही काय कुणाचे खातो, तो राम अम्हाला देतो।' औरंगाबादला राष्ट्र सेवा दलाचा दोन दिवसांचा मेळावा झाला. विनोबांनी मार्गदर्शन केले. महाराष्ट्रातील साहित्यिकांशीही त्यांनी हितगुज केले.

## व्यक्तींचे नेमके मूल्यमापन

विनोबांना माणसांबद्दल जितके प्रेम आहे तितके संस्थांबद्दल नाही. संस्था त्यांना निर्जीव वाटतात; पण व्यक्ती जिवंत असतात.

महर्षी अण्णासाहेब कर्वे यांच्या शताब्दीनिमित्त त्यांनी लिहिले : "१८ एप्रिल. आमचे प्रपितामह अण्णासाहेब कर्वे यांच्या शताब्दीपूर्तीचा दिवस. त्याच दिवशी भूदान-यज्ञाचा जन्म. त्या बालकाची सात वर्षे आता संपत आहेत. अण्णासाहेबांच्या चरणी बालकाचा शिरसाष्टांग प्रणिपात.

"आपला देश इंग्रजांच्या ताब्यात गेल्यानंतर त्याला म्हणजे त्यातील नेत्यांना धर्मसुधारणेची प्रथम गरज वाटली, ही एक विशेष घटना आहे आणि भारताच्या जिवंतपणाची ती द्योतक आहे. या पहिल्या अंतर्मुख प्रवृत्तीचे प्रतीक रूप अण्णासाहेब आज आपल्यात विद्यमान आहेत. या प्रवृत्तीच्या पोटी

पुढे स्वराज्य-भावना, सत्याग्रह-साधना, सर्वोदय-प्रेरणा अशी संतान-परंपरा जन्मास आली. म्हणून अण्णासाहेबांचे विचारऋण आमच्यावर मोठे आहे. ते फेडण्यासाठी कष्ट करणे हे आमचे कर्तव्य आहे. तथापि तेवढ्यानेही ते फिटण्यासारखे नाही. तदर्थ, हा प्रणाम निवेदित आहे–

**ते ऋण-शेष वाचा द्या, न फेडवे मरोनिया ।**
**ते पाया पडोनि मिया, सोडविले ॥**

श्री. अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांच्या षष्ठ्ब्दपूर्तीच्या वेळी त्यांनी लिहिले, "मराठ्यांनी ओडिसावर पन्नास वर्षं सत्ता गाजवली. आता अण्णासाहेब त्याच ओडिसात सेवा गाजवीत आहेत. ओडिसाच्या भू-दान यात्रेत आम्हांला शत शत ग्रामदाने लाभली. सदर ग्रामदानांच्या सेवेची काही योजना केल्याशिवाय ओडिसातून माझा पाय निघेना. मला अण्णासाहेबांचं नाव आठवलं; आणि नाव आठवताच त्यांनी सेवेसाठी कंबर कसली. अण्णासाहेबांच्या मनाला म्हातारपण कधीच आलं नव्हतं.

"अण्णासाहेब गुप्त तत्त्वज्ञानी आहेत. म्हणजे ते तत्त्वज्ञानी आहेत हे लोकांना तर माहीत नाहीच, पण त्यांनाही माहीत नाही. अण्णांच्या जीवनाची एक निष्ठा आहे, आणि निष्ठा तत्त्वज्ञानाशिवाय बनत नसते....

"...अण्णासाहेबांना जनतेविषयी प्रेम आहे. देशाविषयी अभिमान आहे. स्वतःविषयी दोन्ही नाहीत. अण्णांनी इहलोकी कर्मे करीत करीतच शंभर वर्षं जगण्याची इच्छा धरावी."

एस्. एम्. जोशींच्या षष्ठ्ब्दपूर्तीच्या वेळी त्यांनी लिहिले, "एसेम म्हणजे संयुक्त महाराष्ट्र– असा त्यांचा लौकिक झाला आहे. यापुढं 'संयुक्त भारत' आणि 'संयुक्त विश्व' असे दोन मोठे कार्यक्रम उपस्थित आहेत. त्यांसाठी एसेमनी 'शंभर वर्षं जगण्याची इच्छा धरावी.'

श्री. बाबा आमटे हे एक थोर सेवक. त्यांच्या पन्नासाव्या वाढदिवसाच्या वेळी त्यांनी लिहिले, "अशी निष्काम, सेवापरायण माणसं भगवान अधिक का निर्माण करीत नाही, याची 'शो-कॉज' नोटिस मी त्याला देत आहे. पाहू त्याचं काय उत्तर येतं! पण तो उत्तर द्यायला बांधला गेलेला नाही, हे उघडच आहे. त्यानं आमची नोटिस विचारात घेतली तरी पुरे आहे."

## संयुक्त महाराष्ट्र व विनोबा

महाराष्ट्रात विनोबांनी प्रवेश केला आणि संयुक्त महाराष्ट्राबद्दल त्यांना छेडण्याला सुरुवात झाली. विनोबांनी प्रारंभीच सांगून टाकले की, मी विचाराला वश होणारा आहे, दुसऱ्या कोठल्याही गोष्टीचा परिणाम माझ्यावर होत नाही. आणि संयुक्त महाराष्ट्राचे पुष्कळसे कार्यकर्ते आवेश आणि आवेग यांच्या पलीकडे जायलाच तयार नसत! त्यामुळे खडकेवाडा, कोल्हापूर, चाळीसगाव अशा काही ठिकाणी विनोबांच्या सभेत काही आक्रस्ताळ्या लोकांनी निदर्शने केली! राजापूरला विनोबांनी सांगितले की, या प्रश्नाबद्दल मी जाहीर चर्चा करणार नाही. व्यक्तिगत चर्चा करण्याला माझी नेहमीच तयारी राहील. आणि अशी चर्चा त्यांनी नेहमीच मोकळेपणाने केली. ग्रामराज्यामुळे अनेक जटिल समस्या ह्या संदर्भहीन बनतील असे त्यांचे म्हणणे. नुसते एकभाषिकांचे राज्य एवढयाने गरीबांना सुखाचे दिवस लाभतील, सामाजिक समता आणि आर्थिक शोषणमुक्ती साधेल अशा भ्रमात राहू नये, असा इशारा परोपरीने ते देत. बंगाल आणि केरळमधील संख्यास्फोट शेजाऱ्यांना सामावून घ्यावा लागेल, व त्यासाठी बंगाल-बिहार आणि केरळ-कर्नाटक अशी द्विभाषिक राज्ये करावी लागण्याची शक्यताही ते व्यक्त करीत. प्रश्नकर्त्याला आपल्या प्रश्नापुरताच विचार करावयाचा असे, आणि विनोबा भारतीय प्रश्नाचा एक अंश-भाग म्हणून विचार करीत. ह्या तफावतीमुळे पुष्कळदा पंचाईत होत असे. पुष्कळ वेळा प्रश्नकर्त्याचा तोल सुटे आणि मग चर्चेसाठी आवश्यक ते सौहार्द वातावरणात राहात नसे.

जयसिंगपूरला अशी चर्चा सुरू असताना मुंबईचे एक साहित्यिक तावातावाने म्हणाले, " महाराष्ट्रीय लोकमत पुढच्या वेळी द्विभाषिकवाले विकत घेतील!"

महाराष्ट्रीय लोकमत संयुक्त महाष्ट्राच्या बाजूला आहे असे सांगणारेच जेव्हा असे बोलत तेव्हा विनोबांना खेद होई. ते म्हणत, " महाराष्ट्र कधीच विकला जाऊ शकत नाही. महाराष्ट्राचे गुणदोष काहीही असोत, पण तो विकला जात नाही हा त्याचा खास गुण आहे. गेल्या निवडणुकीच्या वेळी महाराष्ट्र विकला जात नाही हे दिसून आले. नाही तर संयुक्त महाराष्ट्र समितीला एवढे यश मिळते ना!"

संयुक्त महाराष्ट्राच्या कोण्या पुरस्कर्त्याने असे म्हणणे हे गैर, पण बेभान माणसाला ते समजत नाही. विनोबाच अशा माणसाला ठिकाणी आणत.

एक गृहस्थ एवढयानेही भानावर आले नाहीत आणि बोलून गेले, " निवडणुकीच्या दर वेळी असे एकशे पाच हुतात्मे कोठून मिळणार ? "

विनोबा म्हणाले, " हे एकशे पाच हुतात्मे झाले नसते तर संयुक्त महाराष्ट्राची मागणी महाराष्ट्रानं सोडून दिली असती ? ज्या कार्यासाठी एकशे पाच लोकांना प्राणांची कुर्बडी करावीशी वाटली त्या कार्यार्थ आपली मतंही मराठी माणूस नोंदवणार नाही असं का वाटावं ? "

विनोबा आपल्या पद्धतीने काँग्रेसश्रेष्ठींशी या प्रश्नाबाबत बोलत, व द्विभाषिकासारखा प्रयोग लादालादीने यशस्वी होणार नाही, असे त्यांना सांगत. एकदा एक काँग्रेसश्रेष्ठी म्हणाले, " मुंबईतल्या ह्या दंगलीनंतर आम्ही संयुक्त महाराष्ट्र द्यायला कबूल झालो तर आम्ही दहशतीला आणि गुंडगिरीला शरण गेलो असा त्याचा अर्थ होईल. "

विनोबा म्हणाले, " बंगाल–बिहारच्या द्विभाषिकाचा विचार तुम्ही सोडलात त्याच दिवशी ही गोष्ट सिद्ध होऊन चुकली आहे ! "

विनोबा महाराष्ट्रात येण्यापूर्वी मोरारजी त्यांना भेटून गेल्याची बातमी आली आणि कल्पक मराठी पत्रकारांनी त्यावर विनोबा विरोधाचे इमले उभे केले ! हीच मंडळी विनोबांना संयुक्त महाराष्ट्राविषयी बोलण्याचा आग्रह करू लागली, तेव्हा एकदा विनोबा म्हणाले, " विनोबाच्या मताविषयी आज तुम्ही एवढा आग्रह धरता, संयुक्त महाराष्ट्राविषयी बोला म्हणता, पण त्या विनोबाची तुम्ही किंमत काय करता ? तर मोरारजी भेटले आणि त्यांनी सांगितलं, मी ऐकलं ! मी हलक्या कानांचा आहे, परप्रत्ययानेय बुद्धीचा आहे, असं सुचवण्यात आलं ! पण सत्य जाणून घेण्याची कोणी तसदी घेतली नाही. घडलं असं : मोरारजी त्या ठिकाणी आपल्या कामासाठी आले होते. माझा मुक्काम तिथंच आहे कळलं म्हणून ते निवासाच्या जागी आले. त्या वेळी मी कार्यकर्त्यांच्या सभेत बोलत होतो. त्यांनी नमस्कार केला. औपचारिक कुशल प्रश्न झाले. पाच मिनिटांच्या आत ते निघून गेले. सत्य घटना ही अशी, पण ती जाणून घेण्याचा प्रयत्नही न करता कपोलकल्पित आणि विकृत लिहायचं ! विनोबाची ही तर तुम्ही

कल्पना केली !" विनोबांच्या ह्या बोलण्यात केवढी प्रचंड वेदना दडलेली आहे !

## निरोप देतानाचा निरोप

खडकेवाडा येथे सुरू झालेली विनोबांची महाराष्ट्रातील यात्रा भडभुंजा येथे संपली. १८५ दिवसांत १७३ गावांना त्यांनी भेटी दिल्या. दहा जिल्ह्यांना विनोबांचा परिसस्पर्श झाला. अक्राणी व अक्कलकुवा या धुळे जिल्ह्यातील दोन महालांचे दान झाले. विनोबा निरोप घेताना म्हणाले, "रत्नागिरीला यात्रेचा आरंभ गोड झाला. पंढरपूरला मध्य गोड झाला. मराठवाडयात उपान्त्य गोड झाला, आणि अक्राणी–अक्कलकुव्यात शेवटही गोड झाला. एकूण सर्वच यात्रा मोठी गोड झाली !"

विज्ञानाच्या संदर्भात ते म्हणाले, "विज्ञानयुगाच्या संदर्भात आजचे अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राजकारण एवढेच नव्हे तर अध्यात्मही एकांगी आहे. पूर्वी ह्या सर्वांना शास्त्र अशी पदवी दिली जात असली तरी ते अडाखेच होते. विज्ञानाच्या नव्या संदर्भात मनू किंवा मार्क्स टिकत नाहीत. गांधीदेखील आज जसेच्या तसे चालणार नाहीत. विश्वव्यापक प्रश्न आणि त्वरित उत्तरे, हे विज्ञान-युगाचे वैशिष्ट्य आहे ! आजच्या समस्या त्यामुळे राजकीय मुत्सद्द्यांच्या जुन्या विचारपद्धतीच्या बाहेरच्या ठरतात. विज्ञानयुगातील सत्याग्रह–कल्पनेचेही संशोधन केले पाहिजे. विज्ञानाने परस्पर विश्वास अपरिहार्य केला आहे. मनाच्या पलीकडे गेल्याशिवाय गुणदोषांचा यथार्थ निवाडा करता येणार नाही, असे विज्ञान सांगत आहे. दोषनिष्कृती आणि गुणांचा विनियोग करण्याची शक्ती मनाच्या वर गेल्याशिवाय येणार नाही. प्रांत, भाषा, धर्म, जात यांची लेशही भावना महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांत मला आढळली नाही. त्यागाची तमा न बाळगणारे व भेदाच्या व संकुचितपणाच्या आहारी न जाणारे कार्यकर्ते विश्वासाची शक्ती जोडतील तर विश्वाला महाराष्ट्रात क्रान्तीचे दर्शन होऊ शकेल. आजच्या विज्ञानयुगाच्या संदर्भात प्रांतच काय, पण राष्ट्रभेदही टिकणार नाहीत. विज्ञानयुगात जुन्या कल्पनांचा त्यागच केला पाहिजे. बुद्धीला पटणाऱ्या गोष्टींचा पाठपुरावा करण्याआड मनाचा अडथळा येत असतो. मन जुन्याच कल्पनांना चिकटून बसायला पाहते; चाकोरीतच सुख अनुभवते. यासाठी मनाच्या पातळीच्या वर जाण्याची फार आवश्यकता आहे."

## गुजरातमध्ये

महाराष्ट्रात विनोबांची सात महिने यात्रा झाली. नंदुरबारला विनोबांना निरोप देण्याचा कार्यक्रम झाला. सुरतवरून विनोबा बडोद्याला गेले. बडोद्याशी त्यांच्या अनंत स्मृती निगडित. त्या सर्वांची उजळणी झाली. आपल्या जुन्या घराला त्यांनी भेट दिली. आईच्या स्मरणाने ते सद्‌गदित झाले. बडोद्याला जुन्या मित्रांचे संमेलन झाले. तेथून अहमदाबाद. अहमदाबादशीही किती आठवणी निगडित ! गांधीजींचे किती उत्कटतेने त्यांना स्मरण तेथे झाले.

## राजस्थानात

गुजरातमधून विनोबा राजस्थानात गेले. मीराबाईंचे मेवाड त्यांनी पाहिले. अजमेरला पुन्हा एकदा त्यांचा मुक्काम झाला. सर्वोदय संमेलनही तेथेच भरले होते. अजमेर हे मुसलमानांचे मोठे क्षेत्र. मक्केनंतर अजमेरची महती हिंदी मुसलमानांना वाटते.

## मुस्लिम भगिनींचा कळवळा

विनोबा अजमेरला गेले तेव्हा तेथील प्रसिद्ध दर्ग्यात त्यांची सात दिवस व्याख्याने झाली. एक दिवस तिथे नमाज पढण्यासाठी दोन तीन हजार लोक आले होते.

विनोबा त्यांना म्हणाले, " ही महादेवी माझ्याबरोबर आहे. तीही नमाजाच्या वेळी माझ्याबरोबरच राहील. "

मुसलमान म्हणाले, " राहू द्या. "

वास्तविक मुसलमानांचा नियम असा आहे की, स्त्रियांना नमाजात ते सहभागी करून घेत नाहीत. विनोबा त्यांना म्हणाले, " परमेश्वरापाशी जायला मुसलमान स्त्रियांना प्रार्थना वगैरे काहीच का सोय नाही ? "

ते म्हणाले, " त्यांना घरच्या घरी नमाज पढायची मुभा असते. त्यांच्याबरोबर मुले असतात. ती गलका करतात. शांतता त्यामुळे भंगते. "

पुढे म्हणाले, " समजा, काही वेळ पुरुषांनी मुले सांभाळायची जबाबदारी घेतली तर....आठवडयात एक वेळ पुरुषांनी घरी मुले सांभाळावी आणि स्त्रियांना सामुदायिक नमाज पढू द्यावा. "

"पडद्याची प्रथा अतिशय वाईट आहे. आपल्या भगिनींना पडद्यात डांबण्यात कोणते शहाणपण आहे? मुसलमानांनीदेखील आता पडदा टाकला पाहिजे. ज्या समाजातील स्त्रिया पडद्यात डांबल्या जातील तो समाज कधीही प्रगती करू शकणार नाही!"

## पंजाबमध्ये

राजस्थानातून विनोबा पंजाबात गेले. विनोबांनी शीख धर्माचा सखोल अभ्यास केलेला. जपजीची ओळख त्यांनी शीखेतरांना करून दिलेली. त्यांच्या सर्वधर्म-प्रार्थनेत, एक ॐकार सत् नाम, कर्ता पुरुष, निर्भव निर्वैर, अकाल मूरत अजूनी, सैभंग गुरूप्रसाद, जपादिसच, जुगादि सच, हैभी सच, नानक होसीभी सच। ' हा मंत्र समाविष्ट झालेला. पंजाबात नानकांचे भजन गात लोकांनी विनोबांचे उत्साहाने स्वागत केले. विनोबा रोजच्या प्रार्थनासभेत 'जपजी'चा पाठ करीत आणि नानकांच्या भाषेत लोकांना भूदान-ग्रामदान समजून सांगत. पठाणकोटला पंजाबमधला शेवटचा मुक्काम. रावी नदीचा पूल ओलांडून विनोबांनी बुद्धजयंतीच्या मुहूर्तावर काश्मीरमध्ये प्रवेश केला.

## काश्मीरमधील यात्रा

काश्मीर यात्रेत रोज दुपारी अकरा वाजता कुराणाची तिलावत म्हणजे पाठ सुरू झाला. विनोबांचे अरबी शुद्ध, स्पष्ट उच्चार ऐकायला रोज मुसलमान या वेळी येऊन बसत. सभेत विनोबा कुराणाच्या वचनांच्या आधारे करुणेचा मार्ग समजावीत. 'मुहब्बतका पैगाम घेऊन मी तुमच्याकडे आलो आहे' असे विनोबा सांगत. "जमिनीचा मालीक अल्लाताला आहे. जो माणूस स्वतःला जमिनीचा मालक समजेल तो खरा मुसलमान नाही, काफीर आहे. जमिनीची मालकी सोडून ग्रामदान करील तो सच्चा मुसलमान!" असे विनोबा म्हणत.

एका मुक्कामावर मूठभर सनातनी मौलवी विनोबांना भेटायला आले. कुराणाचा नवा अर्थ विनोबा सांगत. त्यामुळे ते खवळले होते. विनोबांना त्यांनी विचारले, "कुराण तुम्ही अक्षरशः मानता का?"

विनोबा म्हणाले, "कुठलाच ग्रंथ मी अक्षरशः मानीत नाही. वेद, कुराण, बायबल या सर्व ग्रंथांतून मी निवडक भाग तेवढाच घेतो. कुठल्याही ग्रंथाचं सगळं ओझं मी शिरावर कशाला घ्यावं? सगळ्याचा आग्रह धरू तर

थोडंदेखील कुणी वाचणार नाही. भुसा फुंकून फुंकून खायला लोकांना आता वेळ नाही. निवड करून देऊ तर या ग्रंथांचा लोकांच्या जीवनाला थोडाफार स्पर्श तरी होईल... "

मौलवी म्हणाले, "तुम्ही कुराण अक्षरशः मानीत नाही तर तुम्हांला कुराणाचा आधार घ्यायचा अधिकार नाही."

त्यांना उत्तर काय द्यायचे ? विनोबांनी फक्त स्मित केले. जाहीर सभेत या घटनेचा उल्लेख करून विनोबा म्हणाले, "हे लोक पैगंबराचं नाव घेऊन काही सांगू नये म्हणतात. ठीक आहे. माझं नाव घेऊनच आता मी विचार सांगेन !"

चार महिने विनोबांची काश्मीरात यात्रा झाली. हिमालयाच्या परिसरात निसर्गाने अनेक वेळी कसोटी पाहिली. हिंदुस्थान-पाकिस्तान महासंघराज्याची कल्पना विनोबांनी मांडली.

परतीच्या मार्गावर पुन्हा पठाणकोट लागले. पठाणकोट हे फार महत्त्वाचे ठिकाण आहे. पश्चिम भारतातली ही मोक्याची जागा. विनोबांनी तेथे प्रस्थान आश्रमाची स्थापना केली. स्नेह-सौहार्दाचा, समन्वयाचा संदेश देणारा आश्रम.

## बागींशी संबंध

काश्मीरमध्ये विनोबा असतानाच मध्यप्रदेशातील चंबळ खोऱ्यातील डाकूंसंबंधीच्या हकीकती विनोबांच्या कानी आल्या होत्या. परिस्थितिवश माणसे कुमार्गाला लागतात, आणि नंतर तो मार्ग सोडू म्हटले तरी सहसा शक्य होत नाही. चंबळ खोऱ्यातील डाकूंची समस्या हा यातलाच प्रकार होता. दहशत, तिला आळा घालण्यासाठी सवाई दहशत, आणि तिला पुरून उरण्यासाठी त्या वरचढ दहशत असा हा प्रकार. त्यात मरण अर्थातच सर्वसामान्यांचे. एकदा दरोडेखोरांचा धाक आणि नंतर पोलिसांची जरब. त्यात जनतेचे मात्र हाल ! डाकूंपर्यंतही विनोबांचे नाव पोचले होते. पोलिसांशी झुंज देताना मरण ओढवलेल्या मानसिंगच्या मुलाला फाशीची सजा ठोठावण्यात आलेली होती. त्याने तुरुंगातून विनोबांना लिहिले होते : "मला फाशीची सजा झाली आहे. मरण्यापूर्वी आपलं दर्शन घेण्याची उत्कंठा आहे. आपण आमच्या भागात जावं आणि आमच्या मुला-बाळांना या कुमार्गापासून वाचवावं अशी प्रार्थना

आहे." या पत्रातील आर्तता विनोबांसारख्या सहृदय माणसाला जाणवल्या-शिवाय कशी राहील ?

लोकांना उत्सुकता वाटत होती. "तुम्ही डाकूंच्या प्रदेशात जाणार काय ?" असे लोक सारखे विचारीत. जाहीरपणेच त्याबद्दल विनोबा एका सभेत बोलले. म्हणाले, "मी डाकूंच्या नव्हे, सज्जनांच्या प्रदेशात जात आहे. कोण डाकू आणि कोण सज्जन, हे तर एका देवालाच ठाऊक ! दिल्ली-मुंबईतही डाकू आहेत, आणि त्यांपैकी कित्येक प्रतिष्ठितपणं मिरवीत आहेत. देवाच्या दरबारात तेच अधिक गुन्हेगार ठरतील !"

## चंबळच्या खोऱ्यात

आणि विनोबा चंबळच्या खोऱ्याच्या दिशेने निघाले. विनोबांच्या आधीच काश्मीरमधील निवृत्त सेनाधिकारी यदुनाथसिंग आणि अन्य सहकारी विनोबांचा संदेश घेऊन डाकूंच्या विभागात निर्भयपणे गेले होते, आणि त्यांनी डाकूंशी संपर्क साधला होता. त्यांच्यातला बालसदृश मोकळेपणा अनुभवला होता. पोलिसी दंडुक्याला जे जमले नाही ते सहृदयतेने साधले. डाकू स्वतःला बागी म्हणजे बंडखोर म्हणवत. विनोबा म्हणत, "मीसुद्धा बागीच आहे. समाजात जी विषमता आणि अन्याय आहे त्याच्या निरसनासाठीच मी झुंजतो आहे. माझं बंड उघड असल्यानं लोक माझ्या पाठीशी उघडपणे उभे राहतात. ज्या समाजरचनेमुळं काही लोकांना डाकू होण्याची पाळी आली ती समाज-रचनाच बदलली पाहिजे !'

## डाकूंचे आत्मसमर्पण

अठरा मे एकोणीसशे साठचा दिवस. ज्याला पकडण्यासाठी सरकारने पाच हजारांचे इनाम लावले होते तो लच्छी पंडित स्वतः होऊन विनोबांकडे आला. लच्छी पंडित मुंबईत जाऊन राहिला होता. तिथल्या लाखो लोकांत त्याला कोणी ओळखण्याची शक्यता नव्हती, पण विनोबांच्या चंबळ खोऱ्यातील पदयात्रेचे वृत्त त्याने वाचले. आपल्या कुकर्मांचा पश्चात्ताप व्यक्त करावा असे त्याला वाटले, आणि संभाव्य संकटांची पर्वा न करता तो विनोबांकडे आला. दुसऱ्या दिवशी अकरा डाकूंची टोळी अशीच विनोबांकडे आली. पहाटे

अडीच वाजता विनोबा त्यांच्याशी एकान्तात बोलले. दुसऱ्या दिवशीच्या पदयात्रेत हे सर्व बागी विनोबांबरोबर होते.

त्या दिवशीच्या प्रार्थना-सभेत डाकूंनी आपल्या पूर्वकर्माबद्दल पश्चात्ताप व्यक्त केला, आणि आपली शस्त्रे विनोबांच्या पायांशी ठेवली. चार दिवस विनोबांच्या सोबत ही मंडळी राहिली. भिंड शहरात विनोबा आणि त्यांच्या पाठोपाठ बागी अशी अभूतपूर्व मिरवणूक निघाली! हजारो लोकांनी ते दृश्य पाहिले. संध्याकाळी ह्या बागींनी हरिनामसंकीर्तन केले, व साश्रू नयनांनी विनोबांचा निरोप घेतला. तुरुंगात ते जाणार होते. विनोबांनी आशीर्वाद दिला, " सद्भावना ठेवा, देवावर श्रद्धा ठेवा. तो सगळं भलं करील. "

आणि पोलिसांच्या मोटरीतून ते तुरुंगाकडे गेले. वीस जण होते. पोलिसांना ज्यांनी सळो की पळो करून सोडले होते आणि पोलिसांच्या हाती लागले नव्हते असे ते बागी स्वतः होऊन तुरुंगात जात होते. जेलच्या फाटकापाशी त्यांनी विनोबा-परिवाराचा निरोप घेतला, " विनोबांच्या गोष्टी कळवीत जा. जेलच्या जीवनात तोच आधार. तुरुंगातून जिवन्त सुटलो तर विनोबांचे काम करू! "

## इंदुरातील कार्य

भिंडहून विनोबा इंदूरला आले. महिनाभर तेथे राहिले. स्वच्छ इंदूरचे अभियान त्यांनी केले, आणि सिनेमाच्या असभ्य फलकांविरुद्ध त्यांनी मोहीम केली. इंदूरच्या नगरसेवकांना ते म्हणाले, " स्वातंत्र्यानंतर जनता जास्त परावलंबी बनत चालली आहे की काय अशी शंका येते. प्रत्येक काम सरकारनेच करावं असं म्हणून लोक निष्क्रिय राहात आहेत. जागृत, सक्रिय व स्वतंत्र जनताच लोकशाही टिकवू शकते. आजच्या मंत्र्यांच्या हाती जी सत्ता केन्द्रित झाली आहे ती पूर्वीच्या मोठमोठ्या बादशहांच्या हातीदेखील नव्हती. औरंगजेबाचा हुकूम आसामात पोचायला चार चार महिने लागत. आज काही मिनिटांच्या आत कोणताही हुकूम देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोचू शकतो. अशा स्थितीत आपली जास्तीत जास्त कामं आपल्या अभिक्रमानं व शक्तीनं जनतेनं केली तरच लोकशाही स्वातंत्र्य व टिकेल. "

इंदूरला विनोबांनी विसर्जन आश्रमाची व वानप्रस्थ मंडळाची स्थापना

केली. विसर्जन म्हणजे जुन्या मूल्यांचे विसर्जन व नव्या मूल्यांचे विशेष सर्जन असे विनोबांनी सांगितले. " वानप्रस्थाश्रम म्हणजे वृद्धांना ' रि-टायर ' करून कार्यप्रवृत्त करणे ! "

इंदूरच्या मुक्कामात विनोबांनी अहिल्योत्सवात स्त्रियांनी शान्तिरक्षा व शीलरक्षा यांचे कार्य करावे असे सांगितले. कस्तुरबा ग्रामला आठवडाभर त्यांचे वास्तव्य होते. तेथे सप्त स्त्री-शक्तींचे त्यांनी विवेचन केले.

## बंडखोर स्त्रिया हव्यात

स्त्री-पुरुषांतली विषमता विनोबांना चुकीची वाटते. ते स्वतः स्त्री-पुरुष भेद मानीतच नाहीत. सामाजिक, कौटुंबिक आणि राजकीय अधिकार स्त्री-पुरुषांना समान असले पाहिजेत. एवढेच नव्हे तर नैतिक योग्यता समान असली पाहिजे, असेही ते मानतात. एका व्याख्यानात विनोबा म्हणाले, " मी जर स्त्री असतो तर किती बाबतीत मी बंडखोरी केली असती ते सांगणं कठीण ! बंडखोरी आणि विनय यांत विरोध नसतो. "

विवाहाच्या निमित्ताने मुलीवर नाना प्रकारची जुल्म—जबरदस्ती होत असते. त्याबाबत विनोबा विनोबा म्हणतात, " विवाहाच्या बाबतीत आई—वडिलांनी सल्ला द्यावा, मदत करावी; परंतु निर्णय मुलीचाच मानला पाहिजे. आपला सल्ला मुलीनं मानला नाही, म्हणून आई-बापांनी दुःखी होऊ नये. त्यांना दुःख झालं तर त्याला मुलगीच सर्वस्वी जबाबदार मानणं योग्य नाही. आपलं हृदय जी गोष्ट मान्य करीत नसेल ती गोष्ट आई-बांपाच्या समाधानासाठी मान्य करणं उचित नव्हे. हृदयाला मान्य नसणारी गोष्ट करणं म्हणजे अंतरात्म्याशी बेइमान होणं. हा अधर्मच होय. साऱ्या जगाकडे परिपूर्ण प्रेमानं पाहण्याचं शिक्षण मिळावं यासाठी लग्न आदी प्रयोग आहेत. "

## स्त्री दासी नव्हे

स्त्रियांना गुलामासारखे वागवले जाते तेव्हा विनोबा अस्वस्थ होतात. " स्त्रीला दासी मानणं चुकीचं आहे. माझा या गोष्टीला विरोध आहे. लोकांना वाटते स्त्रीला देवाकडे जायचं तर पती या एजंटाची गरज आहे ! या भाकड कल्पना आहेत. पातिव्रत्याचे प्रतीक म्हणून बांगडया, मंगळसूत्र, कुंकू अशा वस्तूंची गरज आहे असं नाही. पातिव्रत्याप्रमाणे पत्नीव्रताचीदेखील गरज

आहे. स्त्रियांना दागिन्यांनी लदवतात आणि वर मित्रेपणाची पदवी बहाल करतात ! स्त्रिया पुरुषांच्या हाती सुरक्षित आहेत असं मानतात. हा धर्म-विचार नव्हे. स्त्रियांना ज्ञानाचे दरवाजे मोकळे झाले पाहिजेत. सार्वजनिक कामांतही त्यांच्या बुद्धिमत्तेचा उपयोग झाला पाहिजे. समाजाला प्रगती करायची तर सार्वजनिक जीवनातून स्त्री–पुरुष भेद आपण दूर केला पाहिजे. पत्नीने नेहमी पतीच्या कह्यात राहिले पाहिजे, हा अतिशय घातक विचार आहे. जीवनात पुरुषार्थ वाढतो तेव्हा विषयवासना कमी होते. सर्वांना पुरुषार्थाच्या वाटा मोकळ्या झाल्या पाहिजेत. कमजोर माणसातच वासनांचे थैमान चालू असते. ”

## माता आणि नेता

एका ठिकाणी ते म्हणतात, “ स्त्रियांनी ज्ञान-विज्ञानाच्या क्षेत्रांत अग्रभागी असलं पाहिजे. वेदात असं दाखवलं आहे की, उमा आणि हेमवती यांनी इंद्र आणि अग्नि यांना आत्मज्ञान दिले. अशा प्रकारच्या उमा निर्माण झाल्या पाहिजेत. स्त्रियांनी आश्रम चालवले पाहिजेत, आणि त्यांतून स्त्री-पुरुष दोघांनाही त्यांनी संस्कारित केले पाहिजे. आसाममध्ये समाजात स्त्रियांना मोठे स्थान आहे. माताच उत्तम नेता बनू शकतात. पुरुषांच्या या जगात स्त्रियांनी बंड केलं पाहिजे. त्या बंडाला प्रवृत्त होतील तेव्हा समाजाची आजची चुकीची घडी बदलून नवी घडी बसवता येईल. स्त्रियांच्या हाती समाजाचा अंकुश असला पाहिजे. त्या दृष्टीनं त्यांनी स्वतःला तयार केलं पाहिजे. आजच्या विज्ञानयुगात पुरुषांची बुद्धी स्तंभित झाली आहे. आपले दैवी गुण घेऊन, संयमशीलता घेऊन, वात्सल्य घेऊन स्त्रिया आता पुढं सरसावतील तर त्या जगाचं रूप पालटून टाकतील. स्त्रियांनी ब्रह्मविद्या प्राप्त केली पाहिजे. संत मिराबाईचं स्त्रियांनी अनुकरण करावं. केवढा तिचा त्याग ! किती हिंमत ! आपल्या काळा-तली सर्व बंधनं झुगारून ती बाहेर आली होती. तिच्या शौर्याला भारताच्या इतिहासात तोड नाही. मिरेचं हे सगळं सामर्थ्य ब्रह्मविद्येचं होतं. वेदात सांगितलं आहे की, स्त्रियांत अधिक सूक्ष्म बुद्धी असते. स्त्री पुरुषांपेक्षा अधिक उदार असते. गीतेत म्हटलं आहे : ‘ कीर्तिः श्रीः वाक च नारीणां स्मृतिर्मेधा धृतिः क्षमाः ’– स्त्रियांत कीर्ती, लक्ष्मी, वाणी, स्मृती, बुद्धी, धैर्य आणि क्षमा– अशा सात रूपांत परमेश्वर वास करतो. मनूनं स्त्रियांबाबत परम आदर व्यक्त केला

आहे. तो म्हणतो– ‘ उपाध्यायान् दशाचार्यः आचार्याणां शतं पिता । सहस्रं तु पितृन् माता, गौरवेणातिरिच्यते । दहा उपाध्यायांबरोबर एक आचार्य असतो, शंभर आचार्यांच्या बरोबर एक पिता होय. पण हजार पित्यांपेक्षाही एक माता श्रेष्ठ होय ! ”

## ब्रह्मविद्या आणि स्त्रिया

म. गांधींनी सार्वजनिक कार्यात आणि चळवळीत स्त्रियांना फार मोठ्या प्रमाणावर आणले. स्त्री–पुरुषांमधील संशयाचे आणि चमत्कारिक वातावरण नाहीसे व्हावे व तिलाही निर्भयपणे आणि मुक्त मनाने समाजात वावरता यावे या दृष्टीने त्यांनी प्रयत्न केले. ब्रह्मचर्य व्रताचे अनुशासन यासाठी त्यांनी राष्ट्रीय चळवळीत निर्माण करण्याचा प्रयत्न केला. समाजाचा हा अर्धा भाग स्वातंत्र्य अनुभवू शकला नाही तर स्वातंत्र्याची सारी चळवळ व्यर्थ, असे त्यांना वाटे ! ब्रह्मचर्य म्हणजे स्त्रियांचा संपर्क टाळणे, ही कल्पना त्यांनी बदलली, उलट ब्रह्मचर्याची कसोटी स्त्रिया किती मोकळेपणी आणि निर्भयतेने आपल्यात वावरतात ही त्यांनी ठरवली.

विनोबांची आकांक्षा अशी की, ब्रह्मविद्येच्या क्षेत्रातही स्त्रियांनी आपले कर्तृत्व दाखवावे. ब्रह्मविद्या मंदिराच्या स्थापनेचा विचार त्यांच्या मनात वर्षानुवर्षे घोळत होता. परंधाम पवनारचा आपला आश्रम त्यांनी ह्या कामासाठी मुक्रर केला. ह्या आश्रमाचे संचालन आणि व्यवस्था स्त्रियांनी करावी असे त्यांनी ठरवले. स्त्रियांची साधना सामान्यतः गुप्तच राहिली. त्या साधनेचा परिणाम कोणा ना कोणावर होतही राहिला; परंतु ती साधना प्रकट व्हावी अशी विनोबांची इच्छा. जागतिक शान्तता केवळ पुरुष करू शकणार नाहीत, ही त्यांची मनोमन धारणा. एकोणीसशे एकूणसाठच्या मार्च महिन्यात ब्रह्मविद्या मंदिराची स्थापना झाली. विनोबांच्या बरोबर भू-दान चळवळीत काम करणाऱ्या राजम्मा आणि इतर तरुण स्त्रियांनी ब्रह्मविद्या-मंदिराची सर्व जबाबदारी घेतली, ब्रह्मविद्येच्या समोर स्त्री-पुरुष हा भेद निरर्थक असल्याने ब्रह्मविद्या-मंदिरात पुरुषांनाही प्रवेश आहे. ब्रह्मविद्या-मंदिराचे कार्य अकरा वर्षे चालू आहे. ब्रह्मविद्या-मंदिरातील स्त्रिया ‘ मैत्री ’ नावाचे एक सुंदर हिंदी मासिक चालवतात. साधकांचे विचार आणि अनुभव त्यात दिलेले असतात.

क्रांतीचे शास्त्र

मार्क्सवाद्यांशी विनोबाजींच्या चर्चा सतत घडत आलेल्या आहेत. अशा चर्चांत त्यांना मनापासून उत्साह वाटत आला आहे. त्यासंबंधी एका ठिकाणी मोठे मार्मिक विवेचन केले आहे ते असे : "मार्क्सने सबंध इतिहासाचा ओघ शोधून काढला आहे. निर्णय हा लागला आहे की, ज्याप्रमाणे बाण सुटल्यानंतर त्याची दिशा बदलू शकत नाही, निश्चित दिशेने त्याला जाणे भाग पडते, त्याप्रमाणे आमची स्थिती आहे. पूर्वइतिहासाच्या प्रवाहाने आमच्या कार्याची दिशा ठरवून टाकलेली आहे. आम्हांला क्रिया-स्वातंत्र्य उरलेले नाही. आधी रक्ताच्या नद्या वाहतील, मग दुधा—मधाच्या वाहतील आणि शेवटी सर्वांची तृष्णा भागवणारी शीतल जलाची नदी दरेकाच्या घरावरून वाहात जाईल ! हे सर्व ठरलेले आहे. युक्लिडच्या भूमितीप्रमाणे क्रांतीचे एक सुव्यवस्थित शास्त्र इतिहासाच्या निरीक्षणाने आणि संशोधनाने आपल्याला लाभलेले आहे, असा कम्युनिस्टांचा दावा असतो. क्रांती आधी कुठे कुठे होईल याचे भाकितही मार्क्सने करून ठेवले होते. यद्यपि ते खरे झालेले नाही, तरी ज्योतिषाची भाकित वर्तवण्याची ती नजरचूक आहे. तेवढ्याने फलज्योतिषाचे शास्त्र निष्फळ झालेले नाही. यमाची ओढ जशी टळायची नाही, त्याप्रमाणे क्रांतीचे भविष्य टळायचे नाही. अशा स्थितीत तीत भाग घेणे, तिला हातभार लावणे, एवढेच आपल्या हातात आहे; आणि एवढेच आपले काम आहे" असे मार्क्सवादी मानतात, मार्क्सवाद्यांच्या भूमिकेचे असे विश्लेषण केल्यावर विनोबा म्हणतात, "वाल्मीकीने रामचरित्र आधीच लिहून ठेवले होते म्हणतात. आणि मग राम त्याबरहुकूम अक्षरशः वागले. त्यामुळे रामाला काडीचीही अडचण पडली नाही. बघायचे नि वागायचे ! परिणामही लिहून ठेवलेला. त्यामुळे त्याचीही चिंता करायचे कारण नाही. अशी साम्यवाद्यांची स्थिती. मार्क्सने लिहिले तसा लेनिन वागला. आम्हीही त्याचा मागोवा घेत घेत सरळ मुक्काम गाठायचा. मार्क्सच्या लिहिण्यात आणि लेनिनच्या वागण्यात कुठे तफावत पडल्याचा भास होतो तेवढी एकवाक्यता करून दाखवायचा प्रयास कधी कधी करावा लागतो. तेही तितके जड काम नसते. कारण श्रुतिवचनानुसारच स्मृती असायची हे ठरलेले असल्यामुळे स्मृतिवचन अधिक स्पष्ट असले तर तदनुरोधाने श्रुती लावून घेतली म्हणजे झाले. इतके केले म्हणजे सर्व लाइन-क्लीअर !"

## व्याकुळ बुद्धी– वैज्ञानिक बुद्धी

एका उत्कट, पण विचार गमावून न बसलेल्या साम्यवाद्याशी चर्चा चालली होती. विनोबांनी विचारले, "हिंसा ही आमजनतेची शक्ती म्हटली जाईल का?"

तो म्हणाला, "सामान्यतः नाही म्हटली जाणार, पण विशेष प्रसंगी आणि विशेष उपायांनी हिंसेसाठी जनता तयार करता येते."

यावर विनोबांनी विचारले, "समजा, विशेष प्रसंगापुरती तयार करता आली तरी उपयोग काय? एकदा कमावू आणि कायमचे खावू असं तर व्हायचंच नाही. जी शक्ती आमच्या स्वभावातली नाही तिचा उसना आव आणला तरी शेवटी ज्यांच्या स्वभावतच ती शक्ती आहे अशा लोकांच्या हातांतच सत्ता राहायची. बरं, जनतेचा स्वभाव पालटू म्हटलं तर एक तर ती अशक्य गोष्ट आहे; आणि समजा, शक्य झाली तर ती एक भयानक घटना होईल. अशी घटना की तिचे परिणाम तुमच्याही अपेक्षेच्या किंवा कल्पनेच्या पार पलीकडे जातील."

यावर ते कम्युनिस्ट म्हणाले, "जाऊ देत. काहीही परिणाम होऊ दे. आजची स्थिती पालटू दे म्हणजे झालं!"

विनोबा म्हणाले, "आजची स्थिती पालटण्याचा भास क्षणभर खुशाल होईल, पण पुढं दुप्पट जोरानं तीच स्थिती उलटेल."

कम्युनिस्ट कार्यकर्ते म्हणाले, "उलटली तर उलटली, पुढचं पुढं पाहू."

विनोबा म्हणाले, "हे वैज्ञानिक बुद्धीचं बोलणं नाही; व्याकुळ बुद्धीचं आहे. कम्युनिस्ट तर वैज्ञानिक बुद्धीचा दावा करतात!"

यावर ते कम्युनिस्ट म्हणाले, "होय, करीत असतात. कारण एकदा सत्ता हातात आल्यावर कायमची व्यवस्था करून टाकू, अशी त्यांनी भाषा काढली आहे. कायमच्या व्यवस्थेची भाषा मला पटत नाही. कारण जगात काहीच कायमचं टिकू शकत नाही. तरी पण श्रीमंतांना एकदा श्रीहत करायला हवंच. पुढचा प्रश्न पुढच्या पिढ्या सोडवतील."

विनोबा म्हणाले, "कायमच्या व्यवस्थेचा कडेकोट बंदोबस्त जरी साम्यवादानं रचला असला तरी त्यानं ती अफूची गोळीच शोधून काढली आहे!

सर्वसामान्य साम्यवाद्याची भूमिका 'तुरतदान महापुण्य' अशीच असते. माउलीची व्याकुळता त्यात दिसते, गुरुमाउलीची कूर्मदृष्टी तीत नाही !"

## स्वराज्य-शास्त्र

एकोणीसशे चाळीस साली वैयक्तिक सत्याग्रहाच्या वेळी विनोबांनी स्वराज्य-शास्त्र हे पुस्तक लिहिले. राजनीती काढून तिच्या जागी लोकनीतीची स्थापना करायची, हा ध्यास त्यामागे आहे. राज्यशास्त्रावरील अलौकिक असा तो ग्रंथ आहे. सूत्ररूपाने विनोबांनी तो विषय मांडला आहे. जगभरच्या राज्य-शास्त्रीय ग्रंथांचा अभ्यास करतो म्हणणाऱ्या पुष्कळांना ह्या अपूर्व ग्रंथाचा परिचय नाही ! गीताईच्या लाखो प्रती खपूनही साहित्यिकांना जसा तिचा पत्ता नव्हता तशीच काहीशी स्थिती ! 'लोकनीतीचे व्याकरण' अशी या स्वराज्य-शास्त्राची विनोबांनी स्वतःच भलावण केली आहे. "अल्पाक्षरयोजनेमुळे त्याचा अर्थ उकलायला मननाची गरज राहील" असे विनोबांनाही वाटते.

उत्तम राज्यपद्धतीची म्हणून काही तत्त्वे विनोबांनी मांडली आहेत ती अशी : सार्वराष्ट्रीय भ्रातृभाव, राष्ट्रातील सर्वांचे ज्ञानपूर्वक, यथाशक्ती पण सहज-स्फूर्त आणि हार्दिक सहकार्य, समर्थ अल्पसंख्या आणि सर्वसामान्य बहुसंख्या यांचे हितैक्य, सर्वांच्या सर्वांगीण आणि समान विकासाची दृष्टी, राज्यसत्तेचे व्यापकतम विभाजन, अल्पतम शासन, सुलभतम तंत्र, कमीत कमी खर्च, कमीत-कमी रखवाली आणि सार्वत्रिक, अव्याहत आणि तटस्थ अथवा मुक्त ज्ञानप्रचार,–असे दशोगुणी स्वराज्य निर्माण व्हावे हाच विनोबांना ध्यास आहे. त्याचसाठी त्यांचा सर्व अट्टाहास आहे.

निर्दोष राज्यपद्धतीची चार लक्षणेही त्यांनी त्याच पुस्तकात एका ठिकाणी विवरली आहेत : (१) समर्थांचे सामर्थ्य जनसेवेला वाहिलेले असले पाहिजे. (२) जनता संपूर्ण स्वावलंबी आणि परस्पर सहकारी असली पाहिजे. (३) नेहमीच्या सहकार्याचे आणि प्रासंगिक असहकाराचे अथवा प्रतिकाराचे अहिंसा हेच अधिष्ठान असले पाहिजे. (४) सर्वांच्या प्रामाणिक परिश्रमांची नैतिक आणि आर्थिक किंमत समान असली पाहिजे.

## विनोबा म्हणजे भूकंप

गीताप्रवचनांचे भाषान्तर सर्व भारतीय भाषांत आणि काही बोलींमध्येही झाले आहे. सिंधी भाषेत झालेल्या अनुवादाच्या प्रस्तावनेत विनोबांनी लिहिले

आहे, “ मला ठाऊक आहे की सिंधी निर्वासितांची मी फारशी सेवा करू शकलो नाही. परंतु आता ह्या प्रवचनांच्या द्वारे मला अशी आशा आहे की माझी सेवा त्यांना रुजू होईल. ”

सिंधी भाषेत विनोबांचे एक चरित्र प्रसिद्ध झाले त्याला श्री जयरामदास दौलतराम यांनी प्रस्तावना लिहिली आहे. “ विनोबा म्हणजे एक भूकंप आहेत. भूकंप होतो तेव्हा तो एकदम, अचानक झाल्यासारखा वाटतो. परंतु त्याची प्रचंड तयारी पृथ्वीच्या पोटात पुष्कळ वर्षे होत असते. पण त्याचा उद्रेक होईपर्यंत त्याची कोणाला कल्पना नसते ! ”

गीताप्रवचनाच्या सिंधी भाषेतही पाचांवर आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या आहेत. तामिळ भाषेतही मराठीइतकेच गीताप्रवचन लोकप्रिय ठरले आहे. इतर भाषांतही. बंगाली आवृत्तीच्या प्रास्ताविकात विनोबांनी लिहिले आहे, “ काशीहून एक तर बंगालला जावे किंवा हिमालयात जावे असा विचार होता; पण गांधीजींशी पत्रव्यवहार होऊन मी तिकडे गेलो, आणि तिथे मला बंगालची क्रान्ती आणि हिमालयाची शान्ती दोन्ही मिळाल्या. ” विनोबा मराठी–भाषी असले तरी त्यांची मानसिक पार्श्वभूमी बंगालची होती. विनोबांचे त्या वेळी एक बंगाली आराध्यपंचायतन होते. रामकृष्ण, विवेकानंद, अरविंद, रवीन्द्रनाथ आणि राममोहन राय– हे ते पंचायतन.

## व्यावहारिक गणित

विनोबा नेहमी म्हणतात की, परमेश्वराखालोखाल माझा विश्वास गणितावर आहे आणि आपली मांडणी त्याच दृष्टीने ते नेहमी करतात. असेच त्यांनी मांडलेले हे गणित पहा :

एका कुटुंबात सरासरी पाच माणसे आहेत असे समजू. ती सगळीच्या सगळी काही काम करण्याइतकी आरोग्यसंपन्न असणार नाहीत. कोणी वृद्ध, कोणी आजारी, तर काही मुले. त्यामुळे सर्वजण पूर्ण आठ तास काम करू शकणार नाहीत. दिवसाकाठी सर्वजण मिळून १६ तास काम व्हायला हरकत नाही. पुरुष ८ तास, स्त्री ५ तास, आणि मुले ३ तास. महिन्याकाठी २५ दिवस काम, आणि ५ दिवस सुटी. म्हणजे महिन्याला कुटुंबागणिक ४०० तास काम होईल. या कुटुंबाला महिन्याकाठी १५० रुपये मिळाले पाहिजेत. म्हणजे तासाला

छत्तीस-सदतीस पैसे तरी मिळाले पाहिजेत. दिवसाला आठ तासाला तीन रुपये मजुरी तरी मिळाली पाहिजे. पण एवढी देण्याचीदेखील हमी आपले योजनाकार घ्यायला तयार नाहीत. कधी घेता येईल हे सांगायला तयार नाहीत. म्हणून विनोबा म्हणतात, गावानेच या दृष्टीने स्वतःची योजना बनवली पाहिजे. याचेच नाव ग्रामदान.

## अशी सजा द्यावी

शिक्षणासंबंधीचा विचार समजावताना विनोबा म्हणाले, "आजच्या शिक्षकाचा समाजावर पुरेसा परिणाम होत नाही. त्यामुळे चोऱ्या होतात. मग त्यासाठी न्यायाधीश नेमावे लागतात. अजब दृश्य आहे! एकदा एकाने चोरी केली. न्यायाधिशांकडे प्रकरण गेले. त्यांनी विचारले, "चोरी का केली?"

चोर म्हणाला, "घरात खायला नव्हतं म्हणून चोरी केली. मुलां-बाळांचं रक्षण करायचं होतं. ना नोकरी, ना रोजगार!"

न्यायाधीशांनी त्याला सजा ठोठावली. त्याला तुरुंगात निश्चितपणे अन्न मिळू लागले, पण घरी मुलाबाळांची उपासमार! मग मुलांची आई त्यांना म्हणते, "तुमच्या बापाच्या पावलावर पाऊल टाकून चालाल तर तुम्हांला चार घास खायला तरी मिळतील!"

मग ती मुले बापाच्या वाटेला लागतात!

खरे म्हणजे न्यायाधिशांनी म्हणायला पाहिजे, "बिचारा बेकार होता. काम नव्हतं. त्यामुळं चोरी करण्याशिवाय त्याला गत्यंतर नव्हतं. तेव्हा त्याला तीन एकर जमिनीची मी सजा देतो!"

त्याला तीन एकर जमीन देऊन पुन्हा चोरी करू नकोस, असे बजवायला हवे. ही सजा ऐकून तो न्यायाधिशांना प्रणाम करील. म्हणेल, "आता कष्ट करून मी पोट भरीन. पुन्हा असं करणार नाही!"

पण आज न्यायालये, तुरुंग, सत्ता, दंड हे सारे दूषित समाजरचनेमुळे झाले आहे. नीती एकांगी असू शकत नाही. 'न मे स्तेनो न कदर्यः — आमच्याकडे चोर नाहीत, कारण कंजूष लोकही नाहीत.' आपल्या समाजाने चोरांना दोष दिला तसाच तो संग्रहींनाही दिला!

## आजचे शिक्षण

आजच्या उच्च शिक्षणाच्या खर्चिकपणाचा हिशोब मांडताना विनोबा म्हणाले, " उच्च शिक्षण घेणारा मुलगा दरसाल वीस एकरांचं उत्पन्न खात असतो ! आजचा मुलगा बी.ए. होतो; मग बी. टी.; बी. टी. नंतर एम्. ए.; इंग्रजीत २६ अक्षरं आहेत, ती सर्व आपल्या नावानंतर लागावी हा जणू हव्यास ! पराक्रम करायचं जे वय ते डिगऱ्या मिळवण्यातच खर्ची पडतं. घरचा पैसा खर्च होतो तो वेगळाच. "

यानंतर विनोबांनी अकबर बादशहाची एक गोष्ट सांगितली.

अकबराचा बाप तो लहान असतानाच वारला. अकबर लहान म्हणून त्याचे गुरूच राज्यकारभार पाहात होते. अकबरालाही शिकवीत होते. गुरू चांगले ज्ञानी होते. अकबराला तेरावे वर्ष लागले आणि तो अस्वस्थ झाला ! अकबराला राज्य करण्याची उत्कंठा लागून राहिली होती. किती दिवस वाट बघायची ?

एक दिवस तो उठला आणि दरबाराकडे सरळ निघाला. हुजरे चपापले. सिंहासन रिकामेच होते. अकबर सरळ त्यावर जाऊन बसला. म्हणाला, " आजपासून मी बादशहा. माझे हुकूम सर्वांनी पाळायचे. "

हुजरे म्हणाले, " काय आज्ञा आहे आपली ? "

अकबर म्हणाला, " गुरुजींना कैद करून अटकेत टाका. "

दहा-बारा दिवस उत्तम कारभार चालवल्यानंतर अकबर गुरुजींना भेटायला गेला. त्यांना वंदन करून म्हणाला, " गुरुजी, माझ्या वागण्याबद्दल मला क्षमा करा. पण तेरा वर्षं वयाची झाली. तुमच्या हुकमतीत किती दिवस राहायचं ? सगळं कर्तबगारीचं वय असंच फुकट जायच ! तेव्हा झालं गेलं विसरा. आता तुम्ही मुक्त आहात. मला जरूर वाटेल तेव्हा सल्ला–मसलत देत जा. "

गुरू म्हणाले, " माझं काम झालं. तू जबाबदारी सांभाळण्यालायक झालास. आता मी तीर्थयात्रेला जातो. "

तेरा वर्षांच्या अकबराला पुरुषार्थाची घाई झाली होती. पण आजची मुलं तेरा दुणे सव्वीस वर्षे झाली तरी बापाच्या पैशांवर शिकतच असतात !

## सद्‌गुण समाजात पसरावेत

एकदा विनोबा म्हणाले, “सद्‌गुण हे दह्यासारखे असतात. दह्याचं दुधात मुरण घातलं तर दही सतत मिळत राहतं. दही तसंच ठेवून दिलं तर ते सडून जातं. सद्‌गुणांचंही तसंच आहे. ते समाजात पसरले पाहिजेत. ते तसेच ठेवू म्हटलं तर त्यात विकृती निर्माण होते. साधना एकाकी राहिली तर तीही विकृत होते. म्हणून ती समाजात पसरली पाहिजे.”

## आसामात

आसामात बंगाली भाषी व आसामी भाषी यांच्यात प्रचंड दंगली उसळल्याची बातमी आली. विनोबांनी तेथील भाषिक तणावाचे शमन व्हावे म्हणून काही शान्ति-सैनिकांना आसामकडे पाठवले. ‘विश्व जालीया वन्ही संते व्हावे पाणी’ या उक्तीप्रमाणे विनोबांनी तिकडे जावे अशी अनेकांची इच्छा. विनोबा म्हणाले, “मी आसामात जाईन; पण किती केले तरी कासव आपल्याच गतीनं जणार, ते काही ससा होऊ शकत नाही!” आणि विनोबा आसामच्या रोखाने निघाले. मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार, बंगाल– अशा मार्गाने ते आसामात पोचले. मार्गात बोधगयेचा समन्वयाश्रम, मुंगेरचा खादी ग्राम आश्रम, आणि पूर्णिया जिल्ह्यातील राणीपतरा आश्रम यांना विनोबांनी भेटी दिल्या. आपल्या संकल्पाचे बिहारच्या जनतेला भान करून दिले. आसामात पाकिस्तानातून बेकायदा येणाऱ्या मुसलमानांची संख्या, हा तेथील सर्वांच्या चिंतेचा विषय झालेला दिसला. ही संख्या पन्नास टक्क्यांच्या घरात जाईल अशी शक्यता अनेकांनी बोलून दाखवली. विनोबा म्हणाले, “यावर इलाज ग्रामदान हाच आहे. ग्रामदान झालं की, सर्व जमीन गावाच्या मालकीची होईल. जमीन कोणाला विकता येणार नाही. विकत घेता येणार नाही. जमिनीच्या लोभानं बाहेरून येणारांस त्यामुळं सहज आळा बसेल. गावात कोणी बाहेरून आला आणि स्थिरावू म्हणू लागला तर चटकन ध्यानी येईल व त्याचा बंदोबस्तही करता येईल.”

## नामघोषा सार

विनोबा आसामात गेले त्यापूर्वी त्यांनी आसामी भाषेचा अभ्यास केला. आसामचे दोन महापुरुष होऊन गेले. त्यांची नावे इतर प्रांतांत फारशी माहिती

नाहीत; पण आसामात मात्र ती नावे घरोघरी पोचली आहेत. एक शंकरदेव आणि दुसरे माधवदेव. चारशे वर्षांपूर्वीचे हे वैष्णव संप्रदायी महापुरुष. आसामात गेल्यावर त्यांची पुस्तके विनोबांनी वाचली. माधवदेवांचे ' नामघोष ' पुस्तक विनोबांना खूपच आवडले. विनोबांनी ' नामघोषा-सार ' तयार केले. आसामी लिपीत ते प्रसिद्ध झाले; पण विनोबांना वाटले की, हे पुस्तक सर्व भारतभर गेले पाहिजे. विनोबांनी ' नामघोषा-सार ' देवनागरी लिपीत छापवून प्रसिद्ध केले. अशा रीतीने सर्व भारताची विचारसंपत्ती सर्वांना उपलब्ध व्हावी व त्यामुळे भारतीय ऐक्य वाढावे अशी विनोबांची दृष्टी आहे. हिंदी नामघोषा-सारच्या शेवटी एक शब्दकोशही विनोबांनी दिला आहे. हिंदी जाणणाऱ्यांना आसामीच्या शब्दांची ओळख व्हावी आणि परकेपणाची भावना राहू नये हा उद्देश.

## असे शिक्षण हवे

आसाममधील बमनगामा या गावची गोष्ट. गावाचे ग्रामदान झाले होते. गावकरी विनोबाजींकडे गेले. म्हणाले, " आमच्या गावात शिक्षणाची काही तरी व्यवस्था करा. "

विनोबा म्हणाले, " गावाच्या शिक्षणाची व्यवस्था मी करू शकतो. पण तुम्ही नोकरी मिळण्याची शिक्षणाकडून अपेक्षा करणार नसाल तर ! मी शाळेवर अशी पाटी लावीन की ' या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना नोकरी मिळणार नाही ! ' आहे कबूल ? "

गावकरी म्हणाले, " कबूल. आमच्या मुलांना नोकऱ्या नाही मिळाल्या तरी चालतील; पण शिक्षण मात्र चांगलं असलं पाहिजे. "

## मैत्री-आश्रम

चीन-भारत सीमेजवळ नेफाच्या सुबन्सरी विभागात उत्तर लखीमपूर शहरात ५ मार्च १९६१ रोजी विनोबांनी मैत्री-आश्रमाची स्थापना केली. आश्रमाच्या स्थापनेमागील आपली कल्पना विशद करताना विनोबा म्हणाले, " मैत्री हा या आश्रमाचा विशेष होय. सीमावर्ती भागात सद्‌भाव आणि सौहार्द, परस्पर-विश्वास आणि प्रेम राहावं यासाठी हा आश्रम. स्त्री-शक्तीचा विकास हाही या आश्रमाचा आणखी एक उद्देश आहे. भारतातील भिन्न भिन्न प्रांतांतील

स्त्रिया या आश्रमात एकत्र रहाव्यात व त्यांनी मैत्रीची सामूहिक साधना करावी. परस्परांच्या भाषा शिकाव्या. सर्व भाषांतील सर्वोत्तम ग्रंथांचं सर्व भारतीय भाषांत भाषान्तर करावं व जीवनाच्या द्वारे सर्वत्र मैत्रीचं वातावरण निर्माण करावं. ”

आसाममध्ये सार्वजनिक कार्यात इतर कुठल्याही भागापेक्षा स्त्रिया जास्त आहेत. श्रीमती अमलप्रभा दास ह्या त्यांच्या जणू अग्रणी. त्यांची समर्पण वृत्ती, विधायक वृत्तीच्या संगोपनाची वात्सल्य-भावना आणि निर्भयता ही आदर्शभूत म्हणावी लागेल. आसामात महिला लोकसेवक संघाची स्थापना करण्यात आली. त्या वेळी विनोबा म्हणाले, “ स्वराज्यानंतर काँग्रेसचं विसर्जन करून लोकसेवक संघाची स्थापना करण्याचा गांधीजींचा सल्ला काँग्रेसनं मानला असता तर देशात सेवासंस्था बलशाली झाली असती, व सत्तासंस्थेवर तिचा प्रभाव पडला असता. महिलांनी पक्षमुक्त होऊन सेवाकार्य करावं व पुरुषांच्या भांडणांना लगाम घालावा. आजवर पुरुषांच्या हाती कारभार राहिला आणि केवळ एका अर्ध्या विसाव्या शतकात दोन विश्वयुद्धे करण्याचा पराक्रम त्यांनी केला ! महिलांनी आता भेदाच्या भिंती नेस्तनाबूत करून सर्व जग एकत्र करायला सिद्ध व्हावं. ”

आसामच्या काँग्रेसकार्यकर्त्यांना ते म्हणाले, “ स्वराज्यानंतर तुम्ही सत्तेचा हव्यास धरलात आणि पुण्यक्षयाचा कार्यक्रम सुरू केलात ! आता गावोगाव फिरा, लोकांची सेवा करून विश्वास संपादन करा. ” विरोधी पक्षांना त्यांनी सांगितले, “ कुस्ती जिंकायची तर आखाड्यात जाऊन काही व्यायाम कराल की नाही ? ” राजकीय पक्ष ठराव करून पाठिंबा देत. त्याबद्दल विनोबा म्हणाले, “ एक पत्रक दुसऱ्या पत्रकाला जन्म देतं आणि पत्रकांची अशी माळका लागते. प्रत्यक्ष काम मात्र काहीच होत नाही ! ”

आसामात विनोबा अठरा महिने राहिले.

## पाकिस्तानात सोळा दिवस

आसामातून बंगालमध्ये जाण्याचा जवळचा मार्ग पाकिस्तानातून जात होता. विनोबांनी त्या मार्गाने जायचे ठरवले. पाकिस्तानने अनुमती दिली आणि पाच सप्टेंबर एकोणीसशे बासष्टला विनोबांनी सोनार हाट या सीमेवरील

गावातून पाकिस्तानात प्रवेश केला. पाकिस्तानच्या जनतेने आणि लोकांनी विनोबांचे उत्साहाने आणि प्रेमाने स्वागत केले. विनोबा स्वागताला उत्तर देताना म्हणाले, "पाकिस्तानच्या जनतेकडे मी प्रेमाचा व शान्तीचा संदेश घेऊन आलो आहे. इथं मला काहीच वेगळेपणा भासत नाही. तेच आकाश, तीच माती, तोच माणूस, तेच प्रेमानं ओथंबलेलं मन! भारतातील लोकांच्या दर्शनानं माझं हृदय उचंबळून येई तसंच इथंही येत आहे."

पहिला पडाव भुरुंगयारी येथे होता. विनोबांच्या दर्शनाला लोकांची रीघ लागली होती. शाळेच्या अंगणात संध्याकाळी प्रार्थना-सभा झाली. गावकऱ्यांनी त्यांना मानपत्र अर्पण केले. चार-पाच हजारांचा समुदाय होता. विनोबा हिंदीत बोलले. आशादेवी आर्यनायकम यांनी बंगालीत अनुवाद केला. विनोबा भाषणाच्या ओघात म्हणाले, "कुराणात म्हटलं आहे की, निम्मा रजकूबा हुम्‌युन फिकून!– याचा अर्थ आपल्या मिळकतीतला काही भाग आपल्या गरीब बांधवांसाठी द्या. ईश्वराला रहमान् अर रहीम असं म्हटलं आहे. परमेश्वर जर दयाळू असेल तर आपण निष्ठुर होऊन कसं चालेल? परमेश्वर एक असं आपण म्हणतो आणि त्याचं नाव घेण्याच्या वेळी मात्र वेगळे होतो! आपण मौन प्रार्थना केली की, आपण एकाच ठिकाणी आपापल्या भाषांत ईश्वराचं नाव घेऊ शकतो."

प्रार्थनेनंतर अबदुल खलिक मुनशी या माणसाने आपल्या चार एकर जमिनीतील एक विघा जमीन आपल्या गावातील गरीब बांधवांसाठी दिली. पहिल्याच दिवशी भू-दान मिळाले!

दुसऱ्या गावातील सभेत स्त्रिया नव्हत्या. तेव्हा विनोबा म्हणाले, "सभेमध्ये एकही स्त्री नाही ही दुःखाची गोष्ट आहे. माझ्या ह्या प्रेमाच्या गोष्टी त्यांनीही ऐकायला पाहिजेत." विनोबांच्या स्वागतप्रसंगी पाकिस्तान झिंदाबाद आणि जय जगत् अशा घोषणांनी आकाश दुमदुमत होते.

एका ठिकाणी विनोबा म्हणाले, "भारत-पाकिस्तान यांचं महासंघराज्य व्हावं असं मला वाटतं. खरं तर आता सगळे देश हे विश्वराज्याचे प्रांत व्हावे. सर्वांनी विशाल जागतिक संघराज्यात सामील व्हावं."

एका गावात विनोबांना संस्कृतमध्ये मानपत्र देण्यात आले. सभेत विनोबा म्हणाले, "भारत व पाकिस्तान यांची शरीरं दोन असली तरी हृदय

एक आहे. येथल्या बंगाली क्रमिक पुस्तकात एका सूफी कवीची कविता आहे. त्यात तो कवी म्हणतो– जाती, देश यांच्यापेक्षा माणुसकी मोठी आहे. मी जय जगत् म्हणतो ते याच दृष्टीनं. केवळ एकाच, माझ्याच देशाचा जय व्हावा असे घोष सर्वत्र ऐकू येतात, पण मी म्हणतो की, सर्वच देशांचा जय होवो ! गेल्या महायुद्धात कोटयवधी लोक मेले, जखमींची तर गणनाच नाही. दोन्ही पक्ष एकाच ख्रिश्चन धर्माचे. दोन्ही बाजू आपलाच जय व्हावा म्हणून ईश्वराची करुणा भाकीत होत्या ! बिचाऱ्या परमेश्वरानं अशा वेळी करावं तरी काय ? लढाईत एकाचा जय म्हणजे दुसऱ्याचा पराजय, आणि एकाच देवाचे ते दोघे भक्त. खरे म्हणजे, अशी प्रार्थना होऊच शकत नाही. देव म्हणेल, 'माझा आशीर्वाद हवा असला तर आधी आपसांतील लढाई थांबवा.' तुम्ही लढत राहाल तर तुमची भक्ती खोटी आहे. हजरत महंमद पैगंबर यांनी सांगितलं आहे की, गरीबाला मदत न करता पाच वेळा नमाज पढतात त्यांना अल्ला म्हणेल की, तुम्ही माझे खरे भक्त नाही ! कुराणात म्हटलं आहे की, सर्वांवर प्रेम करा, प्रेमात फरक करू नका. आपलाच मार्ग श्रेष्ठ, इतरांचा हीन असं म्हणाल तर स्वतःलाच हीन करून टाकाल !"

## काही प्रश्नोत्तरे

एकाने विचारले, "मार्क्सिझम आणि कम्युनिझम जोरानं पसरत आहे तो कसा थांबवता येईल ?"

विनोबा म्हणाले, "त्यांनी गरीबांचं दुःख दूर करण्याचं काम पत्करलं. जगातले सर्व भेदाभेद दूर करण्यावर त्यांचा भर आहे. याउलट आस्तिक म्हणवणारे, प्रभूची लेकरं म्हणवणारे मात्र एकमेकांत लढाया करतात. गरीबांना मदत न करता त्यांचं शोषण करतात. अस्तिकांनी भेद-भावनेचा त्याग केला आणि गरीबी दूर करण्याचा प्रयत्न केला तरच ते नास्तिकांना आणि कम्युनिझमला अटकाव करू शकतील."

दुसऱ्या एकाने विचारले, "आपण प्रेमाच्या गोष्टी बोलता, मग काश्मीरचा प्रश्न प्रेमानं का मिटवीत नाही ?"

विनोबा म्हणाले, "तो प्रश्न राजकीय आहे. मी इथं राजकारणाची चर्चा करायला नाही आलो. आणि ती करायची असेल तर तुमच्याशी करून उपयोग नाही. प्रे. अय्यूबखानांशीच ती केली पाहिजे, नाही ?"

## ईश्वर परीक्षक

एका प्रार्थनासभेत विनोबा म्हणाले, "आपल्या समाजात गरीब-श्रीमंत का असतात? कुराण सांगते, परीक्षेसाठी ईश्वरही शाळा-मास्तरांप्रमाणं दोन प्रश्नपत्रिका दोन वर्गांसाठी काढतो! गरीबांच्या प्रश्नपत्रिकेत तो विचारतो— 'नाना प्रकारची दुःखं तुम्ही भोगता, विव्हळता, मग तुमच्यासारखा दुःखी कोणी राहू नये म्हणून प्रयत्न करता का? सत्यानं वागता का? कोणाची फसवणूक तर नाही ना करीत? व्यसनांत नाही ना फसत? या प्रश्नांची जे योग्य उत्तरं देतील ते गरीब पास होतील. तो श्रीमंत वर्गाला विचारतो की, मी तुम्हांला श्रीमंत केलं, पण गरीबांविषयी तुमच्या मनात प्रेम आहे का? त्यांचं दुःख निवारण करण्यासाठी झटता का तुम्ही? आपल्या श्रीमंतीबद्दल तुम्हांला घमेंड नाही ना वाटत? कोणाला फसवून त्याची लुबाडणूक नाही ना करत? प्रभू अशी परीक्षा घेत असतो, असं कुराण सांगते. या परीक्षेत आपल्याला उत्तीर्ण व्हायचं आहे."

## जुन्या मित्राची भेट

'छोडो भारत' आंदोलनाच्या वेळी विनोबांबरोबर नागपूरच्या तुरुंगात असलेले, पण पाकिस्तानचे नागरिक बनलेले एक मुस्लिम गृहस्थ विनोबांना भेटायला आले होते. 'रुहुल कुरान' या कुराणातील वेच्यांच्या विनोबांच्या पुस्तकाच्या निमित्ताने पाकिस्तानी वृत्रपत्रांनी गहजब केला तेव्हा हा गृहस्थ विनोबांचा पाठीराखा म्हणून उभा राहिला! 'कुराणाच्या विरुद्ध एकही शब्द विनोबांच्या मुखातून निघणार नाही' अशी ग्वाही त्याने जाहीरपणे दिली.

ढाका येथील स्त्रियांच्या हायस्कूलच्या मुख्याध्यापिका बेगम सलिमा बानू विनोबांचे सान्निध्य लाभावे म्हणून दोन दिवस आल्या होत्या. यात्री-दलातील इतर भगिनींशी त्यांची चांगलीच गट्टी जमलेली दिसली.

## आणाभराची योजना!

पाकिस्तानच्या योजनेची चर्चा निघाली तेव्हा विनोबा म्हणाले, "पाकिस्तानातील योजनेविषयी मला तपशीलवार माहिती नाही; पण हिंदुस्थानची योजना ५,८०० कोटी रुपयांची. या हिशोबानं माणशी रोज एक आणा खर्च होणार! या योजनेला मी एक आण्याची योजना असे नाव दिले

आहे. गाजावाजा करून, परदेशी कर्ज घेऊन ही योजना पार पडली म्हणजे रोजमजुरी दोन रुपये व्हायची. याचा अर्थ पंधरा मिनिटाला एक आणा ! याचा अर्थ सरकारची जी ही प्रचंड योजना ती मजुराच्या पंधरा मिनिटांच्या कामाशी तुल्य झाली ! सरकारच्या शक्तीशी तुलना केली तर लोकांची शक्ती किती प्रचंड आहे ते यावरून दिसून येईल. "

## बायबलचा अभ्यास

पाकिस्तानच्या यात्रेच्या काळात विनोबा न्यू टेस्टामेंटचा अभ्यास करीत होते. ख्रिस्ताचे अनुयायी त्याच्या निधनानंतर कसे वागत, त्याचे वर्णन त्यात आहे. ख्रिस्ताच्या अनुयायांनी व्यक्तिगत संपत्तीचे विसर्जन केले, असा भाग त्यात आहे. विनोबा हा भाग कार्यकर्त्यांच्या मनावर ठसवण्याचा प्रयत्न करीत होते.

सोळा दिवसांच्या काळात सुमारे १५० बिघे जमीन भू-दान म्हणून पाकिस्तानात मिळाली. शंभर भूमिहीनांना त्यामुळे आसरा झाला.

## महंमदाची वचने

विनोबांच्या बोलण्यात कुराणाची वचने सतत येत. एके ठिकाणी ते म्हणाले, " कुराणाच्या भाषेत मी 'वस्ल'साठी आलो आहे. 'वस्ल' म्हणजे हृदयाला हृदय जोडणं. " दुसऱ्या एका ठिकाणी ते म्हणाले, " इथं येण्यापूर्वी, कुराणाच्या भाषेत सांगायचं तर माझा बौद्धिक विश्वास म्हणजे 'इल्मुल यकीन' होता. आता त्याचं रूपान्तर 'ऐनुल यकीन' म्हणजे साक्षात्कारात झालं आहे. " आणखी एका ठिकाणी ते म्हणाले, " इस्लामनं इमान आणि अमल म्हणजे श्रद्धा आणि कृती अशा दोन गोष्टी सांगितल्या आहेत. नुसती श्रद्धा असून चालणार नाही. त्यानुसार आचरणं असलं पाहिजे. " अजानचा पहाटेचा ध्वनी ऐकून विनोबा म्हणत, " ईश्वर जसा एक आहे तसाच मानवही एक आहे. आपण हे समजून घेऊ तर जगात स्वर्ग अवतरेल. " आणखी एका ठिकाणी ते म्हणाले, " कुराणात असं म्हटलं आहे की, भक्तानं काही वाईट केलं तर ईश्वर तेवढंच वाईट त्याला भोगायला लावतो; पण त्यानं काही चांगलं केलं की, त्याच्या दसपट इनाम तो देतो. म्हणून चांगलं करण्याबाबत अंगचुकारपणा करू नका ! "

एके ठिकाणी ते म्हणाले, "पैगंबरांनी सर्वांत मोठी गोष्ट कोणती केली असेल तर ती म्हणजे व्यक्तिनिरपेक्ष चिंतन. कुराणातून महंमदाविषयीचे सर्व उल्लेख वगळले तरी कुराण शिल्लक राहतंच."

एकदा विनोबा म्हणाले, "जन्मानं मी कोणाला हिंदू किंवा मुसलमान मानीत नाही. जो विचारपूर्वक ग्रहण केला जातो तोच धर्म म्हणवण्याला पात्र होय. अन्य तऱ्हेनं विचार करणं म्हणजे धर्माचरण नव्हे, धर्माचा दुरभिमानच होय. हीच जातीयता होय."

सोळा दिवसांच्या अंती विरळ हे पाकिस्तान सीमेवरील गाव आले. दोन्ही बाजूंना प्रचंड समुदाय उभे होते. मध्ये व्यासपीठ उभारले होते. एका बाजूला पाकिस्तानचा हिरवा झेंडा फडकत होता, व "विनोबांना प्रेमपूर्वक निरोप" असा फलक होता. तर भारताच्या हद्दीत तिरंगी ध्वज फडकत होता. 'विनोबांचे प्रेमपूर्वक स्वागत' असा फलक झळकत होता.

## पश्चिम बंगालमध्ये

पश्चिम बंगाल म्हणजे चैतन्य महाप्रभू, रामकृष्ण परमहंस, आणि रवीन्द्रनाथ यांची भूमी. बंगालमध्ये रवीन्द्रांच्या काव्याचा विनोबांनी अभ्यास केला. त्या काव्याचे विवेचन करणारे वर्ग घेतले.

याच काळात भारत-चीन संघर्ष भडकला. विनोबा जागजागी सांगत की, "आळस, विलासप्रियता, स्वार्थ, कलह, व्यसनाधीनता आणि विषमता कायम ठेवून देशाचे रक्षण करता येणार नाही. ग्रामदान हे एक डिफेन्स मेझर आहे. गावाची जमीन साऱ्या गावाच्या मालकीची झाली तर आक्रमणाची शक्यताच राहणार नाही. गाव एखाद्या विराट पुरुषासारखे उभे राहील."

## ग्रामदान संरक्षक कवच

येलवालच्या परिषदेनंतर पाच वर्षांनी विनोबांना भेटायला पंतप्रधान पंडित नेहरू बंगालमध्ये आले. पूर्ण एकान्तात त्यांनी विनोबांशी चर्चा केली. दोन तास ही बोलणी झाली. विनोबांच्या बोलण्याची टिपणे त्यांनी स्वतः घेतली. प्लासीचे ग्रामदान झाल्याची बातमी ऐकून पंडितजींना फार आनंद झाला. मिल्टनप्रमाणे प्लासी लॉस्ट– प्लासी रिगेन्ड– प्लासी गेली– प्लासी घेतली– अशी

कल्पना मनात तरळून गेली. एकाच जाहीर सभेत पंडित नेहरू आणि विनोबाजी यांची भाषणे झाली. नेहरू म्हणाले, " आपला मुकाबला चीनशी आहे. चीनच्या ताब्यात गेलेला मुलूख परत मिळवणंदेखील एक वेळ सोपं म्हणता येईल; पण इथल्या दारिद्र्यावर विजय मिळवणं हे एक फार बिकट कार्य आहे. ग्रामदान दारिद्र्य-निवारण्याच्या दृष्टीनं फार उपयोगी पडेल. "

विनोबा म्हणाले, " देशाचं संरक्षण करायचं तर पोलिस आणि सेना यांचा अंतर्गत प्रश्नांसाठी वापर करण्याची पाळी येता कामा नये. "

ग्रामदानात सर्वांना सामील होण्याबाबत अडचण पडू नये म्हणून ग्रामदानाची बंगालमध्ये सुलभ व्याख्या करण्यात आली. खेड्यातील निदान ऐंशी टक्क्यांनी जमिनींवरची मालकी सोडली, गावाच्या निम्म्यावर जमिनीच्या क्षेत्रावरील मालकीचे विसर्जन झाले, गावच्या भूमिहीनांसाठी गावातल्या सर्वांनी विसावा हिस्सा दिला, व एकोणीस हिस्से जमीन स्वतःकडेच ठेवली, लहान मोठे गाव असेल त्याप्रमाणे गावातील सर्व प्रौढांची किंवा घरटी एका प्रौढाची मिळून ग्रामसभा बनली, ग्रामकोषासाठी आपल्या उत्पन्नाचा विसावा हिस्सा देण्याचा सर्वांनी संकल्प केला म्हणजे ते गाव ग्रामदान समजावे असे ठरले. बंगालमध्ये अशी तीनशेवर ग्रामदाने झाली. सुलभ ग्रामदानात सामूहिक स्वामित्व आहे, आणि व्यक्तिगत प्रेरणाही आहे, हे ह्या योजनेचे वैशिष्ट्य आहे, असे विनोबांना वाटते. स्वामित्व गावाचे आणि कसणूक व्यक्तीची, यामुळे या कार्यक्रमालाच तत्त्वतः विरोध करायला जागा नाही.

## कुराणसार प्रकाशन

विनोबांच्या कुराणसार ग्रंथाने प्रकाशनाआधीच खूप खळबळ माजवली होती. हा ग्रंथ पाहण्याची लोकांना मोठी उत्सुकता लागून राहीली होती. अखेर कलकत्त्याला ग्रंथ तयार होऊन आला, आणि त्याचे प्रकाशन झाले. ' हा ग्रंथ प्रकाशित करून विनोबांनी इस्लामची फार मोठी सेवा बजावली आहे ' असे या वेळी मुसलमान म्हणाले. विनोबा म्हणाले, " विज्ञानयुगात संकुचित धर्म चालणारच नाही. धर्मातील शुद्ध आध्यात्मिक भाग तेवढाच आपण घेतला पाहिजे. धर्मातही सार आणि असार भाग असतो. त्यातलं सार तेवढं घ्यायचं, असार टाकायचं, ही दृष्टी आधुनिक काळात आपण स्वीकारली पाहिजे. घ्याल तर काना-मात्रेचाही फरक न करता सर्वच घ्या, असा आपण आग्रह राखू तर सर्व तर

लोक घेणारच नाहीत, पण घेण्याजोगे त्याचाही अव्हेर करतील! यासाठी आपल्या धर्मग्रंथाबरोबर इतरांच्या धर्मग्रंथांचा अभ्यास करण्याचाही आपण पायंडा ठेवला पाहिजे."

## देवनागरीचा पुरस्कार

विनोबांनी या काळात चिनी भाषेचा अभ्यास केला, आणि शांतिनिकेतन-मधील चीन-भवनाच्या आचार्यांना सुचवले की, देवनागरीतून चिनी शिकता येईल असे पुस्तक तयार करा. भारतातील सर्व भाषांनी देवनागरी लिपीचा स्वीकार केला तर चीन-जपानही देवनागरी स्वीकारतील, असे विनोबांना वाटते; आणि त्या दृष्टीने लिपी सुधारणेचा सतत विचार ते करतात; त्याबद्दल प्रयोगही करतात. 'लोक—नागरी' ही छापखाने, टंकलेखन इत्यादी वैज्ञानिक साधनांच्या दृष्टीने सुधारित देवनागरी त्यांनी तयारी केली आहे. विविध भाषांतील गीताप्रवचने त्यांनी त्या त्या भाषांच्या लिप्यांबरोबर देवनागरीतही छापली आहेत. अशा रीतीने भाषा-लिपी सहज आत्मसात करता येऊ शकतील, असे विनोबांचे मत आहे.

## ओरिसातून मध्यप्रदेशात

बंगालमधून विनोबा ओरिसामार्गे मध्यप्रदेशाकडे आले. रायपूरला पंधरावे सर्वोदय संमेलन भरणार होते. विनोबा चार वर्षे जाणूनबुजूनच सर्वोदय संमेलनांना हजर नव्हते. 'आफ्टर नेहरू व्हॉट — नेहरूंनंतर काय?' असा प्रश्न आपल्या बाबतीत निर्माण होऊ नये म्हणून ही काळजी! रायपूरला सर्वच प्रांतांनी विनोबांनी आपापल्या प्रांतात यावे असा आग्रह धरला. पण विनोबांनी सेवाग्रामला परतायचे ठरवले. तेरा वर्षे अखंडपणे त्यांनी भ्रमण केले. त्रेचाळीस हजार मैलांची पदयात्रा. पृथ्वीच्या जणू दोन प्रदक्षिणाच!

## दुखणे

विनोबांना विषमाचे दुखणे परतल्यावर झाले. कानांनीही छळवाद मांडला. चकरा येऊ लागल्या. विश्रान्तीची जणू शरीर मागणी करीत होते. डॉक्टरांचे उपचार चालू होते तसे स्वतः विनोबांचे उपचारही चालू होते. त्यांनी बोलणे — ऐकणे सोडले. वहीवर लिहूनच प्रश्नोत्तरे होत. एका वहीवर

आपण लिहायचे. दुसऱ्यावर विनोबांनी लिहायचे. एकाचे नाव पकड-वही. दुसऱ्याचे नाव खरड-वही. पवनारच्या ब्रह्मविद्या मंदिरातच विनोबांचा मुक्काम होता. त्याही स्थितीत त्यांचे अध्ययन जोरात चालू होते. आजच्या काळात सारग्रंथ उपलब्ध झाले तरच ते लोक वाचतील, अशी त्यांची कल्पना. त्या दृष्टीनेच त्यांचे अध्ययन व निवड–कार्य चालू होते. शिवाय शब्दकोशाचाही त्यांचा अभ्यास जोरात चालू होता. देवनागरीतून इंग्रजीसुद्धा सर्व भाषांचे कोश तयार करण्याची त्यांची कल्पना. त्यामुळे साहित्याइतक्याच आवडीने त्यांचे शब्दकोशाचे कार्यही चालू असे.

## पत्रव्यवहार

विनोबांचा पत्रव्यवहार खूप मोठा. वाढता. पत्रे नाना विषयांवरची, नाना प्रकारची. विनोबांनी पत्रव्यवहारासाठी हिंदुस्थानचे सात भाग केले. ओरिसा, आसाम, बंगाल यांच्यासाठी रविवार. कारण सूर्योदय आधी तिकडे होतो. बिहारसाठी सोमवार. चंद्राचा वार. चंद्र सौम्य तसे बिहारी लोकही सौम्य. उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश यांच्यासाठी मंगळवार. काशी-प्रयाग-मथुरा-अयोध्या ही सारी मंगलस्थाने तिथे आहेत. दिल्ली-राजस्थान-पंजाब यांसाठी बुधवार. बुध म्हणजे बुद्धिमान. राजधानीच्या परिसरात बरेच बुद्धिमान असतात म्हणून. महाराष्ट्र-गुजरातसाठी गुरुवार. कारण हे दोन प्रांत विनोबांच्या गुरूच्या निवासस्थानामुळे पूजनीय ठरलेले. कर्नाटक-केरळ यांच्यासाठी शुक्रवार. तो लक्ष्मीचा वार. कोलारच्या सोन्याच्या खाणी आणि सृष्टीचे अपार वैभव ह्याच भागात. तमिळनाडू आणि आंध्र यांच्यासाठी शनिवार. तसाच इतर देशांसाठी ही तोच. असा भारताचा सारा नकाशा डोळ्यांसमोर ठेवून आणि जगाचे उचित अनुसंधान राखून साप्ताहिक क्रम विनोबाजींनी अनुसरला होता !

## ग्रामदान तुफान

एकोणीसशे पासष्टचा मे महिना. बिहारचे कार्यकर्ते विनोबांना भेटायला वर्ध्याला गोपुरीत आले होते. विनोबा त्यांना म्हणाले, “ बिहारमध्ये ग्रामदान तुफान निर्माण करीत असाल तर मी पुन्हा बिहारमध्ये यायला तयार आहे.” विनोबांचे सत्तरावे वर्ष या वेळी चालू होते, ही गोष्ट लक्षात

ठेवण्यासारखी आहे !

कार्यकर्ते म्हणाले, " ग्रामदान तुफान म्हणजे काय ? "

विनोबा म्हणाले, " सहा महिन्यांत दहा हजार ग्रामदाने करीत असाल तर पाहा. आणि आता पदयात्रा करण्याचाच आग्रह माझा असणार नाही. विज्ञानाने कालगती तीव्र केली आहे. येत्या पाच सहा वर्षांत आपण जर काही करून दाखवू शकलो नाही तर आपले विचार सगळे शीतागारात पडल्यासारखे होतील. चांगला विचार जर शीतागारातच पडून राहणार असला तर तो असून नसून सारखाच ! "

विनोबांना याबाबत किती तीव्रता वाटत होती ते त्यांच्या त्या वेळच्या उद्‌गारांवरून दिसून येते. ते कार्यकर्त्यांना म्हणाले, " माणसानं मृत्यूपूर्वी मरावं आणि आपली प्रेतयात्रा त्यानं स्वतः पाहावी ! माझीही तीच इच्छा आहे. तेव्हा आता ग्रामदान तुफानासाठी मी तिकडे आलो आणि मला चकरा येऊ लागल्या तर असं नका म्हणू की, आता तुम्ही बाहेर पडू नका. उलट म्हणा, रात्रभर आराम करा आणि सकाळी ताजेतवाने होऊन कामाला लागा. थोडं बरं वाटेनासं झालं आणि तुम्ही मला थांबायला सांगितलं तर पंचाईत होईल. आजाराने मी डगमगलो तर खुशाल मला सांगा की, मोटरीत बसून जायला काय अडचण आहे ? एका ठिकाणी झोपलात तरी जे कष्ट भोगावेच लागणार तेच मोटरीत बसून होतील. "

आणि पुन्हा विनोबा बिहारमध्ये गेले. विखुरलेल्या ग्रामदानांऐवजी एकाच क्षेत्रातील सर्व गावे ग्रामदानात यावी असा प्रयत्न सुरू झाला. १९६७ मध्ये दरभंगा जिल्हा ग्रामदानात आला. दरभंगा हा अतिशय सुपीक जिल्हा आहे. तो ग्रामदानात आल्यामुळे इतर जिल्ह्यांतही याच पद्धतीने काम करावे असा विचार सुरू झाला. विनोबा एकेका जिल्ह्यात दहा पंधरा दिवस मुक्काम करू लागले, आणि ग्रामदानांचे संकल्प होऊ लागले. काही पूर्ण विचारान्ती, काही अर्धवट समजून, तर काही न समजता ! पण सर्व जिल्ह्यांत तीव्रतेने काम झाले आणि गांधीजन्मशताब्दीपर्यंत म्हणजे १९६९ च्या दोन आक्टोबरपर्यंत संपूर्ण बिहार ग्रामदानी झाला. बिहारमध्ये राजगीरला सर्वोदय संमेलन भरले होते. तिथे बिहारदानाचा संकल्प पूर्ण होतोसे पाहून इतरत्रही चालना मिळाली. विशेषतः तमिळनाडूमध्ये.

स्वतंत्र भारतात जुनीच शिक्षणपद्धती चालू राहिली याबद्दल विनोबा सदैव असंतुष्ट राहिले. स्वातंत्र्य मिळताच जुना झेंडा आपण काढून टाकला त्याप्रमाणे जुनी शिक्षणपद्धतीही निकाली काढायला हवी होती, असे ते अनेक वेळा बोलले ! चीनमध्ये माओने तीन तास पुस्तकी शिक्षण – तीन तास काम, अशी नवी पद्धती सुरू केली, पण आपल्याकडे मात्र जुनीच परिपाठी सुरू राहिली. विनोबा एका ठिकाणी म्हणाले, " नव्या राज्यात जुनंच शिक्षण राहिलं तर खुशाल समजा की, जुनंच राज्य विस्तारत आहे, स्वराज्य अजून आलेलं नाही ! " आजच्या शिक्षणपद्धतीमुळे एक शृंगापत्ती उभी केली आहे. शिक्षण न द्यावे तर लोक गावंढळ राहतात, आणि द्यावे तर बेकार बनतात ! शिक्षणाने प्रश्न सुटतात, पण भारतात शिक्षण ही स्वतःच एक जटिल समस्या बनली आहे ! आपल्याकडे शिक्षणसंस्थादेखील विषमतेचाच परिपोष करीत आहेत. सर्वांना सारखे शिक्षण दिले जात नाही. अशा स्थितीत शिक्षणक्षेत्रात सर्वत्र अनागोंदी न माजली तरच आश्चर्य. विनोबा तर कित्येक वेळी म्हणाले-देखील की, नवे शिक्षण कोणते ते नक्की होईपर्यंत खुशाल शाळा बंद ठेवा, मुले आईबापांकडून शिकतील तेवढे शिकतील. कुशिक्षण देण्यापेक्षा अशिक्षण परवडले !

विनोबांचे शिक्षणविषयक तीव्र विचार ऐकून १९६७ साली ७–८ डिसेंबरला बिहारमध्ये पूसा रोड येथे शिक्षणतज्ज्ञ व संचालक यांची एक परिषद बोलावण्यात आली. केंद्रीय शिक्षणमंत्री त्रिगुण सेनही त्या वेळी हजर होते. त्यानंतरही या विषयावर चर्चा झाल्या. विनोबांनी काही महत्त्वाच्या गोष्टी या वेळी मांडल्या. शिक्षण विभाग हा न्यायदान विभागाप्रमाणे सरकारच्या हस्तक्षेपापासून मुक्त राहिला पाहिजे. शिक्षकांनी न्यायमूर्तींप्रमाणे पक्षीय राजकारणात चबढब करू नये. शिक्षकांनी जनताभिमुख राहिले पाहिजे. विद्यापीठांच्या आणि शिक्षण संस्थांच्या आवारात सुव्यवस्था आणि शांतता राखण्यासाठी पोलिसांना पाचारण करावे लागणे, ही अत्यंत नामुष्कीची गोष्ट आहे. सर्व देश म्हणजेच विद्यापीठाचे आवार आहे असे अध्यापकांनी मानले पाहिजे. एका बाजूला मताचा अधिकार द्यायचा, आणि शिक्षण मात्र सरकारने आपल्या धोरणाने चालवायचे, याचा अर्थ दिलेले लोकशाही स्वातंत्र्य अप्रत्यक्ष-

पणे काढून घेणेच होय. आज शिक्षकाची स्थिती नोकरागत झाली आहे, ती बदलली पाहिजे. ज्ञान आणि कर्मातील अंतर शिक्षणाने तोडले पाहिजे, नाहीतर शिक्षण म्हणजे वाचाळता ठरेल. पक्षीय राजकारण, सत्तेचे राजकारण, संकुचित राजकारण घुसल्यामुळे शिक्षणक्षेत्राचे पावित्र्य नष्ट झाले आहे. शिक्षक म्हणजे जनानखान्यातल्या बेगमा नव्हेत, त्यांनी बाहेर येऊन पराक्रम केला पाहिजे !

## अध्यापकाचे तीन गुण

शिक्षकात तीन गुण प्राधान्येकरून असले पाहिजेत, असे विनोबांनी सांगितले. विद्यार्थ्यांबद्दल वात्सल्य हा पहिला गुण. या गुणावाचून कोणीही शिक्षक बनण्याला पात्र ठरणार नाही. शिक्षकाचा दुसरा गुण नित्यनिरंतर अध्ययनशीलता. तिसरा गुण राजकीय पक्षापक्षीच्या रगाड्यापासून दूर राहणे. त्यानंतर त्यांनी सांगितले की, विद्येच्या क्षेत्रात पोलिसाचा प्रवेश होणे ही फार चिंताजनक बाब आहे. पोलिसांच्या मदतीशिवाय, विद्यार्थ्यांशी सौहार्द राखून प्रश्नांची सोडवणूक शिक्षकांना करता आली पाहिजे.

आचार्यांची तीन लक्षणे विनोबांनी सांगितली आहेत : तो शीलवान, प्रज्ञावान आणि करुणावान असावा. शीलवान साधू असतो. प्रज्ञावान ज्ञानी असतो. करुणावान आई असते. परंतु शिक्षक साधू, ज्ञानी आणि आई– तिन्ही असतो.

नव्या पद्धतीचे शिक्षण सुरू व्हायचे तर त्यासाठी अध्यापकांनी स्वतःच संघटित झाले पाहिजे. पण ही संघटना पुन्हा चाकोरीतली संघटना नको. रजा-बदल्या-नेमणुका, पगारवाढ या गोष्टी आहेतच, पण शिक्षण हे मुख्य; कारण शिक्षणातूनच देशाचे भवितव्य घडत असते. नव्या प्रकारची संघटना हवी, पक्षमुक्त संघटना. विनोबांनी अशा संघटनेला आचार्य-कुल असे नाव दिले आहे.

महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांपुढे बोलताना विनोबा म्हणाले, "शिक्षक हेच माझं आवडते बिरुद आहे. शिकल्या-शिकवल्याशिवाय माझा एकही दिवस गेला नाही ! भूमिहीनांचा प्रश्न सर्वांत महत्त्वाचा. त्या खालोखाल शिक्षणाचा प्रश्न महत्त्वाचा. श्रमिकांची शक्ती आणि आचार्यांची शक्ती एकवटली तर ही तारक व प्रेरक शक्ती ठरेल, आणि त्यांतून एक शुभ आणि मंगल क्रान्ती उदयाला येईल. अध्यापकांची शक्ती जागृत व संघटित झाली पाहिजे. त्यांना ग्रामदानाचं

महत्त्व पटलं की नव्या विचारांची कर्तबगार, निष्ठावान नवी पिढी तयार होईल. पाच वर्षवाल्यांची वीस वर्षवाल्यांवर जी सत्ता चालते ती आचार्यकुलासारख्या संघटना थांबवू शकतील. ”

आचार्य कुलाची संघटना देशभर उभी राहावी आणि त्यातून ज्ञानकर्माची सांगड घालणाऱ्या नव्या शिक्षणाचे नवे पर्व सुरू व्हावे, अशी विनोबांनी अपेक्षा बाळगली आहे.

## स्वागत आणि निरोपदेखील

रक्सोलला नेपाळची सीमा आहे. मध्ये फक्त एका छोट्या नदीवरचा छोटा पूल. विनोबांना भेटायला नेपाळमधील भारतीय राजदूत राजबहादुरसिंग आणि कार्यकर्ते तुलसी मेहर आले होते. विनोबांनी काही दिवसांसाठी नेपाळात यावे असा तुलसीजींचा आग्रह.

२१ ऑगस्ट १९६८ चा दिवस. विनोबा पहाटे पाचला फिरायला निघाले. झिमझिम पाऊस पडत होता. विनोबा नदीच्या दिशेने निघाले, पूल पार करून ते नेपाळमध्ये गेले. तुलसीजी पुढे झाले आणि आनंदविभोर होऊन म्हणाले, “ या मंगल घटिकेला नेपाळच्या भूमीवर मी आपलं हार्दिक स्वागत करतो ! ”

एवढ्यात अडीच फर्लांग पूर्ण झाले आणि विनोबांची नेपाळयात्राही पूर्ण झाली ! ते मागे फिरले. तुलसी मेहरना विनोबांना निरोप देण्याचीही पाळी आली !

घरी परतल्यावर विनोबा तुलसीजींना म्हणाले, “ आता नेपाळयात्रेची गोष्ट पुन्हा काढू नका. माझी नेपाळयात्रा होऊन गेली. मी आता फॉरिन-रिटर्न्ड झालो ! ”

## धर्मसार उपयुक्त व आवश्यक

विनोबांनी सर्व धर्मांचा सखोल अभ्यास केला आहे. त्या त्या धर्माचे जे प्रमुख ग्रंथ त्यांचे त्यांनी सूक्ष्म परिशीलन केले आहे. ते ग्रंथ समजून घेण्यासाठी जे अन्य ग्रंथ उपलब्ध, तेही त्यांनी वाचले आहेत. धर्मग्रंथात काही प्रासंगिक भाग असतो. स्थळ-काळ-परिस्थितीचा काही ठसा त्यात उमटणे अपरिहार्यच असते. गंमत म्हणजे कोणत्याही मुख्य धर्माचे संस्थापक हे साक्षर नव्हते ! त्यामुळे

त्यांच्या वचनांचा संग्रह हा त्यांच्या निर्वाणानंतर अनेक वर्षांनी स्मरणानेच करण्यात आलेला आहे. त्यामुळे त्यात प्रक्षेपही पुष्कळच आहेत. काही बे-मालूम पद्धतीने शिरले आहेत, काही सहज ध्यानी येतात. त्याशिवाय ह्या विस्तृत धर्मग्रंथांचे अलोडन करण्याइतकी फुरसतही आधुनिक काळात लोकांना नाही. तेव्हा त्यासाठी धर्माचे सार काढणे युक्त, उपयुक्त, आणि आवश्यकही झाले आहे. विनोबांनी हे कार्य केले आहे.

कुराण आणि बायबल यांचे त्यांनी केवळ सारच काढले आहे असे नसून प्रासादिक संस्कृतमधून ते गुंफलेही आहे. ऋषि-मुनींच्या रचनांत ही रचना सहज शोभून दिसेल अशी आहे. धर्मसमन्वयाच्या दृष्टीने ही निवड व रचना केली असून त्या दृष्टीने ती अतिशय हृद्य झाली आहे. विनोबा नेहमी म्हणतात, "धर्माचा झगडा दुसऱ्या धर्माशी असूच शकत नाही. सर्व धर्मांनी मिळून अधर्माशी झगडा करायला हवा." विनोबांच्या धर्माभ्यासाची ही बैठक आहे. त्यातही सारग्रहणार्थ पूर्वीप्रमाणे त्या त्या धर्मांची औपचारिक दीक्षा घेण्याचीही गरज आता नाही. सर्व धर्म–पुस्तके आता यच्चयावत माणसांना खुली झाली असून विज्ञानयुगाने केलेली ही एक महान क्रान्ती आहे. त्यामुळे विज्ञानयुगात कर्मकांडात्मक दीक्षांची जरूरी नसून सहृदय अभ्यासाची गरज आहे. विनोबांनी असा अभ्यास केला असून ते एका व्यापक अर्थाने धर्ममूर्तीच आहेत.

विनोबांच्या धर्मसार ग्रंथातील काही प्रासादिक उतारे देण्याचा मोह आवरत नाही. खरे म्हणजे प्रत्यक्षातच ह्या रचना पाहिल्या पाहिजेत.

## ख्रिस्तधर्मसार

समग्र-धर्मः कृतिमत्-श्रद्धा
कामक्रोधौ भक्त्या वार्यौ
ईश्वरेच्छया धैर्यं धार्यं
नामस्मरणं महद् भेषजं ।

शब्द-दोहनं पथिक-भूमिका
बोध उत्तमो युक्ति-संगतः
नम्रतोन्नतिः सहन भूषणं
स्व-स्व-शक्तितो भगवदर्चनम्

श्रद्धादि-समादरावसानं
जीवन मूल्यं सदाभ्यस्यताम्
शब्दे साक्षात्कृते कदापि
स्वीयं भाष्यं नैव कल्प्यताम्
पुष्पितवाचा नागाह्यितां
नव्ययुगाशा चिरं सेव्यताम

प्रकाशमूर्तिर्देवो वैद्यः
रव्यापनेन दुरितानि क्षपयेत
आज्ञाकारी स एव भक्तो
हृत्संवादी प्रभुविश्वासी
मूर्ति-त्रितये सत्यसाक्षिता
सत्यवति सुते पितुः प्रहर्षः

येन ज्योतिर्दर्शनं कृतं
बंधुद्वेषं कथं च कुर्यात्
संसारात् स भवेत् सु-विरक्तः
प्रेमजीवनं न वाग्विलासः
दृष्टे बंधौ प्रेम नास्ति चेत्
अव्यक्ते तत् कथं संभवेत
प्रेम निर्भयं प्रिय-हित-कारी
भगवतः प्रियो नात्र संशयः
ये यथेव मां तांस्तु तथैव
सत्पुरुषाणां विश्वासोऽयम् ।

सर्व धर्मांतील प्रमुख मंत्र एकत्र करून त्यांची प्रासादिक गुंफण विनोबांनी एका प्रार्थनेत केली आहे. हे करताना धर्मसंस्थापकाला जे अभिप्रेत, पण भाषेच्या मर्यादांमुळे व्यक्त होण्यात जेथे काही उणे राहिल्यासारखे वाटते तेही ' न्यून ते सरते ' करून त्यांनी घेतले आहे. उदाहरणार्थ, ' लव्ह दाय एनेमी ॲज दाय नेबर ' हा बायबलचा संदेश मराठीत विनोबांनी असा आणला आहे—

शेजाऱ्यावर प्रेम करू
शत्रूवरही प्रेम करू
परस्परांवर प्रेम करू

## प्रासादिक अनुवाद

‘ अल् फातेहा ’ या इस्लामी प्रार्थनेचा त्यांचा मराठी अनुवाद असाच मधुर आणि प्रासादिक आहे. संतवचनांचा निनाद त्यात सहजच प्रकटल्या-सारखा वाटतो.

आरंभी देवाचे नाव
कृपाळू जो कनवाळू
स्तुति त्या देवाची
प्रभू जो विश्वाचा
कृपाळू, कनवाळू
स्वामी शेवटच्या दिवसाचा
तुझी करू भक्ती, तुझीच रे याचना
सरळ मार्ग दाखवी तू आम्हा
ज्यावरी तू करतोस कृपा त्यांचा
न ज्यावरी तुझा प्रकोप उतरे
न वा भ्रमित जे त्यांचा

कुराणाचे त्यांनी संस्कृत श्लोकांत सूत्ररूपाने काढलेले सारही असेच मधुर आणि हृद्य आहे. कुराणातल्या ६,२३७ आयतांपैकी १,०६५ उक्ती विनोबांनी निवडल्या आहेत. त्या साराचे ग्रथन त्यांनी संस्कृत श्लोकांत केले आहे. त्याची ही थोडी वानगी—

दयालुः दानवान् कर्ता
सुरूपः सुप्रकेतनः
सर्वशक्तिः स्वतंत्रेच्छः
मनोवाचामगोचरः

नामभिर्घोषितश्च आविः
प्रार्थनीयः पुनः पुनः
उपासनोपदिष्टेयं
या धृता भौतिकैरपि

निष्ठा त्यागः तपश्चर्या
धैर्यं मद्भक्तिलक्षणम्
सत्संगः क्षणिको भावः
वैराग्यं च तदुद्भवम्

लाक्षण्याः प्रार्थनावन्तः
नैष्ठिकाः धैर्यशालिनः
अहिंसका ये मद्भक्ताः
मद्दूतैः अभिरक्षिताः

नास्तिकाः भ्रान्तचितास्तु
मोघाः निरयगामिनः
धर्मनिष्ठासहिष्णुत्वं
लोकसंग्रह–योजना

सत्य-धीरः वदेद्वाक्यं
सत्यं शिवं अनिंदनम्
न्यायं रक्षेत् परं न्यायात्
करुणैव गरीयसी

अहिंसायां दृढश्रद्धा
स्नेहेन सहजीवनम्
पापैरसहकाराश्च
प्रतीकारश्च संयतः

आस्वादः वासनाशुद्धि
अस्तेयं मितसंग्रहः
दानं शिवानुसंधानं
नीतिः आचारपालनम्

" असे हे नव्वद तत्त्वांचे कुराणसार आहे. त्यातली ही वानगी वाचल्यानंतर वेगळ्या धर्मांत अपरिचय आणि अज्ञान यापायीच झगडे संभवतात हे स्पष्ट दिसते.

## भावना आणि व्यवहारकुशलता

भारतात भावना आणि व्यवहारकुशलता असे जणू दोन वेगवेगळे भागच पडले आहेत. बंगाल, बिहार, ओरिसा, आसाम हे पूर्वेकडील प्रांत भावनावान आहेत, तर राजस्थान, महाराष्ट्र, गुजरात ह्या पश्चिमेच्या प्रांतांत व्यवहारकुशलता अधिक आढळते. सेवकात भावना आणि व्यवहारकुशलता ह्या दोन्ही गोष्टी हव्यात. भारतात हिशोबी वृत्ती एकूण कमीच. मी प्रत्येक काम गणिताने करतो. एकदा विनोदाने मी म्हणालो, मरतानादेखील घड्याळ पाहिल्याशिवाय मी

मरणार नाही ! प्राण जायला किती वेळ लागला ते मी पाहीन. प्रत्येकाने गणित-पूर्वक काम करावे हे ठसवण्यासाठी मी ही गोष्ट सांगितली."

## बादशहाखानांची भेट

खान अबदुल गफारखान हे गांधीजींच्या अहिंसक लढयातील एक थोर सेनानी. गांधीकुलात त्यांचा अपार गौरव. त्यांची अपरंपार ईश्वरी श्रद्धा, त्यांचे धर्ममय जीवन, गरीबांविषयीचा त्यांचा कळवळा, विधायक कार्याबद्दलची त्यांची निष्ठा, सर्व गोष्टी गांधीकुलात आदर्श गणल्या जात. परंतु स्वातंत्र्य मिळताना देशाची फाळणी झाली आणि स्वातंत्र्य मिळाल्यानंतर हा देशभक्त तुरुंगांत खितपत पडला. एकदा एक कार्यकर्ता विनोबांना म्हणाला, "स्वातंत्र्यानंतर स्वातंत्र्यवीराला अखंड तुरुंगवास भोगावा लागतो याबद्दल तुम्हांला काय वाटतं ?"

विनोबा म्हणाले, "प्रभूचे मार्ग अतर्क्य असतात. गफारखानांची ईश्वर-श्रद्धा फार सखोल आहे."

विनोबांची पाकिस्तानातून सोळा दिवस यात्रा झाली. त्या वेळी गफार-खानांचे स्मरण त्यांना किती वेळा झाले! गफारखान मोकळे असते तर पाकिस्तानात भूदानसदृश असे काही कार्य त्यांनी निश्चितच केले असते. तिथल्या कार्यकर्त्यांना मोठा आधार झाला असता. पाकिस्तानातील अमानुष जातीयतेशी त्यांनी मुकाबला केला असता.

गफारखान पाकिस्तानच्या तावडीतून सुटून काबूलला आले तेव्हा विनोबांनी त्यांना पत्र पाठवले.

"प्रिय बादशहाखान,

स्वातंत्र्य स्वीकारताना आम्ही तुमच्यावर फार मोठा अन्याय केला, पण तुम्ही सगळे शान्तपणे सोसले. आम्हांला तुमच्यापासून स्फूर्ती मिळते. आता रुहानियत म्हणजे अध्यात्मच प्रश्न सोडवील. राजकारणाने प्रश्न सुटतील असे वाटत नाही. तुम्ही मुळात प्रभूचे भक्त. प्रभूच्या लेकरांचे सेवक. राजकारण हा तुमचा पिंड नव्हे. अहिंसा आणि आत्मक्लेश यांवर तुमचा अढळ विश्वास. जगाचे प्रश्न सोडवण्याचे साधन ईश्वर तुम्हांला बनवू पाहात असावा. प्रभू करील ते प्रमाण. बशिरीस साब्रिन—"

गांधीजन्म-शताब्दी-वर्षात गफारखान भारतात आले तेव्हा त्यांना भेटण्यासाठी विनोबा बिहारमधून वर्ध्याला परत आले. दोघांची झालेली भेट अपूर्व म्हणावी लागेल ! कित्येक वर्षांनी ते भेटले. पुन्हा त्यांची भेट जानेवारी १९७० मध्ये वर्ध्याला झाली. गफारखान 'अल् विदा' करण्यासाठी, निरोप घेण्यासाठी जणू आले होते. खुदाई खिदमतगारांसाठी खादीचे हजार गणवेश तयार करून गफारखानांना देण्याचा कार्यक्रम होता. गफारखान म्हणाले, "मला गणवेश घालणारे खिदमतगार नको आहेत. मला हे गणवेश कशाला ?"

खादीवाले खट्टू झाले. त्यांची भावना निर्मळ आणि गफारखानांचा विचार शुद्ध. विनोबांनी यातून मार्ग काढला.

ते म्हणाले, "खानसाहेब, तुम्ही गरीबीचं व्रत घेतलं आहे. दोनच्या पेक्षा जास्त कपडे तुम्ही बाळगीत नाही. तेव्हा तुमचा वापरलेला पोषाख आठवण म्हणून आम्हांला द्या आणि यांतला एक तुम्ही ठेवून घ्या."

आणि गफारखानांनी तो पोषाख स्वीकारला. सर्वांची मने आनंदली.

## विस्मरणाचा इलाज

परमेश्वराने विस्मरणाची शक्ती देऊन माणसावर फार उपकार केले आहेत, असे विनोबा म्हणतात. सर्वच गोष्टी ध्यानी राहिल्या असत्या तर ती एक भयंकर गोष्ट झाली असती, असे त्यांना वाटते. एके दिवशीचा हा प्रसंग : दोन पक्षांचे कार्यकर्ते उखाळ्यापाखाळ्या विनोबांसमोरच काढीत होते. एकमेकांचा पूर्वेतिहास सांगत होते, त्यामुळे परस्परांशी सहकार्य करणे अशक्य आहे, असे म्हणत होते.

विनोबा मध्येच एकदम म्हणतात, "समजा, आता मी तुम्हांला लाथ मारली तर ही बैठक पुढे चालू शकेल ?" विनोबांच्या तोंडून अचानक अशी भाषा ऐकून लोक बुचकळ्यात पडतात. परस्परांच्या तोंडांकडे पाहू लागतात.

विनोबा म्हणतात, "त्याचं असं आहे की, मागच्या जन्मी मी होतो गाढव आणि तुम्ही होता कुत्रे. आपल्यात भांडण झालं. तुम्ही मला चावला. तुम्हांला एक सणसणीत लाथ ठेवून द्यायचा विचार मनात आला तो तुम्ही पळून गेलात ! आता ती गोष्ट आठवून मी विचार करू लागलो तर लाथ मारायला हवी. कारण आता संधी आहे. चालेल का आपली बैठक ? पण मी

विसरून गेलो की मी गाढव होतो, तुम्ही विसरून गेलात की तुम्ही कुत्रे होतात. त्यामुळं आता आपण प्रेमानं इथं बोलत बसलो आहोत. विस्मरण ही एक मोठीच शक्ती आहे ! ”

## सूक्ष्मात प्रवेश

एकोणीसशे सहासष्टपासून विनोबा ‘ आपण आता सूक्ष्मात प्रवेश करणार ’ असे म्हणू लागले. स्थूल सेवेच्या काही मर्यादा असतात. त्यानंतर यदृच्छा लाभावर माणसाने संतोष मानायला शिकले पाहिजे. सेवेचाही आग्रह किंवा आसक्ती सोडली पाहिजे. म. गांधी व अन्य नेते अखेरच्या श्वासापर्यंत अशी स्थूल सेवा करीत राहिले, व त्यामुळे अनुयायी पंगू आणि काहीसे आत्मविश्वास-हीनही जणू बनले ! विनोबांची इच्छा कार्यकर्ता व सेवक स्वतंत्र विचाराचा आणि आत्मविश्वासाने कार्य करणारा बनावा. त्याच दृष्टीने त्यांनी गण-सेवकत्वाची कल्पना मांडली होती.

१८ एप्रिल १९५१ रोजी पोचमपल्लीला पहिले भू-दान मिळाले. तेव्हापासून अहर्निश संचार आणि भाषणे, प्रवचने, विचारविनिमय, चर्चा असा सततचा कार्यक्रम सुरू झाला. दिवसाकाठी तीन तीन कार्यक्रम त्यांचे पंधरा वर्षे सतत झाले. याचा अर्थ १५ हजार वेळा तरी ते जाहीररीत्या लोकांशी बोलले. भाषणांचा—संभाषणांचा हा एक उच्चांकच म्हटला पाहिजे.

१९१६ साली विनोबा घराबाहेर पडले. ‘ अथातो ब्रह्मजिज्ञासा ’ ही त्यांची त्या वेळी तळमळ होती. १९६६ साली या गोष्टीला अर्धशतक पूर्ण झाले. हे अर्धशतक प्रायः स्थूल सेवेतच गेले. विनोबांनी ‘ साम्यसूत्रे ’ नावाने जी सूत्रे आपले जीवनाचे तत्त्वज्ञान गुंफणारी रचली त्यांत ‘ क्रियोपरमे वीर्यवत्तरम् ’ असे एक सूत्र रचले आहे. त्याचा अर्थ विशद करताना ते म्हणतात, “ जसजशी बाह्य क्रिया कमी होत जाईल तसतसे कार्य अधिकाधिक वीर्यवान झाले पाहिजे. ”

२५ मार्चला विनोबांनी घर सोडले होते, आणि ७ जूनला त्यांना गांधीजींचे पहिले दर्शन झाले होते. तेव्हा यांपैकी कोठल्या तरी एका दिवशी किंवा उशिरात उशिरा म्हणजे ११ सप्टेंबरला स्वतःच्या जन्मदिनी सूक्ष्मात प्रवेश करायचा असे विनोबांच्या मनाने घेतले होते. विनोबांच्या वयाची ७१ वर्षे त्या दिवशी पूर्ण होणार होती.

सूक्ष्मात प्रवेश करण्याचे पहिले पाऊल म्हणून विनोबांनी आपला सर्व पत्रव्यवहार प्रायः बंद करण्याचे ठरवले. लोकांनी आत्मनिवेदनपर पत्रे पाठवावी. विनोबा मात्र पत्रव्यवहाराबाबत संपूर्ण उदासीनता पत्करणार होते. अर्थात ज्यांना तळमळ वाटेल त्यांना विनोबांकडे येण्याची आणि चर्चा करण्याची मुभा त्यांनी ठेवलीच होती.

## दर्शनाभिलाषा

विनोबांनी आता पत्रव्यवहार बंद केला आहे. कोणी समक्ष आले तर चर्चा करतात, विचारविनिमय करतात. ' आता मी चेंबर प्रॅक्टिस करतो ' असे ते गमतीने म्हणतात. पण ही चेंबर प्रॅक्टिस फार मोठी आहे. नाना ठिकाणचे, नाना प्रकारचे लोक येतात. नाना प्रश्नांबद्दल चर्चा च ालते. कार्यकर्त्यांशी पत्रव्यवहार नसला तरी त्यांचे स्मरण असते. विनोबांनी आता धोशा लावला आहे की, " सर्व कार्यकर्त्यांची छायाचित्रं मागवून घ्या. मला त्याचा एक अल्बम तयार करायचा आहे. रोज त्याच्यावरून नजर फिरवीत जाईन. सर्व कार्यकर्त्यांचं स्मरण, शुभचिंतन करीत जाईन ! "

## आठवड्याचा कार्यक्रम

विज्ञानाचे युग म्हणजे योजनापूर्वक काम करण्याचे युग. अठरा वर्षे योजनापूर्वक विनोबांचे कार्यक्रम आखले जात. त्यात थोड्या लवचिकपणालाही वाव असे. पण महिनोन महिने आधी कार्यक्रम ठरे. नकाशा-कॅलेंडर घेऊन कार्यक्रम बनवला जाई. पण आता वेगळीच योजना आहे. आठवड्यापेक्षा जास्त दिवसांचा कार्यक्रम ठरवायचाच नाही. खडे लष्कर जसे केव्हाही, कुठेही तत्परतेने धाव घेते त्याप्रमाणे मोकळीक हवी. आठवड्याच्यावर स्वतःला बांधूनच घ्यायचे नाही.

या निमित्ताने एक आठवण झाली. एकदा एक तरुण गृहस्थ विनोबांकडे गेले. गप्पागोष्टी झाल्या. म्हणाले, " एक वर्ष त्या कामाला मी देणार आहे. "

विनोबा म्हणाले, " एक वर्ष काम करण्याची प्रतिज्ञा पार पाडणं सर्वस्वी आपल्या हातचं नाही. मध्येच मृत्यूनं घेरलं तर प्रतिज्ञापालनात अडथळा येणार. त्यापेक्षा आमरण काम करण्याची प्रतिज्ञा करणं हे रास्त ! म्हणजे त्यात निदान प्रतिज्ञा मोडल्याचा तरी दोष पदरी येण्याचा संभव नाही. "

## संत-दरबारात घटकाभर

विनोबांच्या संत-दरबारात तास-दोन तास बसले, तिथल्या गप्पा-गोष्टी, चर्चा ऐकल्या तरी कान तृप्त होतात. एक दिवस ते आपल्या जीवनाचे रहस्यच जणू सांगत होते. म्हणाले, "आजवर किमान चाळीस हजार ग्रंथ मी वाचले आहेत. माझी ग्रंथ वाचण्याची एक विशिष्ट पद्धत आहे. ग्रंथ एकदा सबंध चाळायचा, महत्त्वाचा वाटणारा भाग काळजीपूर्वक वाचायचा. १९२२ ते १९२८ रोज आठ तास श्रम मी केले. अर्धा तास अध्ययन करावं, आणि बाकीचे साडेतेवीस तास त्याचं पचन करावं असं मला वाटतं. 'श्रमामाजी श्रम शेतीचा उत्तम' असा माझा अनुभव आहे."

एका आसामी कार्यकर्त्याशीही चर्चा चालू होती. विनोबांचे ज्ञानेश्वरीवरील अपरंपार प्रेम पाहून आपणही ज्ञानेश्वरी वाचावी अशी उत्कंठा त्याला लागून राहिली होती. विनोबांच्या वाणीत ज्ञानेश्वर डोकावत असतो. तो म्हणाला, "आसामीमध्ये ज्ञानेश्वरीचा अनुवाद व्हायला हवा. निदान आपली ज्ञानदेव चिंतनिका तरी आसामीत हवी."

विनोबा म्हणाले, "आसामी भाषेत ज्ञानेश्वरीचा अनुवाद किती खपणार ? पण ढाक्याहून बंगालीत पंचवीस वर्षांपूर्वी ज्ञानेश्वरी प्रसिद्ध झाली होती. तिची प्रत मी पाहिली होती. तिची दुसरी आवृत्ती निघत आहे. आसामी लोकांनी ती वाचावी."

स्त्रियांना होणाऱ्या त्रासाचा विषय निघाला. तेव्हा विनोबा म्हणाले, "इव्ह–टीझिंग होते आणि स्त्रियांनी अशा प्रसंगी कोणाला मारलं तरी ते क्षम्य मानलं पाहिजे. आतून भीती वाटता कामा नये. त्यांनी निर्भयपणं अशा प्रकारांना तोंड दिलं पाहिजे. आमच्या पदयात्रेतही स्त्रियांना क्वचित असा त्रास झाला आहे. बिहारमध्ये देवघरला आमच्यावर सनातन्यांनी हल्ला केला तेव्हा स्त्रियांनाही त्यांनी त्यातून वगळले नाही ! सेलमलाही असा प्रकार झाला तेव्हा त्या मुलीनं त्या माणसाला प्रसाद दिला !"

त्या दिवशी अस्वस्थ तरुण पिढीपैकी दोन इटालियन आले होते. विनोबांचे इंग्रजी क्वचितच ऐकायला मिळते. कुठल्याही सार्वजनिक स्वरूपाच्या कार्यक्रमात ते कधी इंग्रजी बोलत नाहीत. व्यक्तिगत भेटीत इंग्रजीचा वापर

करतात, पण असे प्रसंग क्वचित. त्या इटालियन तरुणांशी बोलताना त्यांचे इंग्रजीवरील प्रभुत्व किती आहे, आणि किती सुंदर, मार्मिक इंग्रजी ते बोलतात ते दिसून आले. त्यांना विनोबा म्हणाले, "क्रियेचा उगम प्रेमातूनच होत असतो हे विसरू नये. पूर्वेचं मन, पश्चिमेचं मन असं काही वेगळं नसतं. मानवाच्या भवितव्याबद्दल मी निराश नाही. भीती असेल तिथं शिक्षण असू शकणार नाही. प्रेमशक्तीच्या क्षितिजाचा विकास केला पाहिजे."

## विज्ञानयुग म्हणजे विचारांचं युग

महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांशी चर्चा करताना अनेक गोष्टींवर त्यांनी प्रकाश टाकला. ते म्हणाले, "विज्ञानानं जग जवळ आणलं आहे. विज्ञानयुग म्हणजे विचारांचं युग आहे. चिंतन बंदिस्त असता कामा नये, ते मोकळं असलं पाहिजे. अवघ्या विश्वात अनंतता आहे. तेव्हा तिचं भान ठेवलं की आपली वृत्ती स्वागतशील राहते. लहानपणापासून माझ्या मनात एक गमतीची कल्पना येत राहिली आहे. जीवाचा विकास एक पेशीकडून अनेक पेशींपर्यंत झाला. आपण पंचेन्द्रियांचे आहोत. उद्या कोणी षडेन्द्रिय, सप्तेन्द्रिय माणूस या पृथ्वीच्या पाठीवर आला तर आपल्याला वस्तूत जेवढे गुण आढळतात त्यापेक्षा अधिक गुण त्याच्या ध्यानी येतील. समजा, अशा माणसापुढं सोन्याचे दोन तुकडे ठेवले. आपल्याला ते दोन्ही सारखेच वाटतील. पण तो म्हणेल, तुम्ही हे दोन्ही सोन्याचे तुकडे आहेत असं म्हणत असला तरी त्यातलं एक सोनं आहे आणि दुसरं टोनं आहे. आणि या टोन्यात सोन्यापेक्षाही औषधी गुण जास्त आहेत ! आपण ही शक्यता गृहीत धरली पाहिजे. एक गोष्ट आठवते या संदर्भात.

"आंधळ्यांच्या समाजात एक डोळस जन्माला आला. तो सांगू लागला की तुम्ही जे फूल फूल म्हणता ना, त्याला सुगंध आहे. त्याला मऊ मुलायम स्पर्श आहे. पण त्याला सुंदर सुंदर रंगही आहेत ! तेव्हा ते लोक त्याला म्हणाले, बाबा रे, तुझ्यात काही तरी विकृती निर्माण झालेली दिसते. तुला आता डॉक्टरांकडे नेऊन तपासून घेतलं पाहिजे, तुझ्यात आलेली ही विकृती दूर केली पाहिजे. मग त्याला डॉक्टरांकडे नेण्यात आलं. डॉक्टरांना त्याच्यात निर्माण झालेली विकृती त्यांनी सांगितली. डॉक्टर म्हणाले, तुम्हांला माहीत नसलेले त्या फुलात काही तरी आहे असं हा म्हणतो, ती याची विकृती काढून टाकायची

तर ह्याचं ऑपरेशन केलं पाहिजे. त्या अंधांनी आनंदानं संमती दिली. त्या मुलाचे डोळे काढल्यानंतर तो ' नॉर्मल ' झाला ! "

विश्वाच्या अनंततेवरील विश्वास हीच आस्तिक्यबुद्धी असते. ती असली की माणूस निराश होऊ शकत नाही. विनोबांना निराशा कधी शिवत नाही. ' आनंदाचे डोही आनंद तरंग, आनंदची अंग आनंदाचे ' अशी त्यांची वृत्ती असते !

## मुंगीशी दोस्ती

एकोणीसशे चौपन्न साली, भूदान यात्रेत असताना, एक सायकल-स्वाराची धडक विनोबांना बसली होती, आणि डावा पाय दुखावला होता. सोळा वर्षांनी पुन्हा त्याच जागी पुन्हा दुखू लागले. शेकाचा इलाज त्यावर सुरू झाला. हा शेक चालू असताना नेमकी एक मुंगी तिथे यायची आणि घोटाळायची. विनोबा तिच्याकडे पाहायचे.

एक दिवस ते म्हणाले, " काल आलेलीच ही मुंगी असेल का ? माझ्याशी दोस्ती करायला तर ती येत नसेल ना ? "

एक दिवस म्हणाले, " ज्ञानदेव महाराजांनी सिद्ध–पुरुषाचं वर्णन मोठं बहारीचं केलं आहे.

**मग समुद्रापैलाडी देखे, स्वर्गींचा आलोचु आइके ।**
**मनोगत ओळखे, मुंगीचेये ॥**

त्याला समुद्रापलीकडे दिसतं, स्वर्गातील संगीत ऐकू येतं आणि मुंगीचं मनोगतदेखील तो ओळखतो. "

तुकारामांचा ' मुंगी आणि राव । आम्हा सारखाची जीव ॥ ' हा चरण त्यांना एकदा आठवला.

एक दिवस वावटळ आली. गारांचा पाऊस झाला. त्या दिवशी ती मुंगी आली नाही. विनोबा म्हणाले, " आज ती दिसली नाही; कसं चुकल्या-चुकल्यासारखं वाटतं आहे ! "

असे कुसुमकोमल आहे विनोबांचे अंतःकरण.

## सर्वश्रेष्ठ पुरुष अव्यक्त

विनोबा सहज बोलता बोलता म्हणाले, " जगातले सर्वश्रेष्ठ पुरुष बहुधा अव्यक्तच राहतात; प्रकाशात कधी येतच नाहीत. जे प्रसिद्ध होतात ते

पुष्कळदा महापुरुषांचे दुसऱ्या क्रमांकाचे शिष्य असतात. पहिल्या क्रमांकाचे बहुधा अज्ञातच राहतात. शंकराचार्यांचेच उदाहरण घेऊ या. शंकराचार्यांना लोक ओळखतात, पण त्यांचे गुरू गोविंद पूज्यपाद, त्यांना किती लोक ओळखतात? शंकराचार्यांपेक्षा त्यांची योग्यता अधिक असली पाहिजे असं मला वाटतं. शंकराचार्य झाले नसते तर त्यांचं नावदेखील फारसं कोणाला कळलं नसतं. दुसरं उदाहरण, ज्ञानदेवांचे गुरु आणि वडीलबंधू निवृत्तिनाथ यांचं ज्ञानदेव झाले नसते तर त्यांचं नावही आपल्याला कळलं नसतं!"

## अनोखी वस्तू पाहिली

नागपूरच्या कमलाताई होस्पेट. त्यांनी मातृसेवा संघ ही संस्था आपले मातृत्व व्यापक करण्यासाठी काढली आहे. अनेक ठिकाणी त्यांची सूतिकागृहे. वर्ध्यात एक. तिथल्या भगिनींनी विनोबांना पाचारण केले. एक दिवस दुपारी विनोबा सूतिकागृहात गेले. तिथल्या एका दोन दिवसांच्या मुलाला त्यांनी पाहिले. त्याचा हात हातात घेतला. मूठ उघडून पाहिली.

नंतर ते म्हणाले, "आजवर कधी न पाहिलेली एक गोष्ट मी इथं पाहिली : दोन दिवसांचं बाळ! त्याला पाहताच मनात अनेक भावनांचं वादळ उठलं. आई! केवढी तिच्यावर जबाबदारी! एका मुलाचा प्रतिपाळ करायचा. भू-दान–ग्रामदानापेक्षा हे काम अवघड आहे!" पुढे म्हणाले, "एकदा लक्ष्मीनारायण मंदिरात कृष्णजन्म पाहायला गेलो. नाटक होतं. देवकीच्या यातना पाहून मी घाबरून गेलो. इतक्या यातना मी आईला दिल्या! परमेश्वरा, अशा यातना कोणाही मातेला पुन्हा माझ्यामुळं न होवोत, अशी मनोमन मी करुणा भाकली!"

## दरिद्रनारायण पुरे

विनोबांचा मुक्काम गोपुरीतल्या शान्तिकुटिरात होता. दिवसभरचा त्यांचा कार्यक्रम रेखीव. लोक लांबलांबून भेटायला येत. विनोबांची कित्येक दिवसांत भेट झाली नाही म्हणून कार्यकर्त्यांना ओढ लागे. येऊन भेटत. चर्चा करीत. ताजेतवाने होऊन परत जात. इतक्या लोकांना बसायचे उठायचे, कोणी तरी गावातल्या लक्ष्मीनारायण मंदिरातून मोठ्या सतरंज्या भाड्याने आणल्या. बसाय-उठायची सोय झाली. विनोबांना त्याची काहीच माहिती नव्हती.

एक दिवस त्यांच्यापाशी कोणी तरी कुजबुजले, “ भाड्याच्या सतरंज्या किती दिवस इथं आता राहणार ? लक्ष्मीनारायण मंदिराकडे भाडं भरावं लागेल ! ”

लक्ष्मीनारायणाचे ते मंदिर विनोबांच्या हस्ते उघडलेले. विनोबांना स्वतःला त्या सतरंज्यांची काहीच जरूर नव्हती. एका घोंगडीवरही त्यांचे भागले असते. पण येणाऱ्या सर्व मूर्ती नारायणाच्या. त्यांना आदराने, भक्तीने, प्रेमाने बसवणे म्हणजे लक्ष्मीनारायणालाच बसवणे. पण एवढा समजूतदारपणा सगळ्यांजवळ कोठला ?

विनोबांचे नित्याचे कार्यक्रम सुरूच होते. साडेसहा महिने त्यांना गोपुरीमधल्या शान्तिकुटिरात येऊन झाले होते. बहुधा सतरंज्यांची चर्चा त्यांच्या मनात तशीच होती. सध्या विनोबांचे वेदांचे परिशीलन चालू आहे. सव्वा-अकरा वाजता विनोबा उठून डेस्कापाशी बसले. त्यांच्या भोवती इतर मंडळीही बसली. विनोबांनी वेदाचे पुस्तक उघडले आणि अचानक म्हणाले, “ आज सात जून. चौपन्न वर्षांपूर्वी बरोबर याच तारखेला मी गांधीजींकडे गेलो. पन्नास वर्षं त्यांच्या आदेशानुसार काम केलं. चार वर्षांपूर्वी ते सर्व त्यांना अर्पण करून मुक्त झालो. आज सात जूनचीच तारीख. पवनारला ब्रह्मविद्यामंदिरात जावं वाटतं. ”

कोणी म्हणाले, “ नका, नका. इथंच राहा. ”

विनोबाजी इतरांना म्हणाले, “ काय रे तुमचं काय म्हणणं आहे ? लक्ष्मीनारायण आपल्याला नको, दरिद्रीनारायण आपला सखा; तोच बरा. ”

जयदेवभाई म्हणाले, “ ठीक आहे. ”

कोणी म्हणाले, “ आवराआवर करायची आहे. उन्हं उतरल्यावर जाऊ. ”

विनोबा म्हणाले, “ आवराआवर करून तुम्ही या नंतर. ”

आणि साडेअकरा वाजता गोपुरातील शान्तिकुटिर सोडून विनोबा पवनारच्या दिशेने निघालेदेखील. एका हातात काठी, दुसऱ्या हाती जयदेव भाईंचा हात. सव्वा मैल रपेट केल्यावर गाडी आली, आणि तिच्यात बसून विनोबा पुढे गेले.

## जातिवाद कालबाह्य

जातिवाद ही आपल्या देशाला लागलेली एक भीषण अशी कीड आहे. जातिवाद अमुक प्रदेशात नाही असे सांगणेच अवघड. राजकारणालासुद्धा जातींनी ग्रासले आहे. जातिवादाचा उच्छेद करायला निघालेले राजकीय पक्ष-देखील जातीच्या गोतावळ्यात गळफटलेले दिसतात! निवडणुकींमुळे जातीयतेला खतपाणी मिळते. आपल्या निवडणुकीतील यशासाठी राजकीय पक्ष विनदिक्कतपणे जातीयतेचा वापर करतात. केरळ राज्यात डाव्या पक्षांचा जोर, असे म्हटले जाते. पण तिथे ब्राह्मण, नायर आणि इळवा या तीन जातींचा उपयोग यशासाठी राजकीय पक्ष करतात. भरीला तेथे तीन धर्मही आहेत. ख्रिस्ती, हिंदू, आणि मुसलमान. ह्या षड्रिपूंच्या हातांत निवडणुकीमुळे राजकारण सापडते. वर वेगवेगळ्या राजकीय पक्षांच्या टिळेमाळा आणि आत जातींच्या मतशक्तीचा वापर करण्याची योजकता! मतदार संघांची रचना करतानाही एकेका जातीचे निखळ बहुमत व्हावे अशा पद्धतीने ती केली जाते. एखादा मतदार संघ केवळ नायरांचा असतो, आणि मग प्रत्येक पक्ष नायर उमेदवारच निवडण्याच्या खटपटीत असतो! सर्व प्रांतांत कमबेशी प्रमाणात हाच प्रकार. आंध्रात कम्युनिस्ट आहेत. त्यांना कॉमरेड म्हणतात. पण विनोबांनी त्याची नवी व्युत्पत्ती तेथे जाणली. 'कॉमरेड म्हणजे खम्मा अँड रेड्डी टुगेदर.' खम्मा आणि रेड्डी यांची साठगाठ म्हणजे कॉमरेड! खम्मा आणि रेड्डी या तिथल्या दोन प्रमुख जाती.

गौतम बुद्धांनी जातिवादावर पहिला मोठा प्रहार केला. त्यांनी स्त्री–शूद्रांना संन्यासाचा अधिकार दिला. पण आज त्याबद्दल काही सांगू लागले तर लोक म्हणतात, "बुद्धांनी संन्यासाचा अधिकार दिला खरा, पण आम्हांला कुठे संन्यास घ्यायचा आहे? आम्हांला त्याचा काय उपयोग?"

आधुनिक काळात राजा राममोहन राय यांच्यासारख्यांनी जातिवादा-वर प्रहार केला, पण शहरांपलीकडे त्याचा प्रभाव अद्यापही पोचलेला नाही.

पूर्वी आत्मोद्धारक मंत्रांनाही जातीयतेचा फास असे! 'ॐ नमः शिवाय' हा मंत्र ब्राह्मणांना 'ॐ'सह, आणि ब्राह्मणेतरांना 'ॐ' वगळून दिला जात असे! मालवीयजीदेखील असे करीत. विनोबांनी त्याबद्दल त्यांच्याशी वाद घातला होता. मालवीयजींनी विनोबांचा युक्तिवाद मान्य केला, पण म्हणाले,

" लोकांना हे रुचलं पाहिजे ना. " आणि त्यामुळे फक्त ' नमः शिवाय ' एवढाच मंत्र ते देत राहिले. शेवटी संतांनी ' रामकृष्ण हरी ' हा मंत्र चालू केला. ' ॐ नमः शिवाय ' मंत्र सर्वांना देऊन जातीयतेची हकालपट्टी करण्याऐवजी त्यांनी त्या मंत्राचीच हकालपट्टी करून टाकली ! गांधीजींनी जातीयतेवर प्रहार केला, पण तो विचकत विचकत केला. सेल्फ ॲडजस्टमेंट (आत्मसमाधान) आणि कोएक्झिस्टन्स (सहअस्तित्व) ह्या दोन गुणांमुळे मुळात जातिभेद निर्माण झाला व टिकला, पण आज तो कालबाह्य झाला आहे, असे विनोबांना वाटते. आर्थिक एकाता आणि आध्यात्मिक एकता यांच्या आधाराने गावाचे एक कुटुंब बनवण्याचा निकराने प्रयत्न केला तरच जातिवादाला आळा बसू शकेल, अन्यथा नाही. भारतातील बहुसंख्य जनता खेड्यात राहते, आणि तिथून जर जातिवादाचे उच्चाटन करता आले नाही तर सगळे व्यर्थ. ग्रामदान याचा अर्थ ग्रामपरिवार असाच होतो; आणि त्यामुळे राजकीय लोकशाही आर्थिक व सामाजिक क्षेत्रांतही अवतरू शकेल. आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रांत साम्य आणि प्रेम निर्माण न होईल तर राजकीय लोकशाहीदेखील अस्तास जाईल. ग्रामदानाचा हा पैलू महत्त्वाचा, पण उपेक्षित आहे.

## भ्रष्टाचार

भारतीय जीवनात भ्रष्टाचाराचा सर्वत्र बुजबुजाट झाला आहे. त्याबद्दल तावातावाने बोललेही जाते; पण भ्रष्टाचाराचे क्षेत्र नित्य जणू वाढतेच आहे ! विनोबा एकदा याबाबत बोलताना म्हणाले, " भारतातला काळा बाजार तर काळा आहेच, पण साधारण बाजारदेखील काळाच आहे. आणि हे काही आजचं प्रकरण नाही. जुन्या काळापासून हे सगळे चालत आलं आहे. आज पैशांना मर्यादेबाहेर महत्त्व चढलं आहे; आणि त्यातूनच भ्रष्टाचार फोफावतो. पैशांचं महत्त्व कमी केल्याखेरीज भ्रष्टाचार कमी होणार नाही. होईल इतकेच की, तुम्ही माझ्यापाशी भ्रष्टाचाराबद्दल नाराजी व्यक्त कराल आणि मी तुमच्या-जवळ करीत राहीन. आज भ्रष्टाचार हाच भारतात शिष्टाचार बनला आहे; आणि त्यात जे सामील होणार नाहीत त्यांचा तो फार तर विशिष्टाचार समजला जातो, पण त्याला अशिष्टाचार कोणीच मानीत नाही ! " विनोबांना भ्रष्टा-चाराच्या सर्वव्यापीपणाचे भान आहे. ते एकदा तर म्हणाले, " भ्रष्टाचारात माझा काहीच संबंध नाही अशी ग्वाही देणं मलादेखील शक्य नाही. "

भारतात भ्रष्टाचाराला शिष्टाचार बनण्वयासाठी मामूल, दस्तूर, भेट, नजराणा इत्यादी नावे रूढ आहेत; आणि तो एक रिवाजच बनला आहे.

## लाँग रेंज – शॉर्ट रेंज

बंगालमधील नक्शलवाद्यांचे लोण विहारमधल्याही काही भागांत पसरले. सर्वोदयवाद्यांना ते आपले विरोधक मानतात. दहशतवादाला न दबता काम करणारे, गरीबांचा उमाळा असणारे हे कार्यकर्ते. शान्ततेच्या मार्गाने, सौहार्दाने काम करणारे. अवघा गाव एक परिवार व्हावा म्हणून धडपडणारे. मुझफरपूर जिल्ह्यातील मुसहरी खंडातील दोन कार्यकर्त्यांना दहशतवाद्यांनी खुनाची धमकी दिली तेव्हा जयप्रकाश आपले सर्व कार्यक्रम रद्द करून तिकडे गेले. विनोबांना फार आनंद झाला. जयप्रकाशांसारखा बहाद्दूर माणूसच हे कार्य करू शकतो. जयप्रकाशजी मुसहरी भागात गेले ते ग्रामदान हा नक्शलवादावरील प्रभावी उतारा आहे हे समजावण्यासाठी गेले. नक्शलवादाचा उगम ज्या जमिनीवरील मालकी हक्कातून होतो ती मालकीच ग्रामदानामुळे एकदा विसर्जित केली म्हणजे प्रश्नच राहात नाही ! नक्शलवादाला पायबंद घालण्याचा हाच एक मार्ग आहे. पोलिस हे कार्य करू शकत नाहीत. विचारांचा मुकाबला विचाराने, आणि कृतीचा मुकाबला गरीबांच्या उमाळ्याच्या उत्कट कृतीनेच केला जाऊ शकतो ! विनोबा १९५१ साली तेलंगणात गेले त्या वेळी जशी परिस्थिती तेथे होती– जवळपास तशीच परिस्थिती मुसहरी भागात होती.

विनोबा जयप्रकाशांच्या निर्णयाची बातमी ऐकून म्हणाले, “ आपल्यापुढे दोन आव्हानं आहेत. एक आहे कम्युनिझमचं आणि दुसरं आहे कम्युनॅलिझमचं. देशातले गरीब लोक असंतुष्ट असले तर त्याचा गैरफायदा चीन उचलू शकेल, आणि जातीय तणाव असला तर पाकिस्तान त्याचा गैरफायदा घेईल. हे दोन देश आपल्या शेजारी आहेत. आपण विषमतेचा, गरीबीचा प्रश्न शान्ततामय मार्गांनी सोडवला, आणि हिंदू–मुसलमानांत स्नेह–सौहार्द निर्माण केलं तर ह्या दोन्ही देशांची डाळ शिजणार नाही. हिंदू–मुस्लिम प्रश्नाकडे मी लाँग रेंज प्रश्न म्हणून, आणि विषमतेच्या प्रश्नाकडे शॉर्ट रेंज प्रश्न म्हणून पाहतो. जमिनीचा प्रश्न अविलंब सोडवला पाहिजे; आणि हिंदू–मुस्लिम प्रश्नासाठी दीर्घकाळ खटपट करीत राहिले पाहिजे. पण सरकार मात्र नेमका या उलट

विचार करीत आहे. हिंदू-मुस्लिम प्रश्नाबाबत काही तरी करायला ते उतावीळ झाले आहेत, पण विषमतेबाबत त्यांना कसलीच घाई नाही ! ”

एका कार्यकर्त्याजवळ बोलताना ते म्हणाले, “ बिहारमध्ये आपली कसोटी लागणार आहे. बिहारमध्ये आपण त्या कसोटीला उतरलो तर बंगालवर त्याचा परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. पण तसं न झालं तर दहशतवाद बिहारमध्येही फैलावेल. नक्शलवाद्यांनी काही जमीनदारांचे मुडदे पाडले आहेत. एखाद दिवशी जयप्रकाशांच्या खुनाची बातमी आली तरी आश्चर्य वाटायला नको ! जयप्रकाशांप्रमाणं निर्मला देशपांडे दुसऱ्या एका प्रखंडात काम करीत आहे. जर येत्या वर्षात आपण काही प्रभावी करू शकलो नाही तर नक्शलवाद बिहारमध्ये घुसेल. देशातील राजकीय पक्ष क्षीण झाले आहेत. त्यांच्यावरचा लोकांचा विश्वास उडाला आहे. काँग्रेस भंगली आहे. इतर पक्षांतही फाटाफूट आहे. कोणत्या क्षणी कोणतं सरकार कोसळेल ते सांगणं अवघड. या अस्थिरतेतून देश वाचवायचा असेल तर ग्राम-स्वराज्याची स्थापना झाली पाहिजे. सरकारांच्या पडापडीनं गावात अस्थिरता येता कामा नये. पक्षमुक्त सरकार आणि सरकारमुक्त जनता-या दिशेनं १९७२ पर्यंत आपण काही करून दाखवलं पाहिजे. मोठ्या प्रमाणावर ग्रामदान संकल्प जाहीर केलेल्या बिहार आणि तमिळनाडू राज्यात ग्रामस्वराज्य काही प्रमाणात तरी आपल्याला समूर्त करता आलं पाहिजे. अन्यथा अगतिकपणं देशाची दुर्दशा पाहाणं आपल्याही वाट्याला येईल. ”

## बंगाल आणि बिहार

सध्या विनोबांच्या डोक्यात बंगाल आणि बिहार हा विषय आहे. बिहारचे काम पूर्ण करून बंगालवर त्याचा प्रभाव पडेल असा एक विचार, आणि सरळ बंगालला जाऊन आपल्या शक्तीची कसोटी करावी हा दुसरा विचार. बंगालमधील बलरामपूर हे क्षितीशबाबूंचे क्षेत्र. खुद्द कलकत्त्यातही आघाडी उघडली जाऊ शकते. कित्येक वर्षांपूर्वी विनोबांनी सांगितले होते की, कलकत्त्यात हजार तरी शान्तिसेवक हवेत. अग्निशामक दल जसे झपाट्याने धावून जाते तसे अशान्तिक शमनार्थ धावून जातील असे शान्तिसेवक !

बिहारमध्ये आपण जावे असे विनोबांना एकसारखे वाटते. पण एक तर जयप्रकाश त्यांना म्हणाले की, “ आम्हांला आमची सगळी ताकद एकदा लावू

द्या, नाही जमले तर मग तुम्हांला साद घालूच." त्यामुळे विनोबा अद्याप तिकडे गेलेले नाहीत. शिवाय सूक्ष्मात प्रवेश केल्याने अनंत कामे होऊ शकतात अशी विनोबांची श्रद्धा आहे. एका ठिकाणी बसून सर्वांनी अभिध्यान केले तर त्याचाही प्रभाव पडू शकला पाहिजे, असे त्यांना वाटते.

सुलभ ग्रामदान प्रक्रियेत बिहार आला आहे, आणि तमिळनाड एवढयात येईल असे दिसते. तेव्हा त्या ठिकाणी आता नवरचनेचे काम हाती घ्यावे असे त्यांना वाटते. त्याचबरोबर इतर राज्यांत जिथे जिल्हादान झाले आहे तिथेही काम सुरू करावे असे त्यांचे मत आहे. जयप्रकाश ज्या मुझफरपूर जिल्ह्यातील मुसहरी प्रखंडात काम करीत आहेत त्याच्या आसपास सर्वांनी शक्ती लावावी व ते काम पूर्ण करून टाकावे, असा मार्ग ते सुचवतात. राजकीय पक्षांकडून काही घडेल अशी आशा आता लोकांना फारशी राहिलेली नाही. अशा स्थितीत ग्रामदानाची नीट उठावणी करता आली तर लोकांतील निराशा अस्तास जाऊ शकेल, असे विनोबांना वाटते.

देशात हिंसेचे प्रचंड थैमान चालले आहे, लोक विभिस्त झाले आहेत असे जे वातावरण आहे असे समजले जाते तसे ते वास्तवात नाही, १९७२ पूर्वी जर काही प्रभावी करता आले नाही तर राजकीय पक्षांकडून झाली तशीच निराशा सर्वोदय विचारकांकडून झाली असे वाटून लोक अगतिकपणे भलत्या मार्गाकडे वळण्याचा धोका आहे असे मात्र विनोबांना वाटते.

## विनम्र अभिवादन

विनोबाजी हे स्वतंत्र प्रज्ञेचे पुरुष आहेत. त्यांची प्रगाढ विद्वत्ता, प्रखर बुद्धिमत्ता, अपूर्व स्मरणशक्ती, त्यांची ध्येयनिष्ठा, त्यांचे धगधगीत वैराग्य, त्यांची सेवावृत्ती, त्यांची ईश्वरशरणता, त्यांची साधुता, त्यांची तपश्चर्या, त्यांची अलोट इच्छाशक्ती, त्यांचा नियमितपणा आणि व्यवस्थितपणा, त्यांची अनासक्ती, त्यांची नम्रता, त्यांची निर्भयता, त्यांची भेदातीत वृत्ती, कशा-कशाचे म्हणून वर्णन करावे ?- किती त्यांचे गुण गावेत ? युगायुगातून अशी विभूती जन्माला येते विनोबांचे चरित्र हा अपार सागर आहे. त्याचे वैभव आणि विशालत्व नित्य वाढते आहे. ' सागरे सर्वतीर्थाणि ' असे म्हणतात. विनोबांच्या जीवनात सर्व गुणांचा सागर जणू एकवटला आहे.

भू-दान–ग्रामदानाच्या यशापयशाची चर्चा–चिकित्सा करायची त्यांनी खुशाल करावी. विनोबांनी आपली सर्व शक्ती पणाला लावून या देशाची सेवा केली असाच निर्वाळा सर्वांना द्यावा लागेल. गेली पन्नासावर वर्षे केवढा अवाढव्य कर्मयोग त्यांनी आचरून दाखवला आहे, मन विस्मयचकित होते ! ते यशापयशाच्या कल्पनेपासून निर्लिप्त आहेत. नागपूरला ते म्हणाले, “ इथे शिवाजी आणि लक्ष्मीबाई यांचे पुतळे बसवले आहेत. शिवाजीचा पुतळा हा पराकोटीच्या सफल प्रयत्नांचा गौरव, तर लक्ष्मीबाईंचा पराकोटीच्या असफल प्रयत्नांचा गौरव ! मी स्वतःबद्दल असे मानतो की, सफल झालो तर शिवाजी–आणि असफल झालो तर लक्ष्मीबाई होईन ! ”

त्यांची पंचाहत्तर वर्षे पूर्ण होत आहेत. ‘ वृद्धत्वं जरसाविना ’ जरेविना त्यांना वृद्धत्व लाभले आहे. त्यांच्या पुण्यपावन मूर्तीस विनम्र अभिवादन. त्यांच्या कार्यात खारीप्रमाणे अल्पस्वल्प सेवा बजावता आली तरी जीवन धन्य होईल.

